# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

### एम. ए. भाग २ : मराठी

सत्र ३

# आधुनिक समीक्षा सिद्धांत

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून

**आधुनिक समीक्षा सिद्धांत**
एम.ए.भाग २ : मराठी
२०२४ पासून होणाऱ्या परीक्षांसाठी

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२५
एम. ए. भाग २ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ६००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-93-49570-62-7

■ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी. पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**अभ्यासमंडळ : मराठी**

अध्यक्ष : **डॉ. रणधीर शिंदे**
मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. नंदकुमार विष्णू मोरे**
  मराठी विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. शितल सचिन गोरडे-पाटील**
  विलिंग्डन कॉलेज, सांगली.
- **डॉ. अरुण कृष्णा शिंदे**
  नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अ‍ॅण्ड कॉमर्स, कोल्हापूर
- **डॉ. गोमटेश्वर एस. पाटील**
  महावीर महाविद्यालय, कोल्हापूर
- **डॉ. संदीप मारुती दळवी**
  श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली.
- **डॉ. सागर अशोक पाटील**
  कन्या महाविद्यालय, मिरज, जि. सांगली.
- **डॉ. श्यामसुंदर मिरजकर**
  कला व वाणिज्य महाविद्यालय, मायणी.
- **डॉ. प्रकाश महादेव दुकळे**
  देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली.
- **डॉ. सर्जेराव सदाशिव जाधव**
  यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, जि. कोल्हापूर
- **डॉ. गोविंद गंगाराम कजरेकर**
  गोगटे-वाळके महाविद्यालय, बांदा, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग
- **डॉ. रमेश साळुंखे**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, जि. कोल्हापूर
- **डॉ. अशोक सदाशिव तावर**
  लाल बहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स, सातारा.
- **डॉ. तातोबा कल्लाप्पा बदामे**
  पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगांव, जि. सांगली.

## संपादकीय

आधुनिक समीक्षा सिद्धांत ही अभ्यासपत्रिका एम. ए. भाग-०२ च्या सत्र ०३ साठी आहे. या अभ्यासपत्रिकेमध्ये १. समीक्षेचे स्वरूप २. समीक्षा पद्धती आधुनिकता वाद व उत्तर आधुनिकता वाद ३. सांस्कृतिक समीक्षा ४ देशीवाद इत्यादी घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. समीक्षा प्रस्तुत स्वयं अध्ययन साहित्यामध्ये अभ्यासक्रमासाठी नियुक्त कलाकृतींचे घटकनिहाय लेखन केलेले आहे. प्रत्येक घटकाचे लेखन अभ्यासपूर्ण रीतीने व आकलन सुलभ भाषेत केलेला आहे. घटकाच्या प्रारंभी उद्दिष्टे नमूद केलेले असून उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रस्तुत घटक लेखनातील विषय विवेचन व मूल्यमापन आपणास दिशादर्शक आहे. अभ्यासक्रमासाठी नियुक्त केलेल्या पुस्तकांचा आशय व्यापक असून त्यांचा सूत्रबद्ध आढावा घेण्याचा प्रयत्न घटकलेखनामध्ये केलेला आहे.

या पुस्तकांमध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु यामध्ये काही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात; त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले, पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

■ **संपादक** ■

**डॉ. रणधीर शिंदे**
मराठी अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**आधुनिक समीक्षा सिद्धांत**
**एम. ए. भाग–२ (सत्र–३)**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. देवानंद सोनटक्के**<br>डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव, जि. सातारा | १ |
| **डॉ. गजानन अपिने**<br>मॉर्डन कॉलेज, पुणे | २ |
| **डॉ. धनंजय प्रभाकर देवळालकर**<br>राजाराम कॉलेज, कोल्हापूर | ३ |
| **डॉ. रवी लोंढे**<br>मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४ |

■ **संपादक** ■

**डॉ. रणधीर शिंदे**
मराठी अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका

## आधुनिक समीक्षा सिद्धांत


| | | |
|---|---|---|
| घटक १ | समीक्षेचे स्वरूप | १ |
| घटक २ | समीक्षा पद्धती : आधुनिकतावाद व उत्तर–आधुनिकता | २५ |
| घटक ३ | **सांस्कृतिक समीक्षा** | ७५ |
| घटक ४ | देशीवादी समीक्षा | ९३ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२४-२५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक १
## समीक्षेचे स्वरूप

### १.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो !

या घटकात आपण साहित्य समीक्षेच्या स्वरूपाचा अभ्यास करणार आहोत. हा अभ्यास करताना आपण खालील उद्दिष्ट्ये ठरवली आहेत.

- साहित्य समीक्षा संकल्पना समजून घेणे.
- समीक्षेचे उद्दिष्ट व कार्य जाणून घेणे.
- समीक्षेचे प्रकार समजून घेणे.
- आधुनिक समीक्षेच्या विविध पद्धती समजून घेणे.
- समीक्षेच्या विविध सिद्धांतांचा परिचय करून घेणे.

### १.१ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रांनो,

पहिल्यांदा आपण समीक्षा व साहित्य समीक्षा संकल्पना समजून घेऊ. समीक्षा म्हणजे, एखाद्या साहित्यकृतीच्या गुणदोषांचे परीक्षण आणि मूल्यमापन करणारे लेखन अथवा समीक्षण होय. एखाद्या संहितेवरील खंडनमंडनात्मक, युक्तिवादात्मक, स्वतःचे मत व्यक्त करणारे, स्पष्टीकरणास अथवा विस्ताराने केलेल्या निरूपणास मराठीत 'टीका' असाही शब्द योजला जातो. ही टीका म्हणजेच समीक्षा होय. ग्रंथांशिवाय, नाटक, चित्रपट, संगीत, नृत्य अशा कृतींचेही समीक्षण केले जाते. (मराठी विश्वकोश)

या शिवाय समीक्षेसाठी, सिंहावलोकन, समालोचन, पुनरावलोकन, परीक्षण, भाष्य, टीका अशा संज्ञा देखील मराठीत वापरल्या जातात. इंग्रजीत समीक्षेस Review असा शब्द वापरला जातो. त्याचा शब्दशः अर्थ 'पुनरावलोकन' हा आहे. लोकांकडून जो Review होतो त्यास इंग्रजीत Peer review असे म्हणतात. Peer review ही संज्ञा समीक्षा शब्दाशी मिळती जुळती आहे.

### १.२ साहित्यसमीक्षेचे स्वरूप

समीक्षा ह्या लेखनप्रकारात साहित्यविषयक प्रश्नांची चर्चा करणारे लेखन व साहित्याच्या संदर्भातील सैद्धांतिक स्वरूपाचे लेखन येते. म्हणजे समीक्षापर लेखन हे तात्त्विक (थिअरेटिकल) आणि उपयोजित (ॲप्लाइड) अशा प्रकाराचे असते. त्यावरून समीक्षेचे तात्त्विक आणि उपयोजित हे दोन मुख्य प्रकार मानले जातात.

तात्त्विक समीक्षा किंवा सैद्धांतिक समीक्षा - साहित्यकृतीचे स्वरूप कसे असते, तिला आकार कसा प्राप्त होतो, साहित्याची निर्मितिप्रक्रिया कशी असते, लेखकाचे व्यक्तिमत्त्व साहित्यकृतीत कसे प्रकटते, साहित्यकृतीची रचना किंवा फॉर्म (आकृतिबंध) कसा साकारतो, वाचकाला साहित्याचा आस्वाद कसा येतो, तो त्याची रसप्रक्रिया व आस्वाद प्रक्रिया कशी असते, इत्यादी तात्त्विक प्रश्नांची चर्चा करणारे लेखन म्हणजे तात्त्विक समीक्षा किंवा सैद्धांतिक समीक्षा होय.

उपयोजित समीक्षा - प्रत्यक्ष वाचलेल्या साहित्यकृतीचे स्वरूप, तिचे मर्म, तिचे रहस्य, प्रत्यक्ष आस्वाद कसा होता, कोणत्या अनुभवाला वाचक सामोरे गेला. लेखकाचे व्यक्तिमत्त्व व सभोवताल साहित्यातून कसा प्रकटला, साहित्यकृतीने कोणते योगदान दिले; इत्यादी प्रत्यक्ष साहित्यकृतीच्या गुणदोषांची चर्चा करणारे लेखन म्हणजे उपयोजित समीक्षा होय. या समीक्षेत लेखकाच्या संपूर्ण साहित्याचे मूल्यमापन करणारे लेखन, तसेच लेखनतंत्राचा उलगडा करणारे लेखन ह्यांचाही समावेश होतो.

मात्र ही सैद्धांतिक-उपयोजितही वर्गवारी व त्यातील लेखन यांच्या निश्चित व काटेकोर अशी सीमारेषा आखता येत नाही. कारण सैद्धांतिक स्वरूपाच्या समीक्षेतही विशिष्ट साहित्यकृती व लेखक यांचे संदर्भ तसेच विवरण-विश्लेषण येणे जसे स्वाभाविक ठरते. तसेच उपयोजित समीक्षेतही विशिष्ट लेखकाच्या साहित्यकृतीच्या अनुषंगाने सैद्धांतिक चर्चा येत असते.

## १.३ समीक्षेचे उद्दिष्ट किंवा ध्येय

साहित्यसमीक्षेचे पहिले उद्दिष्ट म्हणजे साहित्यकृतीचे समग्र आकलन अथवा दर्शन हे असते. साहित्यकृती वाचताना काही टप्पे असतात. ही प्रक्रिया पुढील क्रमाने घडते- प्रथम साहित्यकृतीचे अर्थग्रहण केले जाते. त्यानंतर तिचे गुणग्रहण, रसग्रहण, मर्मग्रहण, सौंदर्यग्रहण ह्या गोष्टी येतात. त्यासाठी आस्वाद-आकलन-मूल्यमापन व अर्थनिर्णयन या प्रक्रिया घडून येतात. समीक्षा साहित्यकृती ज्या साहित्यप्रकारात मोडते, त्या साहित्यप्रकारातील अन्य कृतींमध्ये तिचे स्थान काय आहे, ती त्या कृतींहून श्रेष्ठ असल्यास तिची श्रेष्ठता वा महात्मता कशात आहे, हेही समीक्षक सांगण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यामुळे समीक्षेचे दुसरे उद्दिष्ट साहित्यकृतीचे मूल्यमापन व अर्थनिर्णयन हे ठरते.

समीक्षेचे तिसरे उद्दिष्ट म्हणजे वाचकांच्या अभिरुचीला वळण लावण्याचे कामही समीक्षा साधत असते. म्हणजे समीक्षा हा एक असा शोध आहे; की कोणत्याही साहित्यकृतीचे स्वरूप, तिची वैशिष्ट्ये, तिचे सौंदर्य, तिच्या महात्मतेचे रहस्य ह्यांचा शोध समीक्षक स्वत:साठी घेत असतो.

समीक्षेची जी विविध उद्दिष्टे आहेत, त्यांना अनुसरुन समीक्षेचे वेगवेगळे प्रकार आणि तिच्या पद्धती निष्पन्न होतात. उदा., साहित्यसमीक्षेतील अर्थग्रहण ही पायरी घेतली, तरी केवळ अर्थाला प्राधान्य देणारा संस्कृत टीकेचा प्रकार समोर येतो. हे करण्यास साहित्यकृतीची मूळ अधिकृत संहिता अगर पाठ निश्चित करणे आवश्यक असते. ते करणारा समीक्षाव्यापार हा पाठचिकित्सा ह्या नावाने ओळखला जातो.

## १.४ समीक्षेचे कार्य

साहित्याचे सौंदर्य कशात असते, ह्याबाबतीत पूर्वकल्पना असल्यास त्या सौंदर्याचे ग्रहण वाचक-रसिकांस सुलभ होते. अशा पूर्वकल्पनांतूनच साहित्याचे शास्त्र घडत जाते. हे विचार सुटे सुटे मांडणे किंवा ह्या सर्वांची एका व्यापक अशा उपपत्तीमध्ये मांडणी करणे, हेही समीक्षेचेच कार्य आहे.

साहित्याच्या केवळ सौंदर्याचे स्वरूपच नव्हे, तर मुळात साहित्य म्हणजे काय हे सांगण्याचे मूलगामी स्वरूप म्हणजे समीक्षा असते. ह्यांशिवाय साहित्यविषयक अनेक प्रश्नांची चर्चा करणे, हेही समीक्षेचे कार्य ठरते. उदा., साहित्यापासून आपण कोणत्या अपेक्षा करतो? साहित्य आणि समाजाचा संबंध काय? तर साहित्याच्या आस्वादाने केवळ आनंद द्यावा की काही बोधही? आनंदाचा अनुभव द्यावयाचा असलाच, तर तो केवळ मनोरंजनाच्या स्वरूपाचा, की तो त्यापेक्षा अधिक उच्च द्यावा. हा बोध मानवी जीवनदर्शनाचा असावा की मनुष्याच्या भावजीवनाचा असावा? बोध असला, तरी त्या बोधाला नैतिक आग्रहाचे स्वरूप असावे, की परतत्त्वस्पर्शाचे असावे? इ. अनेक प्रश्न समीक्षेच्या चर्चेच्या कक्षेत येतात.

साहित्य आणि समीक्षा परस्परांना पूरक असतात. साहित्य गुणवत्तेने समृद्ध झाले आणि समीक्षाही प्रतिसादशील राहिली, तर साहित्याप्रमाणेच समीक्षाही गुणवत्तेने श्रीमंत होते. समीक्षक हा साहित्याची पूर्वपरंपराही डोळसपणे पाहतो, तिचे आणि साहित्यातील नवतेचे नाते शोधतो, नव्या दृष्टीने जुन्याचे नव्याने मूल्यमापन करतो, हे सर्व साहित्याच्या दृष्टीने उपकारक असते.

## १.५ समीक्षेचे प्रकार

साहित्याचे स्वरूप, साहित्याची निर्मितिप्रक्रिया, साहित्याचा आस्वाद, आस्वादाचे स्वरूप, विविध ज्ञानशाखांचे व विविध सिद्धांत यांचे उपयोजन यानुसार समीक्षेचे विविध प्रकार संभवतात. आधुनिक साहित्यसमीक्षेच्या काही प्रकारांचे विवेचन पुढे केले आहे.

### १.५.१ रूपनिष्ठ समीक्षा

एखाद्या साहित्यकृतीचे साकल्याने रूपदर्शन घडविणारी टीका म्हणजे रूपनिष्ठ समीक्षा होय. ह्या समीक्षेत एखाद्या साहित्यकृतीची तांत्रिक अंगे, तसेच त्या साहित्यकृतीचा आकार वा रूपबंध (फॉर्म) ह्यांचा विचार करण्यात येतो. साहित्यकृतीचा आकार वा रूपबंध हा तिच्यातील आशयाला किती अनुरूप आहे, तो प्रमाणबद्ध आहे की नाही, त्या साहित्यकृतीची अंगे परस्परानुकूल, सुसंगत आणि त्या साहित्यकृतीच्या रूपबंधाशी वा आकृतीशी योग्य प्रमाण साधणारी आहेत की नाही, त्या सबंध कृतीला एकात्मता लाभलेली आहे की नाही, ती एक संपूर्ण आणि स्वयंपूर्ण वस्तू ठरते का इ. विचार हा आकारिक वा रूपवादी (फॉर्मल) समीक्षेचा गाभा आहे.

म्हणजे समजा एखादी कथा असेल, तर तिचा आकार म्हणजे प्रारंभ, मध्य, शेवट कसा आहे. किती पात्रे आहेत, त्यांचे चित्रण कसे आहे. नायक-खलनायक, सद्गुण-दुर्गुण यांचा समतोल आहे का, कथेचा

आशय, पैस योग्य आहे का- इत्यादींचा विचार करणे-थोडक्यात आशयापेक्षा आकाराला महत्त्व देणे म्हणजे रूपवादी समीक्षा होय.

साहित्यकृतीचा रूपबंध हा सेंद्रिय असून तो साहित्यसमीक्षेच्या केंद्रस्थानी असतो. साहित्यकृती म्हणजे तिच्या घटका-घटकांमधील परस्परसंबंधांची एकात्म संघटना असते आणि ती एक स्वायत्त, स्वयंपूर्णवस्तू असते, ही रूपवादाची तात्त्विक भूमिका होय. (संदर्भ: विकिपीडिया)

मराठीत बा. सी. मर्ढेकरांनी रूपवादी समीक्षेची पायाभरणी केली. कलाकृतीला केंद्र असते, तिची रचना तिच्यातील भावानुभावाच्या संघटनेने बनलेली असते. तिच्यातील घटकां-मध्येच संवाद विरोध आंनी समतोल असतो. ती तिचा निर्माता म्हणजे लेखक व वाचक यांच्यापासून स्वायत्त आहे. तिच्यावर कोणाचेही नियंत्रण नाही. - असे मर्ढेकरी रूपवादाचे म्हणणे आहे. मर्ढेकरांच्या नंतर वा. ल. कुळकर्णी, पु. शि. रेगे, गंगाधर गाडगीळ, सुधीर रसाळ, द. भि. कुळकर्णी अशी रूपवादी समीक्षेची परंपरा सांगता येईल.

### १.५.२ न्यायिक समीक्षा

समीक्षा जसजशी प्रगत होत जाते, तसतशी तिला साहित्यातील सौंदर्यसाधनेविषयी काही रहस्ये वा नियम अवगत होत जातात. त्यातून साहित्याचे एक शास्त्र निर्माण होत जाते. त्याचे ग्रंथ निर्माण होतात आणि त्या शास्त्राचे नियम म्हणजे साहित्य व्यवहारातील कायदे होऊन बसतात व साहित्यकृतीच्या यशापयशाविषयीचे निर्णय या कायद्यांना धरून दिले जातात. म्हणून ह्या प्रकारच्या समीक्षेस ‘न्यायिक समीक्षा’ (ज्यूडिशिअल क्रिटिसिझम) असे म्हटले जाते. (संदर्भ : विश्वकोश)

म्हणजे समजा मार्क्सवाद आशय, साहित्याचा इतिहास आणि समाजाशी असलेला संबंध, सामाजिक उत्पादन संबंध, सामाजिक मानवी संबंध, त्यातील उतरंड, आर्थिक विषमता यांना महत्त्व देते. म्हणजे ही त्या समीक्षेची सैद्धांतिक तत्त्वे म्हणजे नियम आहेत. या नियमांच्या आधारेच साहित्यकृती श्रेष्ठ व कनिष्ठ ठरवली जाते. न्यायिक समीक्षेचे स्वरूप असे असते. पण अशी समीक्षा कडक, ताठर आणि ठराविक चौकटीतच वावरते  चौकटीबाहेरील काही करू पाहणाऱ्या साहित्यकृतीवर तिच्याकडून अन्याय होण्याचा संभव असतो.

### १.५.३ आस्वादक समीक्षा

न्यायिक समीक्षेच्या उलट भूमिका घेणारी समीक्षा म्हणजे आस्वादक समीक्षा होय. काटेकोर नियमांना धरुन समीक्षेचे कार्य कोरडेपणाने न करता ते सहानुभूतीने व रसिकतेने केले पाहिजे, ह्या विचारातून आस्वादक समीक्षा जन्माला आली. समीक्षा म्हणजे एक आस्वादन होय. समीक्षकाची भूमिका आस्वादकाची असली पाहिजे. प्रत्येक साहित्यकृती ही एक स्वतंत्र व अनन्यसाधारण अशी निर्मिती असते. तिची स्वत:ची अशी काही वैशिष्ट्ये असतात. समीक्षकाने त्यांचे ग्रहण करून त्यांचा आस्वाद घ्यावयाचा असतो. रसिकतेने घेतलेल्या ह्या आस्वादाचे त्याच्या मनावर झालेले परिणामही अशा समीक्षेत तो नोंदवू शकतो.

मराठीमध्ये अशी आस्वादक समीक्षा बा. सी. मर्ढेकर (बालकवींच्या 'खेड्यातील रात्र'ची समीक्षा), गंगाधर गाडगीळ, माधव आचवल, नरहर कुरुंदकर, कुसुमावती देशपांडे, द. भि. कुलकर्णी, त्र्यं. वि. सरदेशमुख, विजया राजाध्यक्ष, भालचंद्र नेमाडे यांनी अशी समीक्षा लिहिली आहे.

कवितेच्या आस्वादाच्या बाबतीत ही अधिक लोकप्रिय आहे. मात्र अशी समीक्षा वैयक्तिक अनुभवाला अधिक महत्त्व देत असल्याने ती मूळ आशयापेक्षा अधिक भरकटत जाण्याची शक्यता असते. मराठीत आस्वादात्मक समीक्षा विपुल आहे. वाचनाचे संस्कार असे मांडण्याला आत महत्त्व दिले जाते. आत्मपरता, गौरवपारता व अलंकारिक भाषा हे आस्वादात्मक साहित्याचे वैशिष्ट्य होय.

### १.५.४ चरित्रात्मक समीक्षा

चरित्र म्हणजे एखाद्या व्यक्तीचे आयुष्य होय. त्याला जसे जगण्याचे संदर्भ असतात. त्यांच्या मागचे पुढचे आयुष्य असते. तसे साहित्यकृतीलाही मागचे -पुढचे संदर्भ असतात, अशी ही समीक्षा मानते. अर्थात हे संदर्भ लेखकाचे असतात असे ही समीक्षा मानते. प्रत्येक साहित्यकृती ही विशिष्ट स्थळ-काळ-परिस्थितीत जगत असलेल्या लेखकाची निर्मिती असते आणि त्या स्थळ-काळ-परिस्थितीने घडविलेल्या त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तित्वाचे प्रतिबिंब त्याच्या साहित्यकृतीत पडलेले असते. त्याची शैलीही त्याच्या व्यक्तित्वातूनच आकाराला आलेली असते. त्यामुळे साहित्यकृतीचे आकलन, अर्थनिर्णयन आणि मूल्यमापनही त्याच्या जीवनाच्या तपशिलांच्या जाणकारीने शक्य होते, अशी चरित्रात्मक समीक्षेची भूमिका आहे.

मर्ढेकरांच्या कवितेची अशी समीक्षा 'तरीही येतो वास फुलांना' या ग्रंथात म. वा. धोंड यांनी केली आहे. त्यांनी मर्ढेकरांचे खासगी आयुष्य- त्यांचे विवाह, त्यांची नोकरीमुळे बदललेली ठिकाणे आणि मर्ढेकरांच्या कवितेतील ओळी यांचा संबंध जोडला आहे. उदा. 'कितीतरी दिवसांत नाही नदीत डुंबलो' अशी ओळ आली याचा अर्थ त्यावेळी मर्ढेकर हे गावापासून दूर होते, असा अर्थ लावत त्यासाठी मर्ढेकरांच्या डायऱ्या व पत्रे आधार घेतला आहे. 'खानोलकरांच्या शोधात' या ग्रंथातही जया दडकर यांनी चिं. त्र्यं. खानोलकर यांच्या चरित्राचा व साहित्याचा संबंध शोधला आहे.

मात्र अशा समीक्षेचा अवलंब विवेकानेच व्हायला हवा. साहित्यकृतीतील लहानसहान तपशिलांचा संबंध प्रत्येक वेळी साहित्यिकाच्या जीवनातील घटनांशी लावणे धोक्याचे ठरेल. कारण, एकतर त्याचे विश्वसनीय चरित्र उपलब्ध असेलच असे नाही आणि असलेच तर, त्यात त्याचे जीवन स्पष्ट झालेले असेलच असे नाही. त्याच्या साहित्यकृतीचा संबंध तर त्याच्या अंतर्जीवनाशीच अधिक असतो, मात्र ते चरित्रात पूर्णपणे आलेच नसेल तर ओढूनताणून संबंध जोडण्याचा धोका या समीक्षेत असतो.

### १.५.५ समाजशास्त्रीय समीक्षा

लेखक ज्या समाजात जन्माला येतो, त्याच समाजात साहित्यकृती जन्मास येत असते. त्यामुळे साहित्यिक आणि त्याचा समाज ह्यांच्यातील संबंध महत्त्वाचे असतात. समाजाशिवाय लेखक व साहित्यकृती

ह्या विचारातून समाजशास्त्रीय समीक्षा निर्माण झाली. फ्रेंच समीक्षक हिपोलित तेन ह्याने साहित्यकृतीची चिकित्सा करण्यासाठी वंश, परिस्थिती आणि क्षण हे तीन घटक अभ्यासिले पाहिजेत, असा विचार मांडला. त्याच्या मते, 'वंश' म्हणजे लेखकाचे उपजत आनुवांशिक गुण; 'परिस्थिती' म्हणजे त्याची सामाजिक, राजकीय, भौगोलिक पार्श्वभूमी; आणि ज्या ऐतिहासिक स्थितीत लेखक लिहित असतो, तिला तेन 'क्षण' म्हणतो.

म्हणजे प्रत्येक साहित्यकृती ही 'वंश', 'परिस्थिती', आणि 'क्षण' या तत्त्वांनी तपासता येते असे या समीक्षेचे म्हणणे आहे.

साहित्य हा समाज जीवनाचा आरसा आहे. असे म्हंटले जाते. समाजाचे साहित्यात प्रतिबिंब असते ते याच अथाने म्हंटले जाते. साहित्याचा समाज, परिस्थिती, भूगोल, वातावरण आणि भाषेशी अतुट संबंध असतो.

**१.५.६ मार्क्सवादी समीक्षा :**

मार्क्सवादाने एक सर्वांगीण जीवनदर्शन मांडले आहे. इतिहास, समाज, संस्कृती, त्यातील मानवाचे परस्पर संबंध, त्यांची आर्थिक परिस्थिती इत्यादींचा विचार करत अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र ह्या क्षेत्रांत स्वत:ची एक ठाम भूमिका मांडली. ह्या पार्श्वभूमीवर साहित्यक्षेत्रात मार्क्सवादी साहित्यसमीक्षा निर्माण झाली. कार्ल मार्क्स (१८१८-८३) आणि फ्रीड्रिख एंगेल्स (१८२०-९५) ह्यांनी विरोधविकासात्मक भौतिकवाद आणि ऐतिहासिक भौतिकवाद ह्यांच्या आधारे कलेची व साहित्याची मीमांसा केली. त्यातूनच मार्क्सवादी समीक्षा आकाराला आली.

या समीक्षेच्या मते, साहित्य ही एक स्वतंत्र आणि समाजनिरपेक्ष अशी वस्तू नाही. ती एक सामाजिक गोष्टच आहे. त्यामुळे साहित्यसमीक्षेची स्वतंत्र मूल्ये न मानता, सामाजिक मूल्येच त्यासाठी अधिकृत मानावी, हा मार्क्सवादी दृष्टिकोण आहे.

साहित्याने वास्तवाचे म्हणजे आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक वास्तवाचे दर्शन घडविले पाहिजे, असे ही समीक्षा मानते. भांडवलशाहीने निर्माण केलेल्या आत्यंतिक व्यक्तिवादातून फोफावलेला 'कलेसाठी कला' हा कलावादी संप्रदाय तसेच रूपवादी संप्रदाय स्वीकारू नये, असा या समीक्षेचा आग्रह आहे. साहित्याचे प्रयोजन साम्यवादी समाजरचना अस्तित्वात आणण्यास पोषक असले पाहिजे, त्यात आध्यात्माला स्थान असू नये, अशी मार्क्सवादी समीक्षादृष्टीची काही वैशिष्ट्ये सांगता येतील.

कलेचा विचार करताना तिच्या सामाजिक-आर्थिक-सांस्कृतिक संदर्भांचा, म्हणजेच तिच्या ऐतिहासिक आशयाचा विचार करावाच लागतो, कारण त्यातूनच ती निष्पन्न होत असते, हे मार्क्सवादी समीक्षेचे मूलभूत तत्त्व होय.

### १.५.७ मानसशास्त्रीय समीक्षा :

प्रसिध्द मानसशास्त्रज्ञ सिग्मंड फ्रॉइड (१८५६-१९३९) ह्याचे ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांचा साहित्यसमीक्षकांवरही प्रभाव पडला आणि त्यातून मानसशास्त्रीय साहित्यसमीक्षा उदयास आली. फ्रॉइडच्या कल्पनांचा समीक्षेवरील पहिला प्रभाव म्हणजे साहित्यिकाच्या आंतरिक जीवनाचा, त्यातील आंतरिक संघर्षांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने त्याच्या साहित्यकृतीकडे पाहणे- हा होय. म्हणजे लेखकाचे मन, त्याचे मानसिक व्यक्तिमत्त्व, त्याचा मानसिक संघर्ष यांचा साहित्यातून शोध घेणे ही समीक्षा महत्त्वाचे मानते.

फ्रॉइडने माणसाच्या व्यक्तिमत्त्वातील इदम् किंवा सुप्तात्मा (इड) हा भाग त्याने माणसाच्या अबोध मनाचे प्रतिनिधित्व करणारा मानला. माणसाच्या अनेक इच्छा, वासना, विकार ह्या इदम्मध्ये वास्तव्य करून असतात. लेखकाच्या विशिष्ट साहित्यकृतीतून ह्या इदम्चा आविष्कार अप्रत्यक्षपणे कसा घडतो, हे पाहण्यात समीक्षकांना स्वारस्य निर्माण झाले. स्वत: फ्रॉइडने प्रख्यात कलाकृती मोनालिसाचे चित्र या कलाकृतीचा मनोविश्लेषणशास्त्राच्या आधाराने सूक्ष्म वेध घेतला. मनोविश्लेषणाच्या आधारे कलानिर्मिती विषयीचे सिद्धांत मांडले.

विल्यम शेक्सपिअरच्या 'हॅम्लेट' नाटकातील नायक, त्याचे मन, त्यांच्या मानसिक संघर्ष, मनाच्या कल्पनांनी प्रत्यक्ष पात्रांचे रूप घेणे व नाटकात वावरणे यांचे विश्लेषण मानसशास्त्रीय समीक्षेनेच पहिल्यादा मांडले.

### १.५.८ आदिबंधात्मक समीक्षा :

कार्ल युंग (१८७५-१९६१) या मानसशास्त्रज्ञाने आदिबंधाची वा मूलबंधाची संकल्पना मांडली. त्याने असे दाखवून देण्याचा प्रयत्न केला, की काही कवितांचे भावनात्मक आवाहन वाचकांकडे विशेष तीव्रतेने पोचते. ह्याचे कारण वाचकांच्या मनातल्या सामूहिक अबोध (कलेक्टिव्ह अन्कॉन्शस) शक्ती त्या कवितांमुळे उत्तेजित होतात. ह्या शक्ती म्हणजे काही 'आदिबंध' वा 'मूलबंध' (आर्किटाइप्स) आणि 'मूलप्रतिमा' वा 'आद्यतन प्रतिमा' (प्रिमॉर्डिअल इमेजिस) होत. आता हे सामूहिक अबोध मन म्हणजे काय?

सिग्मंड फ्रॉइडने मानवी मनाचे मन आणि अंतर्मन असे दोन भाग मानले आहेत, मनात दडपलेल्या भावना, वासना, विकार, इच्छा या प्रत्यक्ष पूर्ण झाल्या नाहीत तर त्या अंतर्मनात दडून बसतात नंतर त्या बाहेर पडतात, असे सांगितले. अंतर्मनाला जोडून पुढे युंग या शास्त्रज्ञाने अंतर्मनाच्या पलीकडे असलेली 'सामूहिक अबोधमन' संकल्पना मंडळी. व्यक्ती जया समूहात राहतो, त्या समाजाच्या नेणिवेत सामुहिक भावना दडून बसलेल्या असतात, असे त्याचे म्हणणे होते.

माणसांच्या सामूहिक अबोध मनात (कलेक्टिव्ह अन्कॉन्शस) मानवजातीच्या अनेक पिढ्यांच्या एकाच प्रकारच्या असंख्य अनुभवांचे साठलेले अवशेष असतात. ते काही विशिष्ट प्रतिमांमधून संघटित आणि साकार होतात. हे साकारणे ज्या आदिम आकृतिबंधाकडून होते, त्याला आदिबंध वा मूलबंध अशी संज्ञा त्याने वापरली. युंगने अशा अनेक प्रकारच्या आदिबंधांचे स्वरूप स्पष्ट केले.

उदा. उत्पती, विकास आणि लय हा एक आदिबंध मानवी समूहाच्या अबोध मनात आहे. तसेच जन्म, विकास, मृत्यू हा एक आदिबंध आहे. त्यामुळे शिल्पकला व अधर्म साहित्यात ब्रह्मा, विष्णू, महेश अशा प्रतिमा आल्या आहेत.

मॉड बॉडकिन ह्या प्राध्यापिकेने युंगप्रणीत आदिबंधाच्यासिद्धांताचा आधार घेऊन 'आर्किटायपल पॅटर्न्स इन पोएट्री' (१९३४) हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाने आदिबंधात्मक समीक्षेचा पाया घातला. फ्रेंच मनोविश्लेषणवादी सिद्धांतकार झाक लाकाँ (१९०१-८१) ह्याने साहित्यकृती, संरचना, तिच्यामधून जाणवणारे अबोध अर्थ इत्यादींचा विचार केला. संहिता आणि वाचक ह्यांच्यातील परस्परसंबंध ह्याचाही त्याने विचार केला. फ्रॉइडच्या अबोध मनाच्या वा नेणिवेच्या सिद्धांताला पुढे नेणारे विचार त्याने मांडले व १९५९ मध्ये पॅरिस येथे त्याने 'नीओ-फ्रॉइडियन' (नव-फ्रॉइडवादी) गटाची स्थापना केली. (संदर्भ-विकिपीडिया)

## १.६ आधुनिक समीक्षा पद्धती आणि विचारप्रणाली परिचय

विद्यार्थी मित्रांनो,

समीक्षेची संकल्पना, समीक्षेचे उद्दिष्ट, समीक्षेचे कार्य व समीक्षेच्या विविध पद्धती पाहिल्यानंतर आता आधुनिक समीक्षा पद्धती व विचारप्रणालींचाचा परिचय करून घेऊया.

साहित्यात आधुनिकतावाद, उत्तर-आधुनिकतावाद, नवसमीक्षा, संरचनावाद, उत्तर-संरचनावाद, विरचनावाद, वाचकनिष्ठ समीक्षापद्धती, वाचक-प्रतिसाद सिद्धांत, वाचक-ग्रहण सिद्धांत, स्त्रीवादी समीक्षा, नव-इतिहासवाद, उत्तर-वसाहतवाद, सांस्कृतिक समीक्षा, साहित्याचे परिस्थितिविज्ञान व पर्यावरणीय समीक्षा इ. अनेकविध विचार-प्रणाली व समीक्षा-सिद्धांत विसाव्या शतकात उदयास आले.

मराठी साहित्यसमीक्षा-व्यवहारात साधारणत: १९६० पर्यंत रूपवादाचा प्रभाव होता. नंतरच्या काळात आशयवादावरभर देणाऱ्या अनेक समीक्षापद्धती पुढे आल्या. त्यांवर पाश्चात्त्य समीक्षाविचारांचा बराचसा प्रभाव जाणवतो. १९६० नंतर पाश्चात्त्य साहित्यसमीक्षेत जे नवनवे सिद्धांत, तत्त्वप्रणाली, संज्ञा-संकल्पना इ. उदयास आल्या, त्यांचा आधुनिक मराठी साहित्य- समीक्षेत प्रथमच सखोल व विस्तृत परिचय करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य समीक्षक गंगाधर पाटील (१९३१) यांनी केले. 'समीक्षेची नवी रूपे' (१९८१) हे त्यांचे पुस्तक तसेच 'अनुष्टुभ' या वाङ्मयीन नियतकालिकातून त्यांनी लिहिलेले पाश्चात्त्य समीक्षा-संज्ञांविषयीचे लेख या संदर्भात उद्बोधक आहेत. मुख्यत: चिन्हमीमांसा व कथनमीमांसा- विषयक त्यांच्या लेखनाने मराठी समीक्षेत नव्या विचार-व्यूहांचा प्रवेश झाला.

मिलिंद मालशे व अशोक जोशी यांनी लिहिलेल्या 'आधुनिक समीक्षा-सिद्धान्त' (२००७) या पुस्तकात विसाव्या शतकातील आधुनिक पाश्चात्त्य समीक्षा-सिद्धांतांचा चिकित्सक व सखोल परिचय करून दिला आहे. ह्या सिद्धांतांची तात्त्विक मांडणी, ऐतिहासिक पार्श्वभूमीवर, स्वरूप, वैशिष्ट्ये व मर्यादा यांची साधकबाधक चर्चा त्यात असल्याने तो महत्त्वपूर्ण संदर्भगंथ ठरला आहे. उपरोक्त आधुनिक समीक्षा-

सिद्धांतांचा परिचय करून देताना मुख्यत्वे गंगाधर पाटील व मिलिंद मालशे यांच्या विवेचनाचा आधार घेतला आहे.

ज्येष्ठ समीक्षक रा. ग. जाधव यांनी 'साहित्याचे परिस्थितीविज्ञान' (इकॉलॉजी ऑफ लिटरेचर) ही नवी संकल्पना मांडली. साहित्यकृती ही एक सजीव आहे व साहित्य ही समुदायवाचक कल्पना म्हणजे अशा सजीवांची जाती आहे. साहित्य- कृतीचे जीवनचक्र एका सांस्कृतिक पर्यावरणात चालू असते. या सृष्टीतील सजीवांचा त्यांच्या नैसर्गिक पर्यावरणाशी ज्या प्रकारचा जैविक संबंध असतो, तशाच प्रकारचा जैविक संबंध साहित्यकृती व तिच्या सांस्कृतिक पर्यावरणात चालू असतो. अशा स्वरूपाचे विचार त्यांनी या संदर्भात मांडले आहेत. त्यांच्या सर्जनशील समीक्षावृत्तीचा प्रत्यय अशा नव्या सैद्धांतिक मांडणीतून येतो.

'निवडक समीक्षा' या प्रा. रा. ग. जाधव (२००६) ह्या त्यांच्या लेखसंग्रहात त्यांनी तात्त्विक व उपयोजित असे समीक्षा लेखन केले आहे. त्यात समीक्षा-लेखनात नव्याने घडविलेल्या, तसेच वापरात आणलेल्या संज्ञा-संकल्पना, आधुनिक विचारव्यूह व समीक्षाप्रणाली यांचे वेधक दर्शन घडते. सर्जनशील साहित्य हा खरे तर एक ज्ञानगर्भ व्यवहारच असतो आणि या सर्जनशील ज्ञानगर्भ व्यवहाराविषयीचे विवेचन म्हणजे साहित्यसमीक्षा वा समीक्षा-सिद्धांत होत ही भूमिका त्यांनी मंडळी आहे.

विसाव्या शतकाच्या प्रारंभकाळापासून आधुनिक साहित्यसमीक्षाक्षेत्रात भाषा-विज्ञान, समाजशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान, रूपविवेचनवाद (फिनॉमिनॉलॉजी) इ. ज्ञानशाखांच्या प्रभावातून नवनव्या संकल्पना, प्रणाली, विचारव्यूह इ. उदयास आले. त्यांनी तत्कालीन साहित्यक्षेत्रातील प्रचलित व प्रभावी अशा रूपवादी संप्रदायाला आव्हान देऊन समीक्षा-सिद्धांतांच्या नवनव्या दिशा, दृष्टिकोण व प्रणाली विकसित केल्या.

ह्या पार्श्वभूमीवर काही आधुनिक समीक्षा-सिद्धांत व विचारप्रणाली यांचा अल्प परिचय पुढे दिला आहे:

### १.६.१ आधुनिकता (मॉडर्निटी) व आधुनिकतावाद : (मॉडर्निझम)

साधारणतः १८९० ते १९६० हा आधुनिकतावादाचा स्थूलमानाने कालखंड मानला जातो. त्याच्या बहराचा काळ पहिल्या महायुद्धाच्या काळापासून (१९१४) ते दुसऱ्या महायुद्धापर्यंत (१९४५) होता. १९६० नंतरच्या दशकात पाश्चात्त्य विचारविश्वात उत्तर-आधुनिकतावादाचा उदय झाला व आधुनिकतावादी पर्व अस्तंगत झाले. फ्रँक करमोड या समीक्षकाने आधुनिकतावादाच्या या दीर्घकालीन प्रवासाचे दोन टप्पे पाडले : अतिवास्तववादापर्यंतच्या कला-वाङ्मयीन चळवळींना त्याने 'पॅलिओ-मॉडर्निझम' (पुरा-आधुनिकतावाद) तर अतिवास्तववाद व त्यानंतरच्या चळवळींना 'नीओ-मॉडर्निझम' (नव-आधुनिकतावाद) असे संबोधिले.

आधुनिक कालखंडातील मानवी जीवनावर व कला-साहित्यविश्वावर नीत्शे, कार्ल मार्क्स व फ्रॉइड यांच्या भिन्नभिन्न विचारसरणींचा आहे. नीत्शेची ईश्वराच्या मृत्यूची घोषणा (गॉड इज डेड); कार्ल मार्क्सचे भांडवलशाही वर्गाच्या शोषणाचे आर्थिक-राजकीय क्रांतिकारी विश्लेषण; फ्रॉइडप्रणीत मनोविश्लेषण,

अंतर्मनातील सुप्त कामेच्छा, लैंगिक वासना-विकार, दुःस्वप्ने इत्यादींविषयींचे शास्त्रीय विवेचन; युंगचे अबोध मनाचे नेणिवेतील व्यापार, अशा विविध विचारसरणींमुळे नीतिमूल्यांविषयीच्या पारंपरिक, प्रचलित समजुती ढासळत गेल्या. परिणामी पारंपरिक वास्तववादी चित्रण करणारे, तसेच केवळ बाह्य रुपांचे अनुकरण करणारे कला-साहित्यप्रकार मागे पडत गेले व आधुनिकतावादी प्रणालीच्या विविध नवप्रवाहांना प्रेरणा व चालना मिळत गेली.

पहिल्या महायुद्धात संस्कृती व विवेक यांचा ऱ्हास झाला होता. भांडवलशाही व औद्योगिकीकरण यांना मिळालेली गती मिळालेली होती. मानवी अस्तित्वाच्या संदर्भात निरर्थकता व वैफल्य यांचे प्रकटीकरण होत होते. या साऱ्यांची आधुनिकतावाद ही एक अभिव्यक्ती होती.

आधुनिकतावाद ही कलात्मक वृत्ति-प्रवृत्ती व प्रतिसाद यांचीही निदर्शक अशी संज्ञा आहे. साहित्यात व्यक्तिवाद, स्वत्त्वनिष्ठा इत्यादी मूल्य आणि दृष्टी यांच्यावर भर, बाह्य जगाच्या संदर्भात आलेली परात्मता व निराशा, सखोल व विस्तृत अशी वैविध्यपूर्ण प्रयोगशीलता ही आधुनिकतावादी साहित्याची काही लक्षणीय वैशिष्ट्ये होत.

साधारणपणे १९१० ते ३० हा पाश्चात्त्य साहित्य व कला क्षेत्रांतील आधुनिकतावादी साहित्यनिर्मितीचा व समीक्षाप्रणालींचा उत्कर्ष काळ मानला जातो. टी. एस. एलियट चे 'द वेस्ट लॅंड' हे दीर्घकाव्य व जेम्स जॉइस ची 'यूलिसीझ' ही कादंबरी या दोन्ही साहित्यकृती १९२२ मध्ये प्रसिद्ध झाल्या. येथेच सर्जनात्मक पातळीवर आधुनिकतावादाचा खरा प्रारंभ झाला, असे मानले जाते.

आधुनिकतावादामुले समीक्षात्मक पातळीवर साहित्यविषयक दृष्टिकोण, साहित्याभ्यासपद्धती व समीक्षाप्रणाली बदलू लागल्या होत्या. आधुनिकतावादी साहित्यामध्ये भावनावेगा बरोबरच चिकित्सक व बौद्धिक दृष्टिकोणालाही कलात्मक तत्त्व म्हणून मान्यता मिळाली. सर्वसामान्य भाषिक वापरातील शैलीची प्रचंड मोडतोड करण्यात आली. हेही आधुनिकतावादी साहित्याचे गमक ठरले.

मानवी स्वभाव व माणसांची परस्परांशी असणारी नाती यांच्याविषयी नवे, अपारंपरिक दृष्टिकोण निर्माण झाले. या मूलभूत नवतेला साद व न्याय देण्यासाठी नवी भाषिक व सौंदर्यात्मक रचनातत्त्वे उदयाला आली. कलाकृतीच्या घाटाला व रूपबंधाला मिळालेले केंद्रवर्ती स्थान हे विसाव्या शतकाच्या सौंदर्यशास्त्रीय व समीक्षात्मक भूमिकेचे व्यवच्छेदक लक्षण मानले जाते. आधुनिकतावादामधील रूपवादाचे मूळ या नव्या सौंदर्यभानामध्ये व रूपनिष्ठ जाणिवेमध्ये आहे. (संदर्भ : मराठी विश्वकोश)

### १.६.२ उत्तरआधुनिकता व उत्तरआधुनिकतावाद (पोस्ट मॉडर्निझम)

कला, वास्तुकला, साहित्य व समीक्षा या क्षेत्रांतील एक संकल्पना व शैली म्हणून १९७० च्या दशकात उत्तर-आधुनिकतावाद ही संज्ञा सर्वत्र प्रचारात आली. १९८७ पर्यंत 'आधुनिकतावाद' ही संज्ञा चित्रपट, रंगभूमी, नृत्य, संगीत, ललित कला व वास्तुकला, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, मानसशास्त्र, इतिहासमीमांसा इ. क्षेत्रांत आणि विविध सांस्कृतिक जीवनशैलींत परवलीचा शब्द बनली होती,

महायुद्धकालीन प्रचंड नरसंहार, अणुबाँबचे भीषण विनाशकारी परिणाम, नैसर्गिक पर्यावरणाचा नाश व ह्या सर्व घडामोडींची पश्चिमी जगाच्या नीतिधैर्याच्या खच्चीकरणात झालेली परिणती ह्याचे प्रकटीकरण उत्तर-आधुनिकतावादी कला-वाङ्मयीन प्रवृत्तींच्या आविष्कारात आढळते.

आधुनिकतावादाने प्रस्थापित व पारंपरिक कला-वाङ्मयीन संकेत नाकारून नवनव्या संकल्पना, आशय-विषय, घाट वा रूपबंध, शैली अशा सर्व अंगांनीच नव्या वैशिष्ट्यपूर्ण प्रवृत्ती पश्चिमी कला-वाङ्मयीन क्षेत्रांत आणल्या. उत्तर-आधुनिकतावादाने हेच वैशिष्ट्य कधी-कधी टोकाला नेले. इतकेच नव्हे तर, आधुनिकतावादातून उद्भवलेला एक प्रकारचा अभिजनवाद व त्याची निदर्शक अशी उच्चभ्रू कला उत्तर-आधुनिकतावादाने नाकारली.

आधुनिकतावादाने बहुजन-संस्कृतीशी (मासकल्चर) निगडित अशा चित्रपट, दूरदर्शन, वृत्तपत्रीय व्यंग्यचित्रे, लोकप्रिय संगीताचे (पॉप म्यूझिक) विविध प्रकार ह्यांच्याशी जवळीक साधली.

### १.६.३ सांस्कृतिक समीक्षा

पूर्वी संस्कृती म्हणजे उच्च मूल्यभावांची जोपासना, अशी पारंपरिक धारणा होती. त्यातून कला-वाङ्मयात अभिजाततावादी मूल्ये प्रस्थापित झाली. १९७० नंतर संस्कृतीच्या अभिजन-अभिजाततावादी पारंपरिक धारणांना व उच्च मूल्यभावाधिष्ठित प्रस्थापित संकल्पनांना आव्हान देऊन त्या विरोधात बहुजन संस्कृती (मास कल्चर) व बहुजन समाजाचे साहित्य ह्या घटक्रांना मध्यवर्ती केंद्रस्थानी ठेवून सांस्कृतिक समीक्षेची नव्याने मांडणी करणाऱ्या काही प्रणाली पुढे आल्या.

समाज, संस्कृती व साहित्य यांच्या संदर्भातील पूवारोक्त उदारमतवादी व मानवतावादी संकल्पनांना त्यांनी मुख्यत्वे विरोध केला. मॅथ्यू आर्नल्ड (१८२२-८८) या कवी-समीक्षकाने 'वाङ्मय म्हणजे उदारमतवादी मानवकेंद्री भूमिका' मानली. विसाव्या शतकातील टी. एस. एलियट व एफ. आ. लिव्हिस (१८९५-१९७८) या आधुनिक समीक्षकांनीही संस्कृतीला मूल्यभावात्मक अर्थ दिला.

स्त्रीवाद, नवमार्क्सवाद, नव इतिहासवाद, उत्तर-वसाहतवाद या सैद्धांतिक प्रणालींनी स्वायत्ततावादी सौंदर्य सिद्धांत नाकारला. तसेच साहित्याची अभिजातता, श्रेष्ठ साहित्यकृतीची परंपरा (लिटररी कॅनन) अशा पारंपरिक श्रेणीव्यवस्थेलाही आव्हान दिले.

स्त्रियांनी लिहिलेले बहुजन समाजाने निर्मिलेले साहित्य, व बहुजनांच्या अभिरुचीस रुचणारे 'लोकप्रिय' साहित्य, श्रमिक वर्गाचे साहित्य, चित्रपट-दूरदर्शन अशा जनसंपर्क- माध्यमांतून केले जाणारे सामाजिक-सांस्कृतिक चित्रण- ह्यांचा समावेश व्यापक अशा साहित्याच्या संकल्पनेत व्हावा आणि या साहित्याला मुख्य म्हणजे विद्यापीठीय अभ्यासक्रमात स्थान मिळावे, ह्यासाठी अमेरिकन व ब्रिटिश विद्यापीठांध्ये चळवळी सुरु झाल्या.

बहुजन संस्कृती व साहित्याचा खंदा पुरस्कर्ता असलेल्या रेंड विल्यम्सने (१९२१-८८) इंग्लंडमध्ये सांस्कृतिक समीक्षेचा पाया घातला. त्याने संस्कृतीच्या अर्थाची चिकित्सा करताना तिच्या मूल्यभावात्मक

उपयोजनाबरोबरच मानववंशशास्त्रीय वर्णनात्मक वापरालाही प्राधान्य दिले. त्याने 'कल्चर अँड सोसायटी' (१९५८) व 'द लाँग रेव्हलूशन' (१९६१) या ग्रंथांतून संस्कृती, समाज व साहित्य यांसंदर्भांत नव्या संकल्पना मांडल्या. संस्कृती या संकल्पनेचा मुळापासून व त्यातील बदलत्या मूल्यांचा आढावा घेऊन त्याने संस्कृतीला व्यापक व सर्वसमावेशक बहुआयामी अर्थ दिला.

विल्यम्सप्रमाणेच रिचर्ड होगर्ट व स्टुअर्ट हॉल या समीक्षक्रांनीही इंग्लिश सांस्कृतिक समीक्षाप्रणालीत मोलाची भर घातली. होगर्ट याने श्रमिकवर्गाची संस्कृती व रंजनसाधने तसेच जनसंपर्कमाध्यमे यांतील आंतरसंबंध शोधूले; आणि संस्कृतीचा व्यापक अर्थ मांडला. श्रमिक वर्गाची संस्कृती साधी, बालिश वाटली, तरी ती अस्सल आहे आणि बहुजन समाजाच्या फार मोठ्या वर्गाला तिने जगण्याची सकारात्मक प्रेरणा दिली आहे. त्यात अभिजनांच्या अभिजात साहित्यकृती आणि परंपरा, उच्चभ्रू संस्कृती व सौंदर्यूल्ये यांना स्थान नाही, अशी भूमिका त्याने मांडली आहे.

स्टुअर्ट हॉल यानेही चित्रपट, जनसंपर्कमाध्यमे यांवर संशोधन करून संस्कृतीची वेगळी संकल्पना तसेच सांस्कृतिक समीक्षा व अभ्यासक्षेत्र यांविषयी विवेचन केले.

मराठीमध्ये दलित साहित्याचे वेगळे, स्वतंत्र सौंदर्यशास्त्र असावे, अशी भूमिका काही समीक्षक मांडतात. ती सांस्कृतिक समीक्षाप्रणाली व उत्तर-वसाहतवाद यांच्या सैद्धांतिक भूमिकांना बरीचशी जवळ जाणारी आहे, असे म्हणता येईल.

### १.६.४ नवसमीक्षा : (न्यू क्रिटिसिझम)

ही आधुनिक अमेरिकन समीक्षाप्रणाली. मराठीमध्येही मर्ढेकरोत्तर काळात रुजली. इंग्लंडमध्ये १९२० च्या सुमारास सुरू झालेल्या उपयोजित समीक्षेचे अमेरिकेतील विकसित रूप म्हणजे नवसमीक्षा होय. 'नवसमीक्षा' हे नाव जॉन कोरॅन्सम या अमेरिकन कवि-समीक्षकाच्या 'न्यू क्रिटिसिझम' (१९४१) या टीका ग्रंथावरुन समीक्षा प्रणालीला पडले. या ग्रंथात आय. ए. रिर्चड्स, टी. एस. एलियट, विल्यम एम्प्सन व आयव्हर विंटर्स यांच्याविषयीचे प्रदीर्घ निबंध समाविष्ट केले आहे. त्यांत त्यांच्या उपयोजित समीक्षेविषयी विवेचन व चिकित्सक भाष्य आहे.

या समीक्षेच्या मते, ऐतिहासिक समीक्षेतून दर्शन घडते ते इतिहासाचे; साहित्यकृतीचे नव्हे. विशिष्ट साहित्यकृतीचा आस्वाद घेतला जातो, तो सद्यकालीन साहित्याभिरुचीद्वारे. त्यामुळे नवसमीक्षक साहित्यकृतीच्या ऐतिहासिक वा सामाजिक संदर्भाला प्राधान्य न देता भाषेच्या माध्यमातून निर्माण केलेली एक कलाकृती म्हणूनच तिची समीक्षा करतात.

साहित्यकृती निर्माण झाल्यावर तिच्या कर्त्याशी तिची नाळ तुटते व तिला स्वत:चे असे अलिप्त व स्वतंत्र असे रूप प्राप्त होते. ह्या स्वयंभू रूपामुळेच साहित्यकृती आस्वाद्य ठरते. त्यामुळे कर्त्या लेखकाच्या चरित्राचा वा साहित्यनिर्मितीमागील हेतूचा विचार समीक्षेत करणे गरजेचे नसते. निर्मितिहेतू कित्येकदा फसवे व वाचकाची दिशाभूल करणारेअसतात. तेव्हा साहित्यकृतीचा कर्ता किंवा त्याची साहित्यनिर्मितीप्रकिया हा

समीक्षेचा विषय नसून विशिष्ट साहित्यकृती हाच असतो, असे नवसमीक्षा मानते. मराठीमध्ये अशी समीक्षेची भूईका डॉ. ड. भि. कुलकर्णी यांनी घेतली आहे.

नवसमीक्षेच्या मते, साहित्यकृती आस्वाद्य होते ती तिच्या अंगभूत गुणांमुळे तिच्या निर्मात्यामुळे नव्हे, किंवा निर्मितिप्रक्रियेमुळे नव्हे. म्हणून नवसमीक्षाप्रणाली ही कर्त्याच्या जीवनाला व त्याच्या मनोव्यापारांना डावलून प्रत्यक्ष साहित्यकृतीलाच भिडू पाहते. कलाकृतीची निर्मिती ही जाणिवेपेक्षा नेणिवेतच विशेष करून होत असल्यामुळे तिच्या कर्त्यालाही निश्चितपणे व ठामपणे निर्मिति हेतूसांगता येईलच, असे नव्हे; आणि वाचकालाही हेतू माहीत नसला, तरीसाहित्यकृतीचा आस्वाद घेता येतो, अशी नवसमीक्षाप्रणालीची भूमिका आहे.

समीक्षा शक्य तितकी वस्तुनिष्ठ असावी, असा नवसमीक्षेचा आग्रह आहे. त्यामुळे ही समीक्षा आस्वादक समीक्षेप्रमाणे विशिष्ट साहित्यकृतीचा वाचकांवर पडणारा प्रभाव विचारात घेत नाही. आस्वादक समीक्षेचा मोठा धोका म्हणजे समीक्षेचे लक्ष्य साहित्यकृतीऐवजी वाचक-श्रोतृवर्ग हे होते. शिवाय समीक्षक स्वत:वर पडलेल्या प्रभावाचे वर्णन करू लागतो, तेव्हा ती समीक्षा आत्मनिष्ठ बनते. त्यामुळे नवसमीक्षा आस्वादक समीक्षेला मानत नाही.

नवसमीक्षेच्या मते, साहित्यकृतीचे घटक म्हणजे शब्द, त्यांचे नाद, शब्दबंध व नादबंध होय. त्यामुळे शब्दांच्या सूक्ष्म अर्थच्छटा व अनेकार्थता इ. घटकांचा सूक्ष्म भाषिक अभ्यास नवसमीक्षेत केला जातो. प्रतिमा, प्रतीके व त्यांतून सूचित होणारा आशय तसेच साहित्यकृतीत व्यक्त होणारा उपरोध, विरोधाभास, संदिग्धता इत्यादींचा अभ्यास साहित्यकृती ही एक स्वयंपूर्ण कलाकृतीआहे ह्याचे भान राखून केला जातो. आशय व अभिव्यक्ती यांचे द्वैत नवसमीक्षा मानत नाही. आशयानुसार अभिव्यक्तीचे रूप बदलते इतकेच नव्हे तर अभिव्यक्ती हाच कलाकृतीचा आशय असतो. अनेकार्थता,  संदिग्धता, विरोध, विसंगती, उपरोध ही सर्व अंगे साहित्यकृतीच्या संपूर्ण आशयाची संघटनाच प्रकट करतात. आणि अशी व्यामिश्र व एकसंध साहित्यकृती श्रेष्ठ ठरते, अशी नवसमीक्षेची धारणा आहे.

### १.६.५ रशियन रूपवाद

रशियन रूपवाद ही पश्चिम यूरोपीय रूपवादाची शाखा मानली जाते. साहित्याभ्यासाच्या चरित्रात्मक, सामाजिक, ऐतिहासिक इ. साहित्यबाह्यपद्धतींना त्या काळात महत्त्व प्राप्त झाले होते. रूपवाद्यांनी ह्या साहित्य-बाह्यअभ्यासपद्धतींना, प्रयोजनांना व ज्ञानदृष्टींना विरोध केला आणि साहित्याच्या व साहित्याभ्यासाच्या स्वायत्ततेवर भर दिला. रूपवाद्यांनी काव्यभाषेवर लक्ष केंद्रित केले. काव्यात्म भाषा, अपरिचितीकरण व नियमोल्लंघन, रूपबंध व संरचनाही रूपवादी प्रणालीची प्रमुख समीक्षातत्त्वे मानली.

रशियन रूपवादी समीक्षकांनी काव्यरचनांबरोबरच गद्यरचनांचाही विचार आपल्या समीक्षाप्रणालीमध्ये केला, हे त्याचे लक्षणीय वैशिष्ट्य होय. अपरिचितीकरण, नियमोल्लंघन, साहित्याचे साहित्यिकत्व इ. संकल्पनांबरोबरच कथा व कथारचना यांसंबंधी महत्त्वाची संकल्पनाही त्यांनी गद्य साहित्याच्या संदर्भात

मांडली. रशियन रूपवादी विचारसरणीतूनपुढे प्राग संरचनावाद, कथनमीमांसा, चिन्हमीमांसा इ. वाङ्मय-विचारपद्धतींचा उदय झाला.

### १.६.६ संरचनावाद : ( स्ट्रक्चरॅलिझम).

साहित्यकृतीची संरचना (स्ट्रक्चर) केंद्रीभूत मानून त्या संरचनेची, तिच्या अंगोपांगांची चिकित्सा व विश्लेषण करणारी ही समीक्षाप्रणाली आहे. मात्र ती केवळ वाङ्मयापुरतीच मर्यादित न राहता मानवशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र अशा अन्य ज्ञानक्षेत्रांत प्रभावी ठरलेली व सबंध युरोपभर पसरलेली विसाव्या शतकातील महत्त्वाची वैचारिक चळवळ होती.

फेर्दिनांद सोस्यूर याच्या, भाषेची नवी संकल्पना व अभ्यासपद्धती मांडणाऱ्या व्याख्यानांवरुन त्याच्या निधनानंतर तयार करण्यात आलेल्या 'द लिंग्विस्टिक जनरल' (१९१६) या ग्रंथाने आधुनिक संरचनावादी भाषाविज्ञानाचा, तसेच चिन्हमीमांसेचा किंवा चिन्हार्थ विद्येचा (सेमिऑलॉजी) पाया घातला. त्यात आधुनिक भाषाविज्ञानाच्या मूलभूत तत्त्वांची मांडणी आढळते. आता ही चिन्हमीमांसा म्हणजे काय ते आपण पाहू.

सोस्यूरच्या मते, भाषा ही एक चिन्हपद्धती वा संरचना आहे. म्हणजे भाषा ही ध्वनी व अर्थ यांना एकत्र आणून वाक्यरचनेचा, परिच्छेदाचा म्हणजे भाषेचा आकार (फॉर्म) निर्माण करते. हा आकार म्हणजे चिन्हांची एक व्यवस्था होय. चिन्ह हे 'चिन्हक' (सिग्निफायर) म्हणजे शब्दरूप ध्वनी व 'चिन्हित' (सिग्निफाइड) म्हणजे शब्दरूप अर्थ यांच्यातील संबंधांतून सिद्ध होते. भाषिक 'चिन्हक' हा एखादा ध्वनी असू शकेल, वा एखादे लिखित अक्षर असू शकेल. कित्येकदा एखाद्या सुट्या ध्वनीपेक्षा ध्वनींची एक संगती देखील चिन्हक म्हणून वापरली जाते; तर 'चिन्हित' या संकल्पना असतात.

चिन्हे ही चिन्हक-चिन्हित यांच्या मिश्रणातून जशी सिद्ध होतात, तसेच ती इतर चिन्हांशी असणाऱ्या त्यांच्या संबंधांमुळेही सिद्ध होतात. अशा प्रकारच्या आधुनिक भाषाविज्ञानाच्या ह्या नमुनारूपाच्या (लिंग्विस्टिक मॉडेल) आधारे साहित्याचा, साहित्यशास्त्राचा व साहित्यविषयक प्रश्नांचा विचार व अभ्यास संरचनावादी समीक्षेत केला जातो.

सोस्यूरच्या या आधुनिक भाषाविचाराच्या व चिन्हार्थ विद्येच्या आश्रयाने संरचनावादाची जडणघडण झाली. चिन्हव्यवस्था, चिन्हांची रचना, चिन्हांची यादृच्छिकता, भाषानियम (लांग), भाषित/भाषण (पॅरोल), चिन्हांची व भाषेची कार्ये इ. संकल्पनांचा वापर संरचनावादाच्या उभारणीत केला गेला. चिन्हार्थविद्या व संरचनावाद यांचे नाते निकटचे आहे. मानवी मन चिन्हांच्या आश्रयाने विचार, चिंतन, सर्जन व संदेशन करीत असते. मानवी संस्कृती ही चिन्हे व चिन्हव्यवस्था यांवर आधारलेली आहे. समाजातील आणि संस्कृतीतील चिन्हांचे स्वरूप, त्यांची रचना, त्यांचा अर्थ व कार्य इ. बाबींचा शास्त्रशुद्ध अभ्यास व मीमांसा चिन्हार्थविद्येत केली जाते. हे एक विज्ञान असून संरचनावाद ही त्याची विश्लेषणपद्धती आहे, असे काही समीक्षक मानतात; तर काहीजण या दोन ज्ञानशाखांत भेद मानत नाहीत.

साहित्यकृतीत प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीत्या प्रकट झालेल्या सामान्यनियम-संकेतांच्या आश्रयाने साहित्यशास्त्राची उभारणी करणे, तसेच त्या त्यासाहित्यप्रकाराच्या विशिष्ट साहित्यशास्त्राची शास्त्रशुद्ध रचना करणे, हे संरचनावादी समीक्षेचे मूळ उद्दिष्ट होय.

फ्रेंच साहित्यमीमांसक रॉलां बार्त, फ्रेंच समीक्षक जेरार्द जेने, तत्त्ववेत्ता ए.जे. ग्रिमास इ. संरचनावादी समीक्षकानी 'कथनमीमांसा', 'काव्यचिन्हमीमांसा' अशा प्रकारनिष्ठ साहित्यशास्त्राची उभारणी केली. तसेच लेखक, संहिता, वाचक, संरचना, साहित्यिकता, साहित्याची भाषा इ. वाङ्मयीन घटकांच्या संदर्भात संरचनावादी दृष्टिकोणातून नवे विचार मांडून संरचनावादी साहित्यशास्त्राची उभारणी केली.

संरचनावादी साहित्यशास्त्राने गूढवादी तसेच आस्वादक-संस्कारवादीसंकल्पनांना व समजुतींना धक्के दिले. दुसरे म्हणजे, संकुचित रूपवादी भूमिकेलाही विरोध केला. साहित्यकृतीमागे सामान्य तत्त्वे नसतात, प्रत्येक साहित्यकृती अनन्य असते व तिचे खास रूपतत्त्व शोधणे, हे समीक्षकाचे कार्य होय, ही संकुचित रूपवादी भूमिका संरचनावादाने मोडीत काढली.

**संरचनावादी समीक्षेची काही मूलतत्त्वे पुढीलप्रमाणे :**

भाषा ही प्राथमिक स्वरूपाची चिन्हव्यवस्था असून, साहित्य ही त्यावर आधारलेली दुय्यम स्वरूपाची चिन्हव्यवस्था आहे. भाषेला जसे स्वत:चे भाषाशास्त्र, तसेच साहित्यालाही स्वत:चे साहित्यशास्त्र असते. भाषेला जशी नियमव्यवस्था, तसेच साहित्यालाही स्वत:चा साहित्यिक संकेतव्यूह (लांग किंवा लिटररी कोड) असतो. साहित्यव्यवस्थेतील या संकेतव्यूहाचे पालन किंवा उल्लंघन करीत (पॅरोल) प्रत्येक साहित्यकृती अवतरत असते. संकेतांचे पालन करण्यापेक्षा त्यांचे उल्लंघन करण्यावरच साहित्य-कृतीचा जास्त भर असतो.

वाङ्मयकृती ही संरचनावादी दृष्टिकोणातून 'संहिता' असते. लेखकाकडे संहितेचा निर्माता वा आदिकारण म्हणून पाहिले जात नाही तर तो लेखनाच्या प्रकियेतील एक संरचनात्मक घटक असतो. संहितेच्या अर्थाचे मूळ हे लेखकाच्या व्यक्तिगत मनोव्यापारांत वा प्रतिभाव्यापारात नसून ते भाषेच्या व साहित्याच्या कार्ययंत्रणेत आहे, अशी भूमिका संरचनावादाने मांडली. संरचनावादी समीक्षेने लेखकाच्या जागी वाचकाची स्थापना केली. मात्र वाचक-व्यक्तीचे अस्तित्व 'वाचन' या अ-व्यक्तिगत कियेत विरघळून टाकले आणि हे केवळ एखाद्या 'संहिते'चे वाचन नव्हे, तर समग लिखिताचे वाचन असते.

साहित्यकृती वा संहिता साहित्यव्यवस्थेचाच एक घटक असून, तिला त्या व्यवस्थेच्या संदर्भात आणि संबंधसरणीत अस्तित्व, अर्थ व मूल्यप्राप्त होत असल्याने साहित्यकृती ही स्वायत्त, स्वतंत्रअशी वस्तू नसते. संरचनावाद्यांच्या मते, भाषेची नियमव्यवस्था व साहित्याची संकेतव्यवस्था हे भाषेचे/साहित्याचे एकसामाजिक व सांस्कृतिक अंग होय.

### १.६.७ उत्तर-संरचनावाद : (पोस्ट-स्ट्र क्चरॅलिझम).

१९६० च्या दशकात संरचनावादी सिद्धांतांची चिकित्सक समीक्षा होऊ लागली व त्याविरुद्ध प्रतिकिया उमटू लागल्या. उत्तर-संरचनावादाने संरचनावादाची तपासणी करून शोध, स्पष्टीकरण व अर्थनिर्णयन

यांबाबतीत पर्यायी सिद्धांतांची मांडणी केली. संरचनावादाच्या परिपूर्णतेबाबत उत्तर-संरचनावादी समीक्षकांनी मूलभूत शंका उपस्थित केल्या. उत्तर-संरचनावादी टीकाकारांच्या मते कोणत्याही संहितेचा अर्थ अस्थिर असतो. चिन्हीकरण स्वभावत:च अस्थिर असते. सोस्यूर याने केलेला चिन्हक आणि चिन्हार्थयांतील मूलभूत भेदच ह्या अस्थिरतेच्या मुळाशी आहे. भाषेची अपूर्णता हीउत्तर-संरचनावादी विचारातील एक महत्त्वाची बाब आहे. अर्थ हा आतून अस्थिर असतो, ही उत्तर-संरचनावादी मीमांसकांची भूमिका आहे.

यूरोपीय साहित्यसमीक्षा-व्यवहारात साधारणपणे १९७० पासून उत्तर-संरचनावाद ही संज्ञा प्रचारात आली. सोस्यूरप्रणीत संरचनावादी भाषाविचाराचे परिशीलन व चिकित्सक समीक्षा ही उत्तर-संरचनावादाचा आधार होय. या भूमिकेने संरचनावादातील केंद्रयुक्त संरचना, ज्ञाता इ. संकल्पना या प्रणालीने त्याज्य ठरवल्या. तसेच संरचनावादातील विज्ञाननिष्ठ व बंदिस्त अशा विचारांवर टीकाही केली. काही समीक्षकांच्या मते उत्तर-संरचनावाद हे संरचनावादाचेच विकसित रूप आहे. उत्तर-संरचनावादी समीक्षक व्यक्तीऐवजी 'ज्ञाता', 'कर्ता' ही संकल्पना वापरतात.

उत्तर-संरचनावादी सिद्धांताच्या संदर्भात रॉलां बार्त याची भूमिका महत्त्वाची मानली जाते, कारण त्याने संरचनावाद आणि उत्तर-संरचनावादयांना सांधण्याचे कार्य केले. बार्त याने 'लेखकाचा अंत' (डेथ ऑफद ऑथर) ही महत्त्वाची संकल्पना मांडली. ती उत्तर संरचनावादी तत्त्वप्रणालीच्या मुळाशी आहे. संहितेच्या अर्थाचा विचार लेखक या व्यक्तीशी, तिच्या मनोधारणेशी वा हेतू , उद्दिष्टे यांच्याशी जखडून ठेवता येणार नाही, असा युक्तिवाद त्याने मांडला.

बार्त व अन्य उत्तरसंरचनावादी विचारवंतांनी साहित्यकृतीतील लेखकाची सर्वसाक्षी व सर्वसमावेशक उपस्थिती नाकारली व त्याजागी वाचकाची प्रतिष्ठापना केली. ज्या विधानांमुळे लेखन सिद्ध झाले आहे, ती विधाने ज्या अवकाशात कोरलेली आहेत, तो अवकाश म्हणजे वाचक. संहितेची एकात्मता लेखकात नाही, तर वाचकात आहे. वाचकाने संहितेचे सगळे धागेदोरे धरुन ठेवलेले असतात. वाचकाचा जन्म लेखकाच्या अंतातून होत असतो, अशी बार्तची भूमिका आहे.

संस्कृतीच्या असंख्य केंद्रांकडून मिळवलेल्या वचनांचे पेशीजाल म्हणजे संहिता (टेक्स्ट). वाचकाला संहितेची बहुविधता कळत असते, तर लेखक म्हणजे समीक्षकाने संहितेतून काढलेले, प्रक्षेपित केलेले एक 'गृहीत' असते, अशी उत्तर-संरचनावादाची धारणा आहे.

या उत्तर-संरचनावादी साहित्यविचाराने साहित्य समीक्षेला आणि विशेषत: सांस्कृतिक साहित्याभ्यासाला एक नवी दिशा व वेगळे परिमाण दिले.

**१.६.८ वि-रचनावाद : (डी-कन्स्ट्रक्शनिझम).**

फ्रेंच तत्त्वज्ञ झाक देरिदा याने आपल्या 'ऑफ ग्रॅमॅटॉलॉजी' (१९६७) या ग्रंथात 'वि-रचना' ही संकल्पना प्रथमत: मांडली. त्याचे 'स्ट्रक्चर, साइन अँड प्ले', 'इन द डिस्कोर्स इन द ह्यून सायन्सेस' (१९६६) हे निबंध व 'स्पीच अँड फिनॉमिना' (१९७३), 'रायटिंग अँड डिफरन्स' (१९७८) हे ग्रंथ यांत

वि-रचनावादी विचारांची सूक्ष्म, सखोल व चिकित्सक मांडणी आढळते. देरिदाने पाश्चात्त्य तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, भाषाविज्ञान इ. ज्ञानशाखांतील आधारभूत तत्त्वांविषयी व साहित्यकृतीचे केंद्रां याविषयी मूलभूत शंका उपस्थित करून काही नव्या संकल्पना मांडल्या.

मूळ फ्रेंच संज्ञा 'Deconstruirs' म्हणजे विघटनाची, वि-रचनेची कृती (ॲक्शन ऑफ डी-कन्स्ट्रक्शन) कृती होय, असे देरिदा मानतो. या संज्ञेचे पुढील अर्थ इ. अर्थ देरिदाला अभिप्रेत आहेत : (१) एखाद्या समष्टीचे घटक सुटे सुटे करणे, (२) स्वत:चेच विघटन वा वि-रचना ( सेल्फडी-कन्स्ट्र क्शन) करणे.

एखादी संहिता ज्या तत्त्वविचाराचे, विचारप्रणालीचे वा अर्थाचे आवर्जून प्रतिपादन करीत असते, त्याचे ती स्वत:च कसे केंद्रविचलन वा खंडन करीत असते, ते त्या संहितेतील आलंकारिक भाषेच्या कार्याच्या आश्रयाने स्पष्ट वा उघड करणे म्हणजे 'वि-रचना' (डी-कन्स्ट्र क्शन) होय. म्हणजे मूळ रचनेची विराचन होय. अशी विरचनापर कविता मराठीत विंदा करंदीकर यांनी लिहिली आहे.

विरचनावाद १९७०च्या कालखंडात फ्रेंच विचारविश्वात उदयास आलेली संकल्पना आहे. तिचा प्रभाव युरोपीय व आंग्ल युरोपियन समीक्षेवर पडला आहे. देरीदाच्या मते, वि-रचन म्हणजे एखाद्या केंद्राचा, सेंद्रिय एकतेचा, अर्थाचा वा केंद्राचा शोध घेण्याच्या दृष्टीने केलेलं विश्लेषण नव्हे, तसेच ती विज्ञाननिष्ठ अभ्यासपद्धतीही नव्हे.

### १.६.९ कथनमीमांसा :

कथन करणे म्हणजे 'सांगणे' होय. कथन हे गोष्ट किंवा कथानकाच्या संदर्भात घडत असते. त्यामुळे कथा-कादंबऱ्या यांचे विश्लेषण करण्यासाठी ही पद्धती वापरली जाते. या पद्धतीत-गोष्ट, कथन वा निवेदन; पात्र, घटना, वातावरण इ. मूलघटकांचे स्वरूप यांचा समावेश होतो. तसेच, या घटकांचे कथात्म कार्य, विविध प्रकारचे कथासंकेत इ. बाबींचा सुव्यवस्थित, शास्त्रशुद्ध, सूक्ष्म व सखोल अभ्यास म्हणजे 'कथनमीमांसा' होय. कथनमीमांसेला 'नॅरॅटॉलॉजी' अशी इंग्रजी संज्ञा आहे. कथनविषयक निरनिराळे सिद्धांत यांचा त्यात समावेश होतो.

लेव्ही स्त्राऊस ह्या फ्रेंच तत्त्वज्ञ-विचारवंताच्या मते, मिथ्यकथांच्या कथनात काही मूलभूत व विश्वात्मक अशा संरचना सातत्याने आढळतात. त्यांच्या आधारे कोणत्याही मिथकाचे विश्लेषण करता येते. 'मिथ्य' ही एक प्रकारची भाषा असते व तिचे पृथक्करण करता येते.

### १.६.१० वाचकनिष्ठ समीक्षापद्धती :

१९६० च्या दशकात रूपवादी समीक्षेचे महत्त्व हळूहळू कमी होत गेले व नवनव्या समीक्षापद्धती पुढे येऊ लागल्या. त्यांतील एक महत्त्वाची समीक्षापद्धती म्हणजे 'वाचकनिष्ठ' वा 'वाचकवादी' समीक्षापद्धती होय. १९७० च्या दशकात साहित्यव्यवहारात 'वाचक' या घटकाला मध्यवर्ती केंद्रस्थानी प्रस्थापित करणाऱ्या वाचकनिष्ठ समीक्षापद्धतीचा उदय झाला. त्यात दोन विचारधारा आहेत.

(१) जर्मन साहित्यमीमांसक वोल्फगांग आयझर (१९२६-२००७) याने पुरस्कृत केलेला वाचक-प्रतिसाद सिद्धांत (रीडररिस्पॉन्स थिअरी) आणि

(२) हान्स-रॉबर्ट जौस या जर्मन समीक्षकानेमांडलेला वाचक-ग्रहण सिद्धांत (रीडर रिसेप्शन थिअरी).

पूर्वीच्या रूपवादी समीक्षेत साहित्यकृती ही स्वायत्त व स्वयंपूर्ण आहे, असे मानून वाचकाचा अनुभव व अपेक्षा विचारात न घेता संहितेवरच लक्ष केंद्रित केले गेले. त्या विरुद्धची प्रति-क्रिया म्हणून वाचकनिष्ठ समीक्षापद्धती निर्माण झाली. तसेच विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील संज्ञामीमांसा, संरचनावाद, आधुनिक भाषा-विज्ञान, चिन्हमीमांसा इ. समीक्षाप्रणालींच्या उदयामुळे संहिता आणि वाचकयांच्यातील संबंधांकडे नव्या ज्ञानदृष्टीने पाहिले जाऊ लागले. उदा. संज्ञामीमांसेच्या दृष्टीने संहितेचा अर्थ वाचकाच्या वाचनकियेतच निर्माण होत असतो; त्यामुळे संहितागत अर्थाचा शोध घेण्याऐवजी संहितार्थाची निर्मिती करणे, हे वाचकाचे व समीक्षेचे कार्य मानले जाऊ लागले. परिणामी समीक्षेचे लक्ष संहितेपेक्षा वाचकाच्या प्रतिसादावर व अनुभवावरअधिक केंद्रित होऊ लागले. या नव्या भूमिकेची स्वाभाविक परिणती म्हणून वाचक-प्रतिसाद सिद्धांत उदयाला आला.

तात्पर्य लेखक किंवा लेखनकृतीच्या स्वातंत्र्यापेक्षा वाचक व अत्याचा वाचनानुभव याला या समीक्षेत महत्त्वाचे स्थान आले आहे.

### १.६.११ वाचक-प्रतिसाद सिद्धांत :

ही अनेकांगी व बहुजिनसी स्वरूपाची विचारधारा आहे. साहित्यकृतीचा 'वाचक' या संकल्पनेविषयी अनेक समीक्षकांनी वेगवेगळ्या भूमिका मांडल्या. आयझरने असे मत मांडले, की संहितेतच तिच्या अनेक वाचनांची शक्यता अध्याहृत असते. संहिता वाचणारे दोन प्रकारचे वाचक असतात: प्रत्यक्ष वाचक व अप्रत्यक्ष (इंप्लाइड) वाचक. प्रत्यक्ष वाचक म्हणजे संहिताबाह्य लौकिक वाचक. अप्रत्यक्ष वाचक म्हणजे संहितागत (ग्रंथ) गर्भित वाचक.

या सिधानाताच्या मते, अप्रत्यक्ष वाचकाची निर्मिती संहिताच करीत असते. कारण वाचकाच्या प्रतिसादाला आमंत्रण देणाऱ्या रचनांचे जाळे संहितेमध्येच म्हणजे ग्रंथातच असते, असे आयझरचे मत आहे. या शिवाय रोमॉन इन्गार्देनचा सहसर्जक वाचक (को-किएटर), ऊंबेर्तो इकोचा संहितारचित नमुनेदार वाचक, जेराल्ड प्रिन्सचा संहितागत श्रोता, जोनाथन कलरचा साहित्यिक ज्ञानक्षमता असलेला सक्षम वाचक (कॉंपिटंट रीडर) इ. अनेकविध संकल्पना 'वाचक' या घटकाला मध्यवर्ती कल्पून मांडल्या गेल्या आहेत.

### १.६.१२ वाचक-ग्रहण सिद्धांत :

जौस नावाच्या अभ्यासकाने वाचक-ग्रहण सिद्धांत मांडला. या सिद्धांतात त्याने 'अपेक्षांचे क्षितिज' (होरायझन ऑफ एक्स्पेक्टेशन्स) ही नवी संकल्पना मांडली. आदर्शांमुळे कोणत्याही काळात काही अपेक्षा निर्माण होतात, त्यांना जौसने 'अपेक्षांचे क्षितिज' असे संबोधिले. या अपेक्षांच्या क्षितिजामुळेच आपल्याला त्या काळातील कलाकृतीच्या मूल्यमापनाचे निकष मिळण्याची शक्यता असते. परंतु कलाकृतीच्या संदर्भात

अपेक्षांची क्षितिजे ही कल्पना स्थिर असू शकत नाही. जौसच्या मते, कलाकृतीच्या अपेक्षांची क्षितिजे नेहमीच बदलत असल्याने कलाकृतीला निश्चितार्थ नसतो, तसेच सार्वत्रिक वा वैश्विक स्वरूपाचा अर्थ नसतो. कलाकृतीचा सर्वकाळी लावता येण्यासारखा एक आणि एकाचा असा निश्चित अर्थ नसतो. तसेच कलाकृतीचा अर्थ कलावंतानेच ठरवायचा नसतो, या दोन बाबी त्याने अधोरेखित केल्या.

वाचकाने संहितेला दिलेल्या प्रतिसादामुळेव वाचकाच्या संहितेबरोबर होणाऱ्या किया-प्रतिकियेमुळे संहितेचे विशिष्टकाळातील रूप सिद्ध होते व हे रूप सिद्ध होण्यासअपेक्षेच्या क्षितिजाचीभूमिका महत्त्वाची ठरते, अशी जौसची थोडक्यात भूमिका आहे.

ब्रिटिश-अमेरिकन समीक्षक जोनाथन कलर याने 'सक्षम वाचका' ची कल्पना मांडली. त्याच्या मते, वाचक व लेखक या दोघांनीही चिन्हव्यवस्थेवर प्रभुत्व मिळवलेले असते आणि या प्रभुत्वावरच त्यांचे वाचक वा लेखक म्हणून असलेले सामर्थ्य अवलंबून असते, असे कलर म्हणतो. त्याच्या मते अपरिचित, अस्वाभाविक व अर्थदुर्लभ वाटणाऱ्या साहित्यसंहितेला परिचिताच्या, स्वाभाविकतेच्या व अर्थसुभगतेच्या पातळीवर आणून तिला संप्रेषणसुलभ करणे आवश्यक असते. वाचनाच्या ह्या क्रियेला कलरने 'स्वाभाविकीकरण' असे म्हटले आहे. त्यासाठी वाचकाला भाषिक व साहित्यिक संकेतांचे चिन्हांचे यथोचित ज्ञान असले पाहिजे, म्हणजेच वाचकाच्या ठायी 'साहित्यिक ज्ञानक्षमता' असली पाहिजे, असे तो म्हणतो.

साहित्यिकज्ञानक्षमतेच्या संकल्पनेत भाषिक, साहित्यिक व सांस्कृतिक अशा तीन प्रकारच्या संकेतांचे ज्ञान वाचकाला असावे, हे अपेक्षित असते. अशा सर्वप्रकारच्या ज्ञानदृष्टीने वाचक 'सक्षम' असला पाहिजे, असे कलर याचे म्हणणे आहे.

वाचनाच्या या विविध भूमिकांनंतर आपण स्त्रीवादी समीक्षा या प्रकाराकडे वळूया.

### १.६.१३ स्त्रीवादी समीक्षा :

स्त्रियांचे, स्वत:च्या वेगळेपणाची जाणीव प्रकर्षाने व्यक्त करणारे व स्वत्वाचा शोध घेऊ पाहणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. साहजिकच पुरुषी साहित्याहून ते स्वरूपत: वेगळे ठरते.स्त्रि यांच्या साहित्यातील हे वेगळेपण शोधून त्याची चिकित्सा करण्याचे कार्य गेल्या काही वर्षांत स्त्रीवादी समीक्षकांनी केले आहे. स्त्रियांच्या कथा, कादंबऱ्या, कविता आदी साहित्यातून त्यांच्या 'स्व' त्वाचा शोध त्यांनी कसा घेतला आहे, त्याची जाणीव त्यांना कशा प्रकारे झाली आहे, वर्षानुवर्षे पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेमुळे आपण दडपले गेलो आहोत, ह्या दडपशाहीचे भान स्त्रियांनी आपल्या लेखनातून कसे व्यक्त केले आहे, ह्याचा शोध स्त्रीवादी समीक्षा घेते.

पुरुषी साहित्यापेक्षा स्त्री-साहित्याचे जे वेगळेपण संभवते, त्या वेगळेपणाची-भिन्नत्वाची कारणमीमांसा, त्याचे स्वरूप व नेमकेपणा यांचे विवेचन-विश्लेषण स्त्रीवादी समीक्षेत केले जाते. स्त्री व पुरुष यांचे जगाकडे पाहण्याचे दृष्टिकोणच मुळात भिन्न असतात, असे ही समीक्षा मानते. परंपरेने स्त्री व पुरुष यांच्याकडे

सोपविलेल्या वेगवेगळ्या विषमतावादी भूमिकांमुळे (उदा., पुरुषसत्ताक समाज व संस्कृती यांनी स्त्रियांना बहाल केलेल्या पत्नी-माता-गृहिणी ह्या भूमिका); तसेच व्यवसायांमुळे स्त्री-पुरुषांच्या लेखनात भेद निर्माण होतो, असे ही समीक्षा मानते.

स्त्रियांचे स्त्रियांनी केलेले चित्रण, स्त्रियांचे खास वेगळे अनुभव व विषय यांचे स्त्रीवादी दृष्टिकोणातून दर्शन घडविणारे साहित्य, स्त्रीचे स्वत्वाचा शोध घेऊ पाहणारे, स्वत्वाच्या जाणिवेने केलेले आत्मप्रकटीकरण व आत्मशोध ह्या स्त्रीवादी साहित्याच्या वेगवेगळ्या दिशा आहेत. स्त्रीवादी समीक्षा ही अशा अनेक दिशांनी, स्त्रीवादी साहित्याचे विवेचन-विश्लेषण करून त्यातील स्वत्वाचा, वेगळेपणाचा शोध घेऊ पाहते.

स्त्रीवादी साहित्य वस्त्रीवादी समीक्षा ह्या संकल्पना स्त्रीमुक्ती चळवळीतून उदयाला आल्या. फ्रेंच लेखिका सीमॉन द बोव्हार ह्यांनी लिहिलेल्या 'द सेकंड सेक्स' (१९५३) या पुस्तकापासून स्त्रीमुक्ती चळवळीचा प्रारंभ झाला, असे मानले जाते. पुरुषप्रधान समाजात स्त्री ही पुरुषाशी अनेक नात्यांनी जखडून ठेवली जाते व त्यातही पुरुष हा मुख्य व स्त्री ही'इतर' (दुय्यम) असा विषमभाव आहे. स्त्री-पुरुषातील ही विषमता जीवशास्त्रीय वा दैवी नसून संस्कृतिनिर्मित आहे. दोघांत इतर कुठलाही भेद नसताना केवळ नैसर्गिक शारीरिक रचनेतील भेदामुळे स्त्रीला दुय्यमस्थान दिले जाते. 'स्त्री म्हणून आपण जन्म घेत नसतो तर आपण स्त्री बनत असतो' ('वन इज नॉट बॉर्न अ वुन रादर वन बिकम्स अवुन') हे सीमॉन द बोव्हारचे विधान संस्कृतिनिर्मित स्त्री-पुरुष भेदावर भाष्य करणारे विधान प्रसिद्ध आहे.

स्त्रीवादाला स्त्री-पुरुष शारीर भेद इथे नाकारायचा नाही. परंतु स्त्री-देहाबरोबरच तिचा लाजाळूपणा, नाजुकपणा, भावनाप्रधानता, ममता, स्वार्थत्याग, समर्पण वगैरे तिला बहाल केले जाणारे गुण हे जन्मजात असतात, हे येथे नाकारावयाचे आहे. हे गुण समाजाने व संस्कृतीने स्त्रीत्वावर लादलेले असतात. तेव्हा जैविक लिंगभेद म्हणजे सांस्कृतिक लिंगभेद नव्हे, हे स्त्रीवादाने स्पष्ट केले आहे.

स्त्रीची विशिष्ट अशी संस्कृती असते. स्त्रियांच्या लेखनातूनत्यांच्या वेगळ्या अनुभवचित्रणातूनत्यांचे आशय-विषय, वाङ्मयीन रूपबंध, आविष्कार-रीती, शैली, भाषा इ. वाङ्मयीन घटकांतूनही स्त्री-संस्कृती वेगवेगळ्या रूपांत प्रकटत असते.

म्हणून स्त्रीवादी समीक्षा स्त्रियांच्या साहित्याचा जीवशास्त्रीय, भाषिक, मानसशास्त्रीय, सांस्कृतिक अशा वेगवेगळ्या दृष्टिकोणांतून वेध घेऊन त्यातील वेगळेपणा अधोरेखत करते. स्त्रियांच्या लेखनाचा असा वेगळा स्वतंत्र विचार करणाऱ्या समीक्षेला एलेन शोवॉल्टरने 'गायनोसेंट्रिक फेमिनिस्ट क्रिटिसिझम' व समीक्षकाला 'गायनोक्रिटिक' (स्त्री-समीक्षक) असे संबोधिले आहे. स्त्रीवादी समीक्षेचा 'वाचक स्त्री' (वुन ॲज अ रीडर) असा वेगळाघटकही तिने मानला आहे.

स्त्रीवादी समीक्षा मुख्यत्वे विषयनिष्ठ आहे. समाजात स्त्रीचे पुरुषाकडून होणारे शोषण व छळवणूक यांवर साहित्याचा विषय म्हणून ती लक्ष केंद्रित करते. तसेच स्त्री-साहित्यातील खास अनुभवाच्या वेगळेपणाचा, एक स्वतंत्र लक्षण म्हणून ती शोध घेऊ पाहते. पुरुष आणि स्त्री यांच्या अनुभवांत सरळ व स्वच्छ असा भेद असतो. काही अनुभव जे खास स्त्रियांचे असतात, ते पुरुष अनुभवू शकत नाहीत वा जाणून

घेऊ शकत नाहीत. त्यामुळे स्त्रीलेखिकेचा वर्ण्य विषय मुळातच भिन्न ठरतो. त्या प्रमाणेच स्त्रीची भाषा, प्रतिमासृष्टी, शैली इ. पुरुषी आविष्कारापेक्षा स्वभावत:च भिन्न असते. ह्या भिन्नत्वाचा, स्त्रीविशिष्ट वेगळेपणाचा शोध स्त्रीवादी समीक्षा घेऊ पाहते.

### १.६.१४ नव–इतिहासवाद :

ही समीक्षाप्रणाली अमेरिकन विद्यापीठांमध्ये मुख्यत्वे स्टीफन गीनब्लाट या सिद्धांतकाराच्या लेखनाच्या प्रभावाखाली १९८० च्या सुमारास निर्माण झाली व पुढे दोन दशके टिकून राहिली. मायकल मॅकान्लिस याने प्रबोधनाच्या (रेनेसान्स) अभ्यासाच्या संदर्भात 'नीओ–हिस्टॉरिसिझम' (नव–इतिहासवाद) ही संज्ञा प्रथमत: वापरली, तर गीनब्लाटने ती अधिक प्रचलित केली.

नव–इतिहासवाद प्रामुख्याने दोन तत्त्वप्रणालींच्या विरोधात उभा ठाकला.

पहिले म्हणजे, संदर्भहीन पोकळीमध्ये संहितांचे सूक्ष्म वाचन करणाऱ्या भूमिकांना त्याने विरोध केला. त्यांच्या मते, रूपवाद, संरचनावाद, वि–रचनावाद इ. समीक्षा प्रणालींमध्ये संहितांचे सूक्ष्म वाचन होते; तथापि संहितांच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक स्वरूपाला न्याय मिळत नाही. तसेच त्यातून संदर्भहीन अशी संहिताकेंद्री समीक्षा निर्माण होते, असा नव–इतिहासवाद्यांचा आक्षेप होता.

दुसरे म्हणजे, इतिहासाला एकाच सत्त्वाच्या दावणीला बांधणाऱ्या इतिहासवादी भूमिकांना त्यांनी विरोध केला. हेगेल व मार्क्स यांच्या प्रभावाखाली आधुनिक साहित्याभ्यासा मध्ये जो इतिहासवाद प्रस्थापित झाला होता, तो या समीक्षकांना मान्य नव्हता. पारंपरिक मार्क्सवादाने कला–साहित्याच्या विचारांत ऐतिहासिकतेला महत्त्व दिले. मात्र, साहित्यकृती वा कलाकृती ह्या तर सामाजिक–आर्थिक परिस्थिती पार्श्वभूमीवर असते, असे ही विचारसरणी मानते. नव इतिहासवाद्यांना कला–साहित्यादी संकल्पनांची स्वायत्तता व मक्तेदारी त्यांना मोडून काढावयाची होती. संहितेला प्राधान्य देऊन सामाजिक–राजकीय परिस्थितीला पार्श्वभूमीचा दर्जा देणाऱ्या इतिहासवादी प्रणालीच्या विरोधात नवइतिहासवादी समीक्षकांनी मांडलेल्या भूमिकेत विशिष्ट संहिता निर्माण करणे यावर या विचारपद्धतीत भर दिला जातो.

### १.६.१५ उत्तर–वसाहतवाद : (पोस्ट–कलोनिअलिझम)

साम्राज्यवाद (इंपीरिअलिझम) म्हणजे एका समाजाने आपले राज्य व साम्राज्य इतर समाजांवर लादण्याची प्रकिया म्हणजे वसाहतवाद (कलोनिअलिझम) होय. म्हणजे एखाद्या समाजाने परक्या भूमीवर व तेथे राहणाऱ्या समाजांवर आपली वसाहत लादण्याची प्रकिया. या प्रक्रियेला विरोध करणारे लेखन म्हणजे उत्तर–वसाहतवाद होय.

यूरोपीय समाजाच्या प्रगतीचा काळ हा वसाहतींच्या गुलामगिरीचा व पिळवणुकीचाही काळ होता, असेही म्हटले जाते. साम्राज्यवाद ही संकल्पना आधुनिक लोकशाहीच्या व उदारमानवतावादाच्या विचारसरणीशी विसंगत व विरोधी मानली जात असतानाही आधुनिक यूरोपीय समाज 'साम्राज्यसादी' वा

वसाहतवादी कसे आणि सांस्कृतिक वर्चस्व गाजवण्याची प्रेरणा त्यांच्यात प्रबळ कशी, ह्यां मागील विसंगतीचा शोध उत्तर-वसाहतवाद घेऊ पाहतो.

## १.७ समारोप

मित्रांनो

अशा प्रकारे आपण 'आधुनिक समीक्षा सिद्धांत' या पहिल्या सत्रातील पहिल्या घटकाचा विचार प्रस्तुत केला आहे. या घटकात आपण समीक्षा म्हणजे काय, समीक्षेचे घटक, समीक्षेचे एकूण स्वरूप, समीक्षेचे प्रकार व समीक्षेतील विविध पद्धती व विचारसरणीचा आढावा. घेतला आहे. त्यातील निवडक व महत्त्वाच्या विचारसरणी बद्दल पुढील प्रकरणांतून सविस्तर विवेचन येईल.

## १.८. संदर्भ सूची


१. कुळकर्णी, वा. ल. साहित्य : स्वरूप आणि समीक्षा, मुंबई, १९७५

३. खोले, विलास, संपा. विसाव्या शतकातील मराठी समीक्षा, पुणे, २००४

४. गणोरकर, प्रभा, डहाके, वसंत आबाजी व इतर, वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश, मुंबई, २००१

५. जाधव, रा. ग. निवडक समीक्षा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००६

६. धोंगडे, अश्विनी, स्त्रीवादी समीक्षा, दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९३

७. पाटील, गंगाधर, समीक्षेची नवी रुपे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८१

८. मालशे, मिलिंद, जोशी, अशोक, आधुनिक समीक्षा-सिद्धान्त, मैत्र पकाशन गृह, मुंबई, २००७

९. राजाध्यक्ष, विजया व इतर, संपा. मराठी वाङ्मयकोश : खंड चौथा : समीक्षा-संज्ञा, मुंबई, २००२

१०. रायकर, सीताराम आणि इतर, संपा. वाङ्मयीन वाद : संकल्पना आणि स्वरूप, पुणे, १९९०


## १.९ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

मित्रांनो, आता आपण आतापर्यंत केलेल्या विवेचनाच्या आधारे काही नमुना प्रश्न उपस्थित करून त्याचा शोध घेऊ.

### अ) वस्तुनिष्ठ प्रश्न

१. 'समीक्षा' या शब्दाला इंग्रजीत कोणती पर्यायी संज्ञा वापरली जाते?

अ. टीका ब. भाष्य क. पाठचिकित्सा ड. Review

२. समीक्षेची एखादी विचारप्रणाली घेऊन साहित्यकृतीचे विश्लेषण केलेल्या समीक्षेला कोणती समीक्षा म्हणतात?

अ. सैद्धांतिक समीक्षा ब. उपयोजित समीक्षा

क. मानसशास्त्रीय समीक्षा ड. स्त्रीवादी समीक्षा

३. साहित्यकृतीचा आकार व रचना यांना प्राधान्य देणारी समीक्षा कोणती?

अ. न्यायिक　ब. आदिबंधात्मक　क. मार्क्सवादी　ड. रूपवादी

४. लेखकाचे आयुष्य आणि त्याचे लेखन यांचा संबंध शोधणारी समीक्षा कोणती?

अ. चरित्रात्मक　ब. आदिबंधात्म　क. वसाहतवादी　ड. उत्तर आधुनिकतावादी

५. 'वंश', 'परिस्थिती आणि 'क्षण' या तत्वांना आपल्या समीक्षाविचारात महत्त्वाचे स्थान देणारा समीक्षक कोण?

अ. बा. सी. मर्ढेकर　ब. देरिदा

क. हिपोलित तेन　ड. लेवी स्त्राउस

६. साहित्यकृतीच्या विश्लेषणासाठी 'सामूहिक अबोध मन' आधार मानणारी समीक्षा पद्धती कोणती

अ. न्यायिक समीक्षा　ब. उत्तर आधुनिकतावादी

क. संरचनावादी　ड. आदिबंधात्मक

७. साहित्यकृतीत बहुजन संस्कृतीच्या चित्रणाचा आग्रह धरणारी समीक्षा विचारप्रणाली कोणती?

अ. विरचनावाद　ब. संरचनावाद　क. सांस्कृतिक समीक्षा　ड. वाचक-प्रतिसादवाद

८. साहित्यकृतीसाठी भाषेचा चिन्हव्यवस्था म्हणून विचार कोणत्या अभ्यासकाने मांडला आहे?

अ. रोला बार्त　ब. सीमान द बोव्हुआर　क. सोस्यूर　ड. कार्ल युंग

९. वि-रचनावादाचा सिद्धांत कोणी मांडला आहे?

अ. बार्त　ब. हिपोलित तेन　क. रिचर्ड होगर्ट　ड. देरिदा

१०. साहित्यातील गोष्ट, वातावरण, पात्र व घटना यांचा सखोल अभ्यास करणारी विचारप्रणाली कोणती?

अ. वाचक-ग्रहण सिद्धांत　ब. उत्तर-संरचनावाद

क. संरचनावाद　ड. कथन मीमांसा

उत्तरे-१. ड.　२. ब.　३. ड.　४. अ.　५. क.

६. ड.　७. ड.　८. क.　९. ड.　१०. ड.

**ब) लघुत्तरी प्रश्न**

१. तात्त्विक व उपयोजित समीक्षेचे स्वरूप लिहा.

२. समीक्षेची उद्दिष्ट्ये स्पष्ट करा.

३. आस्वादक समीक्षेचे स्वरूप स्पष्ट करा.

४. चरित्रात्मक समीक्षेचे स्वरूप स्पष्ट करा.

५. समाजशास्त्रीय समीक्षेचे स्वरूप स्पष्ट करा.

६. सांस्कृतिक समीक्षेचे स्वरूप स्पष्ट करा.

७. कथनमीमांसेचे स्वरूप उलगडून दाखवा.

८. आदिबंधात्मक समीक्षेचा परिचय करून द्या.

**क) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. समीक्षा म्हणजे काय ते सांगून समीक्षेच्या विविध प्रकारांचा आढावा घ्या.

२. समीक्षा ही संकल्पना स्पष्ट करून समीक्षेच्या विविध सिद्धांताचा परिचय करून द्या.

३. आधुनिकता आधुनिकतावाद आणि उत्तर आधुनिकता या संकल्पना स्पष्ट करा.

४. नवसमीक्षा व सांस्कृतिक समीक्षा या संकल्पनांचे विवेचन करा.

५. वाचकनिष्ठ समीक्षा पद्धती, वाचक प्रतिसाद व वाचक ग्रहण हे सिद्धांत स्पष्ट करा.

❑❑❑

## घटक २
## समीक्षा पद्धती : आधुनिकतावाद आणि उत्तर आधुनिकता

### २.० उद्दिष्टे:

१. आधुनिकतावाद आणि उत्तर-आधुनिकतावाद या संकल्पना त्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीसह स्पष्ट होतील.

२. या विचारव्यूहातील मूलभूत विशेषांची चर्चा होईल.

३. या विचारव्यूहातील महत्त्वपूर्ण साम्य-भेदांचा परिचय होईल.

४. आधुनिकतावाद आणि उत्तर-आधुनिकतावादाने प्रभावित साहित्य-समीक्षेचे स्वरूप ध्यानात येईल.

### २.१ प्रास्ताविक:

कोणत्याही काळातील समाज-राजकारणातील स्थित्यंतरे, चळवळी, अन्य सांस्कृतिक घडामोडी यांच्या परिणामातून नवनवे विचारव्यूह आकारास येत असतात. यातील काहींचा साहित्यलेखन आणि साहित्यसमीक्षेवर सूक्ष्म परिणाम होत असतो. या अर्थाने नजिकच्या काळात आधुनिकतावाद आणि उत्तर-आधुनिकतावाद हे विचारव्यूह नव्या विश्वभानाच्या निर्देशासाठी संपूर्ण जगभरात स्वीकारल्या गेल्या आहेत. अर्थात आधुनिकतावाद आणि उत्तर-आधुनिकतावादाच्या विचारांमागे विशिष्ट अर्थाच्या वैचारिक, राजकीय आणि सांस्कृतिक बदलांचे पाठबळ आहे. परिणामी साहित्यादी विविध कलांना परंपरेला छेद देणाऱ्या व्यापक चळवळीचे स्वरूप म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले आहे.

मुख्यत्वे पूर्व आधुनिक, आधुनिक आणि उत्तर-आधुनिक हे पाश्चात्त्य जगाच्या इतिहासातील तीन महत्त्वपूर्ण कालखंड मानले जातात. आधुनिकतावाद आणि उत्तर-आधुनिकतावाद या संकल्पना या एका विशिष्ट सामाजिक-सांस्कृतिक परिस्थितीतून उत्पन्न झालेल्या आहेत. या दोन्ही संकल्पना पाश्चात्त्य तत्त्वचिंतनातून आपल्याकडे विशिष्ट संदर्भातून स्वीकारल्या गेल्या आहेत. मुख्यत्वे या संकल्पना त्यातील कल्पनेसाहित समजून घेण्यातून आपल्याला आधुनिकतावादी आणि उत्तर-आधुनिकतावादी साहित्य-समीक्षेविषयीची नेमकी विश्लेषणे पुढे आणणे शक्य आहे. या संकल्पनांकडे साहित्यातील प्रवृत्ती म्हणून जसे पाहिले जाते तसे साहित्यत्येतिहासातील कालखंड सूचित करताना देखील यांचा विचार होतो. उपरोक्त उल्लेखाप्रमाणे अशा संकल्पना/प्रवृत्ती राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीचा अपरिहार्य परिपाक असतात. त्यामुळे प्रस्तुत काळातील सामाजिक-सांस्कृतिक इतिहासाच्या मांडणीसाठी देखील आधुनिकतावाद, उत्तर-आधुनिकतावादाच्या विवेचन-विश्लेषणाची गरज स्पष्ट होते. अशावेळी या संकल्पनांची नेमकेपणाने चर्चा करताना मांडणीच्या उपयुक्ततेसाठी एकूण मांडणी दोन विभागात केली जाणार आहे. त्यातील पहिल्या विभागात आधुनिकतावाद आणि दुसऱ्या विभागात उत्तर-आधुनिकतावादाची चर्चा अपेक्षित आहे.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१. विभाग अः आधुनिकतावाद

आधुनिक (Modern), आधुनिकता (Modernity) आणि आधुनिकतावाद (Modernism) ह्या संकल्पना जगभरात साहित्य, समीक्षा आणि सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासामध्ये चर्चिल्या जातात. या तीनही संज्ञा अर्थाच्या दृष्टीने भिन्न आहेत. त्यांची वाढ देखील नानाविध संदर्भाने झालेली आहे. मात्र अनेकदा आपल्याकडे या संज्ञा ढोबळ स्वरूपात, शिवाय एका समान अर्थाने वापरल्या जातात. मुळात या संज्ञा काटेकोरपणे वापरल्या नाहीत तर त्याविषयीच्या विवेचनात, आकलनात गोंधळ निर्माण होतो. मुख्यत्वे एक विचारव्यूह म्हणून आधुनिकता-आधुनिकतवादाची चर्चा ही दीर्घकाळ चाललेल्या समाजव्यवहारातील आमुलाग्र बदलांच्या पार्श्वभूमीवर प्रारंभी युरोपमध्ये आणि उत्तरोत्तर भारतासह उर्वरित जगात वाढलेली आहे. या चर्चेला विशिष्ट अशा वैचारिक, राजकीय आणि सांस्कृतिक बदलांचे पाठबळ आहे.

साहित्यादी विविध कलांना छेद देणाऱ्या व्यापक चळवळीचे स्वरूप म्हणूनही आधुनिकता आणि आधुनिकतावादाकडे पाहिले जाते. युरोप अथवा भारतासहित जगभरामध्ये आधुनिकतावादी साहित्य लिहिले गेले. ज्यातून साहित्यविषयक संकल्पनाविश्वात देखील मूलभूत बदल सुचविले गेले. या संकल्पना त्यातील कल्पनेसाहित समजून घेताना आधुनिकतावादी मराठी साहित्य-समीक्षेविषयी नेमकी विवेचने, विश्लेषणे पुढे आणणे शक्य आहे. अशावेळी आधुनिक, आधुनिकता, आधुनिकतावादी संकल्पना समजावून घेताना युरोपीय आणि भारतीय संदर्भातून तत्कालीन कालखंडातील सामाजिक - राजकीय स्थित्यंतरे आणि त्यातून वाढलेल्या चळवळी ध्यानात घेणे अगत्याचे ठरते. या अनुषंगाने मांडणी करताना पुढील विवेचन अपेक्षित आहे.

#### २.२.१.१ आधुनिक

'अधुना' या संस्कृत शब्दापासून आधुनिक हा शब्द तयार झालेला आहे. आधुनिक हा शब्द बौद्धिक आणि सामाजिकतेसह सर्वच व्यवहारात वापरला जात असतो. अशावेळी त्याचा अर्थ नवीन या अर्थाने गृहीत धरलेला असतो. ''अधुना म्हणजे आता, हल्ली, आताच्या काळी, या क्षणी; तेव्हा आधुनिक म्हणजे आताचे, हल्लीचे, या क्षणाचे. यामागे अर्थातच कालपरिमाणाची चौकट आहे.''[१] याचा अर्थ आधुनिक म्हणजे आता, हल्ली, या क्षणाचे असे अर्थ असले तरी काहीएका व्यापक अर्थाने आज ही संज्ञा जुण्याच्या पार्श्वभूमीवर नवीन या अर्थाने वापरली जात आहे. साहित्यातही ''आधुनिक (मॉडर्न) ही संज्ञा 'नवीन' या अर्थाने वेगवेगळ्या वाङ्मयीन कालखंडासाठी वापरलेली आहे.''[२] आधुनिक म्हणजे नवीन असा अर्थ घेताना एखादी गोष्ट नवी ठरते तीच मुळी जुण्याच्या पार्श्वभूमीवर. परिणामी आधुनिक या संज्ञेच्या चर्चेत परंपरेला सामावून घ्यावे लागते, ही गोष्ट ध्यानात घ्यावी लागेल.

युरोपमध्ये मागील पाच-सहा दशकात नव्या प्रबोधनावर आधारित नवी व्यवस्था उभी राहत होती. ही व्यवस्था परंपरेला विवेक, बुद्धी, समता, स्वातंत्र्य, वैज्ञानिक दृष्टी, ऐहिकता, व्यक्तिवाद, वस्तुनिष्ठता या

निकषांवर तपासते. या कसोट्यांवर न उतरणाऱ्या व्यवस्थांबद्दल स्वाभाविकच ती साशंक राहते. यामुळे परंपरेतील दैवी असे जे काही मानले जाते त्यास नाकारते. अशा विचारांच्या मुळांशी माणूस केंद्रस्थानी असल्याने मानववादी असण्याला प्राधान्य देते. मूल्यांच्या अंगाने देखील विवेकी, बुद्धीप्रामाण्यवादी, समतावादी, स्वातंत्र्यवादी, व्यक्तिवादी, ऐतिहकतावादी, वस्तुनिष्ठतावादी असणेही आधुनिक असण्यामध्ये गृहीत धरले जाते. याचा अर्थ बौद्धिक व्यवहारात वापरला जाणारा आधुनिक हा शब्द केवळ कालसूचक नाही तर तो प्रवृत्ती-प्रकृतीसूचकही आहे.

आधुनिक या शब्दाचा अर्थ कालसूचकतेच्या पलीकडे जात प्रवृत्ती-प्रकृतीसूचक होण्याला काही महत्त्वपूर्ण संदर्भ आहेत. प्रारंभी युरोपचा आणि उत्तरकाळात भारतासहित उर्वरित जगाचा जो मध्ययुगातून नव्या युगात प्रवेश होत होता, त्या प्रवेशाचा संदर्भास आधुनिक म्हणून संबोधले गेले. या अवस्थांतराच्या संदर्भामुळे आधुनिक या संज्ञेला कालसूचक अर्थापलीकडे जात प्रवृत्ती-प्रकृतीसूचक अशा अर्थाने पाहिले जाऊ लागले. आधुनिक या संज्ञेकडे अशा पद्धतीने पाहण्याचा इतिहास हा युरोपमध्ये सोळाव्या-सतराव्या शतकात आणि आपल्याकडे तो एकोणिसाव्या शतकात नोंदविता येतो.

### २.२.१.२ आधुनिकता

आधुनिकता ही काळाच्या एका टप्प्यात प्रकल्पासारखी आकारास आलेली विशिष्ट अशी जीवनदृष्टी आहे. आधुनिकतेत एकवटल्या गेलेल्या गोष्टींना एक विचारव्यूह किंबहुना एक मूल्यव्यवस्था म्हणूनही पाहिले जाते. प्रारंभी युरोपमध्ये विशिष्ट अशा भौतिक परिस्थितीत आधुनिकता आकारास आली. आणि तिचा जगभर प्रवास झाला. युरोपमधील तेरावा-चौदाव्या शतकातील सामाजिक-सांस्कृतिक घडामोडीतून आधुनिकतेची भूमी तयार होत होती. युरोपमधील चौदाव्या शतकातील पुनरूज्जीवनवादाची चळवळ पुढे धर्मसुधारणेची चळवळ, प्रबोधनवादी चळवळ, शिवाय पुढच्या काळात विज्ञान क्षेत्रातील विविध शोधातून विज्ञानदृष्टी, वस्तुनिष्ठ दृष्टिकोन, व्यक्तिवाद अशा गोष्टींचा विकास झाला. शिवाय विविध ज्ञानशाखांच्या उदय-विकासामुळे विवेकवाद, बुद्धिप्रामाण्यवाद, वस्तुनिष्ठ दृष्टिकोण इ. तत्त्वांना समाजव्यवहारात महत्त्वपूर्ण स्थान मिळू लागले. तत्कालीन रूढी-परंपरेविरोधी बंडाची भूमिका उभी राहू लागली. धार्मिक बंधने आणि अंधश्रद्धाविरोधी आवाजाला समाजातून बळ मिळू लागले. या सगळ्याचा समग्र परिणाम म्हणजे आधुनिकता होय. चौदाव्या शतकापासून तिथे सुरू झालेल्या विविध चळवळींचा परिपाक म्हणून आधुनिकतेकडे पाहिले जाते.

युरोप हा आधुनिकतेच्या प्रकल्पाचा मूळ प्रदेश म्हणून संपूर्ण जगभरात ओळखला जातो. आधुनिकतेच्या मूल्यव्यवस्थेची आणि तिच्या विस्ताराची सुरुवात युरोपमधून झाली आणि उत्तरोत्तर हा प्रकल्प जगभर व्यापत राहिला. या प्रकल्पाच्या परिणामातून संपूर्ण युरोप सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अंगाने बदलू लागला आणि उत्तरोत्तर अमेरिका, आशिया, आफ्रिका ह्याही खंडात बदलाचे वारे वाहू लागले. ह्या प्रकल्पाचे सगळ्यात महत्त्वपूर्ण कार्य कोणते असेल तर सरंजामशाहीचे-साम्राज्यवादाचे गडकिल्ले उद्ध्वस्त होण्यास प्रारंभ झाले आणि देशादेशांमध्ये लोकशाही शासनव्यवस्था रुजू लागली. याच प्रकल्पातून व्यापक

पातळीवर समता, स्वातंत्र्य, बंधुता, विवेक, चिकित्सा, बुद्धिप्रामाण्यदृष्टी, विज्ञाननिष्ठा इ. मूल्यांच्या प्रस्थापनेला महत्त्व आले. आधुनिकता अशा अर्थाच्या बदलांची निदर्शक आहे. एकुणात आधुनिकतेच्या प्रकल्पाचा प्रवास हा मानवी संस्कृतीच्या विकासप्रक्रियेतील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानावा लागेल. युरोपपासून जगभरात वाढत गेलेल्या आधुनिकतेचा प्रवास हा विलक्षण वाटावा असा आहे. काळाच्या ओघात मात्र आधुनिक युरोपने जन्माला घातलेल्या आधुनिकतेच्या प्रकल्पातील अनेक अंतर्विरोध पुढे आले. आधुनिकतेचा ढालीसारखा वापर करून त्याच्या आड वाढलेल्या भांडवली व्यवस्थांचा विस्तारही नजरेआड करता येत नाही. असे असले तरी हा कालबद्ध टप्पा प्रारंभी युरोप आणि उत्तरोत्तर सबंध जगभरातील व्यक्तिगत आणि संस्थात्मक पातळीवरील जीवनव्यवहार मूल्यांच्या अंगाने गतिमान करण्यात मोलाची भूमिका बजावला आहे, याबाबत अनेक अभ्यासक आणि इतिहासकारांमध्ये एकमत आहे.

### २.२.१.२.१ आधुनिकतेचा ऐतिहासिक परिप्रेक्ष्य

#### आधुनिकतेचा युरोपीय संदर्भ

साधारण तेराव्या-चौदाव्या शतकापासून युरोपमध्ये बदलाचे वारे वाहू लागले. हा बदल पंधराव्या शतकापासून अधिक गतिमान झाला. या अर्थाने इ.स. १४५३ मध्ये कॉन्स्टॅन्टिनोपल तुर्की लोकांच्या हाती जाणे हा कालबिंदू युरोपच्या गतिमान बदलाच्या मुळाशी विशेष गृहीत धरला जातो. याचा अर्थ बदलाला अपेक्षित असलेली सर्व पूरक कारणे ही इ.स. १४५३ नंतरच घडली असे नाही. त्यापूर्वी दोन-तीनशे वर्षांपासून युरोपमध्ये व्यवस्थांमधील पारंपरिक रचनातंत्राला धोका निर्माण करणाऱ्या विविध गोष्टी घडत होत्या. पुढे इ.स. १४५३ पासून समाज बदलास पूरक आणि परिणामकारक ठरलेली कारणे ही अधिक आहेत. इ.स. १४५३ च्या कॉन्स्टॅन्टिनोपलच्या पाडावापासून पहिल्या महायुद्धापर्यंतचा काळ हा युरोपमधील आधुनिकतेच्या बहराचा काळ मानला जातो. या काळात युरोपच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक पातळीवर विविध छोट्या-मोठ्या चळवळींचा उदय झालेला होता. एकीकडे रूढी-परंपरेविरोधी बंडाची भूमिका, धार्मिक कर्मकांडांना विरोध, तर दुसरीकडे याच टप्प्यात विज्ञानाच्या क्षेत्रातील विविध शोध, औद्योगिकीकरण, शहरीकरण अशातून जीवनव्यवहार समूहनिष्ठेकडून व्यक्तिनिष्ठेकडे सरकू लागला.

सतराव्या शतकापासून युरोपमधील विविध देशांचा प्रारंभी व्यापार आणि पुढे राज्यकर्ते म्हणून भारताशी वाढत गेलेल्या संपर्कातून आपल्याकडे आधुनिकतेचा प्रकल्प ठळक होत गेला. आपल्याकडील आधुनिकतेची प्रक्रिया ध्यानात घेताना मध्ययुगानंतरचा युरोप आणि तेथील सामाजिक-राजकीय आंदोलनांचा परिचय अपरिहार्य ठरतो. हा परिचय तेथील ग्रीक विद्या पुनरुज्जीवनाची चळवळ, धर्मसुधारणा चळवळ, विज्ञानदृष्टी, औद्योगिक क्रांती, प्रबोधन चळवळ अशा टप्प्यातून उलगडणे सोयीचे ठरेल. मध्ययुगानंतर युरोपची नव्याने बनत चाललेली व्यवस्था समजून घेताना तेथील वैचारिक-सांस्कृतिक आंदोलनांची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

**ग्रीक विद्या पुनरुज्जीवन चळवळ**

युरोपच्या पश्चिम आणि पूर्व या दोन्ही प्रदेशात पसरलेले रोमन साम्राज्य इ.स. ४७६ कोसळले. तिथून पुढे रोमन साम्राज्यातूनच उदयास आलेले बायझँटाइन नावाचे साम्राज्य पूर्व युरोपमध्ये टिकून होते. इ.स. १४५३ मध्ये तुर्की हल्ल्यामुळे या साम्राज्याची राजधानी कॉन्स्टॅन्टिनोपाल हे शहर पडले व तेही साम्राज्य कोसळले.[३] बायझँटाइन साम्राज्याचे एक महत्त्वपूर्ण विशेष म्हणजे तिथे विद्वांनाना आश्रय आणि अभय होते. हे साम्राज्य ग्रीक पंडितांचे विद्यापीठ म्हणूनच ओळखले जायचे. अशावेळी कॉन्स्टॅन्टिनोपलवर तुर्की टोळ्यांचे हल्ले होऊ लागल्याने कॉन्स्टॅन्टिनोपालमधून बहुतांश ग्रीक विद्वान सुरुवातीला इटली आणि नंतर युरोपच्या अन्य देशांमध्ये (इटली, इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल इ.) वेगाने स्थलांतरीत झाल्याचे सांगितले जाते. सुरुवातीच्या काळात इटलीसह युरोपमधील अनेक देशांच्या धनिकांनी दिलेल्या आश्रयाने त्यांचा विद्याव्यासंग सुरू झाला. या विद्वानांनी युरोपच्या पश्चिम आणि दक्षिण भागात येताना आपल्यासोबत अनेक जुने ग्रीक ग्रंथसंग्रह आणले होते. यातूनच पुढे अनेक ग्रीक साहित्य आणि शास्त्रीय-तत्त्वज्ञानात्मक ग्रंथांची भाषांतरे प्रकाशित होऊ लागली. परिणामी युरोपमध्ये तात्त्विक विचाराला, धर्मचिंतनाला, धर्मचिकित्सेला नव्या प्रेरणा मिळू लागल्या.[४] जुन्या ग्रीक व लॅटिनमधील ज्ञानव्यवहाराला एका दृष्टीने नव्याने उजाळा मिळाला. यामध्ये ग्रीक-रोमनांच्या शास्त्रीय दृष्टिकोनांचा, त्यांच्या स्वतंत्र विचारांचा विशेष समावेश होता. याच प्रक्रियेला युरोपमध्ये ग्रीक विद्यांचे पुनरुज्जीवन असे म्हटले गेले. ज्याच्यामध्ये पुढील काळातील युरोपचा आणि पर्यायाने संपूर्ण जगाचा चेहरामोहरा बदलण्याची क्षमता साठून राहिलेली होती.

यातून ग्रीक-रोमनांच्या जुन्या शास्त्रशुद्ध दृष्टिकोनांचा आणि स्वतंत्रपणे विचार करण्याच्या पद्धतीचा पुन्हा एकदा नव्याने अन्वयार्थ लावण्याची प्रक्रिया सुरू झाली. जुन्या ग्रीक ग्रंथांच्या पारायणा पलीकडे जाऊन त्यातून नवा अर्थ उलगडण्याची, नव्या विचाराला चालना देण्याची प्रक्रिया सुरू झाली. युरोपमधील बंदिस्त अशा ख्रिश्चन धर्मप्रणित समाजात ग्रीक चैतन्याचा झालेला पुनर्जन्म हा व्यापक पातळीवर लक्षणीय ठरला. विविध प्रज्ञावंताला मानवी जीवनाकडे, निसर्गाकडे पाहण्याची नवी दृष्टी लाभली. त्यातून विश्वाची आणि जीवनाची नवी रहस्ये उलगडण्याची प्रेरणा लाभली. एक नवी मानव्याची जाणीव, मानवतावादी दृष्टिकोन या काळात उदयास आला. मुळात हा प्राचीन ग्रीक मानवनिष्ठ परंपरेचा वारसा होता. यातून मानवाच्या माहात्म्याचे, त्याच्या अपरंपार सर्जनशक्तीचे दर्शन या काळात झाले. मानवी जीवन हेच महत्त्वपूर्ण मूल्य आहे याची जाणीव होऊ लागली.[५] समाजव्यवहारात समूहाचे महत्त्व नगण्य मानून व्यक्तीला केंद्र मानण्याची धारणा ही ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनातूनच युरोपमध्ये मूळ धरू लागली. हे सर्व घडताना युरोपचा तेथपर्यंतचा प्रवास हा ख्रिश्चन धर्माच्या चर्चप्रणीत दाबातून बंदिस्त आणि अत्यंत कठीण ठरलेला होता. अशाप्रसंगी ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनामुळे मग नव्या विचाराचे वारे वाहू लागले. आणि धर्मसत्तेच्या आहारी गेलेल्या समाजात त्याचवेळी विविध ताण देखील तयार होऊ लागले. अशा ताणाच्या वातावरणात ग्रीक विद्यांचे पुनरुज्जीवन ही गोष्ट युरोपमध्ये एका चळवळीच्या रूपाने मूळ धरलेली दिसेल.

या चळवळीने चर्चकेंद्रित पारंपरिक चौकटींना धक्के दिले. याने धार्मिक अनागोंदीतून बाहेर येण्यास तत्कालीन युरोपीय समाजाला मदत झाली. धर्मव्यवस्थेतून तयार झालेल्या सामाजिक व्यवस्थेच्या बंधनातून

व्यक्तीचे कार्यकर्तृत्व मोकळे झाले. याचा परिणाम समाज-समूह मताहून व्यक्तीच्या मताला महत्त्व प्राप्त होऊ लागले. हा कालखंड केवळ वैयक्तिक कर्तृत्वाने झगमगणारा राहिला नाही. तर ''ह्या वैयक्तिक कर्तृत्वातून एक अतिशय चैतन्यशील अशी सामाजिक परंपरा निर्माण झाली.''[६] परिणामी अख्खा समाजच नव्या धारणेने चलित होण्यास ग्रीक विद्या पुनरुज्जीवनाची चळवळ महत्त्वपूर्ण ठरली. एकूणच या चळवळीद्वारे धर्मव्यवस्थेच्या सापळ्यात अडकलेल्या माणसांच्या विचारांना मोकळीकता मिळाली. त्यांच्यावरील रूढी-परंपरेची बंधने ढिली पडली. येथूनच व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिवादी-विवेकवादी दृष्टिकोन, विज्ञाननिष्ठा, लोकशाही शासनव्यवस्था यांचे बीजारोपण झाले. याने धर्मसुधारणेला चालना मिळाली. ही प्रक्रिया गतिमान होऊन तिला धर्मसुधारणा चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. युरोपला अंधारयुगात नेण्यात जशी धर्मसत्ता जबाबदार होती, तशी युरोपच्या आधुनिकतेचे दरवाजे किलकिले करण्यात मध्ययुगातील धर्मसुधारणा चळवळीची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली.

**धर्मसुधारणा चळवळ**

आधुनिक युगात युरोपचा चेहरामोहरा बदलण्यापूर्वी तेथील राजसत्तेवर आणि समाजमनावर धर्मसत्तेची लोखंडी पकड होती. हे चित्र जवळपास बाराव्या-तेराव्या शतकापर्यंत ठळक होते. पुढे सोळाव्या शतकापासून युरोप अनेकार्थाने बदलला. अठराव्या शतकात तर युरोपात आधुनिक युगाला प्रेरक करणारी केवळ समाजाच्या राजकीय, आर्थिक पातळीवर नव्हे तर तत्त्वज्ञान, विज्ञान आणि यंत्रसामुग्रींमध्ये कमालीचा बदलाव आला. ह्याचे श्रेय या दोन महत्त्वपूर्ण चळवळींना जाते. त्यातील पहिली म्हणजे ग्रीक विद्येची पुनरुज्जीवनवादी चळवळ आणि दुसरी धर्मसुधारणेची चळवळ होय. ज्यांनी युरोपच्या समाजकारण-राजकारणाला बायबल आणि पोपच्या पकडीतून सोडविले.

ख्रिश्चन धर्माच्या उदयापासून सुरुवातीच्या चार-पाच दशकांनंतर बाराव्या-तेराव्या शतकापर्यंत बायबल धर्मग्रंथ म्हणून प्रमाण, पोप सर्वोच्च म्हणून त्यांचा शब्दप्रमाण अशा अचिकित्सक वर्तुळात युरोप सापडलेला होता. एका अर्थाने संपूर्ण समाजजीवन धर्मपरंपरेत गढून गेले होते. ही स्थिती उत्तरोत्तर अधिक गुंतागुंतीची होत धर्मसंस्थेचा स्तर अवनतीकडे झुकलेला होता. रोमन चर्च हे मध्ययुगाच्या अखेरपर्यंत युरोपच्या धर्मश्रद्धेचे एकमेव केंद्र होते. युरोपमधील अन्य देशात स्थापन झालेल्या चर्चवर मध्यवर्ती चर्चचे नियंत्रण होते. चर्चचे प्रमुख पोपकेंद्री नियंत्रण हे केवळ धार्मिकतेपुरते मर्यादित न राहता त्याचा विस्तार वैयक्तिक, सामाजिक किंबहुना राजकीय जीवनाच्या अंगोपांगापर्यंत पसरले. या काळात पोप आणि त्याचे बहुतांश साहाय्यक धर्मगुरू हे जुलमी, गबर आणि लुटारू झाले असल्याच्या नोंदीच अधिक आढळतात. राजा व प्रजा यांचे परस्परसंबंध, सर्व आर्थिक व्यवहार यांचे सूत्रचालन पोप करू लागला. धर्मव्यवस्थेचा समाजावरील अशा विचित्र आणि लोखंडी पकडीमुळे तत्कालीन काळात समाजात नव्या विचारांना, विशेषतः वैज्ञानिक विचारांना तर अजिबात थारा नव्हता. एका अर्थाच्या कुंठितावस्थेने नवविचारांचा गळा घोटला जात होता.

ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनातून पुढे आलेल्या विचारविनिमयामुळे धर्मसत्तेने व्यापलेल्या युरोपच्या वरील परिस्थितीमध्ये साधारण पंधराव्या शतकापासून काहीएक सुधारणा होऊ लागली. या काळात इतिहास,

सामाजिक शास्त्रे, नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, लोकसत्ताक शासनपद्धती, साहित्य, कला आदी अनेक ज्ञानविषयांवरील ग्रीक ग्रंथांनी तत्कालीन युरोपमध्ये एका अर्थाने नवचैतन्याचे वातावरण निर्माण केले. धर्मसंस्थेत शिरलेल्या अनेक दोषांविरोधात हळूहळू जागरूकता येऊन त्याविरोधात प्रश्न विचारले जाऊ लागले. याकडे धर्मव्यवस्थेविरुद्धच्या बंडखोरीची सुरुवात म्हणून पाहता येईल. धर्मग्रंथ आणि विवेक यात विवेकाला प्रमाण मानले जाऊ लागले. हा विश्वास स्वभाषेच्या/देशी भाषेच्या आविष्कारात आणि लॅटिन भाषेच्या वर्चस्वाला केलेल्या विरोधातून वाढू लागला. ''देशी भाषांच्या विकासामुळे ज्ञानप्रसार सुलभ झाला. विचारवंतांना धर्मसंस्थांतील अनेक दोष दिसू लागले. या विचारवंतांपैकी इंग्लंडमधील जॉन विक्लिफ हा ऑक्सफर्डविद्यापीठात धर्मशास्त्राचा प्राध्यापक होता. त्याने बायबलचे इंग्रजीत भाषांतर करण्याचे महत्कार्य केले. प्रत्येकाने बायबलच्या अध्ययनावरून आपले आचरण ठरवावे, असे त्याने प्रतिपादन केले. धर्मसंस्थांतील अनाचारावरही सडकून टीका केली. धर्मसुधारणेचा शुक्रतारा म्हणून त्याच्या कार्याचे मूल्यमापन केले जाते. विक्लिफच्या प्रभावाने बोहीमियातील प्राध्यापक यास हुस याने धर्मसंस्थातील अनेक प्रकारावर टीका केली. कॉन्स्टन्सच्या परिषदेने त्यास पाखंडी ठरवून जिवंत जाळण्याची शिक्षा देण्यात आली. अशा सुधारणावाद्यांच्या कार्याने पुढील काळातील धर्मसुधारणांचा पाया घातला गेला.''[७] धर्माच्या निरंकुश सत्ता आणि त्याविषयीच्या धार्मिक श्रद्धास्थानाला धक्के बसू लागले. पोप आणि चर्चप्रणीत सत्तेस नकार दिला जाऊ लागला. माणसांचा बुद्धिसामर्थ्यावर, कर्तृत्वावर विश्वास निर्माण होऊ लागला.

या काळात विविध विचारवंत-शास्त्रज्ञांना धर्मव्यवस्थेने पाखंडी ठरवले, अनेकांना मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली, मात्र होणारी मांडणी-लागणारे नवनवे विज्ञानविषयक शोध थांबले नाहीत. या दृष्टीने सेंट थॉमस, ॲक्विनास, डांटे, मार्सिलिओ यांच्यासारखे विचारवंत आधुनिक युरोपचे अग्रदूत मानले जातात. उपरोक्त मंडळींनी प्राचीन ग्रीक विचारवंत उदा. प्लेटो, ॲरिस्टॉटल आदी आणि इतर तत्त्वज्ञांच्या आधारे तत्कालीन समाजाला चर्चप्रणीत धार्मिक बंधनातून सोडवण्याचा जो प्रयत्न केला तो विशेष आहे. या सगळ्यातून धर्मसुधारणेच्या कृतिकार्यक्रमाला चळवळीचे रूप आले. संघटित धर्मसत्तेच्या विरोधातील विवेकपूर्ण संघर्ष, उदारमतवादाचा उदय, व्यक्तिस्वातंत्र्याची बीजधारणा ह्या सर्व गोष्टी धर्मसुधारणा चळवळीची कमाई होती. याच गोष्टींनी पुढे सामाजिक क्षेत्रात सरंजामी व्यवस्थेला आणि राजकीय क्षेत्रात राजेशाहीला आव्हान दिले.

**विज्ञान आणि विज्ञानदृष्टीचा विकास**

पुनरुज्जीवन चळवळ आणि धर्मसुधारणा चळवळीतून आकारलेल्या युरोपच्या सामाजिक-राजकीय पर्यावरणात विज्ञानाच्या विकासाचे बीजारोपण झाले. पोलंडच्या निकोलस कोपर्निकसने नव्या खगोलशास्त्रातील शोधाने पोपसह युरोपच्या समाजमनाला धक्का दिला. इटलीतील गॅलिलिओ, जर्मनीतील केपलर इत्यादी शास्त्रज्ञांनी देखील कोपर्निकसप्रमाणेच लक्षणीय शोधप्रवास घडवून आणला. या काळात केप्लर, कोपर्निकस, गॅलिलिओ सारखी मंडळी वैज्ञानिक क्षेत्रात कार्यरत होती. हा तोच काळ होता की, ज्या काळात नैसर्गिक घटनांमागे दडलेल्या शक्तींचा शोध घेऊन आपण त्यांच्यावर काबू मिळवू शकू आणि आपल्या क्षमतांचा विस्तार करू शकू अशी अशा वैज्ञानिकांमध्ये बळावत होती.[८] समाजातील अशा अर्थाच्या वैज्ञानिक प्रगतीमुळे नैसर्गिक गोष्टींना केंद्रस्थानी ठेवत, त्यांच्यात दडलेल्या शक्तींचा शोध घेण्यातून

माणसाच्या नियंत्रणात अनेक गोष्टी येऊ लागल्या. यातून समाजाच्या भौतिक स्थितीत आमूलाग्र बदल होत राहिला. उत्तरोत्तर हा आलेख चढता राहिला.

यातून परंपरेशी तुलना करता एका अर्थाची नवीन जीवनपद्धती विकसित होत होती. कृषिजीवनातून बाहेर पडत भौतिक जग आणि वैचारिक बदलांकडे सर्वसामान्यांचे आकर्षण वाढत गेले. या परिणामातून युरोपमध्ये औद्योगिक क्रांतीची भूमी तयार होऊ लागली. समाजव्यवहारात हे बदल ठळक होण्यास अठराव्या शतकाचा मध्यावधीचा काळ यावा लागला. या बदलांनी युरोपमधील औद्योगिक क्रांती चलित केली. आणि युरोपीयन समाजात एका नव्या युगाचा आरंभ झाला. त्या नव्या युगास यंत्रयुग म्हणून ओळखले जाते. याच काळात युरोपचा भांडवलशाही व्यवस्थेत प्रवेश झाला. (आणि याच परिणामातून सुरुवातीला व्यापार आणि नंतर साम्राज्यवादाच्या हेतूने युरोपमधील अनेक देशांनी जग पादाक्रांत केलेले पहावयास मिळते.)

**औद्योगिक क्रांती**

स्थूलमानाने इ.स.१७५० ते १८५० हा शंभर वर्षांचा काळ युरोपीय औद्योगिक क्रांतीचा काळ मानला जातो. औद्योगिक क्रांतीने युरोपच्या आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनाला एकमेकांसह चलित केले. आर्थिक हितसंबंध, राजकीय घटना, त्यातून निर्माण होणारे नवे सामाजिक वर्ग यांच्याबरोबरच विज्ञान आणि तंत्रज्ञान यात झालेल्या आमूलाग्र क्रांतीतून औद्योगिक संस्कृतीचा उदय झाला.[९] सुरुवातीला कापडउद्योगात काही शोध लागले. सूतकताईचे यंत्र आले. हातमाग मागे पडू लागले. अठराव्या शतकाच्या मध्यावधीपासून हस्तोद्योगांच्या जोडीला यंत्रे आली. या काळात प्रथम वाफेची आणि नंतर विजेची शक्ती उपयोगात आणली जाऊ लागली. वाफ आणि विजेच्या ऊर्जेचा वापर कशाकशात करता येऊ शकेल याचाही शोध सुरू होता. त्यामुळे ''एका कल्पनेतून दुसरी कल्पना सुचावी त्याप्रमाणे एका यंत्रातून दुसरे अधिक उत्पादनदायी यंत्र निर्माण होत गेले आणि अशा प्रगत यंत्राच्या शोधामुळे मालाच्या उत्पादन प्रक्रियेला प्रचंड गती मिळाली.''[१०] त्यामुळे उत्पादनपद्धतीचे स्वरूप बदलतानाच उत्पादनप्रक्रिया सुलभ, कमी खर्चाची आणि उत्पादन अधिक प्रमाणात होऊ लागले. निसर्गातील अनेक घटनांमागील रहस्याचा उलगडा करण्याचा, भोवतालातील विज्ञान उलगडण्याचा प्रयत्न औद्योगिक क्रांतिपूर्वकाळात अनेक शास्त्रज्ञ-तंत्रज्ञांकडून कित्येक वर्षांपासून होत आले होते. वाफेचे, विजेचे शोध हे त्यावर अवलंबून होते. अर्थात विज्ञानातील नव्या नव्या शोधांनी यंत्रयुग आकारले. आणि यंत्रयुगाने युरोपमधील औद्योगिक क्रांतीचा मोठा टप्पा गाठला.[११] एकाचवेळी सूतकताईचे यंत्र आठ-आठ चात्या फिरवून वेगाने सूत काढू लागले. मालाचे उत्पादन वाढू लागले. व्यापार वाढू लागले. अशावेळी शेतीकेंद्रित अर्थव्यवस्थेचे व्यापार-उद्योगकेंद्रित अर्थव्यवस्थेत रूपांतर झाले. यातून तथाकथित जमीनदार, सरंजामदार मागे पडत भांडवलदार उद्योजक, व्यापारी वरचढ होऊ लागले. पुढे दळणवळणाच्या सुविधांमुळे एकाचवेळी युरोपांतर्गत आणि युरोपबाहेरील प्रदेशात इंग्लंड आणि अन्य देशांचा व्यापार वाढीस लागला. या सगळ्याची सुरुवात प्रथम इंग्लंडमध्ये झाली आणि तेथून मग ही क्रांती फ्रान्स, जर्मनी आदी देशांसह संपूर्ण युरोपभर पसरली.

अर्थात आर्थिक क्षेत्रातील बदलांचा सामाजिक पुनर्घटनांवर होणारा परिणाम सर्वश्रुत आहे. त्याचे प्रतिबिंब औद्योगिक क्रांतीनंतरच्या युरोपमध्ये प्रकर्षाने दिसू लागले. याच काळात युरोपमधील एकूण उत्पादनाच्या प्रकारात आणि प्रमाणात बदल झाले. वस्तूंच्या वापराचे प्रमाण वाढले, संचयवृत्ती वाढली. व्यापाराचे प्रमाण वाढले. पूर्वकाळाशी तुलना करता 'उत्पादनपद्धतीतील आमूलाग्र बदल' आणि 'अतिरिक्त उत्पादन' या दोन गोष्टीने कधी नव्हे इतके युरोपच्या व्यापार आणि व्यापारी धोरणाला झळाळी आली. दळणवळणाची साधने आणि माध्यमे वाढली. रस्त्यांसोबत नद्या आणि कालवे, समुद्राचा वापर दळणवळणासाठी वाढू लागला. वाफेच्या शक्तीचा करून इंग्लंडमध्ये रेल्वे (१८३०) धावू लागली. वाफेच्या शक्तीने आणि लाकडाऐवजी पोलादी यंत्रे वापरून बांधलेल्या आगबोटी दूरदूरच्या देशांपर्यंत समुद्रामार्गे जा-ये करू लागल्या. याच काळात टपाल (१८४०), तारयंत्रणांची (१८४४) व्यवस्था वाढली. मुद्रणयंत्रणा, वृत्तपत्र-मासिकांचाही उदय-विस्तार याच काळातला. अर्थात या सगळ्यांची निर्मिती ही परस्परपूरक अशी होती. या सगळ्यांचा परिणाम विभिन्न प्रदेश-राष्ट्रांच्या संपर्क आणि परस्परसंबंध वाढींवर झाला. येथूनच एकूण मानवी जीवनव्यवहाराच्या-संस्कृतीव्यवहाराच्या वेगवान बदलाची सुरुवात झाली. युरोप आणि उत्तरकाळात जगाच्या बदलाच्या मुळाशी युरोपमध्ये रुजलेली आणि विस्तारलेली औद्योगिक क्रांतीच सर्वार्थाने कारणीभूत आहे हे ठामपणे म्हणता येते. युरोपमधील देशांना सुरुवातीला व्यापारासाठी आणि नंतर साम्राज्यविस्तारासाठी युरोपमधून देशांतर करण्यास तेथील विस्तारत गेलेली औद्योगिक क्रांतीच जबाबदार आहे. एकूणात नव्याने निर्माण झालेली औद्योगिक संस्कृती आणि त्यातून पुढे आलेल्या जीवनव्यवहाराने झालेले बदल नमूद करता येण्यासारखे आहे.

**प्रबोधन चळवळ**

युरोपमधील प्रबोधनाच्या चळवळीस ग्रीक विद्या पुनरुज्जीवनापासून फ्रान्सच्या राज्यक्रांतीपर्यंत विविध गोष्टी त्यास कारणीभूत आहेत. शिवाय या काळातील विविध चळवळी ह्या परस्परपूरक होत्या. प्रबोधन चळवळ असे म्हणताना साधारण पंधराव्या शतकाच्या अखेरीपासून सुरू झालेल्या नवविचारांच्या आंदोलनाला प्रबोधन चळवळ असे म्हटले गेले. सुरुवातीला इटलीपासून प्रारंभ होऊन मग फ्रान्स, नेदर्लंडस, स्पेन, इंग्लंड, जर्मनी आणि ब्रिटन आदी युरोपीय राष्ट्रांमध्ये प्रबोधनाची चळवळ गतिमान होत त्यातून विज्ञान, समाजकारण, राजकारण, साहित्यादी कला यांच्यामध्ये नावीन्यपूर्ण परिवर्तन आणि सर्जनशील आविष्कार होऊ लागले. याच काळात निसर्गातील सत्य, पृथ्वीचे आकलन, पुढे येऊ लागले.[१२] धर्मसत्तेच्या विरोधात झालेले बंड, एकाचवेळी नवे साहित्यलेखन, नव्याने विकसित होऊ लागलेली विज्ञान दृष्टी, यंत्रयुगाने सुलभ केलेले जीवनव्यवहार अशा अनेक गोष्टीतून युरोपमध्ये प्रबोधनप्रक्रिया आकारास आली.

प्रबोधनकाळात मानवी जीवनाच्या बहुतांश क्षेत्रात अनेक बाजूंनी परस्परपूरक आणि परस्परकारणाने विविध उठाव झाले. ते जीवनातील विविध क्षेत्रांना पोषक ठरले. हे जसे युरोपमध्ये घडत होते तसे वसाहतीकरणातून युरोपबाहेरील जगात देखील अनुभवास येत होते. या अर्थाने आधुनिक मानवी जीवनाची संस्कृती ही प्रबोधनप्रक्रियेने रचली. ही प्रबोधनप्रक्रिया युरोपमधील अनेक लहान-मोठ्या बंडखोर समाजसुधारक, शास्त्रज्ञ, विचारवंत, लेखक इत्यादींनी घडविलेली आहे. याच काळात शास्त्रीय आणि

वैश्विक सत्यांविषयी पुराव्यानिशी अत्यंत निर्भयाने मांडणी होऊ लागली. माणूस आणि समाजाविषयीची जी नवी आकलनं पुढे येऊ लागली ती नवखी आणि प्रखर होती. याचाच परिणाम समकालीन समाज कठोर धर्मव्यवस्था आणि त्याविषयीच्या अनेक भाकडकथांमधून बाहेर पडू लागला. आपोआपच इतिहासाशी तुलना करता प्रबोधनकाळात जे तत्त्वज्ञान आकारत होते ते अपारंपरिक होते.

या काळात पूर्वपंरपरेतील विचारसरणी आणि समज विज्ञानाच्या, बुद्धीच्या पार्श्वभूमीवर तपासून घेण्याची एक प्रवृत्ती वाढली. यावर टिकणाऱ्या गोष्टींना प्रमाण मानले जाऊ लागले. व्यक्तीच्या भौतिक संदर्भाला महत्त्व येऊ लागले. त्याच्या प्रत्यक्ष इच्छा आणि समाधान यांचे नाते जोडले जाऊ लागले. याला आड येणाऱ्या पारंपरिक चौकटींची पुनर्मांडणी/पुनर्रचना होऊ लागली. अर्थात प्रबोधनप्रक्रियेत ''बुद्धिवाद ह्या तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान होते आणि वैज्ञानिक ज्ञानाच्या आणि बौद्धिक चिकित्सेच्या आधारावर नैतिक संकल्पनांची आणि सामाजिक संस्थांची, प्रथांची पुनर्रचना करणे हा त्याचा व्यावहारिक कार्यक्रम होता.''[१३] हा कार्यक्रम जसाजसा विकसित होऊ लागला तशी प्रबोधनाची भूमिका ठळक होऊ लागली. त्यातून विज्ञानतंत्रज्ञानासह सामाजिकशास्त्रांमधूनही उत्तरोत्तर एकूण विचारविश्वाला/चर्चाविश्वाला कलाटणी देणाऱ्या सिद्धान्तनांची मांडणी होऊ लागली. प्रबोधनकाळात सर्वच क्षेत्रात एक प्रकारचे चैतन्य संचारले होते. नव्या जगाच्या शोधाची मनीषा निर्माण होत होती. सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धापूर्वीच जगभरातील बहुतांश प्रांत युरोपीय देशांना माहीत झालेले होते. शिवाय यातील अनेक प्रांतात व्यापाराच्या कारणाने युरोपीयनांचा शिरकाव देखील झाला होता. जसे भौगोलिक शोधाच्या ध्यासाने युरोपच्या एकूण आधुनिकीकरणाला व्यापक करत नेले, तसे मुद्रणकलेचा शोधही एकूण प्रबोधनप्रक्रियेत महत्त्वपूर्ण मानावा लागेल. या काळात युरोपमध्ये एकीकडे सरंजामदारीतून निर्माण झालेले यादवी युद्ध संपुष्टात येऊ लागले होते. तर दुसरीकडे औद्योगिक क्रांती गतिमान झाली तर, तिसरीकडे सामाजिक कराराच्या तत्त्वज्ञानाला देखील गती आली. यामध्ये सामाजिक आणि एकूणच राजकीय परिवर्तनाला फ्रेंच राज्यक्रांतीने (१७८९) अधिक खुले केले. फ्रेंच राज्यक्रांतीतूनच जनतेच्या सार्वभौमत्वाचे तत्त्व सामाजिक मूल्य म्हणून पुढे आले. परिणामी राजेशाही, सरंजामदारी, सरदार वर्ग, जमीनदारी वर्ग यांच्या सामाजिक आधाराला प्रचंड धक्के बसले. फ्रेंच राज्यक्रांतीने तयार केलेल्या सामाजिक पातळीवरील न्यायव्यवस्थेला पूरक असे वातावरण त्यापूर्वी इंग्लंडमधील रक्तशून्य क्रांती (१६८८) आणि अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धाने (१७७६) निर्माण केले होते. ह्या तिन्ही क्रांतींनी सुरुवातीला युरोप, मग अमेरिका आणि उत्तरोत्तर बहुतांश राष्ट्रांमधील राजेशाही, सरंजामशाही, जमीनदारीला खिळखिळे रूप आणले. एकूण सामाजिक, राजकीय जीवनव्यवहारात नव्या समानतेवर जोपासल्या गेलेल्या संस्कृतीला उदयास घातले. प्रबोधन चळवळीतील ही गोष्ट विशेष म्हणून नोंदवावी लागेल.

ग्रीक विद्येचे पुनरुज्जीवन, धर्मसुधारणा, शिक्षणाचा विकास, विज्ञानाची प्रगती, छापखान्याचा शोध, याच काळात लागोपाठ झालेल्या विविध राज्यक्रांत्यांमुळे एकूण युरोपच्या सांस्कृतिक, वैचारिक व्यवहारात आमूलाग्र बदल होत गेले. नव्या औद्योगिक क्रांतीतून आणि वाढलेल्या व्यापारातून नवा औद्योगिक समाज निर्माण होत होता. यातूनच मध्यमवर्गाची निर्मिती होऊ लागली. आणि नव्याने निर्माण झालेल्या या मध्यमवर्गाच्या हाती आधुनिक समाजाच्या बदलांची सूत्रे गेली. याच काळात समता, स्वातंत्र्य, बंधुता यांची

प्रत्यक्षातील जगात घोषणा होत होती. मात्र दुसरीकडे युरोपमध्ये भांडवलीव्यवस्था उभी राहत होती, नव-साम्राज्यवादी मानसिकता तयार होत होती. खरेतर ह्या दोन्ही व्यवस्था परस्परपूरक आणि एका टप्प्यावर परस्पर सहकार्यानेही वाढलेल्या आहेत. वरील गोष्टी परस्परविरोधी वाटत असल्या तरी याच अंतर्विरोधातून आधुनिकतेच्या विचारव्यूहाचा प्रवास सुरू झाला आणि प्रारंभी युरोप आणि कालांतराने युरोपबाह्य जगामध्ये आधुनिक जीवनव्यवहाराचा पाया घातला गेला.

**आधुनिकतेतील भारत, महाराष्ट्रातील संदर्भ**

आधुनिकतेचा प्रकल्प हा युरोपमध्ये उदयास आला असला तरी तो केवळ युरोपपुरता मर्यादित राहिला नाही. युरोपमधील भांडवलीव्यवस्थेच्या विस्तारासोबत साम्राज्यवादाच्या विस्ताराला देखील वेग आला. यातून युरोपमधील अनेक देशांनी जगभर वसाहती लादल्या. युरोपमधील साम्राज्यवादी देशांच्या अर्थोउत्पादनाला कमालीची गती आली. या अर्थाने मग युरोपचा उर्वरित जगाशी सुरुवातीला व्यापार आणि उत्तरकाळात राजकीय कारणाने संपर्क येऊ लागल्यावर युरोपमधील विचार, शास्त्र, तंत्रज्ञानाच्या पातळीवरील बदल सर्वार्थाने जगभर पसरू लागले. युरोपने वसाहतीतून ज्या देशांची राजकीय सत्ता बळकावली तेथील देशांची एकीकडे आर्थिक पिळवणूक होत होती तर दुसरीकडे नव्या बदललेल्या युरोपच्या संस्कृतिसंपर्कातून वैचारिक बदलही होत होते. या संपर्कातूनच नवी शिक्षणपद्धत, औद्योगिकीकरण, दळणवळणाची सुविधा, नवे राजकीय व्यवस्थापन अशा अनेक संदर्भांचा परिचय वसाहतीव्यवस्थेतून पुढे येत राहिले.

वसाहतीदेशांमध्ये धर्मचिकित्सा, धर्मसुधारणा, विज्ञान-तंत्रज्ञानातील शोध, आधुनिक शिक्षणव्यवस्था इ. प्रबोधन प्रकल्पाचा संसर्ग सुरू झाला. यातून वसाहतीप्रदेशांमध्ये सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक वातावरण बदलू लागले. समाजमान्य परंपरेतील श्रद्धा-विश्वास-रीतीरिवाज यांना तपासून घेणे, प्रसंगी त्याच्या विरोधात जाणे, कधी त्याच्यातील फोलपणा-तकलादूपणा स्पष्ट करून त्याचा अव्हेर करणे, किंबहुना त्यासाठीचे बुद्धिवादी-विवेकवादी पर्याय शोधणे इ. समान बाबी युरोप आणि भारतातील आधुनिकतेच्या प्रकल्पामध्ये समान असल्या तरी त्यातील तपशील आणि प्रक्रिया भिन्न आहेत.

आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतून आधुनिकतेची मूल्यव्यवस्था आकारत होती. याची सुरुवात पश्चिम युरोप, इंग्लंड, फ्रान्स, बेल्जियम, पोर्तुगाल, नेदरलँड या राष्ट्रांमध्ये झाली. अपरिहार्यपणे या देशांच्या ज्या वसाहती होत्या, तेथेही आधुनिकीकरणाची कल्पना व परिणाम प्रसृत झाले आणि आधुनिकतेचे लोण पसरविण्याच्या प्रक्रियेत जागतिक युद्धांनी महत्त्वाचा भाग उचलला. रशिया, चीन, जपान या देशात पहिल्या महायुद्धानंतर खऱ्या अर्थाने आधुनिकीकरणाचा प्रसार होऊ लागला. दोन्ही महायुद्धानंतरच्या सांप्रतच्या काळात तर आधुनिकता विश्वव्यापी बनू पाहत आहे.[१४] याचा अर्थ आधुनिकतेतून आलेले परिवर्तन हे मूलगामी असले तरी युरोपबाहेर तिच्या प्रसाराचे स्वरूप हे वेगवेगळ्या काळातील आणि वेगवेगळ्या कारणांनी झाले. दोन महायुद्धानंतर आधुनिकतेचा स्पर्श संपूर्ण जगाला वेगाने जरी होत गेला तरी आपल्याकडे मात्र याची सुरुवात ही सतराव्या शतकाच्या प्रारंभापासून होऊ लागल्याचे आणि एकोणिसाव्या-विसाव्या शतकात त्याचे स्वरूप गतिमान होत गेल्याचे चित्र स्पष्ट आहे.

युरोपमधील अनेक राष्ट्रांनी जगभर वसाहती लादल्या. भारतात वसाहती लादण्यात प्रारंभीच्या काळापासून ब्रिटिशांप्रमाणेच डच, पोर्तुगाल, फ्रान्स हेही देश होते. अन्य देशांच्या तुलनेत ब्रिटिशांनी भारतामध्ये व्यापक पातळीवर आपली सत्ता प्रस्थापित करण्यात बाजी मारलेली होती. ब्रिटिशांची वसाहतीच्या माध्यमातूनच पुढे एकहाती सत्ता संपूर्ण भारतभर निर्माण झाली आणि भारतात आधुनिकतेचा खंडित स्वरूपात का होईना प्रवेश झाला. सुरुवातीला व्यापार आणि नंतर राज्यकर्ते म्हणून ब्रिटिशांच्या स्थिरावण्याने आलेल्या संस्कृतिसंपर्कातून ज्यांची परंपरा पूर्वकालखंडात दाखवता येणार नाहीत अशा अनेक गोष्टी आपल्याकडील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक व्यवहारांमध्ये आपल्याकडे अवतरल्या. आधुनिकतेनेच प्रेरित झालेल्या ब्रिटिशांचा राजकीय सत्तेमुळे भारताशी आलेल्या दीर्घकाळाच्या संपर्काबद्दल टिपणी करताना मे.पुं.रेगे म्हणतात, ''इंग्रजांशी आपला जवळून परिचय झाला तेव्हा भारतीय परंपरा अतिशय निःसत्त्व झाली होती. ह्यात शंका नाही. तिचे चैतन्यतत्त्वच लोपल्यासारखे झाले होते. जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील आपल्या क्षीण कामगिरीवरून ही गोष्ट स्पष्ट होते. ह्या स्थितीचा एक अर्थ असा की, आपली प्राचीन परंपरा भूतकाळात विरून गेली होती. कालिदास आणि भवभूती आपले उरले नव्हते. अजिंठा आणि वेरुळ अनास्थेच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले होते. चंद्रगुप्त आणि कौटिल्य ह्यांच्यापासून राजकारणी काही शिकत नव्हते. इंग्रजी विद्येशी परिचय झाल्यामुळे युरोपचे सांस्कृतिक धन आपल्याला लाभलेच, पण आपल्या प्राचीन सांस्कृतिक धनाचाही पुनर्लाभ झाला.''[१५] एकोणिसाव्या शतकापासून अशा काही गोष्टी भारताच्या भूमीवर घडत होत्या की, ज्याचा परिणाम म्हणून भारतालाही आधुनिकतेच्या प्रकल्पाचा चांगल्या अर्थाने प्रादुर्भाव झाला. पाश्चात्त्य संस्कृतिसंपर्काने कुठल्याही पार्श्वभूमीशिवाय आधुनिकीकरणाचे आणि आधुनिकतेच्या मूल्यव्यवस्थेचे कलम आपल्याकडे एकोणिसाव्या शतकापासून होत गेले. आपसूकच यातून एका नव्या विश्वभानाचा परिचय विस्तारत गेल्याचे चित्र स्पष्ट आहे. काहीवेळेला ही प्रक्रिया तुकड्या-तुकड्याने तर काही वेळेस त्याचे स्वरूप अर्धकच्चे, अपूर्ण वाटावे असेही आहे. असे जरी असले तरी एकूण भारतीय परंपरेशी कधी विरोधी तर कधी समन्वय साधत आधुनिकतेचा प्रकल्प आपल्याकडे अवतरला.

युरोपमध्ये कालांतराने आधुनिकतेतील अंतर्विरोध जसे पुढे आले तसे आपल्याकडेही आधुनिकतेच्या प्रकल्पातील अंतर्विरोध पुढे येत गेले. यातून त्याचा प्रतिवाद करणाऱ्या, त्याला प्रतिक्रिया देणाऱ्या अनेक गोष्टी घडत राहिल्या. ही प्रक्रिया अजून पूर्ण झालेली नाही. आधुनिकतेच्या उदयाला प्रखरपणे कारणीभूत ठरणाऱ्या ज्या गोष्टी युरोपच्या भूमीत घडल्या त्यासारख्या परिस्थितीशी भारताचा संदर्भ क्षीण किंबहुना नाहीच असे म्हणता येईल. याचा अर्थ आधुनिकीकरणाची ही प्रक्रिया पाश्चात्त्य देशात चौदाव्या शतकापासून अपेक्षित असा काळ घेऊन जशी ती व्यापक होत गेली तशी प्रक्रिया ही भारतात घडलेली नाही. तेथील पुनरुज्जीवनवादाचा, धर्मचिकित्सा-धर्मसुधारणावादी चळवळींचा, विज्ञानातील नव्या-नव्या शोधांचा, प्रबोधन चळवळींचा एकूणच सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रावरती पडलेला थेटपणे प्रभाव हा तिथल्या प्रदेशात आधुनिकतेची बीजे पेरणारा ठरला. अशा तऱ्हेची आधुनिकतेची पूर्वतयारीची सक्षम पार्श्वभूमी भारतीय इतिहासाला नव्हती. ह्या गोष्टी भारतीय अवकाशात संस्कृतिसंपर्कातून उभ्या राहत होत्या. अर्थात त्याला पोषक असे काहीच घडत नव्हते असेही नाही.

भारतीय आधुनिकतेची सूत्रे युरोपीय प्रबोधनव्यवस्थेला जोडून घेताना हा व्यवहार असा सहजासहजी घडलेला नव्हता. त्यात व्यापार होता, साम्राज्यवादी मुत्सद्दी गुलामी करणारी एक व्यवस्था होती, भांडवलवादी राज्यधारणेला प्रबळ करण्याची मनसुबे होते. आपल्यात आधुनिकेच्या मूल्यांचा प्रसार व्हावा हा काही त्यांचा अंजेडा नव्हता. आपल्या सत्तेच्या सार्वत्रिकतेसाठी आणि त्याच्या सरंक्षणासाठी त्यांनी हरएकप्रकार स्वीकारले होते. जे आधुनिकतेच्या मूल्यांविरोधी होते. तसे त्यांच्याकडून सहजासहजी समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव शिकणे कठीण होते. मात्र या गोष्टींमुळे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वकाळातील भारत आणि एकोणिसाव्या शतकापासूनचा भारत असा कमालीचा बदल असलेला सामाजिक संदर्भ पुढे येत राहिला. शिक्षण, कायदा, उद्योगधंदे, दळणवळण सुविधा इ. घटकांचा याबाबतीत विचार करता येईल. या गोष्टीत ब्रिटिशांनी केलेले बदल हे भारतीय समाजव्यवस्थेत पूर्णत: नवे होते. याच कालखंडात युरोपीय संस्कृतीशी, तिथल्या साहित्यव्यवहारांशी, सामाजिक-सांस्कृतिक पातळीवरील घडामोडींशी भारतीय अभ्यासकांची, विचारवंतांची, समाजसुधारकांची ओळख होत होती. एकोणिसाव्या शतकात वरील ज्या गोष्टी नव्याने रुजल्या आणि पुढेही काळसंदर्भांने विकसित झाल्या ह्यामुळे नवे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक व्यवहार दृग्गोचर होत राहिले. ज्यातून महाराष्ट्र आणि पर्यायाने भारताची नव्याने घडण होत होती.

वासाहतिक सत्तासंबंध हे कितीही अन्यायी आणि आधुनिकतेतील मूल्यव्यवस्थेच्या तुलनेत विषम वाटत असले तरी शेवटी आधुनिक भारताची जडणघडण ही युरोप आणि येथील स्थानिक संदर्भांच्या संमिश्रणातूनच तयार झालेली आहे. खरेतर अशा अर्थाची संस्कृतिसंपर्कता ही तशी गुंतागुंतीचीच म्हणावी लागेल. ती कोणत्याही अर्थाने सुसंगतीने युक्त नव्हती. एकीकडे वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था अणि सरंजामदारी व्यवस्थेत हजारो वर्षांपासून वाढलेला स्थितीशील समाज आणि दुसरीकडे आधुनिकतेने प्रभावित झालेले आणि साम्राज्यवादाच्या आहारी गेलेली ब्रिटिश राज्यव्यवस्था असे विचित्र मिश्रण साधारणतः सुमारे दीडशे वर्षे भारतभर राहिले. याचा अर्थ त्यामध्ये अनेक अंतर्विरोध होते. अशा परस्परविरोधी स्वभावाच्या संस्कृतिसंपर्कातून एकोणिसाव्या शतकातील भारत घडलेला आहे. या नोंदीवरून आपल्याकडे आधुनिकतेच्या प्रकल्पातील नवीन अवतरणे आणि त्यांच्यात काहीकाही ठिकाणी राहिलेल्या पोकळ्या यांचेही स्पष्टीकरण मिळते. ब्रिटिशांचा संपर्क तसाही आपल्यासमाजासाठी नवीन नव्हता. तर त्याही आधी सहाशे-सातशे वर्षे मुस्लिम समाज आणि सत्तेचा संपर्क दीर्घकाळासाठी होता. मात्र ज्या ब्रिटिश समाजाशी आपली गाठ पडलेली होती ती संस्कृतिविकासाच्या एका अद्वितीय टप्प्यावर उभी होती. एकुणातच ब्रिटिश सत्तेच्या काळात भारताची वाटचाल ही एकीकडे अपरिमित शोषण आणि दुसरीकडे युरोपीय प्रबोधनविचारांची आधुनिकीकरणांचे संस्कार अशा दुहेरी अंगाने झाली.

एकोणिसाव्या शतकात आपल्याकडे धर्मसुधारणा, प्रबोधनविचार, उत्पादनप्रक्रियेत झालेला बदल, नव्या शिक्षणव्यवस्था आणि त्यातून बाहेर पडणारे नवशिक्षित यांच्या माध्यमातून आधुनिकतेच्या चर्चाविश्वाचा प्रवेश होत होता. एकीकडे गिरण्या, धरणे, आगगाड्या, उंच इमारती, उद्योग-व्यवसायात झालेल्या यंत्रप्रवेशाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा अनुभव येत होता तर दुसरीकडे शाळा, महाविद्यालये, न्यायालये, कायदे, नोकरशाही, प्रशासन यातून बदल अनुभवास येत होता. अर्थात वरील अर्थाने आधुनिकता प्रतीत होत

होती, जाणवत होती, येथील समाजजीवनावर प्रभुत्व प्रस्थापित करत होती.[१६] आपल्या पर्यावरणात वरील अर्थाचे बदल हे पूर्णतः नवीन होते. किंवा नजीकच्या काळात अशा अर्थाच्या बदलासाठी पूरक वातावरण देखील तयार नव्हते. एकूणच या काळात युरोपीय वसाहतीमुळे तेथील आधुनिकीकरणाचा आणि त्यातून विकसित झालेल्या आधुनिकतेच्या मूल्यव्यवस्थेचा परिणाम आपल्या येथील समाजव्यवस्था आणि व्यवहारांवर खोलवर होत राहिला.

ब्रिटिशसंस्कृतिसंपर्कातून जो आधुनितेच्या प्रभावातील आधुनिक नागरी समाज निर्माण होत होता तो दुहेरी स्वरूपाचा होता. अर्थात ब्रिटिशांच्या विविध व्यवस्थांमध्ये सहज प्रवेश मिळावा म्हणून प्रयत्नशील असणाऱ्या उथळ वर्गाबरोबर युरोपीय संस्कृतीची विचारपूर्वक चिकित्सा करणारा एक स्वतंत्र वर्ग मराठी समाजात निर्माण होत होता. या माध्यमातून युरोपीयांचा धर्म, त्यांचे तत्त्वज्ञान, त्यांची साम्राज्यवादी वृत्ती या सर्वांची चिकित्सा ही काही विचारी लोकांकडून होत राहिली. विशेष म्हणजे ही चिकित्सक मंडळी ब्रिटिशांनी प्रशिक्षित केलेल्या नव्या शिक्षणव्यवस्थेतून तयार झालेली होती. ही सर्व प्रक्रिया आपल्याकडील प्रदेश, वर्ण, जातीच्या संदर्भाने भारित होती. हे सुरुवातीस मुंबई, पुणे इ. शहरामध्ये घडत होते. शिवाय या प्रक्रियेशी पहिला संबंध हा येथील उच्चवर्णीय, उच्चजातीय मंडळींचा आलेला होता. यावरून आपल्याकडील आधुनिकतेचा प्रकल्प तुकड्या-तुकड्याने आणि विशिष्ट समाज/समूह-प्रदेश याच्याशी कसा निगडित होत राहिला, याचा एक अंदाज उभारत येईल.

### २.२.१.२.२ आधुनिकतेची व्यवच्छेदक लक्षणे

आधुनिकतेला अधिक नेमकेपणाने स्पष्ट करताना आपण असे म्हणू शकू की, युरोपीय समाजातील आधुनिकतेच्या प्रक्रियेचा आरंभ पुनरुज्जीवनाच्या कालखंडात झाला असला, तरी तिला सुस्पष्ट स्वरूप प्रबोधनाच्या कालखंडाने दिले. आधुनिकतेकडे एका अर्थाने प्रबोधनाची जाणीव म्हणून पाहता येईल. या जाणिवेच्या मुळाशी बुद्धिप्रामाण्यदृष्टी होती. धर्म, सरंजामदारी, अंधश्रद्धा, पारंपरिकता या गोष्टींना विरोध करीत त्यांच्या जागी विवेक, समता, स्वातंत्र्य, विज्ञान, इहवादी दृष्टिकोन या गोष्टींची प्रतिष्ठापना होत होती. मुळात सभोवतालच्या विश्वाच्या पसाऱ्याचा अर्थ लावण्याची क्षमता मानवी बुद्धीमध्ये आहे, या ठाम विश्वासावर आधुनिकतेच्या मूल्यव्यवस्थेची उभारणी झाली होती. मानवी बुद्धीच्या साहाय्याने सामाजिक-राजकीय पातळीवर विकास घडवून आणून माणसांचे आयुष्य सुलभ करता येईल, हा आशावाद आधुनिकतेच्या मूल्यव्यवस्थेमागे होता. विशिष्ट स्थानिक संस्कृतीने निर्मिलेली मानवविषयक विचार-संकल्पनांना ओलांडून समग्र मानवजातीला कवेत घेणारी वैश्विकतावादी विचार-संकल्पना आधुनिकतेतून अभिप्रेत होती.[१७] किंबहुना ती तशी व्यक्त होत होती.

औद्योगिक संस्कृतीतून जो औद्योगिक समाज निर्माण होत होता त्या औद्योगिक समाजातूनच आधुनिकतेचा विचार आकारलेला होता. ज्याला आपण औद्योगिक समाज म्हणतो, आधुनिक समाज म्हणतो तो पूर्व काळातील अन्य कोणाही सामाजिक स्थितीपेक्षा अधिक गतिमान ठरला. उत्पादनव्यवस्थेतील बदलांमुळे झालेला औद्योगिक विकास आणि बाजारपेठीय अर्थव्यवस्था यातून राजकीय संदर्भांमध्ये झालेले

बदल, हे बदल लोकशाही शासनव्यवस्था आणि राष्ट्र-राज्यनिर्मितीतून स्पष्ट होत गेले. या काळात आधुनिक मानता येतील अशा अनेक व्यवस्था आणि व्यवस्थांच्या परिणामांतून लक्षणीय मूल्ये युरोपच्या धरतीवर उदयाला आल्या आणि रुजल्या. किंबहुना एकातून दुसरे आणि दुसऱ्यातून तिसरे अशा स्वरूपाने त्यांचा प्रवास गतिमान देखील झाला. यातूनच विविध वैचारिक-सांस्कृतिक आंदोलन निर्माण होत त्यातून नव्या विचारपरंपरा प्रवृत्त होत होत्या. औद्योगिकीरणातून नागरीकरणाचा झालेला विस्तार आणि अशा प्रक्रियांमधून वाढणारा मध्यमवर्ग हा नव्या अनेक चळवळींचा आधार बनू लागला. याशिवाय शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होणे, नवा लिहिता-वाचता वर्ग निर्माण होणे, यामध्ये स्त्रियांचा देखील सहभाग वाढणे इ. गोष्टी ह्या आधुनिकतेच्या प्रभावातून निर्माण झालेल्या नव्या विश्वभानाचे निदर्शक म्हणून अधोरेखित करावे लागतील.

आधुनिकतेच्या जाणिवेला कोणी संवेदना तर कोणी मानवी मनाची एक प्रवृत्ती असेही म्हणतात. या प्रवृत्तीमध्ये परंपरेला शह देण्यासाठीची एक धडपड असते. या प्रवृत्तीत दैववादाची जागा बुद्धिवादाने घेतली. जगण्यातल्या कित्येक बाबतीत विवेकवाद, सहिष्णुतेला जागा मिळू लागली. आधुनिकतेच्या ज्ञानस्वरूपात अनुभवनिष्ठता आणि सुसंगतता यांना प्राधान्य आहे. त्यात आग्रही, हेकेकोरी वृत्तीला जागा नाही. परिणामी यातून विकसित होणारी राजकीय व्यवस्था ही आपसूकच साम्राज्यवादी-हुकूमशाही शासनव्यवस्थेकडून लोकशाहीकडे सरकू लागली. आणि ती त्याच पद्धतीने वाढलेली आपल्याला स्पष्टपणे दिसून येते. याशिवाय धर्मनिरपेक्षता, उदारमतवाद, विविध ज्ञानशाखांचा उदय आणि विस्तार, नव्या शैक्षणिक व्यवस्थांची निर्मिती, आणि पर्यायाने नव्या समाजव्यवस्थेसह सांस्कृतिकसंदर्भांमधील नावीन्यपूर्ण निर्मिती अशा अनेक विशेषांनी आधुनिकतेचे स्पष्टीकरण उभे करता येईल. उदा. ''परंपरागत विचार, मूल्ये आणि संस्था यांची या प्रक्रियेच्या दृष्टीने चिकित्सा करून, त्यापैकी प्रगतीच्या आड येणारे विचार, मूल्ये व संस्था यांचा खंत न बाळगता त्याग करणे व मानवी विकास पोषक घटकांचा उदा. करुणा, सहिष्णुता, ज्ञानोपासना इ. आजच्या नवीन संदर्भात परिपोष करणे, हे आधुनिकत्वाचे वैशिष्ट्य होय.''[१७] आधुनिकतेच्या अशा विशेषांकडे पाहिले तर आधुनिकतेतून जो दृष्टिकोन विकसित झालेला आहे त्याच्या व्यापाचे स्वरूप हे वैश्विक आहे. शिवाय हा विचारव्यूह अनुभवाधिष्ठित अशा विज्ञानवादी निकषांवर आधारलेला आहे.

युरोपमधील अनेक देशांमध्ये आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतून पुढे आलेली आधुनिकता ही इतिहासाची एक स्थिती वा अवस्था म्हणून पुढे आली. वरती उल्लेख केल्याप्रमाणे इतिहासातील औद्योगिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक स्थित्यंतरे व त्यामागील वैचारिक घडामोडी यांची निदर्शक म्हणून देखील आधुनिकतेचा विचार होऊ शकतो. अशा या आुधनिकतेमुळे सुरुवातीला युरोपमध्ये आणि उत्तरकाळात जगभरात धर्मसत्ता, सरंजामीव्यवस्था, वर्गव्यवस्था, जातिव्यवस्था आदी गुलामी लादणाऱ्या आणि माणसाचे मूल्य नाकारणाऱ्या व्यवस्थांविरोधातील बंड उभे राहतानाच त्याच्या जागी पर्यायी नव्या मूल्यव्यवस्था उभ्या राहत होत्या. यातून प्रखरपणे पुढे आलेली सामाजिक-सांस्कृतिक विश्लेषणे आणि चळवळींनी समकालीन जगाला अंतर्बाह्य बदलून घेण्यास भाग पाडले. आधुनिकतेच्या परिणामातून युरोपीय समाजव्यवहाराप्रमाणे तत्कालीन कलाव्यवहारात पर्यायाने साहित्यव्यवहारात आमुलाग्र बदल झाले. या

काळात पारंपरिक कलासंकेतांविरूद्ध एक बंडखोरीची भावना काम करू लागली. परंपरेविरूद्ध बंड आणि जगण्यातील-कलेतील नव्या अज्ञात बाबींचा शोध हे आधुनिकतेतील एक सूत्रच ठरले.

खरेतर वरील चर्चेचा विचार करताना संबंधित चर्चा ही आधुनिकतेच्या अंगाने मध्ययुगोत्तर कालखंडाची एक बाजू दर्शविते. या प्रक्रियेची दुसरी बाजूही आपल्याला ध्यानी घ्यावी लागेल. युरोपमधील औद्योगिक क्रांतीच्या भव्य कामगिरीने एकूण समाजात एक उत्साह आणि विलोभनीय असे चित्र उभे केले. समग्र परिस्थितीने संबंधित काळातील उद्योजक, व्यापारी, विचारवंत, संशोधक इ. मंडळींना नवी प्रेरणा दिली. एक स्वरूपाचा आत्मविश्वास वरील घटकांमध्ये निर्माण झाला. त्यामुळे शोधाचे नवनवे किनार पुढे येत होते. पण दुसरीकडे ह्या सगळ्याचे समाजजीवनावर पडणारे काही परिणाम हे अंतर्विरोध स्पष्ट करणारे होते. ते अपरिहार्य वाटतील अशा स्वरूपात पुढे येते होते. आधुनिकतेतील अंतर्विरोध पारखताना तिची दुसरी बाजू पुढे येणे शक्य आहे. किंबहुना आधुनिकतेच्या चर्चेचे वर्तुळ त्याशिवाय पूर्णही होणार नाही. ह्या दृष्टीने विचार करता आधुनिकतेतील अंतर्विरोधाची चर्चा पुढील घटकात अपेक्षित आहे.

**२.२.१.२.३ आधुनिकतेतील अंतर्विरोध**

युरोपमध्ये मध्ययुगात धर्मचिंतन आणि चिकित्सेपासून सुरू झालेल्या गोष्टी ह्या पुढे आधुनिकतेच्या निर्मितीस आणि प्रसारास कारणीभूत ठरल्या. यामुळे आधुनिक जीवनव्यवहाराच्या संदर्भातून आधुनिकतेचा विचार आणि त्याच्या प्रकल्पाची सुरुवात ही तशी युरोपमधून सुरू झाली. याच प्रक्रियेतून जसे वाखाणण्याजोगे बदल घडत होते तसे ज्याचा केवळ धिक्कारच करावा अशाही गोष्टी जन्माला येत होत्या. पैकी भांडवलशाही, वसाहती व्यवस्था आणि नव-साम्राज्यवाद आदींचा उल्लेख अपरिहार्य आहे. यातून युरोपचे आशिया आणि आफ्रिका खंडातील अनेक देशांवर थेट राजकीय नियंत्रण आलेले होते. एकुणात आधुनिकतेच्या प्रकल्पातून पुढे येणारे अंतर्विरोध हे कानाडोळा करता येण्यासारखे नाहीत.

आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतून युरोपीय समाजात नानाविध बदल होत होते हे नक्कीच. मात्र होत असलेले बदल हे निर्दोष नव्हते. आधुनिकीकरणातून जसे भौतिक संदर्भ बदलत होते तसे युरोपीय व्यक्तीच्या विचार करण्याची पद्धत देखील बदलत होती. मात्र हे बदल केवळ विचारव्यवहारातीलच होते असे नाही. याच दरम्यान तिथे ''आर्थिक स्तरावर भांडवलदारी आणि राजकीय स्तरावर लोकशाही जन्माला येत होती.''[१९] खरेतर हे स्पष्ट अंतर्विरोधी आहे. मात्र याकडेही आधुनिकतेचे उत्पादन म्हणूनच पहावे लागेल. आधुनिकतेमध्ये एकीकडे सर्जनशील अर्थाच्या नव्या मूल्यव्यवस्था निपजत होत्या, तर दुसरीकडे तिच्यातील टोकाचे अंतर्विरोधही पुढे येत होते. संबंधित काळातील युरोपीय राष्ट्रांना नजरेसमोर आणल्यास हे अधिक स्पष्टपणे जाणवेल की, एकीकडे त्यांच्यात सरंजामशाही व्यवस्थेला विरोध करत लोकशाही शासनव्यवस्था रुजण्यासाठीची प्रक्रिया जोर धरत होती, तर त्याचवेळी खूप मोठ्या प्रमाणात युरोपीय राष्ट्र, आशिया आणि आफ्रिका खंडात साम्राज्यवादाची भूक भागवण्याच्या दृष्टीने वसाहती लादल्या जात होत्या. स्वतःच्या देशातील औद्योगिक क्रांती, विज्ञानातील अचंबित करणारे शोध आणि भांडवली व्यवस्थेतून वाढलेल्या मुत्सद्दीपणाच्या जोरावर त्यांनी सुरुवातीला व्यापार आणि नंतर राज्यकर्ते म्हणून आशिया, आफ्रिकेतील अनेक

देशांना पद्धतशीरपणे आपल्या वर्चस्वाखाली आणण्यात यशस्वी झाले होते. अर्थात आधुनिकतेने प्रभावित राष्ट्र म्हणून युरोपमधील ज्या राष्ट्रांचा आपण विचार करतो त्यांना साम्राज्यवादाने वेढून टाकले होते हे ठळकपणे सिद्ध होणारी गोष्ट आहे.

आधुनिकतेच्या प्रकल्पाने एका अर्थाने मानवमुक्तीचे संदर्भ जरी पुरविले असले तरी त्याच प्रक्रियेत मानवमुक्तीला बाधा आणणाऱ्या अनेक गोष्टी उदयाला येत होत्या. प्रबोधनाच्या जाणिवेतील विकासाच्या गोष्टींसोबत युरोपकडून विषमतेला खतपाणी घालणाऱ्या भांडवलीव्यवस्थेचे आणि साम्राज्यविस्ताराचे जाळे वसाहतीच्या माध्यमातून जगभर पसरविले जात होते. ''निसर्गावर प्रभुत्व प्रस्थापित करता करता आपल्यासारख्याच इतर माणसांवर प्रभुत्व प्रस्थापित करण्याची आकांक्षा पाश्चात्त्य संस्कृतीमध्ये निर्माण होऊ लागली. विज्ञान ते तंत्रज्ञान, तंत्रज्ञान ते औद्योगिकीकरण, औद्योगिकीकरण ते बाजारपेठांची आवश्यकता या मार्गाने प्रवास करता करता आधुनिकतेचा प्रकल्प वसाहतवाद आणि साम्राज्यवाद यांच्यापर्यंत येऊन पोहोचत होता.''[२०] आधुनिकतेच्या प्रकल्पाचे उत्पादन अशाप्रकारे दुहेरी होते. मुळात लोखंडी धर्मकल्पनेची पकड, संपूर्ण जीवनभर व्यापून राहिलेली अंधश्रद्धा, असमानतेने ओसंडून वाहणारी पारंपरिक समाजव्यवस्था, याशिवाय अनेक तर्कशून्य व्यवस्थांमधून मानवाला मुक्त करण्याची एक प्रेरणा आधुनिकतेमागे खात्रीने होती, पण त्याचप्रमाणे आधुनिक संस्कृतीला एका जगड्व्याळ लोखंडी पिंजऱ्यामध्ये रूपांतरित करण्याच्या क्षमताही तिच्यामध्ये होत्या. वासाहतिक परिस्थितीमुळे आधुनिकतेच्या प्रभावाखाली आलेल्या समग्र जगाने आधुनिकतेच्या या दोन परस्परविरोधी रूपांचा अनुभव घेतला आहे. अनेक प्रश्न सोडवता सोडवता अनेक नवे प्रश्न निर्माण केले आहेत.[२१] ज्यातून एका मोठ्या विश्वव्यापी प्रकल्पातील अंतर्विरोध सहज पुढे यावेत.

औद्योगिक क्रांतीने सुरुवातीला युरोपमध्ये आणि नंतर जगभरात खूप मोठी उलथापालथ घडवून आणली. एकीकडे आर्थिक सुबत्ता वाढली मात्र दुसरीकडे आर्थिक विषमताही त्याच गतीने वाढत गेली. रूढार्थाने शांत व संथ असलेले समाजजीवन औद्योगिक क्रांतीने ढवळून निघाले. वाफ आणि वीज यांच्यातील ऊर्जेच्या शोधातून युरोपने यंत्रयुगाला गतिमान केले. त्यामुळे उत्पादनपद्धतीत अचानक बदल होऊ लागले. म्हणजे यंत्राच्या साहाय्याने वेगात उत्पादन घेतले जाऊ लागले. परिणामी उत्पादनाच्या गुणवत्तेवर आणि उत्पादनाच्या संख्येवरही त्याचा थेट परिणाम होऊ लागला. यंत्राधारे घेतलेले उत्पादन हे कमी किंमतीत बाजारात आणता येणे शक्य झाले. अर्थात वाढीव उत्पादनासाठी बाजारपेठा शोधणे हे युरोपमधील उद्योजकांचे एक महत्त्वाचे काम बनले. अशातून झालेली व्यापारवृद्धी आणि परिणामी युरोपमध्ये भांडवलीव्यवस्था आकारास आली. नफेखोरीच्या दृष्टीने युरोपमधील व्यापारी जग धुंडाळू लागले. मात्र दुसरीकडे पारंपरिक हस्तउद्योगांवर गंडातर आले. अनेकांवर बेकारीची आणि पुढे उपासमारीची पाळी आली. देशाच्या संपत्तीत वाढ होतानाच एकीकडे व्यक्तिगत सामर्थ्य वाढू लागले तर दुसरीकडे बहुसंख्येने लोक रस्त्यावर आले.

आधुनिकीकरणाची मोजदाद करताना अनेकदा औद्योगिक क्रांतीतून एक विलोभनीय चित्र उभे केले जाते. यातून सामाजिक भेद मिटले गेल्याचे चित्र पुढे आणले जाते. मात्र यामधून नवी वर्गवारी पुढे आली. अर्थात वर्गव्यवस्था ही आधुनिकीकरणाचेच उत्पादन म्हणून पहावे लागेल. औद्योगिकीकरणाच्या

विकासाचाच एक परिणाम म्हणून युरोपमध्ये या काळात शहरीकरणाचा वेग वाढला. यातून नागरीकरण होत नागरी समाजाची निर्मिती देखील होत होती. मात्र शहरीकरणासोबतच एकाचवेळी भांडवलदारी आणि गरिबी यांच्यात झालेली वाढ, अस्ताव्यस्त बकालपणात झालेली वाढ ही वाढत्या औद्योगिकीकरणाची दुसरी बाजू होती. औद्योगिकीकरणातून माणसाच्या आयुष्यात प्रवेश केलेल्या यांत्रिकतेमुळे एकूणच जगण्यात आणि परस्पर नातेसंबंधातही उथळपणा आणि एकसुरीपणा वाढत होता. या सोबतच सगळ्यात मोठा प्रभाव हा पहिल्या-दुसऱ्या महायुद्धाच्या (१९१४ ते १९१८) भीषण आणि साऱ्या जगालाच विद्रूप करणाऱ्या अशा परिणामांचा होता. प्रबोधनकाळात अनेक संशोधक-वैज्ञानिकांनी ज्या शोधांची कास धरली, त्याच शोधांच्या आधारे संहारक शस्त्रे देखील निर्माण होऊ लागली. ही प्रक्रिया आजही निरंतर सुरू आहे. विज्ञानातील शोधाने जसे अमानवीय ऊर्जास्त्रोत निर्माण केले त्याप्रमाणे ह्याच शोधांधारे शस्त्रे देखील निर्मिली गेली. अर्थात यातून विज्ञान-तंत्रज्ञानातील शोधाला वाईट ठरवता येत नाही. मात्र त्यातून उद्भवलेली वस्तुस्थिती देखील नाकारता येत नाही. खरेतर हे आधुनिकतेतील परस्परविरोधी संदर्भ म्हणून अधोरेखित करता येतील. याचा अर्थ औद्योगिकीकरण, विस्तारत गेलेले शहरीकरण, लोकशाही शासनव्यवस्थेच्या तळाशी वाढू लागलेली साम्राज्यवादाची वाढती भूक, एकाकीपणाची भावना, तुटलेपणाची भावना, वैचारिक क्षेत्रात निर्माण झालेली अस्थिरता, यंत्राळलेले जीवन यासारख्या गोष्टी आधुनिकतेच्या प्रकल्पातील दुसरी बाजू स्पष्ट करतात.

आधुनिकतेतील अशा अर्थाचे अंतर्विरोध हे जसे आधुनिकतेचा जिथे उदय झाला त्या युरोपमध्ये दाखवता येतात. तसे ते उत्तरकाळात युरोपीय वसाहतींचा जिथे विस्तार झाला त्या अमेरिका, आशिया, आफ्रिका या खंडांमधील देशांमध्ये देखील दाखवता येतात. प्रामुख्याने आधुनिकतेच्या प्रक्रियेत मानवी जीवनाविषयीच्या विकासाची एक धारणा मध्यवर्ती होती. पारंपरिक व्यवस्थेला, मूल्यजाणिवेला धक्के देत त्याचा अव्हेर करत नव्या मूल्यव्यवस्थेचा उदय आधुनिकतेच्या कालखंडात झाला. यातून पारंपरिक श्रद्धा-विश्वास यांच्यातील फोलपणा स्पष्ट होऊ लागला. मानवी बुद्धी, ताकद याला मर्यादशील मानून याहून श्रेष्ठ मानली जाणारी अविनाशी दैवीशक्ती प्रमाण मानण्याच्या वृत्तीला आळा बसू लागला. आधुनिकतेत तर्कनिष्ठेला, बुद्धिवादाला आलेल्या महत्त्वामुळे सगळ्याच गोष्टी तपासून घेण्याकडे कल वाढला. सनातन, चिरंतन असे काही नाही या मताचा स्वीकार होतानाच, कोणतीही गोष्ट श्रद्धापूर्वक, विश्वासाने स्वीकारण्याच्या वृत्तीला आधुनिकतेच्या जाणिवेने विरोध दर्शविला. यातून मानवी विकासाच्या नव्या-नव्या कल्पना जरी पुढे आल्या. मात्र ह्या गोष्टी इतक्या एकसरळ घडून येणाऱ्या नव्हत्या, किंवा तसे एकरेषीय काही घडले नाही हे काळाच्या टप्प्यावर जगजाहीर देखील झाले. यात एक भाबडा आशावाद होता. हा आशावाद युरोपसह जगभरात अनेक ठिकाणी उघडा पडला. आणि आधुनिकतेने दाखवलेले स्वप्न एका अर्थाने युटोपियासारखे कसे होते, हेही सिद्ध होऊ लागले. आधुनिकतेचा प्रवेश युरोपसह युरोपबाहेरही ज्या ज्या समूह-समाजव्यवहारात झाला, तो-तो समूह-समाज काहीअंशी समृद्ध-संपन्न झाला. मात्र त्या समाजाचे सर्व प्रश्न मिटले असे नाही. उलट या प्रकल्पातून निर्माण झालेल्या नव्या प्रश्नांचे स्वरूप भीषण होते. याला प्रतिक्रिया देताना आधुनिकतावादाचा उदय झाला आहे, हे ध्यानात घ्यावे लागेल.

### २.२.१.३. आधुनिकतावाद

आधुनिकीकरणातून जी आधुनिकतेची मूल्यव्यवस्था आकारली, तिच्यातील अंतर्विरोधातून आधुनिकतावादी विचारव्यूह पुढे आला. आधुनिकतावादी विचारव्यूहाचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे तिच्यात परंपरेबाबत असणारी चिकित्सादृष्टी आहे आणि त्या चिकित्सादृष्टीतून येणारी प्रखर अशी बंडखोरी होय. या बंडखोरीतूनच आधुनिकतावादात आदर्शवाद, स्वच्छंदवाद, वास्तववाद, स्वप्नरंजनवाद याबाबत टोकाचा नकार असतो. आधुनिकतेचा/प्रबोधनयुगाचा मानव मुक्तीचा प्रकल्प हा निर्दोष नसून तो सदोष आहे. हा प्रकल्प समस्याग्रस्त असून यामध्ये विषमतेवर आधारलेली वर्गीय जाणीव पोसली जात आहे ही गोष्ट आधुनिकतावादाने पुढे आणली. आधुनिकतेने परंपरेची तपासणी करताना जी चिकित्सादृष्टी वापरली, तीच चिकित्सादृष्टी आधुनिकतावादाने आधुनिकतेची चिकित्सा करताना वापरलेली आहे. आधुनिकतेचा तीन-चारशे वर्षाचा प्रकल्प हा आधुनिकतावादासाठी परंपरेसमानच आहे. आधुनिकतेने जशी परंपरेची चिकित्सा करून तिच्या मर्यादांचे विश्लेषण केले. त्याच तंत्रावर आधुकितेतील अंतर्विरोध आधुनिकतावादाकडून आधुनिक दृष्टीद्वारे तपासले गेले, आधुकितेच्या प्रकल्पाला चिन्हांकित केले गेले, त्याला नकार देण्यात आला. किंबहुना एकूण अशा परंपरेपासूनच आधुनिकतावादाने स्वतःला दूर ठेवले. आधुनिकतेमध्ये प्रबोधनातील मानवमुक्तीच्या प्रकल्पांबाबत श्रद्धा आहे. तर आधुनिकतावादामध्ये याबाबत कमालीचा संशय आहे. या संशयामधूनच आधुनिकतावादाने उपस्थित केलेले प्रश्न, त्यातील मोकळ्या जागांवर ठेवलेले बोट, त्यातील अंतर्विरोधांचा केलेला उलगडा इ. गोष्टी ह्या आधुनिकतवादाचा आशय म्हणून पाहता येईल.

विविध कलाव्यवहारातून आधुनिकतेच्या विपरीत परिणामांची चर्चा, मूल्यमापन, चिकित्सा करण्याचा प्रयत्न आधुनिकतावादी विचारव्यूहाने केला आहे. या विचारव्यूहाच्या मुळांशी आधुनिकतेतील पुनरूज्जीवनवाद, धर्मसुधारणावाद, प्रबोधनवादी चळवळींच्या पलीकडे जाणारी तसेच फ्रीड्रिख नीत्शे, कार्ल मार्क्स, सिग्मंड फ्रॉइड इ. तत्त्ववेत्त्यांनी केलेली क्रांतिकारी मांडणी असल्याचे दिसते. माणूस आणि संपूर्ण मानवी जगाचा नव्याने विचार करण्याची दृष्टी या विचारव्यूहातून विकसित झाली. याच विचारव्यूव्हाद्वारे आधुनिकतेने स्थिर केलेली समाजव्यवस्था, संस्कृती आणि कलाव्यवहारातील संकेतांची पुनर्तपासणी, पुनर्मांडणी सुरू झाली. हा विचारव्यूह कोणत्याही विचारव्यवहारातील-जीवनव्यवहारातील बंदिस्तपणा/कडेकोटपणा नाकारतो.

आधुनिकीकरणातून पुढे आलेल्या बेसुमार गोष्टी ह्या वरती विवेचन केल्याप्रमाणे माणसाच्या मुक्तीच्या कल्पनेला तडा देणाऱ्या ठरल्या. शहरीकरण, त्यातून आलेला बकालपणा, गरीब-श्रीमंतामधील वाढत गेलेले अंतर, संहारक शस्त्रास्त्रांची निर्मिती, जगण्यातील असुरक्षितता, यंत्राळलेली मानसिकता, आधुनिक जगण्याच्या संदर्भातून आंतरिक पातळीवर निर्माण होणारा एकाकीपणा-तुटलेपणा ह्या सगळ्या गोष्टी प्रस्थापित मानवी मूल्यव्यवस्था, आधुनिकतेने निश्चित केलेल्या आदर्शीकृत संकल्पना इ. बाबीवरील निष्ठा आणि विश्वास उडवणाऱ्या ठरल्या. या काळात मानवी जीवनाविषयीच्या अस्थिरतेचे, संस्थात्मक संघटनतत्त्वाविषयीच्या कमकुवतपणाचे दर्शन प्रकर्षाने घडले. आधुनिकतेतील अशा अर्थाच्या अंतर्विरोधातून आधुनिकतावादाने उघड केले.

विज्ञाननिष्ठ मनोभावना, सामाजिकशास्त्रात मांडले गेलेले विविध सिद्धांतव्यूह अशासारख्या अनेक गोष्टींच्या ध्रुवीकरणातून आधुकितावादी विचारव्यूह ठळक झाला. या विचारव्यूहामुळे प्रबोधनकाळात समाज-संस्कृती व्यवहारात रूढ झालेले संकेत आणि कलाव्यवहाराला हादरे बसले. विसाव्या शतकाच्या आगेमागे युरोपमधील समाजव्यवहारात उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे काही मूलभूत बदल घडून आले. गतिमान आधुनिकीकरणाचा मानवी जीवनावर झालेला परिणाम हा मानसिक, भावनिक अंगाने खूप खोलवर होत होता. अशा स्वरूपाच्या जीवनमानाला निरनिराळ्या कलेद्वारे मिळत गेलेली प्रतिक्रिया आणि त्यातून आकारास आलेल्या कलाकृती ह्या कलेतील पूर्वसुरींच्या पंरपरेहून विषय, रचनातंत्र, आशय, शैली ह्या पातळीवर लक्षणीय वेगळेपण जपणाऱ्या होत्या. युरोपमध्ये ज्या कालखंडात आधुनिकतावादाचे वारे वाहत होते, त्या कालखंडात विविध कलाक्षेत्रात कमी-जास्त प्रभावाच्या अनेक चळवळी चालू होत्या. वरती विस्ताराने नोंदविलेल्या ज्या कारणांचा परिणाम म्हणून आधुनिकतावाद उदयास आला त्याच गोष्टी थोड्याफार फरकाने अन्य चळवळींच्या उदयासाठी कारणीभूत ठरलेल्या दिसून येतात. या चळवळींमध्ये प्रतीकवाद, प्रत्ययवाद, घनवाद, भविष्यवाद, प्रतिमावाद, आविष्कारवाद, दादावाद, अतिवास्तववाद, अस्तित्ववाद यांचा समावेश करता येईल. खरे पाहता या सगळ्यांच्या संमिश्रातूनच आधुनिकतावाद आकारास आला. विविध कलाक्षेत्रात कमी-जास्त फरकाने उदयास आलेल्या चळवळींचा तो परिपाक होता. या प्रत्येक चळवळींचा कलेतील आविष्काराबाबतीत विचार केला तर आशय, शैली, घाट यांच्या बाबतीत काहीवेळा एकसाम्यता तर काहीवेळा अंतर्विरोधदेखील असलेला आढळतो. या अर्थाने या काळातील साहित्य, संगीत आणि अन्य कलेत निर्माण झालेल्या निरनिराळ्या चळवळींच्या एकत्रित परिणामाचा भाग म्हणून आधुनिकतावादाकडे पाहिले जाते. विविध कलांमधील मूलभूत स्वरूपाच्या बदलांशी निगडीत वापरली जाणारी आधुनिकतावाद ही संकल्पना मुख्यत्वे कलावंताच्या नावीन्यपूर्ण अभिनव दृष्टीशी म्हणून पर्यायाने कलेच्या आशय आणि रूपाशी संबंधित आहे. युरोपीय आधुनिकतावादाचा कालखंड हा इ.स. १८९० पासून इ.स.१९३० पर्यंत मानला जातो. आणि आपल्याकडे इ.स. १९६० नंतरचा कालखंड या दृष्टीने नक्की केला जातो.

### २.२.१.३.१ आधुनिकतावादाचा ऐतिहासिक परिप्रेक्ष्य

#### आधुनिकतावादाचे युरोपीय संदर्भ

एकोणिसाव्या शतकापर्यंत युरोप-अमेरिकेतील बदलत जाणारी सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय परिस्थिती ही गतिशील आणि मानवकल्याणकारी मूल्यव्यवस्थेला महत्त्व देणारी अशी होती. एकीकडे विज्ञाननिष्ठ भूमिकेचा होत असलेला विकास, यातून बुद्धिवादी-विवेकवादी मानसिकतेचा झालेला प्रसार हा महत्त्वाचा ठरतो. याच काळात सामाजिक शास्त्रातील तत्त्ववेत्ते-विचारवंत फ्रॉइड, नित्शे, मार्क्स इ. मंडळींनी मानवी मन-समाजमनासंबंधी, तत्त्वज्ञानासंबंधी, समाजातील विषम व्यवस्थेसंबंधी तार्किकपणे केलेली मांडणी ही प्रबोधनविचारातून पुढे आलेल्या विचारव्यूहाला आव्हान देणारी ठरली. यातून सभोवतालाकडे नव्या परिमाणातून बघण्याची दृष्टी विकसित झाली. आधुनिकीकरणातून यंत्रसंस्कृतीचा होत गेलेला विकास, औद्योगिकीकरणाने प्राप्त केलेला वेग आणि त्यातून निर्माण झालेले उपप्रश्न पारंपरिक मूल्यव्यवस्थेला

खिळखिळे करू लागले. भौतिक साधनांच्या समृद्धीतून प्रत्यक्ष मानवी जगण्याशी संबंधित जशा सुखकर, सोयीच्या गोष्टी घडू लागल्या, तशा त्यासोबत नव-नव्या समस्याही निर्माण झाल्या. सरळ, प्रवाही जगण्यात अनेक भावनिक-मानसिक पातळीवरील ताण निर्माण होऊ लागले. विसाव्या शतकातील पूर्वार्धात झालेल्या महायुद्धाने मोठ्या प्रमाणात झालेला संहार, जगभर उमटलेले त्याचे पडसाद भीषण होते. मानवी जगण्याच्या विविध संदर्भावरती त्याचे झालेले परिणाम हे अनेक गोष्टी आणि कल्पनांना बदलून घेण्यास भाग पाडले. याच कालखंडात उपरोक्त उल्लेख केल्याप्रमाणे नित्शे, कार्ल मार्क्स, फ्राईड आणि त्यांच्या प्रभावळीतील मंडळींनी अनुक्रमे तत्त्वज्ञान, सामाजिकशास्त्र आणि मानसशास्त्र या क्षेत्रात महत्त्वपूर्ण मांडणी केली. अर्थात या साखळीतून पुढे आलेली मांडणी ही नवपिढीस चिकित्सेची नवदृष्टी बहाल करणारी ठरली.

नित्शे यांनी केलेले "God is dead' हे विधान आणि याच अनुषंगाने पारंपरिक तत्त्वज्ञानाच्या आणि रूढ ख्रिस्ती धर्मपरंपरेला आव्हान करणारी त्यांची तत्त्वज्ञानात्मक मांडणी ही पुढे अस्तित्ववादी विचारप्रणालीला बळकटी देणारी, नवा विचारव्यूह निर्माण करणारी ठरली. मार्क्सने तत्कालीन भांडवलशाही साम्राज्याविषयी-समाजव्यवस्थेविषयी, कामगार जीवनाविषयी केलेले विश्लेषण, भांडवलशाही समाजाकडून कामगारांचे होणारे शोषण याबद्दल त्यांनी मांडलेले तर्कनिष्ठ विचार हे तत्कालीन राजकीय, आर्थिक गणित बदलवणारे ठरले. फ्रॉइडने एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून मानसशास्त्राशी संबंधित मनोविश्लेषण सिद्धांताची मांडणी केली. फ्रॉइडने मानवी मन, कामभावना, स्वप्न या विषयी आपल्या मनोविज्ञानात केलेली मांडणी पूर्णत: नवी आणि एकूणच पाश्चात्त्य समाज-संस्कृतीला धक्के देणारी ठरली. या तिन्ही विचारवंतांचे विश्लेषण आधुनिकतावादी चळवळीवरती प्रभाव टाकणारे, या चळवळीस गतिमान करणारे ठरले. एकूणच या तत्त्ववेत्त्यांच्या विचारधारांनी समकालीन चर्चाविश्वात रूढ असणाऱ्या पारंपरिक ज्ञानसाधना, विचारसरणी, अभ्यासपद्धती यांचे पुनर्मूल्यांकन करण्यास भाग पाडले. मानवी जीवनाविषयीच्या विश्लेषणासाठी आधुनिक पाश्चात्त्य समाजाला नव्या सत्याला जवळ जाणाऱ्या पारंपरिकतेशी फारकत घेणारी पूर्णत: नव्या तत्त्वज्ञानाची देणगी दिली. या सगळ्याचा परिणाम आधुनिकतावादी चळवळीवरती आणि आपसूकच या काळातल्या कलाव्यवहारावरती झाला.

शहरीकरणासोबत एकाचवेळी भांडवलदारी आणि गरिबी यांच्यात झालेली वाढ, अस्ताव्यस्त बकालपणात झालेली वाढ ही युरोपमधल्या वाढत्या औद्योगिकीकरणाची अंधारी बाजू होती. औद्योगिकीकरणातून माणसाच्या आयुष्यात प्रवेश केलेल्या यांत्रिकतेमुळे एकूणच जगण्यात आणि परस्परनातेसंबंधातही उथळपणा आणि एकसुरीपणा वाढत गेला. युरोप-अमेरिकतेतील जीवनव्यवहारात एक प्रकारची अस्थिरता, दुभंगलेपण निर्माण होण्यास अनुकूल ठरणाऱ्या अनेक गोष्टी एकामागोमाग घडत गेल्या. प्रामुख्याने हे दुभंगलेपण, ही अस्थिरता त्या काळातील पिढी अनुभवत होती. या स्वरूपाच्या दुभंगलेपणात पहिल्या महायुद्धाच्या कालखंडात वाढ होत गेली. महायुद्धातील मोठ्या प्रमाणात झालेली मनुष्यहानी आणि वित्तहानी यामुळे संपूर्ण जगालाच मोठा फटका बसला. महायुद्धाच्या संहाराने प्रस्थापित विचारव्यूह, कलासंकेत आणि नैतिक-अनैतिकतेच्या कल्पनेतील पोकळपणा पुढे आला. महायुद्धाने कित्येक सामाजिक संस्थांवरील, मूल्यव्यवस्थेवरील विश्वास उडाला. यातून सार्वत्रिक पातळीवर एकाकीपणाची, तुटलेपणाची

भावना बळावत गेली. एकूणच विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या कालखंडातील युरोपमधील वाढते औद्योगिकीकरण आणि पहिले महायुद्ध हे कित्येक सामाजिक संस्था आणि पारंपरिक मानवी मूल्यांना खिळखिळे करणारे ठरले. यासगळ्याचा एक परिणाम हा या काळातील आधुनिकतावादी चळवळीवर होणे साहजिकच होते.

मुळात आधुनिकतावाद निरनिराळ्या देशात निरनिराळ्या कालखंडात उत्कर्षाला आल्याचे वरती नमूद केले आहे. युरोपमधील काही विशिष्ट घटना-प्रसंगांचा ठळक प्रभाव आधुनिकतावादी चळवळीवर पडला होता. परंतु प्रत्येक देशातील या चळवळीला मिळालेल्या गतीचा कालखंड हा विभिन्न होता. खुद्द इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, रशिया या देशातील आधुनिकतेच्या उदय आणि उत्कर्षाचा कालखंडही निरनिराळा होता. वेगवेगळ्या देशातील आधुनिकतावादाच्या प्रकल्पाविषयी बोलताना जतिन वागळे म्हणतात, ''युरोपभर पसरलेला आधुनिकतावाद म्हणजे बऱ्याच ठिकाणी आणि विविध कलांच्या क्षेत्रात घडणाऱ्या वेगवेगळ्या चळवळींचा एकत्रित असा परिणाम होता. यामुळे आधुनिकतावादाचा जोर विविध ठिकाणी वेगवगळ्या कालखंडात दिसून येतो. रशियामध्ये क्रांतीच्या जरा आधी, जर्मनीत एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात व पुन्हा पहिल्या महायुद्धाच्या आधी, तर इंग्लंडमध्ये १९०८ पासून ते पहिल्या महायुद्धापर्यंत, अमेरिकेत १९१२ नंतर आणि फ्रान्समध्ये जवळपास १९३९ पर्यंत अशा या काळात ठिकठिकाणी घडणाऱ्या कलागत स्थित्यंतराचा एकमेकावर फार मोठा परिणाम घडला.''[२२] या पार्श्वभूमीवरती भारतातील आधुनिकतावादी चळवळीचा विचार करता येईल. युरोपमधील आधुनिकतावादाच्या उदय आणि उत्कर्षाविषयी भारताची तुलना केली तर खूप तफावत दिसते. आधुनिकतावादाचा कलेतील प्रभावाच्या काही बाबी समानपातळीवर जाणाऱ्या असल्या तरी युरोपशी तुलना करता आधुनिकतावादाच्या उदयाला प्रखरपणे कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टी भारताच्या भूमीत खूप कमी झाल्या. भारताला युरोपसारखी थेटपणे महायुद्धाची झळ बसलेली नाही. युरोपमधील पुनरूज्जीवनवादाचा, प्रबोधन कालखंडातील बदलाचा, धर्मसुधारणावादी चळवळींचा, विज्ञानातील नव्या-नव्या शोधांचा एकूणच सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रावरती पडलेला प्रभाव हा तिथल्या प्रदेशात आधुनिकतावादाची बीजे पेरणारा ठरला. अशाप्रकारे आधुनिकतावादाच्या पूर्वतयारीची सक्षम पार्श्वभूमी भारतीय इतिहासाला नाही. शिवाय औद्योगिकीकरण, शैक्षणिक, राजकीय विकासाच्या अंगाने युरोप भारताच्या तुलनेत खूप पुढे होता. आधुनिकीकरणासाठी पोषक असलेले बदल युरोपमध्ये भारताच्या तुलनेत फार पूर्वीच घडलेले होते. असे असले तरी अशा काही गोष्टी भारतीय भूमीवरती घडल्या की, ज्याचा परिणाम म्हणून आधुनिकतावादाचा प्रादुर्भाव भारतीय भूमीलाही झाला.

**आधुनिकतावादाचे भारतीय संदर्भ**

समाजमान्य परंपरेतील श्रद्धा, विश्वास, रीतीरिवाज यांना तपासून घेणे, प्रसंगी त्याच्या विरोधात जाणे, त्यासाठीचे बुद्धिवादावरती, विवेकावरती आधारित पर्याय शोधणे, कधी त्याच्यातील फोलपणा-तकलादूपणा स्पष्ट करून त्याचा अव्हेर करणे, आधुनिकतेतून पुढे आलेल्या मूल्यव्यवस्थेची तपासणी करणे, प्रसंगी त्यांना नकार देणे इ. समान बाबी युरोपीय आणि भारतीय आधुनिकतावादी चळवळीमध्ये दाखवता येतात. परंतु पाश्चात्त्य आधुनिकतावादाहून भारतीय आधुनिकतावादाचे वेगळपण स्पष्ट करणारेही खूप घटक नमूद करता

येतात. याला युरोप आणि भारतातील विभिन्न सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक परिस्थिती कारणीभूत आहे. सुरुवातीला नोंदविल्याप्रमाणे भारताचा बदलत्या युरोपशी व्यापार आणि राज्यकर्ते म्हणून आलेला संपर्क हा तसा सतराव्या शतकापासून पुढे विसाव्या शतकापर्यंत राहिला. इ.स. १८१८ नंतर महाराष्ट्रात आणि पुढेमागे संपूर्ण भारतात ब्रिटिश राजवट पक्की झाली. यानंतर मात्र इंग्रजांचा एकछत्री अंमल संपूर्ण भारतात इ.स. १९४७ पर्यंत राहिला. युरोपमधील हा काळ आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेचा व पुढे उत्कर्षाचा असा मानला जातो. दरम्यानच्या काळात भारताची वाटचाल एकीकडे अपरिमीत शोषण आणि दुसरीकडे युरोपीय प्रबोधनविचारांची-आधुनिकीकरणांची संस्करणे या अर्थाने दुहेरी अंगाने झाली. या काळात युरोपीय वसाहतीमुळे तेथील आधुनिकीकरणाचा आणि त्यांनी स्वीकारलेल्या आधुनिकतेच्या विचारांचा प्रभाव भारतावर खोलवर झाला. या प्रभाव आणि परिणामासहित येथील आधुनिकीकरणाची प्रक्रिया घडत राहिली. आणि उत्तरोत्तर आधुनिकतावादाला पूरक अशी वातावरणनिर्मिती होत राहिली.

विसाव्या शतकाच्या मध्यावधीनंतर दिवसेंदिवस उद्योगधंद्यात झालेली वाढ, वैज्ञानिक प्रगती, राज्यघटनेमुळे लोकशाही मूल्यांच्या विचाराला मिळालेली बळकटी, शिक्षणाचा विकास यातून साक्षरतेचे वाढत गेलेले प्रमाण हे बुद्धिप्रामाण्यवाद-विवेकवादाचा-मानवकल्याणकारी मानसिकतेला ठळक करत गेले. ही एक बाजू असली तरी या काळाची दुसरी एक बाजू आहे. ती म्हणजे, भ्रमनिरासाची, अर्थशून्यतेच्या जाणिवेची, एकाकीपणाची, मानवी मूल्यांविषयीच्या अविश्वासाची तसेच आधुनिकतेविषयी निर्माण झालेल्या शंकेची. या अनुषंगाने विस्ताराने विचार करताना आपल्या लक्षात येते की, स्वतंत्र्योत्तर काळात औद्योगिकीकरणाचा झालेला विकास हा आपल्याकडील आर्थिक विकासाचा दर वाढवणारा ठरला. मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होऊ लागली. शहरात वाढत गेलेल्या रोजगारांच्या संधीमुळे खेड्यातील बेरोजगारांचा ओढा शहराकडे वाढला. उद्योगधंद्यांची जशी नवीन केंद्रे होऊ लागली तशी रोजगारांचेही केंद्रीकरण झाले. छोट्या-छोट्या शहरांची संख्या वाढू लागली. यातून शहरीकरण वाढू लागले. देशांच्या विकासवाहिन्या समजल्या जाणाऱ्या रस्त्यांची निर्मिती होऊ लागली. निरनिराळ्या संपर्क साधनांतही स्वातंत्र्योत्तर कालखंडात वाढ झाली. यातून उत्तरोत्तर शहर-खेडे यांच्यातील अंतर कमी होत गेले. मात्र यासाठी लागणाऱ्या पायाभूत पूर्ततेचा बोजवारा उडाला.

एकीकडे स्वातंत्र्यानंतरच्या पंचवार्षिक योजना ह्या भारतीय शेती, उद्योगधंदे, शिक्षणक्षेत्र यामध्ये मूलभूत बदल घडवत होते. सरकारच्या शिक्षणविषयक नव-धोरणांमुळे तळागाळातील सर्वसामान्यपर्यंत शिक्षण पोहचले. पुढे खेडोपाडी उदयाला आलेल्या सरकारी, खाजगी शिक्षणसंस्था, जिल्हा-तालुक्यांच्यापर्यंत पोहचलेल्या महाविद्यालयामुळे बहुसंख्येने शिक्षित, कुशल अशा मनुष्यबळाची निर्मिती होऊ लागली. मात्र दुसरीकडे अप्रत्यक्ष साम्राज्यवाद-भांडवलशाहीची झालेली वाढ, औद्योगिक कंपन्यांचे सत्ताकारण, महानगरातील बकालपणा, कामगारांची असुरक्षितात, बेरोजगारी यातून वेगळ्याच धोक्याचे सूचन होऊ लागले. ही आधुनिकीकरणाची धोकादाय अशी दुसरी बाजू होती. याशिवाय वाढती लोकसंख्या, वाढते औद्योगिकीकरण, वाढते शहरीकरण, पर्यावरणाचा ढासळत चाललेला तोल ह्या सगळ्यातून माणसां-माणसांत वाढत चाललेले अंतर, स्व:पासून-समूहापासून तुटलेपणाची होत असलेली जाणीव, जगण्याविषयी वाढत

चाललेली उदासीनता ह्या गोष्टी औद्योगिकीकरणाच्या सोबतच हातात हात मिसळून येऊ लागल्या. स्वातंत्र्योत्तर कालखंडात लोकशाही, व्यक्तिवाद, समताभाव, विज्ञान आणि तंत्रज्ञान इ. गोष्टीबाबतच्या विकासाला गती मिळाली. स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतामध्ये सार्वत्रिक बदलत गेलेली परिस्थिती ही आधुनिकतेची मुळे रुजवण्यास पोषक ठरली. परंतु या सगळ्या प्रक्रियेत एक अंतर्विरोधही आकारत होते. अर्थात आधुनिकतेतून निर्माण झालेले गुंतागुतीचे प्रश्नही दुर्लक्षिता येत नाहीत. अशा दुहेरी स्वरूपाची काही स्थित्यंतरे, बदल भारतीय परिप्रेक्ष्यात स्वंतत्र्यपणे घडून आली. अशा अंतर्विरोधी व्यवस्थेची चिकित्सा साहित्यादी कलेतून साठोत्तर कालखंडानंतर तुरळक का होईना पण मराठीमध्ये होऊ लागली. हाच कालखंड आपल्याकडे आधुनिकतावादाचा कालखंड म्हणून ओळखला जातो.

### २.२.१.३.२ आधुनिकतावादी साहित्याची व्यवच्छेदक लक्षणे

आधुनिकतावाद आणि आधुनिकतावादी साहित्यादी कलाव्यवहाराच्या स्पष्टतेसाठी फिलिप् एड्ग्ब्लूम यांच्या एका मताचा उपयोग होईल. उदा. ''आधुनिकतावादाचे बौद्धिक घटक फार मोठ्या प्रमाणात गुंतागुंतीचे आणि बऱ्याच वेळा परस्पर विसंगत वाटतात. पण त्या सर्व विविधतेमागे एक उत्स्फूर्त भावना आहे ती म्हणजे कोणतीही बंदिस्त विचारसरणी किंवा कोणतीही बंदिस्त जीवनसरणी नाकारणे! ह्या गहण गंभीर नव्या मूल्य सापेक्षतावादाकडे पाहणाऱ्या विचारसरणीला कलावंत आणि लेखक विशिष्ट तऱ्हेनेच प्रतिसाद देतात. अनुभव अथवा घटनांकडे ते ठामपणे सतत बदलत्या दृष्टिकोणातून पाहतात, आयुष्याच्या विविध अनुभवांमधून संदर्भाची घट्ट वीण ते घालतात. मग हे अनुभव उत्तुंग असतात तसेच अगदी क्षुद्र वा सामान्य असतात, स्वप्नरंजनात्मक असतात आणि अभिजातही असतात. भावनिक, कल्पनात्मक आणि कोशगत बदल आपल्याला सामावून घेईल अशी भाषा आणि नवे संकेत ते निर्माण करतात. तसेच हे सर्व संमिश्र अनुभव एका मिश्र/आंतरदेशीय बहुभाषिक, शहरी, औद्योगिक आणि यंत्रबद्ध अशा वातावरणातच उभारलेले असतात.''[२३] याचा अर्थ आधुनिकतावादी साहित्यामध्ये समाजव्यवहारातील प्रस्थापित विचार आणि जीवनधारेविषयी बंडखोरी असते. अशा बंडखोरीस आणि पर्यायाने प्रयोगास आधुनिकतावादी विचाराने प्रभावित केले आहे. हा विचार परंपरेकडे एक जोखड म्हणून पाहतो. परंपरा अथवा जीवनानुभव हे नव्या परिप्रेक्ष्यातून वाचले-तपासले जातात. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे प्रबोधन चळवळीतून पुढे आलेली विचारव्यवस्थाकडे आधुनिकतावाद परंपराच म्हणून पाहते, किंबहुना त्याची चिकित्सा करते आणि त्याला नकारही देते. भवतालाकडे पाहण्याच्या सूक्ष्म आणि प्रस्थापितविरोधी दृष्टीमुळे आधुनिकतावादी साहित्यामध्ये अभिव्यक्तीचे नवे संकेत घडविले जातात. स्वच्छंदतावादी, वास्तववादी साहित्यकृतीशी तुलना करता आधुनिकतावादी साहित्य-संकेतव्यवहारांमध्ये प्रयोग का होत असतात याचे काहीएक स्पष्टीकरण आपल्याला मिळते. या अर्थाने युरोपीय असेल अथवा मराठी आधुनिकतावादी साहित्यामधील विषयसूत्रे, कथावस्तू, पात्रनिर्मिती, निवेदनव्यवस्था, भाषा-उपयोजन यातील अपारंपरिकता सहज स्पष्ट होते. आधुनिकतावादी साहित्याचे युरोपमधील प्रातिनिधिक उदाहरण म्हणून आपण जेम्स जॉइस यांची युलिसिस, व्हर्जिनिया वुल्फ यांची जॅकाब्ज रूम, टी.एस.एलियटची द वेस्ट लॅण्ड इ. साहित्यकृती विचारात घेऊ शकतो. मराठीमधील अशा वळणाच्या साहित्यकृती म्हणून आपण कोसला (भालचंद्र नेमाडे), सात सक्कं त्रेचाळीस (किरण

नगरकर), एन्कीच्या राज्यात (विलास सारंग), अरुण कोलटकर-दि.पु.चित्रे-विलास सारंग यांच्या कविता, विजय तेंडुलकर, सतीश आळेकर, महेश एलकुंचवार यांचे नाट्यलेखन, दि. पु. चित्रे-विलास सारंग यांचे कथालेखन इत्यादीचा उल्लेख करता येईल.

आधुनिकतावादी कलावंतांनी पारंपरिक कलासंकेताला दिलेली बगल ही त्या-त्या कलाक्षेत्रात नवे प्रयोगशील वळण सिद्ध करणारे ठरले. या अर्थाने साहित्यातील प्रयोगशीलताही याच चळवळीचा एक परिणाम म्हणून पाहता येईल. पाश्चात्त्य देशामध्ये अशा स्वरूपाचे साहित्य विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून दाखवता येते. आणि आपल्याकडे अशा स्वरूपाचे लेखन हे विसाव्या शतकाच्या मध्यावधीपासून लिहिले जाऊ लागले. पारंपरिकतेला विरोध, साहित्यप्रकाराच्या संरचनाव्यवस्थेला धक्का आणि नव्या रचनातंत्राचा शोध आधुनिकतावादी साहित्यकृतीमधून घेतला जाऊ लागला. या चळवळीत असलेल्या सर्वसमावेषक वृत्तीचा एक परिणाम म्हणून देखील यातून निर्माण झालेल्या कलाकृतीकडे पाहता येईल. कारण या प्रवृत्तीतील कलाकृती ह्या एकाचवेळी भाषा आणि प्रदेशाच्या सीमारेषा ओलांडतात.

आधुनिकतावादी साहित्यामध्ये पारंपरिक साहित्याप्रमाणे वास्तवाला प्रमाण मानून लेखन करण्याची वृत्ती बदलून गेली. छायाचित्रणात्मक वास्तवचित्रणाचा तर पूर्ण विरोधच केला जातो. आधुनिकतावादी कालखंडात सामाजिक वास्तवाहून व्यक्तिनिष्ठ वास्तवाला केंद्र मानून लेखन होऊ लागले. दोन महायुद्धाच्या परिणाम, औद्योगिकीकरणाची गती, शहरीकरणाचा वेग इ. मुळे यातून आलेली एकाकीपणाची भावना, पदोपदी येत असलेली अर्थशून्यतेची जाणीव ही त्या काळाची संवेदना होती. या सगळ्या जाणिवा आधुनिकतावादी साहित्यामध्ये नव्या आविष्कारविशेषाद्वारे अभिव्यक्त झालेल्या आहेत. साहित्यरूपाच्या संकेतव्यवस्थेत याद्वारे मूलभूत बदल सूचविले गेले. ''आधुनिकतावादासमोरील सर्वात प्रभावी प्रश्न जगाचा अर्थ कसा लावायचा हा आहे. आधुनिकवादी कवी-कलावंत हा या जगाचा एक भाग आहे. मात्र जगाचा अर्थ लावण्याच्या साधनांवर त्याचा विश्वास राहिलेला नाही. जगाकडे अर्थपूर्ण समष्टी म्हणून पाहण्याची क्षमता त्याने गमावलेली आहे. या जगामध्ये मी कोण आहे, या जगात जाणून घेण्यासारखे काय आहे, त्याचे ज्ञान कोणाला होते, ज्याला हे ज्ञान होते ते त्याला कसे होते, एका ज्ञानापासून दुसऱ्या ज्ञानापर्यंत हे ज्ञान कसे प्रक्षेपित होते, त्याची विश्वासहार्यता किती, त्याच्या मर्यादा कोणत्या यासारखे प्रश्न आधुनिकतावादी कलावंतासमोर उभे असतात. आधुनिकतावादी या प्रश्नांची सर्वांना समजतील आणि सर्वांना मान्य होतील अशी उत्तरे देण्याचा प्रयत्न करत नाही. ज्यांचे खात्रीलायक उत्तरे देता येत नाही अशा प्रश्नांची उभारणी आधुनिकतावादी संहिता करीत असतात. यासाठी परिप्रेक्ष्यांची अनेकता, परिप्रेक्ष्यांना एकमेकांच्या विरोधात उभे करणे, एकाच विशिष्ट दृष्टिकेंद्रातून असतेपणाचे सर्व पुरावे सादर करून त्यांना सापेक्ष करणे अशा तंत्रांचा उपयोग या संहितामध्ये केला जातो. यामधून आधुनिकतावादी संहितांच्या संरचनेची वैशिष्ट्ये निर्माण होतात व साहजिकच त्या प्रयोगशील होतात.''[२४] आधुनिकतावादी कलावंताला पडलेले प्रश्न या नोंदीमधून स्पष्ट होतात. या प्रश्नांची उत्तरे शोधताना आधुनिकतावादी कलावंताने घेतलेली भूमिका आणि त्यासाठी वापरलेली संरचनाव्यवस्था ही निश्चितपणे नावीण्यपूर्ण ठरते. अशा साहित्यात पारंपरिक रचनातंत्राला टोकाचा विरोध असतो. नव्या रचनातंत्राचे जाणीवपूर्वक प्रयोग केले जातात. यातून आधुनिकतावादी लेखनात

पारंपरिक साचे बाद ठरवून नवी शैली विकसित केली जाते. या सर्व गोष्टी कशातून जन्माला येतात याचा शोध घेताना आपल्या लक्षात येते की, ''आधुनिकतावादी लेखक निश्चित मूल्यांचा आणि कल्पनांचा तिरस्कार करतो. चिरंतनापासून आणि चिरंतनाच्या विविध रूपांपासून आपली मुक्तता करून घेतो. आत्मनिष्ठ अनुभवांतील सूक्ष्म तपशिलांवर आपले लक्ष केंद्रित करतो. आधुनिकतावादी लेखक रूळलेल्या गृहीतकल्पनांना मृत्यूचे मुखवटे मानतो आणि साहित्याला आधिभौतिक (मेटॅफिझिकल) क्रांतीचे साधन समजतो.''[२५] आधुनिकतावादामध्ये परंपरेविषयी असलेला नकारभाव आणि नव्याच्या स्थापणेविषयी असलेला उत्साह ध्यानात घ्यावा लागेल. हा नकार किंवा आव्हान देण्याची वृत्ती तो एकदम अंगिकारत नाही तर समाज-संस्कृतीच्या विकासप्रक्रियेतील काळाच्या प्रवाहात आत्यंतिक गरजेपोटी येतो. आधुनिकतावादी लेखक रूढ आखीवरेखीव मूल्यव्यवस्थेला आणि कल्पनांना नकार देत, ठरीव रूपापासून मुक्तता करून घेत असताना लेखनातील अनवट रचनांची निर्मिती होते. शिवाय प्रस्थापित-रूढ विचारसरणी, नैतिक-अनैतिक कसोटी याविषयींचा अविश्वास यामध्ये दिसून येतो.

आधुनिकतावादाचा कलाव्यवहाराच्या संदर्भात साहित्यकलेवरील परिणाम आणि प्रभाव विचारात घेता तो साहित्याच्या अंतरंग आणि बाह्यरूप या दोन्ही बाबींवर झाला आहे. आधुनिक जीवनाकडे, त्यातील बदलाकडे आधुनिकतावादी लेखक परंपरेची पुटे बाजूला सारून, कधी संशयाने तर कधी उपरोध, उपहास आणि तुच्छतेने पाहतात. कित्येकदा या सगळ्यातून आधुनिकतावादी साहित्यात असंबद्धता, दुर्बोधता, तुटकपणा इ. गोष्टींचा प्रवेश होत राहिलेला दिसतो. कधी कधी आधुनिकतावादाकडे अभिजनवादाला जवळ करणारे, कलेतील स्वायत्तता जपणारे तत्त्वव्यूह ह्या अर्थानेही पाहिले जाते. आधुनिकतावादी साहित्य हे स्वच्छंदवादी आणि वास्तववादी साहित्याहून वेगळे आणि नावीन्यपूर्ण ठरण्याची कारणे ही आधुनिकतावादी तत्त्वव्यूहात आहेत. स्वच्छंदवादी साहित्यप्रवाहातील मंडळींनी ज्या गोष्टींना महत्त्व दिले, त्याचा आधारच आधुनिकीकरणाने निकामी केले आहेत. काही नवीन मांडण्यासाठी एकसंधपणे विचार करणे अथवा आदर्शवादी दृष्टिकोणातून काही बघणे ह्या संकल्पनाच आधुनिकतावादाने बाद ठरविल्या आहेत. ''रोमँटिसिझममधील आदर्शीकृत, एकात्म वास्तवाची कल्पना, व्यक्ती, निसर्ग व विश्व यांमधील एकरूपतेची कल्पना, निसर्गाच्या उदात्तीकरणाची वृत्ती, मूल्यांवरील श्रद्धा, मानवतावादी दृष्टी इत्यादी गोष्टी म्हणजेच एकूणच रोमँटिसझम आधुनिकवाद्यांनी नाकारला आहे. आधुनिकवाद्यांनी जीवनाचे जे चित्र पाहिले होते, ते असे एकात्म नव्हते. त्यांच्या प्रत्ययाला जीवनाची विघटितता, विलगता येत होती. जीवनाचे अमानुष, भेसूर, विरूप चित्र ते पाहत होते. त्यामुळेच रोमँटिसिझमचा उत्साह, आशावाद, निष्ठा, त्यांना आपल्या वाटल्या नाहीत.''[२६] एकूणच या प्रवृत्तीतील साहित्यकृतींनी एकोणिसाव्या शतकातील स्वच्छंदतावादी आणि छायाचित्रणात्मक वास्तववादी साहित्यप्रवृत्तीला विरोध दर्शविला. आधुनिकतावादी कलाकृतींमध्ये मनोनिष्ठ वास्तवाला, 'स्व' विषयक जाणिवेला असलेल्या महत्त्वामुळे स्वच्छंदतावादी, वास्तववादी प्रवृत्तींहून आधुनिकतावादी साहित्य स्वत:ला अलग करते. जीवनानुभवातील छोट्या-छोट्या घटना-प्रसंगांना कलाकृतीत दिलेले स्थान, संदर्भसंपृक्तता, दैनंदिन व्यवहारातील भाषेचा वापर, जीवनाकडे तिरकसपणे

बघण्याची दृष्टी, व्यक्तिनिष्ठ वास्तवाला कलाकृतीत आलेले महत्त्व इ. गोष्टींमुळे आधुनिकतावादी साहित्य हे स्वच्छंदतावादी, वास्तवतावादी साहित्याहून वेगळे आणि नावीन्यपूर्ण ठरले.

आधुनिकीकरणातून पुढे आलेल्या बेसुमार गोष्टी ह्या मानव मुक्तीच्या कल्पनांना तडे देणारे आणि व्यवस्था विकेंद्रित करणाऱ्या होत्या. परिणामी आधुनिकतावादी लेखकांना वास्तव एककेंद्रित नाही तर विघटित-दुभंगलेले वाटत होते. महायुद्धाच्या तडाख्याने मानवी जीवनाविषयीच्या अस्थिरतेचे, संस्थात्मक संघटनतत्त्वाविषयीच्या कमकुवतपणाचे दर्शन घडले. यातून वास्तवाविषयीच्या परिकल्पनेत बदल होत जाऊन वास्तव हे समूहनिष्ठ, बुद्धिगम्य असण्याहून ते व्यक्तिनिष्ठ, आंतरिक स्वरूपाचे असल्याचा विश्वास वाढू लागला. इथे वास्तववादी लेखक आणि आधुनिकतावादी लेखकांच्या वास्तवाकडे पाहण्याच्या भूमिकेत असलेले वेगळेपण अधोरेखित करता येईल. ''सर्वांना सामायिक असणारे असे एक वास्तव (Shared Reality) वास्तववाद्यांसमोर होते. असे वास्तव आधुनिकवाद्यांसमोर नव्हते. त्यांच्यासमोर विघटित वास्तव होते. कोणतेच सामायिक बाह्य वास्तव उरलेले नसल्यामुळे आधुनिकवाद्यांनी वास्तववाद्यांचा बाह्य जगावरचा भरही नाकारला. आंतरिक वास्तव हे अधिक महत्त्वाचे मानले गेले. वास्तवाची विघटितता (Fragmentation) ही आधुनिकवाद्यांच्या बहुदृष्टिकोणवादाचा व सापेक्षतावादाचा आविष्कार आहे.''[२७] याचा परिणाम पारंपरिक सहित्यलेखनाप्रमाणे एकसलगपणे वास्तवाचे चित्रण साहित्यामध्ये न येता ते तुकड्या तुकड्यांनी, विरोधाभासांनी युक्त असे आधुनिकतावादी साहित्यातून येऊ लागले. वास्तवाकडे बघण्याची पारंपरिक दृष्टी बदलल्याचा परिणाम आधुनिकतावादी साहित्यकृतीतून मनोनिष्ठ-व्यक्तिनिष्ठ वास्तव स्वत:चा एक नवा रचनाबंध विकसित झाला.

आधुनिकीकरणातून यंत्रसंस्कृतीचा होत गेलेला विकास, या काळात रुजू पाहत असलेल्या व्यक्तिस्वातंत्र्यवादी विचारामुळे नात्या-नात्यामध्ये होत गेलेला बदल अशा अनेक गोष्टींनी पारंपरिक मूल्यव्यवस्थेला खिळखिळे केले. सरळ, प्रवाही जगण्यात अनेक भावनिक-मानसिक पातळीवरील ताण निर्माण होऊ लागले. अशा अनुभूतीतील गुंतागुंतीचे पडसाद हे साहित्यनिर्मितीवरती पडणे हे साहजिकच होते. या सगळ्यातून थेट मानवी भावभावनांना, मानसिक ताण-तणावांना या काळातील साहित्यातून स्थान मिळू लागले. अर्थात आधुनिकतेच्या जाणिवेतील प्रभावाने यापूर्वीच्या सरधोपट वास्तवचित्रणाहून प्रत्यक्ष माणसाच्या अंतरिक वास्तवाचे चित्रण साहित्याच्या केंद्रस्थानी येऊ लागले. या काळच्या भवतालात होत गेलेले बदल आणि जीवनाच्या विविध भावभावना-कंगोऱ्यांच्या विलेषणासंबंधीच्या वाढत गेलेल्या कसोट्या इ. मुळे एकांगी वास्तवाचित्रणाहून वेगळे, विविध कोणाचे वास्तव पुढे येऊ लागले. याचा परिणाम ठरीव चाकोरीतून, आखीवरेखीव भाषेतून, नि:संदिग्ध रचनातंत्रातून साहित्यकृतीची अभिव्यक्ती होणे शक्य नव्हते. यामुळे कथन, निवेदन, पात्रनिर्मितिप्रक्रिया, भाषा इ. घटकातून प्रयोगाच्या अनेक शक्यता शोधत आधुनिकतावादी साहित्यकृती लिहिल्या गेल्या आहेत.

आधुनिकतावादातून तत्कालीन समाजव्यवस्थेतील, संस्कृतीतील अनेक मर्यादा उघड्या पडू लागल्या. परंपरागत मूल्यविचार, संस्कृती याकडे याकाळात संशयाने-उपहासाने बघितले जाऊ लागले. त्यामुळे ही व्यंगात्म भावना, परंपरेविषयीची उपहासात्मक-विडंबनात्मक भावना आधुनिकतावादी साहित्यातून अनेक

संदर्भाने अभिव्यक्त होऊ लागली. थेटपणे वास्तवचित्रण नाकारून व्यक्तिकेंद्रित भावभावना, आत्मनिष्ठ वास्तव, माणसाच्या जगण्याविषयक छोट्या-छोट्या संदर्भांना आधुनिकतावादी साहित्यात महत्त्वाचे स्थान मिळाले. एकूणच प्रचलित साहित्यव्यवहारातील संकेतव्यवस्थेला आधुनिकतावादी लेखकांनी नकार दिला. प्रस्थापित रचनातंत्रातून अभिव्यक्त होत असताना होणारी कोंडी, त्यातील जाणवणारा अपुरेपणा-थिटेपणा ही या नकारामागील मुख्य कारणे होती. एकसलग भावना, विचार, अनुभूतींची मांडणी मागे पडत होती. याला कारण या कालखंडात अमुलाग्र बदलत जाणारी सामाजिक-राजकीय स्थिती असे द्यावे लागते. कारण प्रत्यक्ष जगण्यातील अनुभव हे इतके गुंतागुंतीचे आणि विचित्र होत होते की, त्याचा परिणाम हा जगण्यातील एकसलगतेवर पडणे साहजिकच होते. म्हणजे एकप्रकारची विमनस्कता, असुरक्षितता, तुटलेपणा ह्या गोष्टी जगण्यातील अनुभूतीत असंगततेची भावना आणत होती. प्रत्यक्ष जगत असलेल्या उपरोक्त भावभावनांचा या प्रवृत्तीतील साहित्यात आविष्कार होऊ लागला.

भाषेबाबतची सजगता हा आधुनिकतावादी साहित्याचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणावा लागेल. आधुनिकतावादी लेखक हे स्वत:च्या साहित्यातील भाषेला आशयाचाच एक भाग बनवतात. आधुनिकतावादी साहित्यातील भाषाही संदर्भसंपृक्तपणे येऊन आशयाची अर्थविषयक शक्यता वाढवते. यापूर्वीच्या साहित्यातील तुलनेत नव्याने शब्दकळेची निर्मिती, रूढ अर्थाहून वेगळ्या अर्थाने शब्दांची योजना अशास्वरूपाच्या भाषेबाबतची लवचीकता ही आधुनिक जाणिवेने लिहिल्या गेलेल्या साहित्यात जास्त जाणवते. याचे दर्शन याकाळातील कवितेतून आणि संज्ञाप्रवाही कादंबरीमधून प्रकर्षाने जाणवते. भाषेबाबतचा प्रयोग याअर्थीही आधुनिकतावादी साहित्याचा विचार शक्य आहे.

आधुनिकतावादी कथात्मक साहित्याबाबत चर्चा करू जाता या काळातील कथात्मक साहित्याचे स्वरूप हे कित्येक पातळीवर नव्या-नव्या प्रयोगामुळे पारंपरिक कथात्मक साहित्याहून बदललेले दिसते. यातूनच कथानक विरहित कादंबरी देखील आकारास येऊ लागली. तसेच पात्रनिर्मितिप्रक्रियेबाबत, शैलीबाबत, निवेदनपद्धतीबाबत आधुनिकतावादी कादंबरी ही पारंपरिक कादंबरीच्या तुलनेत अत्यंतिक नव्या पद्धतीने अभिव्यक्त होते. याकाळात ''बाह्य वास्तवाची संगती स्वीकारत व्यक्तिमनाचे चित्रण करावयाची चालत आलेली परंपरा तुटल्यामुळे कथात्मक साहित्यातील (fiction) कथात्मकताच नष्ट होऊ लागली. व्यक्तीच्या अंतर्मनाचा शोध घेण्याच्या प्रयत्नांमुळे आचार-विचारातील संगतीचे चित्रण थांबले व त्याऐवजी अर्थपूर्ण विसंगतीच्या (meningful inconsistancy) चित्रणाला महत्त्व मिळाले. व्यक्तींना, घटनांना अधिकाधिक प्रतीकात्मक रूप दिले जाऊ लागले. त्यामुळे त्या स्पंजासारख्या त्यांच्या बाहेरच्या कितीतरी गोष्टी शोषण करू लागल्या. एका अर्थाने त्या प्रतीके बनू लागल्या. त्यामुळेच हे कथात्मक वाङ्मय हे अति-अर्थसमृद्ध बनण्याच्या प्रयत्नांमुळे गुंतागुंतीचे आणि दुर्बोध बनू लागले. काव्यात शब्दासंबंधी जे प्रयोग झाले त्यांचा वापर कथात्मक साहित्यातही होऊ लागला.''[२८] कथात्मक साहित्याच्या रूपबदलाचीही सुरुवात ही त्या साहित्यातील वास्तवाकडे बघण्याच्या भूमिकेमुळे बदलत असल्याचे दिसून येते. अशा लेखनातून व्यक्तीच्या स्वभावाला, कृतीला, त्याच्यासोबतच्या घटनाप्रसंगाला एका अर्थाने प्रतिकात्मक रूप प्राप्त होऊ लागले.

आधुनिकतावादी साहित्यातील अपारंपरिकता ही अशा अर्थाच्या विघटित वास्तवाला बहुकोनाने अभिव्यक्त करण्याच्या ताकदीमधून जन्मली, असे म्हणता येईल.

**२.२.१.३.३ आधुनिकतावादी साहित्य–समीक्षेचे मराठीतील अवतरण**

विसाव्या शतकाच्या मध्यावधीनंतर शिक्षणप्रसार, उद्योगविकास आणि त्यातील बलस्थानांच्या अनुषंगाने महाराष्ट्राचा बदलता चेहरा पुढे येत असला तरी आधुनिकतेच्या संदर्भांबद्दलचा भ्रमनिरास वाढविणाऱ्या गोष्टी देखील स्पष्ट होत राहिल्या. शिवाय जगभरच्या साहित्यकृती आणि साहित्यव्यवहाराचाही परिचय या काळात वाढला. या सगळ्याचा एकत्रित परिणाम इ.स. १९६० नंतरच्या साहित्यलेखनावरती झालेला आहे. याकाळातील पिढीच्या लिहित्या लेखकांविषयी नोंदविताना विलास सारंग म्हणतात, ''राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काळात वाढ झाल्याने या पिढीला सदृढ आत्मविश्वास प्राप्त झाला असावा. या पिढीने पाश्चात्त्य साहित्य आणि कला यांतील नवीन व अद्ययावत प्रवाहांची तत्परतेने दखल घेतली, नव्या गोष्टी शिकून स्वीकारण्याची इच्छा दर्शवली, प्रयोग करण्याचे व नव्या दिशा शोधण्याचे धाडस दाखविले.''[२९] याचा अर्थ साठोत्तर कालखंडातील आधुनिकतावादी साहित्यनिर्मितीवरती जगभरातील साहित्यादी कलाव्यवहाराचाही परिणाम झाला आहे. शिवाय या काळातील आधुनिकतावादी जीवनदृष्टी आणि कलादृष्टीतून साहित्याच्या आविष्कारघटकांबाबत नव्या शक्यतांचा शोध घेण्याच्या दृष्टीचा विकास होत होता. यातून या काळातील आधुनिकतावादी लेखकांच्या साहित्यकृतीतून आशय, कथासूत्र, भाषा, रूपबंध याविषयी सजग भान अभिव्यक्त होऊ लागले. या संस्करणातून निर्माण झालेल्या साहित्यकृती ह्या साहित्यव्यवहारातील नव्या बदलाचे निदर्शक ठरल्या. या कालखंडातील सगळ्याच साहित्याची गणना ही आधुनिकतावादी साहित्यात करता येईल असे नाही. कारण याच कालखंडात आणि पुढेदेखील स्वच्छंदवादी, सरधोपट वास्तववादी साहित्यलेखनही तेवढ्याच मोठ्या प्रमाणात झाले आहे. अशा लेखनातून अपवाद वगळता फक्त सपक आणि सरधोपट साहित्यकृती मोठ्या प्रमाणात आकारास आल्या.

मराठी आधुनिकतावादी काव्यलेखनाचा विचार करताना वर नोंदविल्याप्रमाणे बा.सी.मर्ढेकरांच्या कवितांचा पहिल्यांदा विचार करावा लागेल. आधुनिकतेच्या मूल्यव्यवस्थेचा पुरस्कार करत नव्या अनुभूतींच्या आविष्करणासाठी तेव्हा प्रचलित असलेल्या स्वच्छंदवादी, स्वप्नरंजनवादी कवितालेखनाच्या संकेतव्यवस्थेचा त्याग करून काव्याशय, शैली, भाषा, रूपबंध इ. बाबत मर्ढेकरांनी नव्याने घेतलेला वेध हा प्रयोगशीलतेला खूप जवळचा जाणारा होता. यातून जन्मलेल्या त्यांच्या काव्यातील प्रयोगशीलतेचा पुढे मराठी काव्यलेखनावरती दीर्घकाळापर्यंत प्रभाव पडल्याचे दिसून येते. पुढे मराठीतील लघुनियतकलिकांची चळवळ आणि त्यातून उदयास आलेली विविध नियतकालिके ही आधुनिकतेच्या जाणिवेने प्रभावित झालेल्या मंडळीनी एकत्रित येऊन सुरू केलेली, चालवलेली होती. या लघुनियतकालिकांमधून प्रकाशित झालेल्या कवितांमधून दोन महायुद्धातील भीषण मनुष्यहानी आणि वित्तहानी, युद्धातून आलेली संहारकता, जगण्यातील असुरक्षितता, औद्योगिकीकरणातून येत असलेली यंत्रसंस्कृती, यंत्राळलेली मानसिकता, औद्योगिकीकरणातून वाढत जाणाऱ्या शहरी बकालपणाविषयीचे संदर्भ, माणसाचा आधुनिक समाजव्यवस्थेतून समूहाशी आलेला तुटलेपणा इ. आधुनिक मानवी जगण्याविषयीचे संदर्भ विशेष ठळक झाले आहेत. साठोत्तर काळातील

आधुनिकतावादी कवितालेखनाचे व्यासपीठ म्हणून या नियतकालिकांकडे पाहिले गेले. यामधून लिहिते झालेले आधुनिकतावादी कवी म्हणून अरुण कोलटकर, दिलीप चित्रे, विलास सारंग, भालचंद्र नेमाडे, राजा ढाले, नामदेव ढसाळ, मनोहर ओक, चंद्रकांत पाटील, वसंत आबाजी डहाके, सतीश काळशेकर इत्यादींचा ठळक उल्लेख करता येईल. यांच्या कवितांमध्ये व्यक्तिनिष्ठ वास्तवाला महत्त्व आलेले आहे. या कवितांमधील वास्तवाचे किंबहुना व्यक्तिमत्त्वाच्या विघटनाची जाणीव देखील तीव्र आहे. यातून या कवींच्या कवितांमध्ये दुर्बोधता, अर्थशून्यतेची जाणीव, तुटलेपणा, उपरोध, उपहास इ. गोष्टी ठळक झाल्या आहेत. कवितेविषयीची ही जाणीव पूर्णतः स्वतंत्र होती. परिणामी या कवींच्या कवितांना प्रस्थापित काव्यलेखनाचे अनेक संकेत मोडले. मर्ढेकरांच्या नंतर सुरू झालेल्या अशा स्वरूपाच्या कवितालेखनाद्वारे आणि त्यातील यशस्वी प्रयोगशीलतेने मराठी कविता एका वेगळ्या आणि अनोख्या जीवनानुभवाने समृद्ध झाली, असे म्हणता येईल.

स्वातंत्र्योत्तर काळात जीवनाच्या नव्या अनुभूतीतून, नव्या प्रभावातून आकारास आलेली मराठी कथा ही ठरीव साचेबद्ध कथासंकेतातून बाहेर पडून पूर्वसुरीच्या कथेहून स्वत:मध्ये आशयाभिव्यक्तीचे अनेक बदल सुचवत आविष्कृत झाली आहे. अशा अंगाने लिहिल्या गेलेल्या कथालेखनावरती आधुनिकतावादी जीवनजाणिवेचा परिणाम असल्याचे दिसून येते. या काळातील गंगाधर गाडगीळ, पु.भा.भावे, अरविंद गोखले, पु.शि.रेगे इत्यादींच्या कथालेखनातून हे प्रकर्षाने जाणवते. यामंडळींची कथा ही रूढ कथाविषयापासून त्यातील भावविवशतेपासून स्वत:ला अलग ठेवत अभिव्यक्त झाली आहे. या काळात गाडगीळ, गोखले आदींनी आखीवरेखीव कथानकातून लिहिल्या जाणाऱ्या कथालेखनपद्धतीला बगल दिले. जगण्यातील छोट्या-छोट्या घटनाप्रसंगांना नवकथेमध्ये जागा मिळू लागली. एकूणच कथेच्या अंतरंगात झालेले बदल हे कथासंकेतातील पारंपरिकतेला विरोध करत अभिव्यक्तीच्या नव्या प्रयोगांना अनुसरून आकाराला येऊ लागल्याचे दिसून येते. पुढे इ.स. १९६० नंतर लिहिते झालेले दिलीप चित्रे, विलास सारंग, कमल देसाई, चिं.त्र्यं. खानोलकर, श्याम मनोहर इत्यादींच्या कथा ह्या आधुनिकतावादी जाणिवेचा कलात्मक आविष्कार घडवितात. शिवाय यांच्या कथांमधून अभिनव प्रयोगशीलतेचे दर्शनही घडते.

मराठी नाट्यलेखनाच्या प्रवाहात आधुनिकतावादी नाटके लिहिण्यास विजय तेंडुलकर यांच्यापासून सुरुवात झाली. आधुनिकतावादी नाटकातील प्रयोगशीलतेने मराठी नाटकाच्या आशय, व्यक्तिरेखा, शैली यामध्ये पारंपरिक नाटकाच्या तुलनेत आमुलाग्र बदल झालेला दिसून येतो. विजय तेंडुलकर, महेश एलकुंचवार, गो.पु.देशपांडे, चिं.त्र्यं.खानोलकर, सतीश आळेकर, श्याम मनोहर, इ. नाटककार बदलत्या सभोवतालाला कलात्मक अंगाने नाट्याशयातून व्यक्त करताना विविध प्रयोग करण्यात यशस्वी झाले आहेत. या मंडळींनी लिहिलेली नाटके ही संहिता आणि त्यांचे सादरीकरण ह्या दोनही अंगानी साठपूर्व कालखंडातील नाटकाहून नावीण्यपूर्ण ठरल्या आहेत. आधुनिकतावादी विचारव्यूहाच्या प्रभावाने मराठी कादंबरी ही इ.स. १९६० नंतर वैविध्यपूर्ण अंगाने अभिव्यक्त होऊ लागली. साठोत्तर मराठी कादंबरी ही कथानकरचना, पात्ररचना, कथनव्यवस्था, भाषा योजना या बाबतीत अनेक पारंपरिक संकेतांना बाजूला सारून सभोवतालच्या नव्या जाणिवेचा आविष्कार घडवू लागली. यामध्ये भालचंद्र नेमाडे, भाऊ पाध्ये, कमल

देसाई, ए.वि.जोशी, किरण नगरकर, वसंत आबाजी डहाके, दिनानाथ मनोहर, विलास सारंग इ. कादंबरीकारांचा उल्लेख करावा लागेल. भारतीय आधुनिकीकरणातून उदयाला आलेल्या आधुनिकतावादी विचारव्यूहाचा यामंडळींच्या लेखनात विशेष आविष्कार झालेला आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंड हा भारतीय परिप्रेक्ष्यात विविध कारणाने आधुनिकतावादी जाणीव घडविणारा ठरला. यातून लिहिले गेलेले आधुनिकतावादी मराठी साहित्य हे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे परंपरेशी तुलना करता वैशिष्टपूर्ण असे आहे.

पाश्चात्त्य आधुनिकता आणि भारतीय आधुनिकता याच्या घडणीचे संदर्भ हे वरती नमूद केल्याप्रमाणे खूप वेगवेगळे आहेत. शिवाय साहित्यातील त्याचा आविष्कारही युरोपीय आधुनिकतावादी साहित्याहून निराळा आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत विचार करताना येथील प्रादेशिक भिन्नता, भाषिक भेद, सधन प्रदेश, दुष्काळी प्रदेश, शहरी भाग, ग्रामीण भाग, आदिवासी प्रदेश इत्यादी विविध कारणामुळे मराठी समाजस्थिती-संस्कृती ही एकाच एका निकषाने तपासता येत नाही. याठिकाणी मग एकाच वेळी आधुनिक, अविकसित, दुर्गम अशा विविध परिस्थिती आणि मनोवस्थेत मराठी समाज राहतो. यातून इथली आधुनिकतावादी जाणीव ही पुन्हा महानगरीय संवेदनविश्वाशी जोडून येताना दिसते.

युरोपीय आधुनिकतावाद आणि आपल्याकडील आधुनिकतावादाचे काही संदर्भ जरी निरनिराळे असले तरी औद्योगिकीकरणातून, शहरीकरणातून, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या विकासातून आलेला ताण, त्यातले संवेदनविश्व, विकासाच्या कल्पनांविषयी झालेला भ्रमनिरास अशा बहुतांश गोष्टी ह्या जगभरच समान पातळीवर जातात. यातून विघटित झालेल्या, दुभंगलेल्या मानसिकतेचे-भावभावनांचे साहित्यलेखनातील चित्रण हे प्रयोगशील अंगाने जाते. एकुणात धकाधकीच्या जीवनातून विघटित होत असलेली मानसिकता, परात्मतेची जाणीव, विमनस्कतेचे वाढते प्रमाण इत्यादीमुळे आधुनिकतावादी मराठी साहित्याची अभिव्यक्ती देखील लक्षणीय स्वरूपाची झालेली आहे, हे नोंदवावे लागेल.

### २.२.२ विभाग बः उत्तर-आधुनिकतावाद

## २.३ विषय विवेचनः

युरोपीय समकालीन विचारविश्वातील महत्त्वपूर्ण विचारव्यूव्ह म्हणमन उत्तर-आधुनिकतावादाकडे पाहिले जाते. हा विचार प्रथम स्थापत्यकलेच्या क्षेत्रात मांडला गेला. लास वेगासमध्ये बांधण्यात आलेल्या काही इमारतींचा प्रकार हा उत्तर-आधुनिक म्हणून घोषित करण्यात आला. १८७० मध्ये जोन वेट किस्न यांनी फ्रान्स मधील दृकप्रत्ययवादी कलेला उत्तर-आधुनिकतावादी कला अस संबोधले. १९१७ मध्ये जर्मन लेखक रुडोल्फ पेन्त्वीज याने शून्यवादी आणि वेगवेगळ्या विचारधारेच्या व्यक्तींना उत्तर-आधुनिक मनुष्य (पोस्ट मॉडर्न मॅन) असा शब्दप्रयोग केला. उत्तर-आधुनिकतावादी विचार हा एका कोणाच्या चिंतनातून पुढे आलेला नाही, तर याला अनेक तोंडवळे आहेत. विकेंद्रित असणे या विचाराचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. समकालीन विविध तत्त्ववेत्त्यांच्या मांडणीतून आणि मांडणींमधील परस्परसंबंधातून ही संकल्पना पुढे आली.

आधुनिकतावादाचा उदय-विस्ताराचे मूळ जसे भांडवलीव्यवस्थेत असल्याचे मानले जाते. तसे उत्तर-आधुनिकतावादाच्या उदय-विस्ताराचे मूळ नव-भांडवलीव्यवस्थेत असल्याचे मानले जाते. युरोपच्या संदर्भात विचार करताना विसाव्या शतकाचा सुरुवातीच्या टप्प्यातील कालखंड हा आधुनिकतवादाचा तर महायुद्धानंतरचा कालखंड विशेषतः साठोत्तर कालखंड हा उत्तर-आधुनिकतावादी विचारांचा समजला जातो. आपल्याकडे हा साठोत्तर (१९६०) काळ हा आधुनिकतवादाचा तर १९८०-९० नंतरचा काळ हा उत्तर-आधुनिकतावादाचा म्हणून अधोरेखित केला जातो. युरोपशी तुलना करता काळबदल दिसत असला तरी या विचारांचा झालेला परिणाम हा त्यांच्यासारखाच आपल्याकडे देखील स्थापत्य, संगीत, चित्र-शिल्प-चित्रपट, साहित्य आणि इतिहासमीमांसेवर पडलेला आहे. तुलनेने या विचारव्यूहाचा साहित्यव्यवहारावर झालेला परिणाम हा अधिक प्रभावी अंतर्बाह्य बदल दर्शविणारा झालेला आहे.

**२.३.१. उत्तर-आधुनिकतावादातील परस्परविरोधी संदर्भः**

आधुनिकतावादाप्रमाणे उत्तर-आधुनिकतावादाची मांडणी एखाद्या विचारव्यूहाप्रमाणे झालेली नाही. किंबहुना याबाबत झालेली मांडणी ही त्यातील परस्परविरोधी मांडणीच अधिक पुढे आणते. यामुळे उत्तर-आधुनिकतावादाबाबत विचार करताना त्यातील परस्परविरोधी संदर्भांची चर्चा लावून धरावी लागते. असे करत करत मग त्यातील संगतीचा शोध अपरिहार्य ठरतो. अर्थातच हा विचार दुसऱ्या महायुद्धानंतर आकारास आला आहे. याविषयीच्या चर्चेत परस्परपूरकता नसली तरी त्यामधून नव्या जगातील वेगवान बदलाची आणि त्याच्या प्रकृतीची नेमकी मांडणी पुढे येते. महायुद्धोत्तर काळाचे टाळता येणार नाही असे एक साक्षेपी आकलन उत्तर-आधुनिकतेतून पुढे येते.

उत्तर-आधुनिकतेचा विचार व्याख्येत सामावणारा नाही आहे, किंबहुना तो त्यातून निसटत राहणारा विचार आहे. अर्थात त्याच्याकडे उत्तर-आधुनिकतावादातील खुलेपणा अशा अंगाने पाहता येते. या विचाराचे अर्थनिर्णयन सतत बदलते राहिलेले आहे. याचे कारण वरती नमूद केलेल्या त्यातील परस्परविरोधी विशेषात पाहता येईल. हा विचार आजजरी एखाद्या अर्थपूर्ण संज्ञेसारखा वापरला जात असला तरी तिच्यातील संदिग्धता ठळक होत जाणारी आहे, हे ध्यानात घ्यावे लागेल. या विचारव्यूहाबाबतची एक गंमत देखील इथे नोंदविली गेली पाहिजे ती अशी, की एकूण चर्चाविश्वात एकीकडे या विचाराची जोरजोरात चर्चा केली जाते तर त्याचवेळी या विचाराबाबत अनेकांकडून संशय मांडला जातो. असा काही विचारच मुळात नाही, असे विधान केले जाते. एकीकडे आजच्या काळाच्या चिकित्सेसाठी हा विचार पुरेसा नव्हे तर उपयुक्त नाही अशी मांडणी केली जाते. तर दुसरीकडे अशा चिकित्सेस हा विचार अपरिहार्य असे सांगितले जतो. याचा अर्थ उत्तर-आधुनिकतावादाच्या विचाराबाबत आणि त्याच्या उपयोगिततेबाबत थेट संशय देखील आजच्या चर्चाविश्वात आहे. आधुनिकतेच्या उत्तरार्धात आकाराला आलेली उत्तर-आधुनिकतावादाची संकल्पना ही वरील संदर्भाने परस्परविरोधी संदर्भांना आपल्या कवेत घेते. यावरून ही गोष्ट ध्यानात घेणे क्रमप्राप्त आहे, की उत्तर-आधुनिकतावादाची एकूण मांडणी ही अजून स्पष्ट नाही. किंबहुना तशा अर्थाची स्पष्टता आपल्याला ग्राह्य देखील धरता येणार नाही.

उत्तर-आधुनिकतावादाबाबत असा संभ्रम असताना हा विचार इतका पुन्हा चर्चेत का राहतो, याचा विचार होणे अपेक्षित आहे. याच्या उत्तरात आपण जेव्हा जातो तेव्हा आपल्याला ध्यानात येते की, या विचाराचा प्रभाव आणि परिणाम विविध ज्ञानक्षेत्रावर आहे. अनेक क्षेत्रात त्याच्या प्रभाव आणि परिणामातील बहुलता आणि सर्वसमावेशकता टाळता येणार नाही असा आहे. आजच्या काळातील राजकीय आणि सांस्कृतिक स्थितीगतीचे विवेचन-विश्लेषण करण्यासाठी, त्यावर आधारलेल्या/आकाराला आलेल्या कलाकृतींचा-कलाकृतींच्या अंतर्गत वैशिष्ट्यांना अधोरेखित करण्यासाठी उत्तर-आधुनिकतावादाचा विचार वापरला जातो. ''उत्तर-आधुनिकता असा शब्दप्रयोग मानवाची सद्यकालीन एकूण परिस्थिती ज्यात मुख्यत्वेकरून राजकीय-सांस्कृतिक घटक येतात- सुचवितो. उत्तर-आधुनिकता किंवा उत्तर-आधुनिकतावाद एक समावेशक संज्ञा असून त्यात बहुविध विचारप्रणालीचे सहअसित्व अभिप्रेत आहे. पुष्कळदा परस्परविरोधी असले तरी आधुनिकतावाद युरोपात तर उत्तर-आधुनिकतावाद अमेरिकेत उगम पावला असे साधारणपणे मानले जाते. परंतु सध्याच्या आंतरराष्ट्रीय राजकीय-आर्थिक परिस्थितीच्या संदर्भात आणि प्रसार माध्यमांच्या प्रगत उपयोजनांच्या संदर्भात उत्तर-आधुनिकता समकालीन इतिहासातली मेदिनीय (ग्लोबल) घटना ठरते.''[३०] आधुनिकतावादाचे मूळ शोधताना आपण युरोपचा तर उत्तर-आधुनिकतावादाचा विचार करताना अमेरिकतेतील संदर्भ विशेष अधोरेखित करतो. या दोन्हीच्या मुळाशी भांडवली आणि नव-भांडवली अर्थविचार आहेत, हे ध्यानात घेतो. पुढील टप्प्यात मात्र खाऊजामुळे उत्तर-आधुनिकतावादाचा विचार हा जगभरात पसरल्याचे देखील स्पष्ट आहे. या विचारात प्रतिमा, संस्कृती, मूल्ये आणि संकल्पना यांची एक सरमिसळ आहे. मुळात यास उत्तर-आधुनिकतावादाची खास अवस्था मानली जाते. या विचाराच्या नकारस्वरूपासोबतच काही स्वीकारस्वरूपाचे विशेष देखील अधोरेखित होतात. त्यातील एक म्हणजे या विचारातील विविधतेचे महत्त्व होय. या विचाराने लोकपरंपरा, लोकतत्त्व, विकेंद्रिकरण आणि लोकशाहीविचाराला महत्त्व दिले. या विचाराने बुद्धिप्रामाण्य आणि इतिहासाला नाकारले. प्रत्येक गोष्टींबाबत मूलभूत संशय बाळगायला शिकविले. साहित्य-संस्कृती व्यवहारातील राजकारण ध्यानात घेण्यातील महत्त्व उत्तर-आधुनिकतावाद विशेष अधोरेखित करतो. ''उत्तर-आधुनिकतेकडे एक तत्कालीन मनोव्यथा म्हणून बघणे आवश्यक आहे. एक आगळीवेगळी शैली व आशय हे ओघाने आलेच. मानवसंबंधी एकंदरीत सर्वच बाबतीत भ्रमनिरास (इतिहास, संस्कृती, परंपरा, नैतिकता इत्यादी) व त्यास इतर कुठलाही उपाय नसल्यामुळे व्याकुळ झालेले परंतु त्या दडपणाखाली मन न खचून गेलेली जाणीव हा उत्तर-आधुनिकतेचा गाभा म्हणता येईल.''[३१] विसाव्या शतकाच्या मध्यावधीपासून अनेक गोष्टींबाबत एकीकडे आधुनिकतावादाला नकार मिळत असला तरी उत्तर-आधुनिकतावादातील अपरिहार्यता आपल्याला ध्यानात घ्यावी लागेल.

उत्तर-आधुनिकतावादाचा विचार त्याच्यावरील टिकेसह लक्षात घेताना असे दिसून येते, याविचाराच्या मांडणीचे रूप वैशिष्ट्यपूर्ण आणि नानाविध स्वरूपाची आहे. एकीकडे तिच्या गुणांची तर दुसरीकडे तिच्या अर्थशून्यतेची चर्चा केली जाते. तिच्या अर्थहीनतेची चर्चा कर ती असंबद्धता-अस्पष्टतेला कशी चालना देते याबाबत युक्तिवाद पुढे आणले जातात. काही तत्त्ववेत्त्यांच्या मते हा विचार अर्थशून्य आहे. याचे कारण देताना असे सांगितले जाते, की या विचाराने कोणत्याही स्वरूपाच्या विवेचन-विश्लेलषणाला मदत होत

नाही. अनुभवजन्य ज्ञानात यातून काहीही भर पडत नाही. काही विचारवंतांच्या मते हा विचार म्हणजे दुसरा-तिसरा काही नसून आधुनिकतावादाचाच भाग आहे. तर अनेकांना हा विचार समकालीन जगाच्या आकलनासाठी महत्त्वपूर्ण आणि अपरिहार्य वाटतो. अर्थात अशा वेगवेगळ्या ध्रुवांवरील मांडणीवर उत्तर-आधुकिनतावादाचा विचारव्यूह उभा आहे, हे ध्यानात घ्यावे लागेल.

**२.३.२ उत्तर-आधुनिकतावादः आधुनिकतावादाला प्रतिक्रियाः**

सुरुवातीला साहित्यसमीक्षेच्या प्रक्रियेतून आकारास आलेली उत्तर-आधुनिकतावादाची संकल्पना उत्तरकाळात आधुकिनतेला विरोध म्हणून विकसित झाली. मुख्यत्वे आधुनिकतेतील महाकथनांना, रूपबद्ध कल्पनेला उत्तर-आधुनिकतावादात बगल दिले गेले आहे. आधुनिकतेत असलेल्या नेमक्या अर्थाला भूमिकेला हा विचार प्रश्नांकित करतो. आधुकिनतेच्या प्रकल्पातील विविध चळवळींमधून तीन-चार शतकाच्या पार्श्वभूमीवर जे विश्वभान आकाराला आले त्याला याविचाराने आव्हान दिले. याच प्रक्रियेतून जे वैशिष्ट्यपूर्ण आणि तर्कनिष्ठ ज्ञान निर्माण झाले त्यालाही उत्तर-आधुनिकता नकार देते. या विचारात असंबद्धता आणि अस्पष्टतेला गती दिले गेले आहे तर प्रबोधनात्मक युक्तिवाद, वैज्ञानिकतेला नकार मिळालेला आहे. आधुकितेतून आकारत गेलेल्या प्रस्थापिततेच्या विरोधातील बंडखोरी म्हणूनही उत्तर-आधुनिकतावादाकडे पाहिले जाते.

उत्तर-आधुनिकतावादी विचारावर सुसंबद्ध स्वरूपाच्या विवेचन-विश्लेषणात्मक मांडणीत काही योगदान दिले नसल्याची टीका होत असली तरी आजच्या विविध स्वरूपाच्या मांडणीवर याचा प्रभाव टाळता येणार नाही, असा आहे. आधुनिकतेमधील वस्तुनिष्ठतेला किंवा तशा स्वरूपाच्या दाव्यांना हा विचारव्यूह नकार देतो. सत्य किंवा वैध अशा स्वरूपाच्य मांडणीबद्दल हा विचार संशय व्यक्त करतो. किंवा अशा स्वरूपाच्या गोष्टींवर या विचाराचे बारीक लक्ष असते. याचा अर्थ कोणत्याही स्वरूपाच्या व्यापक गोष्टी (उदा. वास्तव, वस्तुनिष्ठता, नैतिकता, सत्य, भाषा, सामाजिक-सांस्कृतिक विकास इ.) या विचारव्यूहाच्या विश्लेषणकक्षेत असतात. अर्थात आधुनिक, आधुनिकता आणि आधुनिकतावादातील गांभीर्यपूर्ण केली गेलेली मांडणी, त्यातील मानवतावाद अशा बाबींना नाकारत व्यक्त होण्याच्या नवीन आणि प्रस्तुत ठरतील अशा संहितांना पुढे आणण्याच्या अटीवर उत्तर-आधुनिकतावादाची चळवळ पुढे आलेली आहे. मुख्यत्वे उत्तर-आधुनिकतावाद ही आधुनिकतावादानंतर आलेली चळवळ असे जरी वरकरणी वाटत असले तरी मुळात आधुनिकतावादाला प्रतिक्रिया देत वाढलेली आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर स्थिर झालेल्या आणि आधुनिकतावादाचा शेवट या अर्थाने वापरल्या जाणाऱ्या उत्तर-आधुनिकतावाद या संकल्पनेच्या स्वरूपाबाबत समजावून घेताना लक्षात येते, की या संकल्पनेमधील उत्तर हा शब्द इथे नंतर या अर्थाने येतो. आधुनिकतावादानंतरची गोष्ट म्हणून उत्तर-आधुनिकतावादाकडे पाहिले जाते. याकडे जसे आधुनिकतावादाचा शेवट या अर्थाने पाहिले जाते तसे आधुनिकतावादाचा विस्तार म्हणूनही पाहिले जाते. स्वाभाविकच या शब्दाचा शब्दशः अर्थ घेताना त्यातून आधुनिकतावादानंतरचा काळ प्रतित होतो. या अर्थाने आधुनिकतावादाच्या नंतरचे जे काही ते उत्तर-आधुनिकतावादी असेही संबोधता

येईल. अशावेळी यातून दोन अर्थ स्पष्ट होतात. एक म्हणजे आधुनिकतावादाचा शेवट आणि दुसरा आधुनिकतावादाचा विस्तार होय. अर्थात उत्तर-आधुनिकतावादाबद्दल अशा विविध मांडणीची रूपे आहेत.. उदा. ''काहींच्या मते उत्तर-आधुनिकता ही जास्त मूलभूत अशी आधुनिकता आहे तर काहींच्या मते उत्तर-आधुनिकता ही आधुनिकतेला नाकारते. असाही एक विचारप्रवाह आहे की, आधुनिकता व उत्तर-आधुनिकता ह्या दोन समांतर चळवळी आहेत.''[३२] सर्वसाधारणपणे कोणत्याही शब्दाला जोडून उत्तर हा शब्द आला तर त्यातून वरती नमूद केल्याप्रमाणेच अर्थ सूचित होतो. शिवाय उत्तर म्हणताना यापूर्वीची स्थिती किंवा आधीची स्थिती आता नाही किंवा पूर्वपरंपरेहून पूर्णता वेगळी असे. पूर्वावस्थेशी तुलना करता त्यापुढील स्थिती, असाही अर्थ घेतला जातो. एकुणात आधुनिकतावादाला प्रतिक्रिया देत वाढणारा संकल्पनाविचार म्हणून उत्तर-आधुनिकतावादाकडे पाहताना हेही ध्यानात येते, की आधुनिकतावादाला येनतेन प्रकारे गृहीत धरल्याविशाय उत्तर-आधुनिकतावादाची चर्चा करता येत नाही.

मुळात युरोपमध्ये असेल अथवा आपल्याकडील साहित्य-संस्कृतीव्यवहारातील रूढ रचनाव्यवस्थाना आधुनिकतावादाने बगल दिले. आधुनिकतावादाच्या या विशेषाला उत्तर-आधुनिकतावादात अधिक ताणले गेले आहे. किंबहुना अशा स्वरूपाचे जे सांकेतिक स्वरूप आधुनिकतावादाला प्राप्त झाले होते, त्यास उत्तर-आधुनिकतावादाने बगल दिलेली आहे. अर्थात आधुनिकतावादातून निर्माण होणाऱ्या अशा स्वरूपाच्या निदर्शकांना आणि त्याच्या आधिमान्यतेला देखील उत्तर-आधुनिकतावादाने नाकारलेले आहे. याउलट परीघावरील, बहुजनव्यवहारातील रूपप्रकार, रचनातंत्र यांना उत्तर-आधुनिकतावादाने अधिक महत्त्व दिले आहे. याही अर्थाने उत्तर आधुनिकतावादाला आधुनिकतावादाचा उत्तरार्ध असे म्हटले जाते.

**२.३.३ उत्तर-आधुनिकतावादाचे सांस्कृतिक संदर्भः**

आधुनिकतावादाची इत्यंभूत चर्चा विवेचनाच्या प्रारंभ टप्प्यात केलेली आहे. आधुनिकतावाद ही युरोपमधील एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या टप्प्यात नव्याने आकराला आलेल्या साहित्यादी कलेतील आशय, रूपबंध, शैली आणि रचनातंत्र यातील विशेषांबाबत वापरली जाणारी एक वैशिष्ट्यपूर्ण संकल्पना मानली जाते. औद्योगिक क्रांतीनंतर आलेले आधुनिकीकरण, शहरीकरण, भांडवली व्यवस्थेचा उदय आणि पुढे महायुद्ध अशा विविध गोष्टीतील विदारक अनुभवामुळे मानवी परस्परसंबंध पातळ होत गेले, त्यात कमालीची कृत्रिमता रूढावली. या सगळ्याला प्रतिक्रिया देताना आधुनिकतावादाचा विचार स्थिर होत गेला. एकीकडे महायुद्धाने ओढावलेला विनाश आणि दुसरीकडे विज्ञानातील प्रगती अशी स्थिती अंतिमतः मानवी विनाशाची गती विस्तारण्यासाठीच कारण ठरत होती. अशावेळी आधुनिकतावादाने मानवी जीवन आणि विचारातील आदर्श, एकात्मता, एकसंघता अशा कल्पनांना विरोध केला.

जर्मन तत्त्वज्ञ फ्रेड्रिक नित्शे यांनी आपल्या एका नाटकातील पात्राच्या मुखाद्वारे 'देव मरण पावला आहे' अशी परंपरेला शह देणारे विधान केले. अशावेळी ही कल्पना नव्या युगातील मानवाला पचेल अशी नव्हती.

अशा अर्थाच्या देव कल्पनेच्या कालबाह्यतेमुळे एकाकीपणा आणि अनिश्चिततेचे धोके जाणवू लागले. कारण त्यांच्या नियमित व्यवहारात देव ही संकल्पना महत्त्वपूर्ण भाग होती.

जीवनांगातील सर्व महत्त्वपूर्ण गोष्टींचा देव हाच एकमेव कर्ता आहे, ही धारणा त्यामागे होती. नित्शेच्या उपरोक्त विधानाने या धारणेला तडा जात होता आणि पर्यायाने एक स्वरूपाची असुरक्षितता आकारत होती. याच दरम्यान कार्ल मार्क्सने यांनी वर्गाधिष्ठित समाजाचे केलेले विश्लेषण, कामगार-कष्टकरी स्तरावरील शोषणाचे केलेले आधारेखन, त्याविरोधात उभा केलेला आवाज यामुळे स्थिर पारंपरिक धारणा/कल्पना ह्या पातळ आणि पोकळ वाटू लागल्या. याच्याच पुढेमागे सिग्मंड फ्रॉइड या मनोविश्लेषकांनी मानवी मनाविषयी केलेली अपारंपरिक विश्लेषणे सिद्धान्तरूपाने पुढे आली. याद्वारे फ्रॉइडने मानवी वर्तनाचा त्याचे मन, त्याच्या तीव्रतम आंतरिक इच्छा-आकांक्षा यांच्याशी असलेला संबंध उघड केला. डार्विन यांनी मांडलेला उत्क्रांतिवादाचा सिद्धांत, फ्रेझर यांनी केलेल्या मानवशास्त्रीय विश्लेषणामुळे मानवी जीवनाचे नवे संदर्भविश्व पुढे येत गेले. या आकलनाने प्रबोधनविचारांना गती येऊ लागली. शिक्षणप्रसार, औद्योगिक क्रांती, विज्ञानाचा विकास, धर्मविचारातील तर्कपूर्णता, बुद्धिप्रामाण्यता, विवेक, चिक्तिसा, फ्रेंच-अमेरिकन राज्यक्रांती अशा एकावेळी चलित झालेल्या विविधि चळवळीमुळे नवी आधुनिकतेची मूल्यव्यवस्था आकारलेली होती. या सगळ्यातून जो एकीकडे आश्वासक तर दुसरीकडे विघातक असे बदलाव येत होते त्याच्यावरील प्रतिक्रिया म्हणून आधुनिकतावादाचा मांडणी एक विचारव्यूह म्हणून पुढे आला होता. यामध्ये उपरोक्त चळवळीतून जे आदर्श रूप उभे केले गेलेले होते त्याच्याबाबत संशय व्यक्त करण्यात येत होता. त्याच्या पुनर्विचाराच्या चर्चेची मागणी होत होती. आधुनिकतावादाच्या या विचाराला पुढे दुसरे महायुद्धादी संदर्भांनी प्रश्नांकित केले. बदलत्या काळाच्या रेट्यापुढे आधुनिकतावादाला प्रतिक्रिया देत त्याची जागा उत्तर-आधुनिकतावादांनी घेतली. अर्थात उत्तर-आधुनिकतावादी विचार हे आधुनिकता-आधुनिकतावाद याच्या संदर्भालाच जोडून घेत, त्यातील प्रस्थापिततेला विरोध करत, रूढ सांस्कृतिकतेला नव्याने मांडत किंबहुना त्यांना धक्का देत मूलभूततेकडे जाण्याला प्रवृत्त करतात.

### २.३.४ उत्तर-आधुनिकतावादातील प्रमुख विचारः

उत्तर-आधुनिकतावादी विचारवंत म्हणून काही महत्त्वपूर्ण नावं पुढे येतात. ज्यामध्ये झॅक देरिदा, मिचेल फुको, जीन ल्योतार, युर्गन हाबरमास, फ्रेड्रिक जेमसन इ. मंडळींचा विचार करावा लागतो. यांनी बहुतेकांनी तत्त्वज्ञान या ज्ञानशाखेतील विविध अंगांच्या अनुषंगाने उत्तर-आधुनिकतावाद या विचाराचा विकास केला. या विचारवंतांनी आपल्या उद्बोधक मांडणीतून उत्तर-आधुनिकतावादाच्या विविध दृष्टिकोनाचा उलगडा केला आहे. या मंडळींच्या मांडणीतील मध्यवर्ती कल्पनेचे स्वरूप खालीलप्रमाणे मांडता येईल, की ज्यातून उत्तर-आधुनिकतावादाच्या विविध विशेषांचा परिचय शक्य आहे.

१. उत्तर-आधुनिकतावादाने परंपरेतून चालत आलेल्या विचारप्रणाली, धर्मविचार, सिद्धान्तने, धारणा, मते, भूमिका, श्रद्धा इत्यांदी गोष्टींना विरोध दर्शविला. किंबहुना आधुनिकतेच्या प्रक्रियेतून जे विविध विचारव्यूह आणि दुष्टिकोण पुढे आले उदा. मानवतावाद, मार्क्सवाद, उदारमतवाद, विज्ञात क्षेत्रातील

संशोधने अशा अनेक स्वरूपाच्या महाकथनांना देखील त्याच्यातील त्रुटीसह पाहण्याचा दृष्टिकोण पुढे आणला. मुख्यत्वे या महाकथनांनी आधुनिक काळातील मानवाला एक सूत्रबद्ध आणि तर्कनिष्ठ विचार दिलेला आहे. याच महाकथनांनी सर्वांगीन प्रगतीची आश्वासक प्रारूपे मांडली गेली होती. मात्र फ्रान्सिस ल्योतार्द सारख्या तत्त्वज्ञांकडून अशा महाकथनांना नकार दिला गेला आहे. यासाठी ल्योतार्द एक युक्तिवाद पुढे आणतात. यातून अशा महाकथनांच्या कोसळण्याचा संदर्भ स्पष्ट होतो. महाकथनांनी अनेक मोठी स्वप्ने दाखवली मात्र दोन महायुद्ध आणि नव-भांडवली व्यवस्थेच्या वाढीने ही स्वप्नं बाद ठरवली. आधुनिकतेच्या प्रक्रियेतून पुढे आलेली महाकथने दोन महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर कमअस्सल वाटू लागली. अशा महाकथनांना नव्या गुंतागुंतीच्या आणि व्यामिश्र व्यवस्थांमध्ये विशेष निभाव लागत नसल्याची खात्री उत्तर-आधुनिकतावादी विचारवंतांमध्ये तीव्र होत राहिली. परिणामी या विचारात महाकथनांना विरोध आणि त्याला पर्याय म्हणून छोट्या छोट्या कथनांना महत्त्व प्राप्त झाले. आजच्या महाकथनांच्या निष्प्रभ स्थितीत उत्तर-आधुनिकतावादाची भूमिका कारणीभूत आहे. उत्तर-आधुनिकतावादाचा हा विचार आधुनिकतेच्या प्रकल्पातून आकारास आलेल्या मूल्यव्यवस्थेला नाकर देतो. मागील तीन-चार वर्षे केंद्रस्थानी आलेल्या आणि प्रस्थापित झालेल्या मूल्यव्यवस्थांना नकार देत उत्तर-आधुनिकतावादाचा विचार वाढलेला आहे. किंबहुना ही महाकथने ही संशयबद्ध झाली. आणि या पार्श्वभूमीवर उत्तर- आधुनिकतावाद परिघावरील विचारसूत्रांना केंद्रस्थानी आणण्यात बांधील आहे.

२. उत्तर-आधुनिकतावादाने 'भाषा' या घटकाला आपल्या एकूण विचारमांडणीमध्ये सार्वभौम आणि अनन्यसाधारण महत्त्व दिले. यासदंर्भात उत्तर-आधुनिकतावादी विचारवंत म्हणून झॅक देरीदा आणि मिचेल फुको यांचे विचार लक्ष वेधून घेतात. झॅक देरिदा यांनी केलेली विरचनावादाची मांडणी ही उत्तर-आधुनिकतावादाच्या महत्त्वपूर्ण चिंतनापैकी एक आहे. याकाळातील भाषाविश्लेषणाचे एक लक्षणीय सिद्धान्तन म्हणून त्याच्याकडे पाहातात. दुसरीकडे मानवी जीवनव्यवहार समजावून घ्यायचे असेल तर त्याचा भाषाव्यवहार समजून घेण्याच्या प्रक्रियेला मिशेल फुको अनन्यसाधारण महत्त्व देतो. मुळात भाषाव्यवहारामधूनच मानवी जीवनाची जडण-घडण आकारास येत असते. त्या-त्या काळातील मानवी जीवन समजावून घेण्यास संबंधित समाजाच्या भूतकालीन साहित्यलेखनाला समजावून घेणे महत्त्वपूर्ण ठरते. फुकोच्या मते ज्ञानाच्या सर्वच क्षेत्रात एक वैशिष्ट्यपूर्ण भाषाव्यवहार असतो आणि तो अभ्यासाच्या दृष्टीने देखील महत्त्वपूर्ण ठरतो. भाषेच्या नियम आणि संकेतांमध्ये तो तो समाजगट आणि त्याची धारणा महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असते. संबंधित समाजगटाचा संपूर्ण भाषिक व्यवहार त्या निश्चित केलेल्या नियम आणि संकेतांमध्येच बद्ध असते. अशावेळी समाजगटाने निश्चित केलेल्या अशा नियम-संकेतांविरोधी मिचेल फुको आणि अन्य उत्तर-आधुनिकतावादी विचारवंतांनी आवाज उठविला. या गोष्टी समग्रतेने समजावून घेतल्यास एखाद्या समाजगटाच्या भाषिक व्यवहाराचा आधार घेत उत्तर-आधुनिकतावादी मीमांसकांनी जी मीमांसा करण्याचा प्रयत्न केला, ते एकीकडे वैशिष्ट्यपूर्ण होते हे लक्षात येते. मात्र दुसरीकडे या दृष्टिकोणांनी या विचारव्यूहाला काही मर्यादाही घातल्या हे नजरेआड करता येणार नाही.

एकुणात भाषाव्यवहाराच्या रूढ-पारंपरिक धारणा-कल्पनांना उत्तर-आधुनिकतावादी मीमांसकांनी धक्के दिले. या मीमांसेनी सत्य, ज्ञान याला जोडून भाषेबाबत होणारी पारंपरिक चौकट आणि मांडणीचे स्वरूप या दोन्हींना नकार दिला. किंबहुना सत्तेद्वारे ज्ञान, सत्य कसे निर्धारित होत असतात, याची मांडणी पुढे आणली. परिणामी जगाचे ज्ञान मिळविण्याच्या प्रक्रियेत भाषा ही महत्त्वपूर्ण भूमिका बजावते असे जे म्हटले जात असे त्याबाबत या विचारव्यूहांनी संशय उभा केला. याच काळात म्हणजे विसाव्या शतकात भाषाविज्ञानाच्या क्षेत्रात सोस्यूर पासून चॉम्स्की यांच्यापर्यंतच्या मंडळींनी जी सिद्धान्तने पुढे आणली याचा उत्तर-आधुनिकतावादी मीमांसकांच्या मांडणीला खूप पूरक ठरले. विसाव्या शतकातील भाषावैज्ञानिकांनी भाषेची चिन्हयुक्त व्यवस्था पुढे आणली. आणि याच्या आधारे उत्तर-आधुनिकतावादी मीमांसकांनी भाषा आणि सत्य, भाषा आणि ज्ञान याबाबतची वस्तुस्थिती पुढे आणली. यातून भाषा रचित म्हणून कशी काम करते आणि यामध्ये सत्तासंबंध कसे कार्यरत असतात हे स्पष्ट झाले. संहितांच्या माध्यमाने भाषाही बाह्य जगाचे एका अर्थाने वर्णन करत असते, मात्र ते समग्र वर्णन ठरू शकत नाही. याचे कारण एखाद्या लेखक जो भाषेच्या सहाय्याने जगाची जी निर्मिती आपल्या संहितेत करत असतो तो केवळ त्यच्या दृष्टिकोणाचा भाग असतो. याच पार्श्वभूमीवर भाषेतून पुढे आणल्या जाणाऱ्या ज्ञानाचे वर्णन या विचारव्यूहाने सापेक्ष आणि भ्रममूलक ठरविले. त्याच्या आत दडलेल्या आभास, संदिग्धतेला पृष्ठस्तरावर आणण्याची प्रक्रिया पुढे आणली. यातून वस्तुनिष्ठ ज्ञान असे जे काही मानले जाते त्यास संशयित केले. या अर्थाने भाषेच्या संदर्भात पुढे आणला गेलेला उत्तर-आधुनिकतावादी विचार हा एक लक्षणीय विचार मानला जातो. हा विचार मुख्यत्वे झॅक देरिदा आणि मिचेल फुको यांनी पुढे आणला.

३. उत्तर-आधुनिकतावादी मंडळींनी ज्ञान आणि सत्तासंबंधांविषयीचे वैशिष्ट्यपूर्ण विवेचन पुढे आणले. याबाबत मिचेल फुको यांची मांडणी लक्षणीय आहे. फुको यांनी समाजव्यवहारात तयार होणारे विविध संभाषित आणि त्याचा सत्ताकारणाशी असणारा संबंध उघड केला. किंबहुना संभाषितांमागे सत्ता गाजविण्याचा किंवा प्रस्थापित करण्याचा जो विचार असतो ते स्पष्ट केले. न्याय म्हणून पुढे आणले जाणारे कायदे, प्रशासन पुढे आणले जाणारे नियम अथवा वास्तविक ज्ञान म्हणून सांगितल्या जाणाऱ्या संभाषितांचा त्यांनी याबाबत विचार केला. याच्या वापराने सत्तासंबंधित गटांचा एका अर्थाने संपूर्ण समाजावर नियंत्रण ठेवण्याच्या प्रक्रियेचा हा भाग असतो, हे स्पष्ट केले. फुको यांनी नव्या जगातील प्रत्यक्ष व्यवहारात स्थिरावलेली संभाषिते आणि त्याच्या आत दडलेल्या शोषणाची प्रक्रिया उघड केली. प्रत्यक्ष व्यवहारातील अशा अर्थाच्या कायदा, नियम आणि ज्ञानाकडे बघण्याची खास तिरकस दृष्टी उत्तर-आधुनिकतावादी मीमांसकांनी पुढे आणली.

### २.३.५ उत्तर-आधुनिकतावादाची मूलभूत वैशिष्ट्ये :

१. आधुनिकतावादाशी उत्तर-आधुनिकतावादाचे परस्परपूरक परस्परविरोधी अशा अर्थाचे विरोधाभासी नाते आहे. त्यामध्ये जसा स्वीकार आहे आणि तसा नकारही आहे.

२. आधुनिकतावादाने विविध सामाजिक-सांस्कृतिक व्यवस्थांची, त्या अंतर्गत असणाऱ्या मूल्यव्यवस्था यांची नवविचाराच्या आधारे चिकित्सा केली. याच प्रक्रियेत उत्तर-आधुनिकतावादी विचारांचा उदय झाला आहे.

३. आधुनिकतावादाप्रमाणे उत्तर-आधुनिकतावादाची मांडणी ही संगतीयुक्त-रचनात्मक स्वरूपाने झालेली नाही. तर उत्तर-आधुनिकतावादाची निर्मितिप्रक्रिया ही अनेक अंतर्विरोधांनी भारलेली आहे.

४. विसंगती, आभास, शून्यवाद यांना उत्तर-आधुनिकतावादात विशेष प्राधान्य आहे.

५. अर्थनिर्यणनाला उत्तर-आधुनिकतावाद निश्चित नव्हे तर अनिश्चित गोष्ट मानते.

६. आधुनिकतेच्या प्रक्रियेत निर्माण झालेल्या विविध ज्ञानशाखांना उत्तर-आधुनिकतावादाने संशयित करून एकूण विचारमांडणीमध्ये पुराण, मिथक आणि संस्कृतीच्या अभ्यासाला महत्त्व प्राप्त करून दिले. याने भूतकाळ, परंपरा यांच्याबाबतीत या विचारव्यूहाचे असणारे आकलन हे संभ्रम निर्माण करणारे आहे. किंबहुना यातून प्रतिगामी स्वरूपाचा एक अवकाशही निर्माण होतो.

७. इतिहासाकडे पाहण्याची, त्याचे आकलन करून घेण्याची एक नवी दृष्टी उत्तर-आधुनिकतावादाने दिली. प्रस्थापित अभिजनवादी इतिहासदृष्टी पलीकडे जाऊन इतिहासाचे अवलोकन यातून शक्य झाले. सत्तासंबंधांच्या वरून खाली नाही तर खालून वर पाहण्याच्या अशा दृष्टीतून सामान्यांचा, सामान्यस्तरावरील इतिहास आकलनाच्या केंद्रस्थानी आला आणि तो महत्त्वपूर्ण देखील ठरत राहिला. यातून इतिहासाच्या पुनर्लेखनाची चर्चा देखील गतिमान झाली.

८. कोणत्याही मांडणीतील निश्चितता आणि शाश्वतता याला या विचारांनी कलाबाह्य ठरवले. वैचित्र्यपूर्ण अनुभवांची, संदर्भांची मांडणी देखील या विचारव्यूहाद्वारे अत्यंत निर्लेपपणे केलली जाते.

९. या विचारामध्ये एकरेषीय विवेचनापेक्षा अनेकविध अर्थात अनेकरेषीय विवेचन महत्त्व आले. याचे कारण या विचारात मतभिन्नता, एकसूत्रता यांचा अट्टाहास नसतो. यातून विभिन्नतेचे तत्त्व महत्त्वपूर्ण मानले गेले.

१०. कोणत्याही गोष्टीतील निश्चिततेला या विचारांनी संशयित केले. म्हणजे निश्चित अर्थाचे भाषेतील शब्द, निश्चित केंद्राची विश्वकल्पना, मूल्यमापनाच्या किंवा चिकित्सेच्या निश्चित अशा कसोट्या या विचारांनी नाकारल्या. अर्थात विशिष्ट अशा व्यवस्थेला किंवा तशा धारणेला या विचाराने नकार दिला.

११. कोणत्याही वैश्विक स्वरूपाच्या सिद्धान्तनांना आणि गुंतागुंतीच्या प्रश्नांना सर्वसमावेशक उत्तरे देण्याच्या दृष्टीला हा विचार संशयांने पाहतो. किंवा आदर्श विचारांबाबत एक अविश्वास या विचाराच्या केंद्रात आहे.

१२. सत्याला निरपेक्ष अथवा सार्वत्रिक मानन्याकडे या विचाराचा कल नाही. या गोष्टी ऐतिहासिक-सामाजिक-सांस्कृतिक संदर्भांना जोडून येत असतात, असे मानन्याकडे या विचाराचा कल आहे. त्यामुळे सत्याला सतत पूर्ण अथवा निश्चित मानन्यापेक्षा या विचारामध्ये आंशिक मानले जाते.

परिणामी महाकथनांबाबत खोल संशय या विचाराच्या मुळाशी आहे. यातून महाकथनांमधील सत्याची कल्पना हा विचार धुडकावून टाकतो.

१३. महाकथनांना विरोध दर्शवितांना हा विचार छोट्या-छोट्या कथनांचे महत्त्व स्पष्ट करतो.

१४. अधिकारशाहीच्या विरोधात जाणे हा या विचाराचा मूलभूत विशेष आहे. शिवाय हा विचार कोणत्या गोष्टीला काही विशिष्ट पाया वगैरे असतो, ही भूमिका नाकारतो.

१५. या विचारव्यूहाचा महत्त्वपूर्ण भाग म्हणजे ज्ञान आणि सत्ता यांच्यातील संबंधांचा उलगडला करणे. हा संबंध तपासला जावा किंवा तपासला जात राहावा याबाजूने हा विचार उभा राहतो.

१६. विविध कलाव्यवहारातील शैली आणि माध्यमांची सरमिसळ या विचारव्यूहाला महत्त्वाचे वाटते. किंवा अशा सरमिसळींना हा विचार मान्यता देतो. किंवा उत्तर-आधुनिकतावादी संहितांमध्ये विविध माध्यमांतील प्रतिमा-प्रतीकांचा विपूल वापर असतो.

१७. या विचाराच्या अस्तित्वाला युरोप-अमेरिकेत दुसऱ्या महायुद्धानंतर तर आपल्याकडे खाऊजाच्या काळानंतर अधोरेखित करता येते.

## २.३.५ उत्तर- आधुनिकतावादी साहित्य-समीक्षाः

उत्तर-आधुनिकतावादाच्या उदयाची पार्श्वभूमी ही साहित्यसमीक्षेत आहे. साहित्यसमीक्षेबाबत उत्तर-आधुनिकतावादाची मांडणी ही साहित्यार्थ, लिहिता लेखक-वाचक, लेखन-वाचनव्यवहार यांच्यावर भाष्य-टिकाटिप्पणी करत आकारली आहे. आजही या विचारव्यूहाच्या केंद्रात ही गोष्ट स्पष्ट आहे. परिणामी या विचारांने प्रभावित केलेले साहित्य आणि साहित्यसमीक्षा पाहणे क्रमप्राप्त आहे. जेव्हा आपण उत्तर-आधुनिकतावादी साहित्य असे म्हणतो तेव्हा त्यामध्ये विसंगती, खंडितता, अनिश्चितता, स्वःसंदर्भयुक्तता, आंतरसंहितात्मकता, अव्यवस्था, विकेंद्रितता, हास्यास्पदता असे काही प्रमुख विशेष आहेत हे गृहीत धरतो. सोबत अशा साहित्यात उपहास, उपरोध, विडंबन, व्यंग हेही विशेष म्हणून स्पष्ट होत असतात. परंपरेच्या पार्श्वभूमीवर टोकाची प्रयोगशीलता हा उत्तर-आधुनिकतावादी साहित्याचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणून नोंदविता येईल. अशा साहित्यामध्ये साहित्यप्रकाराचे रूढ नियम आणि संकेत जाणीवपूर्वक ओलांडले जातात. अशा साहित्यात शेवटाचे खरेतर अनेक पर्याय खुले असतात. किंबहुना ठरीव शेवट हा प्रकार नसतो. अर्थाततच प्रचलित वास्तववादी चित्रणपद्धतींचा अशा साहित्यात सरळ त्याग केलेला असतो.

साहित्यकृती ही एककेंद्री नसून विकेंद्रित असते, ही उत्तर-आधुनिकतावादी साहित्याची भूमिका आहे. त्यामुळे अशा साहित्यात स्वाभाविकच तिच्यातील विरचनेला महत्त्व दिले जाते. उत्तर-आधुनिकतावादी विचारव्यूहात साहित्यकृती संबंधित संहिता आणि उपसंहिता ही कल्पना मांडली जाते. या विचारव्यूहाने साहित्यनिर्मितीत वापरले जाणारे प्रतिभा, प्रतिभावंत हे शब्द बाद ठरविले. किंबहुना याविचाराने लेखकाच्या अधिमान्यतेला नाकार दिला. या विचारात संहितेचे निर्णयन करण्यात लेखकाचा नाही तर वाचकाचा सहभाग हा महत्त्वपूर्ण मानला जातो. अर्थात साहित्यव्यवहारातील लेखकाचे महत्त्व कमी करणे हे या विचारव्यूहाला महत्त्वाचे वाटते. उत्तर-आधुनिकतावादी साहित्याने ढोबळपणे पाडले जाणारे अभिजन लोकप्रिय साहित्य

यातील आंतर काढून टाकले. किंबहुना लोकप्रिय साहित्याचे विशेष महत्त्व अधोरेखित केले. याच विचारातून संस्कृती अभ्यासाची कल्पना विकसित झाली. परिणामी साहित्याचा अभ्यास करणे म्हणजे संस्कृतीचा अभ्यास करणे अशी नवी अभ्यास दिशा अधोरेखित झाली.

उत्तर-आधुनिकतावादी साहित्याने विविध लेखन रूपबंध, त्यातील वैविध्यपूर्ण विशेषांसह गांभीर्य आणि हलकेफुलकेपणा या सगळ्याला एकत्रित आणले. परिणामी प्रस्थापित साहित्य चौकटींमध्ये या साहित्याचे वर्गीकरण बसत नाही. अथवा करता येत नाही. अशा साहित्यामध्ये विविध कला, त्यातील शैली, विविध माध्यमे यांची सरमिळस असते. या विचारातील प्रभावी साहित्यमीमांसक म्हणून हाबरमास, बौद्रिलअर, ल्योतार्द यांचा उल्लेख क्रमप्राप्त आहे. ''समाजात विचारांच्या आणि अनुभवांच्या सामान्यत: स्वीकारल्या गेलेल्या पद्धतीना धक्का देवून अस्तित्वाची निरर्थकता जाणवून देणे, तद्वतच आपली तथाकथित सुरक्षिततेची भावना ज्यावर लटकलेली असते त्या खुंट्याचा पोकळपणा दाखवून देणे, अशी उद्दिष्ट्येही उत्तर-आधुनिकतावादी साहित्याच्या निर्मितीमागे काही वेळा दिसून येतात.''[३३] बहुतेकवेळा अशा स्वरूपाचे साहित्य हे रूढ साहित्यचौकटींना नाकारणारे, संकेतव्यवस्थेला नाकारणारे, ठराविक शेवट नसलेले, शेवटाचे अनेक पर्याय खुले असणारे, विविध धारणा-दृष्टी यांच्या सरमिसळीतून आकारास आलेले, संकीर्ण तर कधी अपुरे भासणारे आणि पर्यायाने अमूर्त वाटावे असे असते. अशा साहित्यात रूढ साहित्यात केंद्रस्थानी असणाऱ्या वास्तववादी चित्रणाचा त्याग केलेला असतो. अशा साहित्यात साहित्यकृतीच्या रूपाबाबत अतिरेकी जाणीव असते. केवळ शाब्दिक अथवा वैचारिक खेळ खेळण्यात, कूट संकेत उलगडण्यात आनंद घेण्याची प्रवृत्ती असते. उत्तर-आधुनिकतावादी साहित्यात अर्थातच सत्याच्या कल्पनेबाबत खोलवर संशय असतो. आणि साहित्याच्या निखळ कल्पिततेला अनन्यसाधारण महत्त्व दिले गेलेले असते. महाकथनांना उत्तर-आधुनिकतावादात असलेल्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर अशा साहत्यकृतीच्या अर्थनिर्णयातील ठरीव प्रारूपांबाबतचा संशय समजावून घेता येतो. या विचारव्यूहात अंतिमतः साहित्यसंहिता ही महत्त्वाची त्यामुळे पर्यायाने लेखक हा कमी महत्त्वाचा मानला जातो. संहितेच्या अर्थनिर्णयात लेखकापेक्षा वाचक महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे साहित्यकृतीच्या अर्थावरील लेखकाची मक्तेदारी आपोआप अशा विचारात ठिसूळ होते. अशा साहित्यात व्यक्तिगत अनुभवांना महत्त्व असले तरी त्याच्या मांडणीचे स्वरूप हे चकवा देणारे असते. अर्थात अशा साहित्यात सत्याची कल्पना हे ओलांडली जाते. त्यासोबत निश्चित अर्थाची कल्पना देखील नाकारली जाते. त्यामुळे त्यात अर्थ शोधण्याची धडपड केली जात नाही. असा अर्थ शोधण्याचा प्रयत्न झालाच तर त्याच्या अर्थशून्यतेचा प्रत्यय गृहीत धरला जातो.

## २.४ सारांश

निरनिराळ्या संदर्भातून विकसित झालेल्या आणि स्वतःमध्ये एक विशिष्ट जीवनदृष्टी ठेवून वाढलेल्या आधुनिक, आधुनिकता आणि आधुनिकतावाद या संकल्पना मागील काही शतकात युरोप आणि भारतीय संदर्भातून विशेष महत्त्वपूर्ण ठरल्या आहेत. जगभरात या संकल्पनांची चर्चा सामाजिकशास्त्रातील अभ्यास-संशोधनाच्या दरम्यान होत असते. उपरोक्त विवेचनात या संकल्पानांच्या उदय-विस्ताराचे स्वरूप, या

संकल्पनांची वैशिष्ट्ये ध्यानात घेताना काही गोष्टी स्पष्ट झाल्या. उदा. ग्रीक विद्या पुनरुज्जीवन, धर्मसुधारणा, विज्ञानविकास, औद्योगिक क्रांती, प्रबोधन काळात इ. मानवी जीवनाच्या बहुतांश क्षेत्रात अनेक बाजूंनी परस्परपूरक आणि परस्परविरोधी ठरतील असे उठाव मागील काही शतकात जगभरात झाले. याच काळात शास्त्रीय आणि वैश्विकतेविषयी पुराव्यानिशी निर्भयपणे मांडणी होऊ लागली. यातून व्यापक पातळीवरील मानवहिताच्या गोष्टींची चर्चा लावून धरली गेली. विज्ञानातील शोधांना थेट मानवी जीवनाशी जोडण्याचा प्रयत्न होत राहिला. कोणत्याही पूर्वपंरपरेतील विचारसरणी आणि समज विज्ञानाच्या, बुद्धीच्या पार्श्वभूमीवरती तपासून घेण्याची दृष्टी विकसित झाली. यातून युरोपमध्ये एका अर्थाने चैतन्याचे वातावरण निर्माण झाले. येथूनच व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिवादी-विवेकवादी दृष्टिकोन, विज्ञाननिष्ठा यांचे बीजारोपण झाले. व्यक्ती ही विचारांच्या, संस्कृतीच्या केंद्रस्थानी आली. याच प्रक्रियेतून प्रखर मानवतेच्या दृष्टीचा, उदारमतवादाच्या मानसिकतेचा उदय झाला. विवेक, समता, स्वातंत्र्य, बंधुता आदी मूल्यांचा वावर प्रत्यक्ष समाजात बळावू लागला. यातून पुढे राष्ट्र-राज्याची कल्पना युरोपमध्ये मूळ धरू लागली. आणि अशा अर्थाने व्यक्तिस्वातंत्र्य आणि व्यक्तिस्वातंत्र्यामुळे लोकशाही शासनव्यवस्था ह्यासारख्या गोष्टी युरोपमध्ये दृढ होत गेल्या. यातून आधुनिक जीवनव्यवहाराचा पाया घातला गेला की, पुढे जग ज्याला आधुनिकतेच्या संदर्भातून ओळखू लागले.

आधुनिकता ही आधुनिक जगाविषयीचे एक विचारव्यूह पुढे आणते. नव्या शिक्षणव्यवस्थेपासून विविध सामाजिक संस्था ते थेट नव्याने आकारलेल्या राजकीय संस्थांशी, शासनव्यवस्थांशी आधुनिकतेचा संबंध होता. आधुनिकता एका अर्थाने विशिष्ट विचार म्हणून विकसित झालेल्या इतिहासाच्या पार्श्वभूमीवरील एक महत्त्वपूर्ण प्रकल्प आहे. मध्यमवर्गाचा वाढत गेलेला विस्तार आणि नव्याने निर्माण झालेल्या एकूण सामाजिक-राजकीय स्थितीला आधुनिकता अधोरेखित करते. औद्योगिक संस्कृतीतून जो नागरी समाज निर्माण होत होता त्या औद्योगिक समाजातूनच आधुनिकतेचा विचार आकाराला येत होता. आधुनिकतेच्या विचारामध्ये संपूर्ण विश्वाकडे पाहण्याचा एक विशेष दृष्टिकोन आहे. किंबहुना आधुनिकतेचा विचारव्यूह अन्य कोणत्याही विचारव्यूहांहून अधिक लक्षणीय आणि महत्त्वपूर्ण ठरला हे नाकारता येणार नाही. प्रस्तुत विचारव्यूहामुळे युरोपमधील नवविचारांना आणि कलाव्यवहारातील आविष्कारांना स्वाभाविकच नवी दृष्टी लाभू लागली की, ज्याचा प्रभाव पुढे संपूर्ण जगावर झाल्याचे स्पष्ट आहे

या पार्श्वभूमीवर आपल्याकडील आधुनिकतेचे चित्र पाहू जाता असे लक्षात येते की, आधुनिकतेने प्रवृत्त असलेल्या युरोपचा सुरुवातीला वसाहतवादी धोरणांमधून आणि उत्तरकाळात येथील राजसत्तेचे मानकरी म्हणून विशेषतः ब्रिटिशांचा भारताशी दीर्घकाळ संबंध आला. या संदर्भाने भारताचा आधुनिकतेशी संबंध दृढ होत गेला. एकीकडे वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था अणि सरंजामशाही समाजव्यवस्था आणि दुसरीकडे आधुनिकतेने प्रभावित झालेली आणि साम्राज्यवादाच्या आहारी गेलेली ब्रिटिश राज्यव्यवस्था असे विचित्र मिश्रण साधारणतः सुमारे दीडशे वर्ष महाराष्ट्र-भारतभर राहिले. याचा अर्थ त्यामध्ये अनेक अंतर्विरोध होते. अशा परस्परविरोधी स्वभावाच्या संस्कृतिसंपर्कातून आपल्याकडील आधुनिकतेची प्रक्रिया घडलेली आहे. मुळात आधुनिकता ही आपली निवड नव्हती, तर तत्कालीन काळाच्या रेट्यातून निर्माण होऊ लागलेली ती

एक वस्तुस्थिती होती. आणि ती अनेक हेलकाव्याने, विविध चळवळी, धर्मपंथ, नव्या शिक्षणव्यवस्था आणि त्यातून पुढे आलेल्या नवशिक्षित बुद्धिजीवी-सुधारकांच्या जिद्दीने चलित होत होती. ही गोष्ट इतक्या सुलभतेने देखील घडून आलेली नाही. तर बदल होत असताना सुधारकांच्या नजरेसमोरील आदर्श आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती ही परस्परविरोधी अशी होती. त्यातून एकाच काळात एकाच समाजात अनेकविध आणि परस्परविरोधी गोष्टींचा माहोल निर्माण झालेला होता. याचा अर्थ बदलत्या भारताची बहुतांश बीजे ही ब्रिटिश सत्तेच्या संपर्कातून एकोणिसाव्या शतकातच रुजली गेली. आणि भारत हा एकोणिसाव्या शतकात अनेक संदर्भाने मध्ययुगातून आधुनिक युगात आल्याचे सहजमान्य होईल अशी वस्तुस्थिती समोर ठाकली. पेशवाईच्या अस्तानंतर आपल्याकडील आधुनिकतेची प्रक्रिया ही पारतंत्र्यात विकसित होऊ लागली. पुढे मात्र स्वतंत्र भारतानंतर याचे स्वरूप बदलू लागले. याच काळापासून एकीकडे हा प्रकल्प चालूही राहिला आणि दुसरीकडे त्यातील अंतर्विरोध देखील पुढे येत राहिले. अर्थात हे जसे युरोपमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात आणि विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात घडत होते, तसे ते आपल्याकडे विसाव्या शतकाच्या उत्तर्धात आधुनिकतेच्या व्यापक प्रकल्पातील अंतर्विरोध स्पष्ट होत होते. विवेचनात विस्ताराने स्पष्ट केल्याप्रमाणे या अंतर्विरोधाच्या परिणामातूनच आधुनिकतावादी विचारव्यूहाचा उदय झाला आहे.

एकीकडे वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था अणि सरंजामशाही समाजव्यवस्था आणि दुसरीकडे आधुनिकतेने प्रभावित झालेली आणि साम्राज्यवादाच्या आहारी गेलेली ब्रिटिश राज्यव्यवस्था असे विचित्र मिश्रण साधारणतः सुमारे दीडशे वर्ष महाराष्ट्र-भारतभर राहिले. याचा अर्थ त्यामध्ये अनेक अंतर्विरोध होते. अशा परस्परविरोधी स्वभावाच्या संस्कृतिसंपर्कातून आपल्याकडील आधुनिकतेची प्रक्रिया घडलेली आहे. या विचारव्यूहाच्या मुळांशी पुनरूज्जीवनवाद, धर्मसुधारणावाद, प्रबोधनवादी चळवळींच्या पलीकडे जाणारी तसेच फ्रीड्रिख नीत्शे, कार्ल मार्क्स, सिग्मंड फ्रॉइड इ. तत्त्ववेत्त्यांनी केलेली क्रांतिकारी मांडणी असल्याचे दिसून आले. माणूस आणि संपूर्ण मानवी जगाचा नव्याने विचार करण्याची दृष्टी या विचारव्यूहातून विकसित झाली. याच काळात समाजव्यवस्था, संस्कृती आणि कलाव्यवहारातील संकेतांची पुनर्तपासणी, पुनर्मांडणी सुरू झाली.

युरोपमध्ये विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात आणि आपल्याकडे उत्तरार्धातील साहित्यनिर्मितीवर आधुनिकतावादी विचारव्यूहाचे थेट परिणाम झालेले आहेत. हा परिणाम साहित्याच्या अंतरंग आणि बाह्यांगावरती झाला. या कालखंडातील साहित्याच्या आविष्कारघटकात झालेले प्रयोग हे पारंपरिक साहित्यव्यवहारापासून स्वतःला अलग ठेवण्यात, विविध कलाशक्यतांना स्पर्श करण्यात, मानवी जीवनातील विविध कंगोऱ्यांना स्पर्श करण्यात यशस्वी झाले आहेत. आधुनिकतावादी विचारव्यूह ही आधुनिकतेच्या विरोधात निर्माण झालेली साहित्यादी कलेच्या क्षेत्रातील प्रतिक्रिया होती. साहित्यादी कलाव्यवहारातून आधुनिकतेच्या विपरीत परिणामांची चर्चा, मूल्यमापन, चिकित्सा करण्याचा प्रयत्न आधुनिकतावादाने केला. हा विचारव्यूह कोणत्याही विचारसरणीतील, जीवनसरणीतील बंदिस्तता नाकारतो.

आधुनिकतावादी प्रवृत्तीतील लेखक-कलावंत भोवतालाचा अर्थ लावण्याच्या धडपडीत आहेत. परंतु या जगाच्या अर्थ लावण्याच्या पद्धतींवर, साधनांवर त्यांचा विश्वास राहिलेला नाही. त्यामुळे

बहुदृष्टिकोणवादी भूमिकेतून वास्तवाकडे बघण्याची वृत्ती आधुनिकतादी साहित्यातून स्पष्ट होते. नावीण्यपूर्ण आशयामुळे आधुनिकतावादी लेखकांनी परंपरिक आविष्कारघटकांना टोकाचा विरोध, नव्या आविष्कारतंत्राचा जाणीवपूर्वक केलेला स्वीकार ह्या गोष्टी प्रयोगशीलतेला जागा निर्माण करून देणाऱ्या ठरल्या. एकूणच परंपरागत संकेतव्यवस्थांना शह देत, त्यांना मोडीत काढत अर्थशून्यतेचा धोका स्वीकारून सातत्याने नवे-नवे प्रयोग करणे हे आधुनिकतावादी विचारव्यूहाचे मूलभूत वैशिष्ट ठरले.

आधुनिक जीवनाकडे, त्यातील बदलाकडे आधुनिकतावादी लेखक परंपरेची पुटे बाजूला सारून, कधी प्रचंड संशय पोटात घेऊन तर कधी उपरोध, उपहास आणि तुच्छतेने पाहतात. आधुनिकतावादी लेखकमंडळींमध्ये वास्तव हे समूहनिष्ठ, बुद्धिगम्य असण्याहून ते व्यक्तिनिष्ठ, आंतरिक स्वरूपाचे असल्याचा विश्वास आहे. आधुनिकतावादी लेखकांच्या वास्तवाकडे पाहण्याच्या भूमिकेत होत गेलेले बदल हे साहित्यकृतीच्या रूपनिर्मितीवरती परिणाम करणारे ठरले. आधुनिकतावादी साहित्यकृतींमध्ये मनोनिष्ठ वास्तवाला, 'स्व' विषयक जाणिवेला विशेष महत्त्व येत गेले. यातून व्यक्तिकेंद्रित भावभावना, आत्मनिष्ठ वास्तव, माणसाच्या जगण्याविषयक छोटे-छोटे घटनाप्रसंग आधुनिकतावादी साहित्यात गर्दी करू लागले. शिवाय अनुभवविश्वाच्या नावीन्यामुळे, भाषेविषयीच्या सजगतेमुळे या जाणिवेतील कलाकृती वेगळ्या अशा रचनातंत्रातून, रूपबंधातून सिद्ध झाल्या आहेत.

**उत्तर-आधुनिकतावादः**

उत्तर-आधुनिकतावाद हा विविध विचार आणि विश्लेषणपद्धतीने बनलेला आहे. या विचारव्यूहाने आधुनिक जगातील अंतर्विरोधांना उघड केले. तसेच आधुनिक काळातील प्रबोधनविचारातील तत्त्वे, स्वप्न आणि वस्तुस्थिती यातील गफलती पुढे आणल्या. उत्तर-आधुनिकतावादाने एकाच एका विचार-पद्धतीला विरोध केला. विशिष्ट विचार, ज्ञानातून तयार झालेली मक्तेदारी / सत्तेला विरोध केला. यातून आपोआपच परीघावरील विचार, ज्ञान, कल्पना यांना महत्त्व येऊ लागले, विविध केंद्रांतील संस्कृतीव्यवहाराला महत्त्व येऊ लागले, हे ध्यानात घ्यावे लागेल. दुसरीकडे मात्र या विचाराने आधुनिक-प्रबोधनविचारातील अंतर्विरोधांना उघड करताना आधुनिक मूल्यव्यवस्था ही चिकित्सेच्या कक्षेत आणली. परिणामी आधुनिक मूल्यव्यवस्था ओलांडत परंपरा, रूढी यांना एकूण चर्चाविश्वात पुन्हा प्रवेश मिळू लागल्याने भूतकाळ आणि परंपरा याबद्दल याविचारव्यूहाचे निर्माण होणारे संबंध प्रश्न उपस्थित करणारे आहेत. यातून परंपरा आणि भूतकाळाकडे अचिकित्सकपणे पाहणे दृढ होवू शकते, परिणामी पुन्हा आधुनिकतेच्या मूल्यव्यवस्थेचे मोल स्पष्ट होऊ शकते, आणि तसे ते होऊ लागले आहे.

मुख्यत्वे आधुनिकतावाद आणि उत्तर-आधुनिकतावाद या युरोपीय चिंतन क्षेत्रातून निर्माण झालेल्या संकल्पना आहेत. अशा संकल्पना या वेगवेगळ्या परिस्थितीतून निर्माण होत असतात. त्यांच्या निर्मितीची पूरक परिस्थिती ही तत्कालीन काळात युरोप-अमेरिकेत निर्माण झालेली होती. तशी परिस्थिती जेव्हा आपल्याकडे निर्माण होवू लागली तसतशा या संकल्पना आपल्याकडेही अर्थपूर्ण ठरू लागल्या. अर्थात यासंदर्भात येथील स्थानिक संदर्भ महत्त्वाचे, हे जरी खरे असले तरी या संकल्पनांना टाळता येईल अशी

स्थिती नाही. त्यामुळे या संकल्पनांचा, पर्यायाने त्यासोबत येणाऱ्या सिद्धान्तनांचा परकिय म्हणून दुस्वास न करता समकालीन समाज, संस्कृती आणि साहित्याच्या अर्थनिणर्यनासाठी वापर होणे महत्त्वपूर्ण आहे. यातून समग्र व्यवहारांबाबत नवी आकलने उभी राहू शकतात.

## २.५ संदर्भ सूची


१. मालश, मिलिंद आणि अशोक जोशी, **आधुनिक समीक्षा सिद्धान्त**, मौज प्रकाशन, मुंबई, २००७, पृ. २३.

२. वागळे, जतिन : आधुनिकतावाद , **मराठी वाङ्मयकोश** : ४, संपा. विजया राजाध्यक्ष, महा. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२, पृ.३४.

३. आठवले, सदाशिव, प्रबोधन-पाश्चात्त्य, **भारतीय समाजविज्ञान कोश**, खंड ३, संपा. गर्गे स.मा., समाजविज्ञान मंडळ, पुणे, १९८३, पृ. २४०.

४. जोशी, लक्ष्मणशास्त्री, प्रबोधनकाल, **मराठी विश्वकोश**, खंड १०, संपा. जोशी लक्ष्मणशास्त्री, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८२, पृ. ३९८.

५. इनामदार, एस.डी., **माध्यम**, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९५, पृ. १०-११.

६. रेगे, मे. पुं., प्रबोधनाचे स्वरूप, **भारतीय प्रबोधनःसमीक्षण आणि चिकित्सा**, शंकरराव देव गौरवग्रंथ, संपा. बेडेकर दि.के., भणगे भा.शं., समाज प्रबोधन संस्था, पुणे, प.आ., १९७३, पृ. ५.

७. ओक द.ह., मध्ययुग-युरोपीय, **मराठी विश्वकोश**, खंड १२, संपा. जोशी लक्ष्मणशास्त्री, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८५, पृ. ११११.

८. रेगे मे. पुं., प्रबोधनाचे स्वरूप, **भारतीय प्रबोधनःसमीक्षण आणि चिकित्सा**, उनि., पृ. ६

९. गर्गे, स.मा., औद्योगिक संस्कृती, भारतीय समाजविज्ञान कोश, खंड २, संपा. गर्गे स.मा., समाजविज्ञान मंडळ, पुणे, १९८७, पृ. ७६

१०. गर्गे स.मा., समाजाची वाटचाल-विज्ञानयुग, भारतीय समाजविज्ञान कोश, खंड ५, संपा. गर्गे स.मा., समाजविज्ञान मंडळ, पुणे, १९९१, पृ. तेरा.

११. गर्गे स.मा., समाजाची वाटचाल- यंत्रयुग, भारतीय समाजविज्ञान कोश, खंड ३, संपा.गर्गे स.मा., समाजविज्ञान मंडळ, पुणे, १९८९, पृ. पंधरा-सोळा.

१२. जोशी लक्ष्मणशास्त्री, प्रबोधनकाल, मराठी विश्वकोश, खंड १०, उनि., पृ. ३९६.

१३. रेगे मे. पुं., प्रबोधनाचे स्वरूप, भारतीय प्रबोधनःसमीक्षण आणि चिकित्सा, उनि., पृ. १०.

१४. गर्गे स.मा., आधुनिकीकरण, भारतीय समाजविज्ञान कोश, खंड १, संपा. गर्गे स.मा., समाजविज्ञान मंडळ, पुणे, १९८६, पृ. २४१.

१५. रेगे मे. पुं., प्रबोधनाचे स्वरूप, भारतीय प्रबोधनःसमीक्षण आणि चिकित्सा, उनि., पृ.२८.

१६. व्होरा राजेंद्र, प्रस्तावना, आधुनिकता आणि परंपरा-एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र, संपा. व्होरा राजेंद्र,प्रतिमा प्रकाशन, प.आ., २०००, पुणे, पृ. १०-११.

१७. तत्रैव, पृ. १९८.

१८. जोशी लक्ष्मणशास्त्री, आधुनिकत्व, मराठी विश्वकोश, खंड २, संपा. जोशी लक्ष्मणशास्त्री, उनि., १९७६, पृ. ५२.

१९. थोरात हरिश्चंद्र, साहित्याचे संदर्भ, उनि., पृ. १९८.

२०. तत्रैव, पृ. १९८-१९९.

२१. तत्रैव, पृ. १९९.

२२. वागळे जतिन : आधुनिकतावाद , मराठी वाङ्मयकोश : ४, उनि., पृ.३५.

२३. एड्ग्ब्लूम फिलिप : मुंबईतील आधुनिकतावादाचे १९४० ते १९५० मधील मराठी-इंग्रजी आविष्कार , मूळ इंग्रजी लेख-फिलिप एड्ग्ब्लूम यांचा, अनुवादः विद्युत भागवत, अभिरूचि, डिसेंबर : १९९०, पृ.२२.

२४. थोरात हरिचंद्र : मर्ढेकर समकालीन कवींची कविता, प्रतिष्ठान, संपा. प्रकाश मेदककर, मार्च-एप्रिल २००६, वर्षे-५३, अंक-४ था, पृ.१०.

२५. हाऊ अर्व्हिंग : 'दि आयडिया ऑफ द मॉडर्न', अनु. सारंग विलास, अक्षरांचा श्रम केला, मौज प्रकाशन, मुंबई, प.आ., २०००, पृ.९-१०.

२६. पाटणकर वसंत : कविता : संकल्पना निर्मिती आणि समीक्षा, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, आणि अनुभव प्रका., मुंबई, प.आ. १९९५, पृ.७१.

२७. तत्रैव, पृ.७१-७२.

२८. रसाळ सुधीर : आजचे प्रयोगशील साहित्य आणि समीक्षेची नवी दिशा, प्रतिष्ठान, संपा, नागनाथ कोत्तापल्ले, औरंगाबाद, वर्षे-२५वे, अंक-७ वा, औरंगाबाद, पृ.३.

२९. सारंग विलास : अक्षरांचा श्रम केला, मौज प्रकाशन, मुंबई, २०००, प.आ., पृ.११.

३०. किंबहुने रवींद्रः इंद्रनाथ चौधुरी यांच्या 'उत्तर-आधुनिकता' या लेखावर संक्षिप्त टिपण, पंचधारा, संपा. नलिनी साधले, वर्षे ३६ वे , अंक १, एप्रिल-मे-जून १९९३, पृ. ५०.

३१. भूमकर संतोषः इंग्लंड व अमेरिकेतील काव्यांतर्गत उत्तर-आधुनिकता, पंचधारा, उनि., पृ. १००.

३२. तत्रैव, पृ. १०५.

३३. वागळे जतिनः उत्तर-आधुनिकतावाद, मराठी वाङ्मय कोश, चौथा खंड, संपा. विजया राजाध्यक्ष, महा. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२, पृ. ४७.

**२.६ स्वंयअध्यन प्रश्न**

**२.६.१ योग्य पर्याय निवडा.**

अ. आधुनिकतेची मूल्ये म्हणून खालीलपैकी कोणत्या मूल्याचा विचार केला जातो?

१. विवेक २. बुद्धिप्रामाण्यता ३. स्वातंत्र्य ४. यापैकी सर्व

आ. आधुनिक या शब्दाचा कोणता मूळ अर्थ बदलत तो प्रवृत्ती-प्रकृतीसूचक झाला?

१. कालसूचक २. स्थळसूचक ३. भाषासूचक ४. संहितासूचक

इ. वसाहतकाळात प्रारंभी व्यापारी आणि नंतर राज्यकर्ते म्हणून भारतात स्थिरावलेला देश कोणता?

१. डच २. पोर्तुगाल ३. फ्रान्स ४. इंग्लंड

ई. उत्तर-आधुनिकतावादी विचारव्यूह खालीलपैकी कोणत्या विचारास प्रतिक्रिया देत आकारास आला?

१. आधुना २. आधुनिक ३. आधुनिकता ४. आधुनिकतावाद

उ. उत्तर-आधुनिकतावादाने खालीलपैकी कोणत्या गोष्टीस ठोस विरोध दर्शविला?

१. महाकथनांना २. परंपरेला ३. भूतकाळाला ४. विज्ञानाला

उत्तर-

अ. यापैकी सर्व आ. कालसूचक इ. इंग्लंड ई. आधुनिकतावाद

उ. महाकथनांना

**२.६.२ दीर्घोत्तरी प्रश्न**

१. आधुनिकतेच्या ऐतिहासिक परिप्रेक्ष्याची सविस्तर मांडणी करा.

२. आधुनिकतावादाच्या ऐतिहासिक परिप्रेक्ष्याची विस्ताराने नोंद घ्या.

३. आधुनिकतावाद ही आधुनिकतेच्या प्रकल्पाला दिलेली नकारात्मक प्रतिक्रिया आहे, या विधानाची चर्चा करा.

४. आधुनिकतावादी साहित्याच्या स्वरूपविशेषांची चर्चा करा.

५. आधुनिकता आणि आधुनिकतावादाच्या युरोपीय संदर्भांची विस्ताराने नोंद घ्या.

६. आधुनिकता आणि आधुनिकतावादाच्या भारतीय संदर्भांची सविस्तर चर्चा करा.

७. उत्तर-आधुनिकतावादाच्या विचारव्यूहातील प्रमुख विचारांची चर्चा करा.

८. उत्तर-आधुनिकतावादाच्या संकल्पनेतील परस्परविरोधी संदर्भांची मांडणी करा.

९. आधुनिकतावादाची प्रतिक्रिया म्हणून उत्तर-आधुनिकतावादाकडे पाहिले जाते, या विधानाची साधार चर्चा करा.

१०. उत्तर-आधुनिकतावादी साहित्याच्या स्वरूपविशेषांची चर्चा करा.

### २.६.३ टिपा

१. भारतातील ब्रिटिशांची सत्ता

२. ग्रीक विद्या पुनरुज्जीवन चळवळ

३. औद्योगिक क्रांती

४. मराठीतील आधुनिकतवादी साहित्य

५. प्रबोधन चळवळ

६. आधुनिकतावादातील बंडखोरी

७. ज्ञान आणि सत्तासंबंध

८. उत्तर-आधुनिकतावादातील भाषाविचार

९. उत्तर-आधुनिकतावादाचे सांस्कृतिक संदर्भ

१०. उत्तर-आधुनिकतावाद आणि महाकथनांना विरोध

## २.७ अधिक वाचनासाठी


१. अहमद एजाज, क्रात्यांचे शतक, अनु. नारकर उदय, लोकवाङ्मयगृह, मुंबई, २००४.

२. आचार्य जावडेकर, आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९३८, पुर्नमुद्रण १९७९.

३. ऑमव्हेट गेल, वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, भाषां. दिघे पी. डी, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५.

४. कुळकर्णी कृ. भि., आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांति, प्रकाशक-लेखक स्वतः, मंबई, १९५६.

५. गुप्ते विश्राम, उत्तर-आधुनिकतेचे नमन, नवं जग नवी कविता, संस्कृती प्रकाशन, पुणे, २०१६.

६. गुहा रामचंद्र, आधुनिक भारताचे विचारस्तंभ, अनु. शारदा साठे, रोहन प्रकाशन, पुणे, २०१८.

७. गुहा रामचंद्र, आधुनिक भारताचे विचारस्तंभ, अनु. शारदा साठे, रोहन प्रकाशन, पुणे, २०१८.

८. गोपाल एस., ब्रिटिशांची भारतातील राजनीती, भाषां. सरोज देशपांडे, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००६.

९. जाधव मनोहर (संपा.), समीक्षेतील नव्या संकल्पना, स्वरूप प्रकाशन, पुणे, २००१.

१०. थोरात हरिश्चंद्र, मूल्यभानाची सामूग्री, शब्द पब्लिकेशन, मुंबई, २०१६.

११. थोरात हरिश्चंद्र, साहित्याचे संदर्भ, मौज प्रकाशन, मुंबई, २००५.

१२. दत्त रजनी पाम, आजकालचा भारत, अनु. देवधर य.ना., डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००६.

१३. दीक्षित राजा, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र-मध्यमवर्गाचा उदय, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००९.


❑❑❑

## घटक ३
# सांस्कृतिक समीक्षा

**सांस्कृतिक समीक्षा**

**उद्दिष्टे**

या घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपणास पुढील गोष्टी समजून येतील.

१. सांस्कृतिक समीक्षेचे स्वरूप अभ्यासता येईल.

२. सांस्कृतिक समीक्षेचे महत्त्व लक्षात येईल.

३. सांस्कृतिक समीक्षेची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेता येईल.

४. सांस्कृतिक समीक्षेत वापरण्यात येणारी परिभाषा परिचित होईल.

५. सांस्कृतिक समीक्षा व प्रभाव टाकणाऱ्या विचारवंतांचा परिचय होईल.

६. समाज राजकारण आणि वाङ्मय यांचा संस्कृतीशी असलेला संबंध लक्षात येईल.

७. सांस्कृतिक समीक्षेचे उपयोजन आणि त्याचे महत्त्व लक्षात येईल.

**प्रास्ताविक :**

संस्कृती ही संकल्पना बहुआयामी आणि व्यापक स्वरूपाची आहे. मानवी समाजाच्या उत्क्रांतीमध्येच संस्कृतीची बीजे पेरली गेली. वेगवेगळ्या भू-प्रदेशातील मानवाने उपलब्ध साधनसामग्रीच्या आधारे आपले जीवन नियमित करण्याचा प्रयत्न केल्याचे आपल्याला आढळून येते. त्यामुळे स्पष्ट व नेमकी अशी व्याख्या संस्कृती या संकल्पनेची करणे एक आव्हानच आहे. परंतु 'संस्कृती' या संकल्पनेतून अभिप्रेत असलेल्या काही घटकांची स्पष्ट व रेखीव मांडणी करणे शक्य आहे. भाषा संस्कृतीची वाहक असते. मानवी उत्क्रांतीच्या एका टप्प्यावर माणूस आपले विचार अनुभव भावना भाषेतून व्यक्त करायला लागला ती अवस्था संस्कृतीच्या जडणघडणीचा पाया समजायला हरकत नाही. भाषा अस्तित्वात नसताना मानवी जीवन कसे असेल याचे अनुमान अभ्यासक लावण्याचा प्रयत्न करतात. संस्कृतीच्या जडणघडणीवर जसा भूप्रदेश, हवामान, नदी, समुद्र, पिके, कला यांचा प्रभाव पडतो तसेच मानवाने निर्माण केलेल्या वेगवेगळ्या सामाजिक, राजकीय संस्था, साहित्य यांचाही खोलवर परिणाम झालेला आपणास आढळून येतो.

मानवी समाज संस्कृतीकरणाच्या आणि सामाजिकरणाच्या प्रक्रियेतून संस्कृती आत्मसात करतो. मानवी समाज वेगवेगळ्या भूप्रदेशात विखवलेला. तो वेगवेगळ्या भाषा वापरतो. वेगवेगळ्या धर्माचे आचरण व पालन करतो. त्यामुळे वैशिष्ट्यपूर्ण पण मिळाल्या संस्कृतीची निर्मिती झालेली आपणास आढळून येते. सामाजिक

नियम व्यक्तीने समाजात कसे वर्तन करावे यासाठी मार्गदर्शन करतात. किंबहुना काय करावे व काय करू नये यावर देखील संस्कृतीचा पगडा असतो. कोणतीही एक संस्कृती श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असत नाही. प्रत्येक संस्कृती आपापल्या ठिकाणी सर्वश्रेष्ठ आणि उत्तमच असते. संस्कृती डावी अथवा उजवी असत नाही काळाच्या ओघात संस्कृती परंपरेचा अट्टाहास धरते. तसेच मानवी समाजाच्या उत्कर्षाबरोबर घडून आलेले बदल ही अंतर्भूत करते. त्यामुळे संस्कृती एकाच वेळी जुनी व नवीन असते.

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवी समाज एकमेकांशी मोठ्या प्रमाणात संवाद करीत आले आहेत. दळणवळणाच्या साधनांमध्ये झालेला बदल तसेच वेगवेगळ्या कारणामुळे एक देश सोडून लोक इतर देशात व्यवसाय नोकरीसाठी विस्थापित होत असल्याकारणामुळे वेगवेगळ्या संस्कृती एकमेकांवर परिणाम करताना दिसून येतात. युनेस्को सारख्या जागतिक संघटना संस्कृतीच्या जतनासाठी प्रयत्न करतात. संस्कृतीचा अभ्यास हा अंतविद्याशाखीय अभ्यास असल्या कारणामुळे या अभ्यासात मानववंशशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, साहित्य या ज्ञानशाखांचा देखील अंतर्भाव होतो.

प्रत्येक संस्कृती आपले वेगळेपण जपते. यात कला, संगीत, नृत्य, विधी, उपासनापद्धती, राहणीमान, पेहराव, खाद्यसंस्कृती यांचा समावेश होतो. संस्कृतीत तंत्रज्ञान स्थापत्य कला यांचा समावेश होतो. तसेच अमूर्त संस्कृतीत सामाजिक संघटना, राजकीय व्यवस्था मिथक कथा तत्त्वज्ञान, साहित्य (मौखिक आणि लिखित) आणि विज्ञान यांचा समावेश होतो.

आधुनिक साहित्य समीक्षेमध्ये सांस्कृतिक समीक्षा हा समीक्षेचा प्रकार मागील काही दशकात प्रभावीपणे पुढे आलेला दिसतो. पारंपारिक साहित्य समीक्षेमध्ये लेखक, लेखकाची शैली, इतिहास, सामाजिक घटक यांच्या अनुषंगाने साहित्याचे मूल्यमापन विश्लेषण करण्याची पद्धत रूढ होती. पाश्चिमात्य देशात विशेषत: दुसऱ्या महायुद्धानंतर इतिहास आणि मानववंश शास्त्राच्या मदतीने मूल्यमापन करण्याची पद्धती जोमाने विकसित झाली.

## ३.३ सांस्कृतिक समीक्षेची ऐतिहासिक पार्श्वभूमी:

१९ व्या शतकातील कवी समीक्षक म्याथू अरनॉल्ड यांच्या मते, संस्कृती ही सामाजिक ऐक्य आणि बदल या दोन्हीचा उगम संस्कृतीत आहे. त्याच्या एका समीक्षात्मक ग्रंथाचे नाव 'कल्चरल अँड अनार्को' असे आहे. सामाजिक स्थैर्यासाठी आणि सामाजिक उन्नतीसाठी संस्कृती महत्त्वाचे काम करते; अशी त्याची मांडणी होती. रेमंड विल्यम्स, अन्तानिओ, ग्रामची, लुई अल्थुझर, मिशेल फुको यांच्या वैचारिक लिखाणामुळे संस्कृती अभ्यासाकडे अभ्यासकांचा ओढा वाढला पारंपारिक पद्धतीने संस्कृतीचा अभ्यास करण्याऐवजी या विचारवंतांनी अर्थशास्त्र, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र या विद्याशाखांचा समावेश संस्कृती अभ्यासामध्ये केला. संस्कृती ही काही स्थिर अपव्यक्तीनीय नसून ती एक प्रक्रिया आहे जी की सतत स्वतःत बदल घडवून आणते.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस जर्मनीतील मार्क्सवादी विचारवंतांनी आणि तत्त्वज्ञानाने सांस्कृतिक समीक्षेच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. थिओडोर अडॉर्नो, मॅक्स हॉरक हायमर, आणि हर्बर्ट मार्कझ या विचारवंतांनी सांस्कृतिक घटनांवर मार्क्सवादी विचारांची अंमलबजावणी करून संस्कृतीचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला. अडोर्नो या विचारवंताने संस्कृती उद्योग ही संकल्पना मांडली त्याच्या एका तात्त्विक विवेचन असलेल्या पुस्तकाचे नाव 'कल्चर इंडस्ट्री' असे आहे. या पुस्तकात असे सुचवले की मोठ्या प्रमाणावर उत्पादित सांस्कृतिक उत्पादने उदाहरणार्थ चित्रपट संगीत आणि जाहिराती जनतेला शांत आणि नियंत्रित करून भांडवली व्यवस्थेला कायम ठेवण्याचे कार्य करतात तसेच कला आणि साहित्याच्या विविध प्रकारांना समजून घेण्याचा आणि तात्त्विक विश्लेषण करण्याचा एक मार्ग म्हणून सांस्कृतिक समीक्षा समोर आली. यामध्ये ऐतिहासिक आणि सामाजिक दृष्टिकोनांचा समावेश सांस्कृतिक समीक्षेत आहे. साहित्य समीक्षेच्या वेगवेगळ्या पद्धती अस्तित्वात आलेल्या आहेत. यामध्ये एकच साहित्यिक कलाकृती वेगवेगळ्या दृष्टिकोनातून अभ्यासली जाते. कलावादी समीक्षा, इतिहासवादी समीक्षा, समाजशास्त्रीय समीक्षा, मार्क्सवादी समीक्षा, मानसशास्त्रीय समीक्षा, भाषाशास्त्रीय समीक्षा, संरचनावाद, विसंरचनावाद, अशा अनेक समीक्षा पद्धती विसाव्या शतकाच्या प्रारंभा पासून विकसित झालेल्या आपणास दिसून येतात.

'सांस्कृतिक समीक्षा' म्हणजे कोणत्याही साहित्यकृती, कलाकृतीची सांस्कृतिक पार्श्वभूमीची चिकित्सक पद्धतीने तपासणी करणे, तसेच त्यातून त्या संस्कृतीचा अर्थ आणि प्रभाव याचा शोध घेणे होय. सांस्कृतिक समीक्षेत खालील बाबींचा समावेश होतो.

१. साहित्यातून त्या संस्कृतीचे प्रतिबिंब कसे दिसते ते तपासणे.

२. कलाकृती आणि संस्कृती यांच्यातील संबंधांचा अभ्यास करणे.

३. सांस्कृतिक विचारांची आणि कल्पनांची चिकित्सकपणे तपासणी करणे.

४. साहित्य किंवा कलाकृती कोणत्या सामाजिक आणि ऐतिहासिक परिस्थितीत तयार झाली याचा अभ्यास करणे.

ऑलन ट्राशेटनबर्ग याने १९७६ मध्ये 'क्रिटिक्स ऑफ कल्चरल' हे पुस्तक लिहिले. यात त्यांनी अमेरिकेतील १९२० च्या दशकातील एल. मेनकेन आणि लेविस ममफोर्ड यांची चर्चा केली. आणि १९९५साली आलेल्या अमेरिकन कल्चरल क्रिटिक या पुस्तकात एफ. ओ. मथेसन, सुझान सोनटॅग यांच्या बद्दल चर्चा केलेली आहे. आर्यव्हींग बाबर्ट आणि वॉल्टर बेन्यामीन यांचा देखील समावेश सांस्कृतिक समीक्षक म्हणून करावा लागेल. रिचर्ड रोर्टी, नील पोस्टमन, डॅनियल क्वीन, मार्क किंगवेल, रिचर्ड रॉर्टी आणि स्लॅव्हॉय झीझेक हे काही आधुनिक सांस्कृतिक समीक्षक आहेत.

**३.३ सांस्कृतिक समीक्षेची ठळक वैशिष्ट्ये.**

१. सांस्कृतिक समीक्षा पारंपारिक समीक्षा पद्धतीला आव्हान देते. आणि पुस्तकाच्या साहित्यापेक्षा संहितेच्या परिपेक्ष्याला जास्त महत्त्व देते. आणि बाह्य घटक कलाकृतींच्या जडणघडणीवर व त्याच्या स्वीकृतीवर कसे परिणाम करते हे दाखवून देते.

२. सांस्कृतिक समीक्षा साहित्यकृतीत दडलेला पूर्वग्रहदूषित विचार उघड करते. जसे की जात, वंश, वर्ग, लिंगभाव याचा परिणाम पात्रावर आणि कथन शैलीवर कसा पडलेला आहे हे दाखवून देते.

३. सांस्कृतिक समीक्षा ही आधुनिक साहित्य सिद्धांताला आव्हान म्हणून उभी टाकलेली आहे कारण आधुनिक साहित्य सिद्धांत हा रुपवादी आणि संहितालक्ष्यी समीक्षाविचार आहे.

### ३.४ संस्कृतीचे स्वरूप:

संस्कृती ही श्रद्धा, मूल्ये, पद्धती आणि भौतिक वस्तूंची एक गतिमान आणि सामायिक प्रणाली आहे. लोकांचा समूह जगाला समजून घेण्यासाठी व जगाशी संवाद साधण्यासाठी त्याचा वापर करतो. संस्कृती शिकली जाते. प्रसारित होते. आणि काळाच्या ओघात विकसित देखील होते. व्यक्तीचे वर्तन. दृष्टिकोन आणि जागतिक दृष्टिकोनास आकार देण्याचे काम संस्कृती करत असते.

**संस्कृतीची प्रमुख वैशिष्ट्ये:**

**१. शिकली जाते :**

संस्कृती ही काही जन्मजात असू शकत नाही. ती मानवी समूहाची निर्मिती असते. त्यामुळे मानव समूहात जन्माला आलेले मुल त्याच्या बालपणापासूनच संस्कृतीचे धडे कळत नकळतपणे गिरवत असते.

**२. सामायिक असते :**

विशिष्ट मानव समूहातील श्रद्धा, मूल्ये आणि नियम सामान्यत: विशिष्ट गटातील किंवा समाजातील सदस्यांमध्ये समान असतात.

**३. प्रसारित होते:**

संस्कृती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे भाषा कथाकथन आणि सांस्कृतिक पद्धतीसह संक्रमित व प्रसारित होते.

**४. गतिमान असते.**

संस्कृती ही स्थिर असत नाही ती नेहमीसाठी परिवर्तनीय असते. कालानुरूप मानवी समूहात होणारे बदल ती आत्मसात करते. ती बदलत्या परिस्थितीशी तंत्रज्ञान आणि सामाजिक प्रभावाशी जुळवून घेते.

**५. प्रतीकात्मक असते:**

संस्कृती ही अर्थ व्यक्त करण्यासाठी आणि संवाद सुलभ, प्रभावी करण्यासाठी भाषाविधी आणि कलाकृती यासारख्या प्रतीकांवर अवलंबून असते.

६. एकात्मिक असते संस्कृतीचे विविध पैलू एकमेकांशी जोडलेले आणि परस्परावलंबी असते त्यामुळे संस्कृती सुसंगत वाटते.

**७. साहित्य व भाषा**

भाषा ही संस्कृतीचे वाहक असते. त्याचवेळी भाषा हीच संस्कृतीचे खूप प्रभावी प्रतीक म्हणून संस्कृती वाहकाचे काम करते. भाषिक कृती म्हणजे साहित्य, कथा, कादंबरी नाटक आणि इतर मौखिक व लिखित साहित्य हे संस्कृतीचा अक्षरठेवा असतो.

८. सांस्कृतिक घटक दोन प्रकारचे असतात. १. भौतिक संस्कृती : साधने तंत्रज्ञान कला वास्तुकला कपडे अन्न आणि इतर भौगोलिक वस्तू. २. अधिभौतिक संस्कृती: श्रद्धा, मूल्ये, दृष्टिकोन, ज्ञान, भाषा, चालीरीती, परंपरा.९. संस्कृतीचे प्रकार :

१. राष्ट्रीय संस्कृती : एकाच राष्ट्रातील सामाजिक, श्रद्धा, मूल्य आणि पद्धती.

२. प्रादेशिक संस्कृती : विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील विशिष्ट सांस्कृतिक श्रद्धा, मूल्ये आणि पद्धती.

३. संघटनात्मक संस्कृती : विशिष्ट संस्थेतील सामाजिक मूल्य, व्यवस्था, श्रद्धा आणि पद्धती.

४. संघ संस्कृती : विशिष्ट संघ किंवा गटात विकसित झालेली संस्कृती.

### ३.५ संस्कृती, इतिहास, राजकारण आणि वाङ्मय :

संस्कृती, इतिहास, राजकारण आणि वाङ्मय यांचा परस्परांशी कनिष्ठ संबंध अस्तित्वात असतो. इतिहासातील राजकीय घडामोडी युद्ध, करार, नैसर्गिक आपत्ती या सर्व घटकांचा परिणाम संस्कृतीच्या जडणघडणीवर होत असतो. संस्कृती काही अचानक आणि एकाच दिवसात उदयास आलेली बाब नसते. संस्कृती पिढ्यानपिढ्याचे संचित असते. आपल्या भावना जगण्याच्या पद्धती, श्रेयस आणि प्रेयस, ईस्ट काय आणि अनिष्ट काय याची जाणीव संस्कृतीच आपणास करून देते.

#### ३.५.१ संस्कृती आणि इतिहास:

मानवी समाज हा नेहमीच परिवर्तनशील राहिलेला आहे. मानवी समूहात घडणाऱ्या वेगवेगळ्या घटना मानवी जीवनावर खोलवर परिणाम करणारे असतात. संस्कृती अभ्यासकाला इतिहास दुर्लक्षित करून संस्कृतीचा अभ्यास निकोप पद्धतीने करणे जवळजवळ अशक्यच आहे. संस्कृती ही इतिहासाचीच निर्मिती असते. ऐतिहासिक घडामोडी, सांस्कृतिक मूल्यांची आणि सांस्कृतिक विधीची निर्मिती करतात. इतिहासाचा अभ्यास करणे म्हणजे भूतकाळातील घडलेल्या घटनांचा चिकित्सक आणि निरपेक्ष पद्धतीने घेतलेला आढावा असतो. समाजाच्या जडणघडणीत आणि संस्कृतीच्या विकासात इतिहास महत्त्वाची भूमिका बजावतो. इतिहास आपल्याला संस्कृतीमधील वेगवेगळे घटक समजून घेण्यास मदत करतो. आपली संस्कृती ओळख कशी आहे? आणि ती तशी का आहे? या प्रश्नाचा सोडवणुकीसाठी आपल्याला इतिहासाची मदत होते. सांस्कृतिक इतिहास

भूतकाळातील घटनांचे सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय दृष्टिकोनातून विश्लेषण करतो. व्यक्तीने वस्तूंना, शब्दांना आणि वर्तनाला दिलेला अर्थ तपासण्यासाठी सांस्कृतिक इतिहास मदत करतो. सांस्कृतिक इतिहासात कल्पना, साहित्य, कला, शिक्षण, माध्यमे, विज्ञान आणि राजकारण यांचा समावेश होतो.

आपल्या प्रेरणा, आपले विचार आणि आपली कृती याचा चिकित्सक अभ्यास सांस्कृतिक इतिहासात अंतर्भूत आहे. सांस्कृतिक इतिहासाची अभ्यास पद्धती ही साहित्य, समीक्षा, संस्कृती,अभ्यास आणि मानववंशशास्त्र यांनी प्रभावित झालेली असते. भूतकाळ हीच एक संहिता (text) आहे असे समजून भूतकाळातील घटनांचा अभ्यास केला जातो. आणि दैनंदिन जीवनातील गुंतागुंत समजून घेतली जाते. सांस्कृतिक इतिहास सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय वातावरणाद्वारे किंवा एखाद्या समूहाला अनुकूल असलेल्या कला आणि शिष्टाचाराशी संबंधित भूतकाळातील घटनांची नोंद करतो. आणि त्याचा अर्थ लावतो. जेकब बर्कहार्ट यांनी शिस्त म्हणून सांस्कृतिक इतिहास शोधण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. संस्कृतीच्या इतिहास या अभ्यास प्रेरणेतून संस्कृती अभ्यास (cultural studies) ही नवीन ज्ञान शाखा उदयास आली. जसे संस्कृती ही बहुआयामी आणि बहुपेढी आहे तसेच संस्कृती अभ्यास ही इतिहासातील नवीन अभ्यास शाखा आंतरविद्याशाखीय असून संस्कृती अभ्यास करणाऱ्या संशोधकास भूगोल, राजकीय, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, सामाजिक सिद्धांत, साहित्य सिद्धांत, सिनेमा अभ्यास, तत्त्वज्ञान, सांस्कृतिक मानववंशशास्त्र आणि कलेचा इतिहास यांचा समावेश करावा लागतो. सांस्कृतिक समीक्षा आणि संस्कृती अभ्यास बऱ्याच अंशी एकमेकांशी निगडित आहेत. संस्कृती अभ्यास (cultural studies) ही संज्ञा रिचर्ड होगार्ट यांनी सर्वप्रथम १९६४ मध्ये उपयोगात आणली ज्यावेळी त्यांनी बर्निंग हॅम येथे 'सेंटर फॉर कंटेम्परी कल्चरल स्टडीज' ची स्थापना केली होती. होगार्ट नंतर हा या केंद्राचा संचालक झाला. या विवेचनाचा सारांश म्हणजे 'संस्कृती' आणि 'इतिहास' या ज्ञानशाखा एकमेकात बऱ्यापैकी मिसळल्या असल्यामुळे फक्त संस्कृतीचा किंवा फक्त इतिहासाचा असा वेगळा अभ्यास करता येणे शक्य नाही. दोन्ही ज्ञानशाखांचा मिळूनच अभ्यास करणे इष्ट ठरते.

### ३.५.२ संस्कृती आणि राजकारण:

एखाद्या देशातील व भूभागावरील शासनप्रणाली, शासनयंत्रणा त्या समूहाने स्वीकारलेली राजकीयप्रणाली ही त्या मानवी समूहाच्या संस्कृतीवर खोलवर परिणाम करणारी बाब असते. सत्ता काय इष्ट, काय अनिष्ट याचे दिशादर्शन करून समाजाला नियंत्रित करण्याचा प्रयत्न करते. नियंत्रित आणि निरंकुश सत्ता आपलीच मतप्रणाली कशी योग्य आहे. आणि हितावह आहे. याचा साम,दाम,दंड नीतीचा वापर करून लोकांच्या गळी उतरवण्याचा प्रयत्न करते. अशावेळी लोकांच्या मानवी हक्काची होणारी पायमल्ली स्वातंत्र्याचा संकोच, अदृश्य दहशतीचे वातावरण याची चिकित्सा सांस्कृतिक समीक्षेत केली जाते. त्यामुळे सांस्कृतिक समीक्षेला राजकीय विश्लेषणामध्ये जास्त रस आहे कारण सत्तेची सूत्रे ज्या मूठभर अभिजनांच्या ताब्यात असतात तीच लोक इतर सर्व लोकांनी काय करावे,काय करू नये, काय पहावे, काय पाहू नये, कसे वागावे, कसे वागू नये, इतकच काय समाजाने कसा आणि कोणता विचार करावा हे देखील नियंत्रित करतात. याची चिरफाड संस्कृती समीक्षेत अपेक्षित आहे. उदाहरणार्थ द्यायचे झाले तर स्टॅलिनच्या सत्तेखालील रशिया किंवा हिटलरच्या सत्तेखालील

जर्मनी यांचे देता येईल. या दोन्ही सत्ताधीशांच्या कालखंडात निर्माण झालेले साहित्य,सिनेमा, कला या सर्व गोष्टीवर त्यांचेच नियंत्रण होते. त्यांच्या विचारप्रणालीला विरोध करणाऱ्या कोणीही व्यक्ती देशद्रोही ठरत असे. अशा सर्व राजकीय एकाधिकारशाहीची चिकित्सा सांस्कृतिक समीक्षेत अपेक्षित आहे.

**३.५.३ संस्कृती आणि वाङ्मय :**

वाङ्मय हे संस्कृतीचे एक प्रमुख अंग आहे. लिखित स्वरूपात उपलब्ध असलेले साहित्य उदाहरणार्थ कथा, कादंबरी, नाटक, कविता, प्रवासवर्णन, ललित, स्फुटलेखन, रोजनिशा या सर्व संस्कृतीच्या रक्षक आणि वाहक असतात. एखादी संस्कृती कशी होते हे समजायचे असेल तर आपल्याला त्या काळातील त्या संस्कृतीत निर्माण झालेल्या साहित्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक ठरते. लोकांच्या धारणा, विधी, वेगवेगळ्या संकल्पना, त्यावेळीची राजकीय स्थिती, भौगोलिक घटना, धर्माचा पगडा, युद्ध, महामाया, पूर या सर्व मानवी जीवनावर दुर्गामी परिणाम करणाऱ्या घटनांचे पडसाद साहित्यिकाने कलाकृतीत उमटवलेले असतात. भाषा हीच संस्कृतीचा अविभाज्य घटक असते. त्यामुळे कोणतीही आणि कोणाचीही भाषिक कृती ही संस्कृती अभ्यासाच्या दृष्टीने मोठी बाब असते. लोकसाहित्य, लोकपरंपरा, मौखिक साहित्य यात आपल्याला संस्कृतीच्या पाऊलखुणा दिसून येतात. सांस्कृतिक समीक्षकाला या पाऊलखुणा संस्कृतीमध्ये मुद्दाम निर्माण केली गेलेल्या उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ,शहरी-ग्रामीण, प्रमाण बोली या भेदावर मात करून त्यात अन्युसत असलेल्या 'सत्ताधाऱ्यांचा कावा' उघडा पाडण्यास मदत करतात. सांस्कृतिक समीक्षेचे ते एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. नाकारला गेलेला, दुर्लक्ष केलेला, क्रम अस्सल म्हणून टाळलेला समाजातील 'नाही रे' वर्गाचा सर्व इतिहास, कला, साहित्य यांना केंद्रस्थानी आणणे आणि त्यातील सौंदर्य स्थळे शोधणे. जसे कोणतीही भाषा श्रेष्ठ कनिष्ठ असत नाही तसेच कोणतीही संस्कृती उच्च दर्जाची व निम्न दर्जाची असत नाही. कृषी संस्कृती, ग्रामीण संस्कृती, कामगार संस्कृती, आदिवासी संस्कृती या सर्व अत्यंत महत्त्वाच्या व अभ्यासास योग्य बाबी आहेत.

**३.६ सांस्कृतिक समीक्षेतील महत्त्वाच्या संकल्पना :**

सांस्कृतिक समीक्षेत काही महत्त्वाच्या संज्ञा, संस्कृती आणि समाज यांचा सहसंबंध अभ्यासण्यासाठी वापरल्या जातात. या संज्ञा संस्कृतिक घटकाच्या अभ्यासासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत सामाजिक वास्तव कशा पद्धतीने निर्माण केले जाते हे समजण्यासाठी खाली दिलेल्या काही संज्ञा उपयुक्त आहेत.

**३.६.१. विचारसरणी** (ideology)

विचारसरणी म्हणजे धारणा, मूल्य आणि कल्पनाचा असा समुच्चय की जी लोकांच्या विचारांना आणि वर्तनाला आकार देते. खूप वेळेस हीच विचारसरणी सामाजिक संरचना आणि राजकीय व्यवस्थेचे समर्थन करण्यासाठी सत्तेतील लोकांकडून स्वहितासाठी वापरली जाते. विचारसरणी लुईस अल्थूसरच्या मते, वास्तवाला सत्ताधाऱ्यांना हवे तसे पाहण्याची, इतरांवर गारूड घालते. त्यामुळे त्यांचे शोषण किंवा नुकसान त्यांच्या

ध्यानातच येत नाही.  विचारसरणीच्या वाहकाला आपण एखादी विचारसरणीच्या कह्यात गेलो आहोत हेच मुळी लक्षात येत नाही.

**विचारसरणीचे प्रमुख वैशिष्ट्ये**

**१. कल्पनांच्या प्रणाली:**

विचारसरणी ही केवळ वेगळ्या श्रद्धा नाहीत तर त्या परस्पर जोडलेल्या विचारप्रणाली असतात ज्या जगाला समजून घेण्यासाठी आणि त्यामध्ये कार्य करण्यासाठी एक चौकट प्रदान करतात.

**२. सामाजिक आणि राजकीय संदर्भ:**

विचारसरणी बऱ्याचदा विशिष्ट सामाजिक गट, राजकीय चळवळी किंवा ऐतिहासिक कालखंडाशी जोडल्या जातात. ज्या त्या गटाच्या आवडी आणि मूल्यांचे प्रतिबिंब असतात.

**३. औचित्य आणि टीका:**

विचारसरणीचा वापर विद्यमान सत्ता संरचनांना वैध ठरवण्यासाठी किंवा त्यांना आव्हान देण्यासाठी सामाजिक बदलाचा पुरस्कार करण्यासाठी किंवा परिस्थिती आहे तशी ठेवण्यासाठी तिचा वापर केला जातो.

**४. वर्तनावर परिणाम:**

विचारसरणी केवळ आपले विचार आणि श्रद्धांचा नव्हे तर समाजातील आपली कृती आणि संवादांना देखील आकार देते.

**५. उदाहरणे**

विचारसरणीचा सामान्य उदाहरणांमध्ये भांडवलशाही, साम्यवाद, समाजवाद, उदरमतवाद, रुढीवाद, राष्ट्रवाद वसाहतवाद विविध धार्मिक आणि तात्विक प्रणालींचा समावेश होतो.

विचारसरणीचे वेगवेगळे दृष्टिकोन:

१. मार्क्सवादी दृष्टिकोन :

मार्क्सवादी दृष्टिकोनातून विचारसरणीकडे अनेकदा शासक वर्ग त्याचे वर्चस्व टिकवण्यासाठी आणि सामाजिक संबंधांचे खरे स्वरूप लपवण्यासाठी आणि कामगार वर्गाची शोषण करण्यासाठी वापरले जाणारे एक साधन म्हणून पाहिले जाते.

२. कार्यात्मक दृष्टिकोन :

कार्यात्मक दृष्टिकोनातून विचारसरणीकडे सामाजिक एकता आणि स्थिरता राखण्याचा एक मार्ग म्हणून पाहिले जाते. ज्यामुळे लोकांना एकत्र बांधणारी मूल्ये आणि श्रद्धांचा एक सामायिक संच तयार झालेला असतो.

३. गंभीर दृष्टिकोन :

गंभीर दृष्टिकोनातून विचारसरणीकडे पाहिल्यास विचारसरणी कशा प्रकारे एका गटावर अत्याचार करण्यासाठी किंवा त्यांना दुर्लक्षित करण्यासाठी, असमानता आणि अन्याय कायम ठेवण्यासाठी कसा वापरला जातो याचे परीक्षण करतो.

थोडक्यात विचारसरणी (ideology) ही एक जटील आणि बहुआयामी संकल्पना आहे. जी आपली समज आणि त्यातील आपले स्थान घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

### ३.६.२ वर्चस्व किंवा धुरिणत्व (Hegemony)

ग्रीक शब्द 'हेगेमोनिया' म्हणजे नेता पासून आलेला शब्द म्हणजे हेजेमनी (वर्चस्व), एका घटकाचे इतरांवर मग ते राष्ट्र, गट किंवा विचारसरणी यावर वर्चस्व किंवा नेतृत्व दर्शवते.

वर्चस्व म्हणजे एका गटाचे किंवा अस्तित्वाचे इतरांवर वर्चस्व. जे बहुतेकदा थेट शक्ती ऐवजी सांस्कृतिक, वैचारिक किंवा आर्थिक प्रभावाद्वारे प्राप्त केले जाते. ज्या ठिकाणी वर्चस्व असलेल्या गटाच्या कल्पना आणि मूल्ये सामान्य ज्ञान म्हणून व्यापकपणे स्वीकारल्या जातात. वर्चस्व शक्ती किंवा जबरदस्तीने वर्चस्व प्रस्थापित करत नसून वर्चस्ववादी शक्ती संमती आणि वर्चस्ववादी गटाचे मूल्ये आणि कल्पनांच्या अंतर्गतीकरणाद्वारे वर्चस्व दाखवले जाते. या ठिकाणी बळाचा वापर न करता लोकांवर नियंत्रण प्राप्त केलेले असते. वर्चस्व हे एका प्रभावी संस्कृती विचारसरणी किंवा जागतिक दृष्टिकोनाच्या प्रसाराद्वारे चालते. ज्यामुळे ते नैसर्गिक आणि अपरिहार्य वाटते. उदाहरणार्थ १. वर्चस्ववादी शक्ती असलेला एखादा देश आर्थिक किंवा लष्करी शक्तीद्वारे प्रभाव पाडू शकते. थेट नियंत्रणाशिवाय इतर राष्ट्राच्या वर्तनाला आकार देऊ शकते.

२. एक प्रभावी वर्ग अथवा गट आपल्या सत्तेला वैध ठरविणाऱ्या कल्पनांच्या प्रसादाद्वारे आपले स्थान टिकून ठेवण्याचा प्रयत्न करतो.

**ग्रामशीचे योगदान :**

इटालियन मार्क्सवादी विचारवंत ऑटोनियो ग्रामशी यांनी वर्चस्वाची (Hegemony) संकल्पना विकसित केली. ग्रामशिने असे प्रतिपादन केले की, शासक वर्ग बळजबरीने नव्हे तर, सांस्कृतिक आणि वैचारिक मार्गानी सत्ता राखण्यात यशस्वी होतात. वर्चस्ववादास 'सामान्य ज्ञान' बनवून कार्यरत ठेवले जाते. ज्यामुळे त्याला आवाहन देणे किंवा प्रश्न विचारणे कठीण होऊन जाते.

वर्चस्ववादी (Hegemony) विचारसरणीची उदाहरणे:

१. अमेरिकन स्वप्न: कठोर परिश्रम आणि दृढनिश्चयाने कोणतेही यश मिळू शकते ही कल्पना, जी विद्यमान असमानतेचे समर्थक करण्याचे काम करते.

२. भांडवलशाही : भांडवलशाही ही नैसर्गिक आणि अपरिहार्य आर्थिक व्यवस्था आहे असा विश्वास.

३. पितृसत्ता : पुरुष हे नैसर्गिकरित्या स्त्रियांपेक्षा श्रेष्ठ असतात असा विश्वास.

### ३.६.३. प्रतिनिधित्व (representation)

प्रतिनिधित्व ही मूलगामी संकल्पना सांस्कृतिक समीक्षेच्या केंद्रभागी आहे. प्रतिनिधित्व म्हणजे संस्कृती स्वतःचे आणि इतरांचे चित्रण कसे करते. भाषा, प्रतिमा आणि इतर सांस्कृतिक पद्धतीद्वारे अर्थ आणि समजूतीला आकार देते. व्यापक सामाजिक संदर्भमध्येओळख कशी तयार होते, समजली जाते आणि अर्थ लावला जातो हे समजून घेण्यासाठी ही एक महत्त्वाची संकल्पना आहे.

प्रतिनिधित्व हे मुळात संस्कृतीमध्ये अर्थ कसा निर्माण होतो आणि देवाण-घेवाण कशी होते याबद्दल असते. बहुतेकदा भाषेद्वारे तसेच प्रतिमा चिन्हे आणि इतर सांस्कृतिक स्वरूपातवादी देखील अर्थ प्राप्त केला जातो. माध्यमे, कला आणि दैनंदिन रूपांतर हे सर्व प्रतिनिधित्वाचे ठिकाण आहेत. जिथे अर्थ तयार केले जातात आणि वाटाघाटी केल्या जातात. प्रतिनिधित्व कधीही तटस्थ असत नाही. ते नेहमीच सत्ता, संबंध आणि विचारसरणी द्वारे आकार घेतात. काही मूल्यांच्या मजबुती करणाचा प्रयत्न करतात. तर इतरांना दुर्लक्षित करतात.

**स्टुअर्ट हॉलचे योगदान :**

सांस्कृतिक अभ्यासातील एक प्रमुख व्यक्तिमत्व असलेल्या स्टुअर्ट हॉलने जगाबद्दलच्या आपल्या समजूतीला आकार देण्यात प्रतिनिधित्वाच्या भूमिकेवर भाग दिला. हॉलने असा युक्तिवाद केला की वास्तव कधीही थेट अनुभवले जात नाही तर ते नेहमीच समाजाने उपलब्ध करून दिलेल्या प्रतिकात्मक श्रेणी मधून अनुभवले जाते. उदा. चित्रपट टेलिव्हिजन आणि जाहिरातीमध्ये वेगवेगळ्या गटाचे चित्रण कसे केले जाते. ते सार्वजनिक धारणांना आकार देऊ शकते. आणि रूढीवादी कल्पनांना बळकटी देऊ शकते. कल्पनेचा वापर, संस्कृतीची मूल्ये, इतिहास सुद्धा यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी किंवा प्रभावी कथांना आव्हान देण्यासाठी केला जाऊ शकतो. आपण जी भाषा जो शब्द वापरतो ते शक्तिशाली अर्थ घेऊन जाऊ शकतात तसेच भाषा आपल्या वर्तनाला आकार देऊ शकते.

### ३.७ सांस्कृतिक समीक्षेचे प्रकार:

### ३.७.१. मार्क्सवादी सांस्कृतिक समीक्षा:

मार्क्सवादी सांस्कृतिक समीक्षा ही कार्ल मार्क्स प्रणित सामाजिक विश्लेषण पद्धतीवर अवलंबून आहे. कार्ल मार्क्सने समाजातील वर्ग व्यवस्थेवर कठोर शब्दात टीका केलेली आहे. उत्पादन साधनांवर मालकी असणारा वर्ग हा कामगार वर्गाचे शोषण कशा पद्धतीने करतो. याची चिकित्सक मांडणी कार्ल मार्क्सने त्याच्या वैचारिक लिखाणातून केलेली आहे. भांडवलशाही कशा पद्धतीने भूमिहीन, गरीब, मजूर, कामगार यांचे शोषण करते हे त्यांनी उदाहरण देऊन स्पष्ट केलेले आहे. मार्क्सच्या समाजवादी विचारांचा पगडा विसाव्या शतकातील बऱ्याचशा विचारवंतांवर पडलेला आपणास आढळून येतो. समाजातील 'आहे रे' आणि 'नाही रे' यांच्यातील दरी कमी व्हावी, सर्वांना सन्मानाचे जीवन जगण्याच्या संधी प्राप्त व्हाव्या. अशा पद्धतीची मांडणी कार्ल मार्क्स

आणि मार्क्सच्या विचाराने प्रभावित विचारवंतांनी केली. मार्क्सवादी विचारवंत कलेला समाजातील आर्थिक आणि वर्ग विभागाच्या संदर्भात अभ्यासतात. यांच्या मते, कलेचा उद्देश केवळ सौंदर्यात्मक नसून कला ही श्रमिकाचे हक्क शोषणाच्या विरोधात एक शक्ती म्हणून कार्य करू शकते.

कार्ल मार्क्सचा ऐतिहासिक, भौतिकवादी सिद्धांत असे प्रतिपादन करतो की, समाजाची आर्थिक स्थिती समाजाच्या उत्पादन पद्धती या सर्व एक अधि रचना तयार करतात. ज्यात संस्कृती, राजकारण विचारधारा यांचा समावेश होतो. मार्क्सवादी सिद्धांतानुसार संस्कृती कधीही तटस्थ असत नाही. ती सत्ताधारी वर्गाच्या हितासाठी कार्य करते. आणि उत्पादनांच्या साधनांवर त्यांचे नियंत्रण कायम ठेवण्यासाठी कार्यरत राहते. सांस्कृतिक समीक्षक अशा संस्कृतीची चिकित्सा करतो. साहित्य कलाकृतीतून कशा पद्धतीने सत्ताधारी वर्गाचे हितसंबंध कळत नकळत जोपासले जातात हे उघड करणे हे सांस्कृतिक समीक्षेचे मुख्य कार्य आहे.

मार्क्सवादी सांस्कृतिक समीक्षेतील महत्त्वाची संकल्पना म्हणजे विचारसरणी (ideology) या संकल्पनेचा विस्तार मार्क्सवादी समीक्षक लुई अल्थूझर यांनी केला आहे. विचारसरणी (ideology) म्हणजे मूल्यांच्या आणि कल्पकतेच्या प्रणाली ज्या की सामाजिक व्यवस्थेला न्याय ठरवतात आणि कामगार वर्गाला त्याचे होत असलेल्या शोषणाची जाणीवच होऊ देत नाहीत, आहे ही परिस्थिती नैतिक, न्याय, अपरिहार्य आहे असे समजावण्याचा प्रयत्न करतात. मार्क्सवादी सांस्कृतिक समीक्षक अशा पद्धतीच्या विचारसरणी विश्लेषण करून साहित्य कलाकृतीचे मूल्यमापन, परिशिलन करतात. मार्क्सवादी सांस्कृतिक समीक्षा वर्गसंघर्ष, विचारसरणी आणि सत्तासंबंध टिकून ठेवण्यात किंवा त्यास आवाहन देण्यास संस्कृतीची भूमिका कशी कार्य करते यावर लक्ष केंद्रित करते. मार्क्सवादी सांस्कृतिक समीक्षा सत्ताधारी वर्गाव्दारे अनेकदा प्रोत्साहन दिलेल्या प्रबळ विचारसरणी, सांस्कृतिक मूल्ये आणि श्रद्धा कशा आकार देतात ज्यामुळे असमानता अस्पष्ट किंवा न्याय ठेवू शकतात. मार्क्सवादी समीक्षेत 'पाया' (आर्थिक पाया) आणि 'अधिरचना' (superstructure) (संस्कृती, कला, धर्म इ.) या संकल्पना वापरते. जेणेकरून पाया अधिरचनेला कसा आकार देतो हे स्पष्ट होईल. मार्क्सवादी सांस्कृतिक समीक्षक सांस्कृतिक वर्चस्वाच्या संकल्पनेचा (cultural Hegemony) विचार करते जिथे प्रबळ गट बळजबरीने नव्हे तर सांस्कृतिक प्रभाव आणि कल्पनांच्या मदतीने सत्ता राखतात. मार्क्सवादी समीक्षक साहित्य कलाकृती उदा. कादंबरी ही कशी वर्ग संरचना, शक्ती गतिशीलता किंवा विचारसरणीची भूमिका कशी प्रतिबंधित करते याचे परीक्षण करतात. मारु मेडिया, समाजमाध्यमे, वर्तमानपत्रे, जाहिराती, चित्रपट हे सर्व कशा पद्धतीने विशिष्ट विचारसरणीला (Ideology) बळकटी देण्याचे काम करतात याचे विश्लेषण मार्क्सवादी सांस्कृतिक समीक्षक करू शकतात.

### ३.७.२ स्त्रीवादी सांस्कृतिक समीक्षा

पुरुषप्रधान समाज व्यवस्थेत स्त्रीला दुय्यम स्थान देण्यात आलेले आहे. सामाजिक संकेत, मूल्यांच्या नावाखाली तिला माणूस म्हणून स्थान नाकारण्यात आले होते. तिच्यातील मानवत्व नाकारुन तिला वस्तूरूप दिले गेले. तिला गुलाम म्हणून वागवणे योग्य आहे याचे उदातीकरण संस्कृती,धर्म, पुराणकथा यातून लादले गेले. स्त्रीशोषणास अनुकूल आणि पुरुषी सत्तापिपासू वृत्ती बळकट करणारी समाज व्यवस्था निर्माण करण्यात

आली. अशा प्रकारच्या लिंग-भेदाच्या विरुद्ध कृतिशील चळवळ म्हणजे स्त्रीवाद होय. लिंगभेद निर्माण करण्यात आणि कायम ठेवण्यात संस्कृतीचा वापर पुरुषप्रधान समाजाकडून वारंवार होत असतो. सिमोन द बोव्हा यांचे 'द सेकंड सेक्स' हे पुस्तक यावर प्रकाश टाकते. साहित्य, सिनेमा, नाटक, दूरदर्शन, जाहिराती आणि इतर सांस्कृतिक घटनांमधून स्त्रीचे केले जाणारे चित्रण हे तिचे वस्तूकरण करावे आणि पुरुषी नजरेतून केलेले आपल्याला आढळून येते. स्त्रीवादी सांस्कृतिक समीक्षा अशा पद्धतीने स्त्रियांचे चित्रण करणाऱ्या कृषी नजरेची पोल खोल करते. स्त्री ला सन्मान न्याय आणि हक्क मिळावे यासाठी संस्कृतीचे विश्लेषण करते.

स्त्रीवाद आणि सांस्कृतिक समीक्षा एकमेकांना छेदतात. सांस्कृतिक निकष, प्रतिनिधित्व आणि लिंगभेद असमानता या सर्व बाबी संस्कृतीच्या माध्यमातून कशा कायम टिकवल्या जातात याचे परीक्षण करून या संरचनांना आव्हान देण्याचे आणि अधिक समानतेसाठी रूपांतरित करण्याचे उद्दिष्टे ठेवतात.

स्त्रीवाद ही एक चळवळ आहे जी सर्व लिंगांसाठी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समानतेचा पुरस्कार करते. आणि पितृसत्ताक संरचनांना आवाहन देते. महिलांच्या हक्काचा पुरस्कार करते. सांस्कृतिक प्रतिनिधित्व आणि निकष लिंग भूमिका आणि रुढींना कसे बळकटी देतात जे महिलांच्या संधी आणि स्वायत्तता मर्यादित करतात. पितृसत्ताकतेसह इतर सत्ता संरचना कशाप्रकारे सामाजिक परस्पर संवाद निर्माण करून संस्थांना आकार देतात, अशा संरचनांना कसे आवाहन दिले जाऊ शकते याचे परीक्षण करतात स्त्रीवादी सांस्कृतिक समीक्षक, माध्यमे आणि इतर सांस्कृतिक उत्पादने महिलांचे चित्रण कसे करतात आणि हे चित्रण लिंगभेदास कसे बळकटी देते याचे परीक्षण करतात. स्त्रीवादी सांस्कृतिक समीक्षेचा उद्देश लिंग असमानतेबद्दल जागता निर्माण करून समानतेला चालना देणे होय.

स्त्रीवादी साहित्य समीक्षक स्त्री पात्राचे प्रतिनिधित्व कसे केले आहे आणि पितृसत्ताक विचारसरणींना कसे प्रतिबिंबित करते आणि बळकटी येते याचे परीक्षण करतात.

स्त्रीवादी सांस्कृतिक समीक्षक जाणून घेतात की माध्यमे कशाप्रकारे अवास्तव सौंदर्य मानके तयार करतात आणि ती कशी टिकवून ठेवतात आणि हे मानक महिलांच्या आत्मसन्मानावर आणि कल्याणावर कसा नकारात्मक परिणाम असतात याचे विश्लेषण करतात.

थोडक्यात स्त्रीवादी सांस्कृतिक समीक्षा आपल्या संस्कृतीत लिंग असमानता कशी अंतर्गत आहे हे समजून देण्यासाठी आणि आवाहन देण्यासाठी आणि अधिक न्याय समतापूर्ण जगाची वकिली करण्यासाठी सांस्कृतिक विश्लेषणाच्या साधनांचा वापर करते.

**३.७.३ उत्तर वसाहतवादी सांस्कृतिक समीक्षा:**

उत्तर वसाहतवादी समीक्षेत वसाहतवादी काळानंतर झालेल्या सांस्कृतिक सामाजिक आणि राजकीय बदलांचा अभ्यास केला जातो. वसाहतवादाने केलेल्या हुकूमशाहीचे आणि सांस्कृतिक भेदभावाचे परिणाम आज देखील स्पष्टपणे जाणवतात. या सर्व घटकांची चिकित्सा उत्तर वसाहतवादी सांस्कृतिक समीक्षेत अपेक्षित आहे.

वसाहतवाद हा नेहमी 'सभ्यतेचा विस्तार' म्हणून सादर केला गेला. पाश्चात्त्य देशांनी इतर देशावर त्यांची संस्कृती, भाषा, साहित्य, विचारधारा, धर्म या सर्व बाबी श्रेष्ठ आहेत म्हणून त्या गैरपाश्चात्य देशाने जशाच्या तशा स्वीकारल्या असा अट्टाहास केला. याला छेद देण्याचे विरोध करण्याचे कार्य आपल्या लिखाणातून उत्तर वसाहतवादी समीक्षक विचारवंतानी केले. त्यातील आघाडीचे विचारवंत म्हणजे फ्रंझ फेनोन, एडवर्ड सईद, चिनुवा अचीबी, वो. ले. सोयंका, डॉ. होमी भाभा आणि गायत्री चक्रवर्ती होत.

मानसोपचार तज्ञ आणि तत्त्वज्ञ फ्रेंच फेनॉन यांनी 'द वेल्ड ऑफ द अर्थ' या पुस्तकात सांगितले की, वसाहतवादाचे स्वरूप मुलत: विनाशकारीच होते. वसाहतीतील लोकांचे शारीरिक आणि मानसिक हिंसेच्या माध्यमातून गुलाम मानसिकतेत रूपांतर करणे हाच उद्देश वसाहतकरांचा राहिला आहे. एडवर्ड सईद यांनी 'ओरिइंटेलिझम' या पुस्तकात सांस्कृतिक समीक्षेच्या माध्यमातून युरोपियन (पाश्चिमात्य) देश, पूर्वेकडील देशाकडे कसे दूषित नजरेने पाहत हे दाखवून दिले.

पाश्चात्य विचारवंतांनी पश्चिमी साम्राज्यवादी दृष्टिकोनातून पूर्व व पौर्वात्य संस्कृती यासंबंधी विचार करण्याची जी ज्ञान चौकट उभारली तिचा ऊहापोह 'ओरिइंटेलिझम' या पुस्तकात केला आहे. ख्रिश्चन आणि मुस्लिम यांच्यातील धर्मयुद्धातील पराभवामुळे ख्रिश्चनांनी अरब आणि मुस्लिम यांची धास्ती घेतली होती. या भीतीतून पाश्चिमात्य देशांनी प्राच्यवादाची ज्ञान चौकट निर्माण केली. कोणतीही शासन यंत्रणा आपली सत्ता टिकवण्यासाठी अशा नियमक ज्ञान चौकट उभी करत असते. तसेच सांस्कृतिक वर्चस्वाच्या आधारे समाजजीवनात बदल घडवून आणता येतो. हे गृहीतक सैद यांच्या मांडणीमध्ये आढळून येते. सैद यांच्या मते, पूर्व हे प्रत्यक्ष वास्तव असले तरीही युरोपीय विचारवंतांनी ते अवास्तव व अतिवास्तव बनवले.

उत्तर वसाहतवादी सांस्कृतिक समीक्षा अशा सर्व वसाहतवादी संस्कृती कल्पनांचा समाचार घेते. आणि देशी साहित्य, भाषा, आचार, विचार, जगण्याची धारणा, उपासना पद्धती, आहार पद्धती या कोणत्याही बाबतीत हीन नाहीत ही बाब अधोरेखित करते. वसाहतवादी सत्ता वसाहतीतून पलायन करून गेल्यानंतर त्या त्या देशातील संस्कृतीला उजाळा आणि ऊर्जा देऊन चर्चेच्या केंद्रस्थानी आणण्याचे कार्य उत्तर वसाहतवादी सांस्कृतिक समीक्षक केले आहे.

### ३.८. सांस्कृतिक समीक्षेचे महत्त्व:

सांस्कृतिक समीक्षा ही समृद्ध सांस्कृतिक वारसा समजून घेण्यासाठी आणि जतन करण्यासाठी तसेच टीकात्मक विचारांना चालना देण्यासाठी उपयोगात आणली जाऊ शकते. मराठी साहित्य आणि समाजातील शक्ती गतिमानता आणि दुर्लक्षित आवाजांचे विश्लेषण करून सामाजिक न्यायाला चालना देण्यासाठी महत्त्वाची आहे.

सांस्कृतिक समीक्षा ही सांस्कृतिक मूल्य, श्रद्धा आणि परंपरांना आकार देण्यात आणि प्रसारित करण्यात भाषेच्या भूमिकेचे विश्लेषण करण्यास मदत करते. भाषा आणि साहित्य संरचना, सामाजिक असमानता

विशिष्ट गटाचे दुर्लक्ष कसे प्रतिबिंबित करतात आणि मजबूत करतात.  याचे परीक्षण सांस्कृतिक समीक्षा करू शकते.

मराठी साहित्य आणि संस्कृतीचे विश्लेषण करून सांस्कृतिक समीक्षा सामाजिक न्यायाच्या मुद्द्यावर प्रकाश टाकू शकते जसे की जातीय भेदभाव, लिंग, असमानता आणि इतर प्रकारची दडपशाही आणि सामाजिक बदलांना हातभार लावू शकते. सांस्कृतिक समीक्षा मराठी संस्कृती आणि साहित्याबद्दल टीकात्मक विचारांना प्रोत्साहन देते. ज्यामुळे व्यक्ती गृहीतकावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यास प्रभावी कथानकांना आवाहन देण्यास आणि जगण्याबद्दल आणि परिसराबद्दल अतिसूक्ष्म व सम्यक समाज विकसित करण्यास प्रवृत्त होतील. सांस्कृतिक समीक्षा मराठी साहित्याचे सामाजिक राजकीय आणि ऐतिहासिक संदर्भ समजून घेण्यास मदत करते ज्यामुळे मराठी लेखकांच्या कृतींचे आणि भाषा संस्कृतीतील त्यांच्या योगदानाचे सखोल आकलन होते.

उदा.

१. **दलित साहित्य:** मराठीतील दलित साहित्याचे विश्लेषण करण्यास सांस्कृतिक समीक्षा महत्त्वाची भूमिका बजावते. जी उपेक्षित समाजाचे अनुभव आणि संघर्षाचा शोध घेते. सांस्कृतिक परिदृष्याला  आकार देण्यात त्याच्या आवाजाचे महत्त्व अधोरेखित करते.

२. **स्त्रीवादी साहित्य :** मराठीतील स्त्रीवादी साहित्याचे विश्लेषण करण्यास सांस्कृतिक समीक्षा महत्त्वाची आहे. लिंगभूमिका शक्ती गतिशीलता, मराठी समाजातील महिलांचे अनुभव तपासते.

३. **प्रादेशिक भिन्नता:** सांस्कृतिक समीक्षा मराठी संस्कृती आणि भाषेतील विविध प्रादेशिक भिन्नता शोधू शकते, ज्यामुळे मराठी सांस्कृतिक परिदृष्यता  समृद्धता आणि जटिलता लक्षात येण्यास मदत होते.

### ३.९ सांस्कृतिक समीक्षकाची भूमिका:

सांस्कृतिक समीक्षक संस्कृतीची चिकित्सा करतो. संस्कृतीत अंतभूत असलेल्या घटकांचे विश्लेषण करतो संस्कृती अस्तित्वात येत असताना किंवा आल्यानंतर ती कशी सत्ताधारी गटांच्या लोकांच्या फायद्याची भाषा करते याचे विश्लेषण करते.

संस्कृतीवर परिणाम करणारे घटक आणि त्यांची कार्यप्रणाली याचे विश्लेषण करते. समाजातील अनिष्ट रुढी,परंपरा कशा अमानवीय आहेत याचे विश्लेषण करते. संस्कृतीच्या गोंडस नावाखाली विशिष्ट वर्गाला कसे विकासापासून वंचित ठेवले गेले याची चिकित्सा करते. समाजात दर्जा, स्वातंत्र्य, व्यक्तीची प्रतिष्ठा, मानवी मूल्य, सहकार्य, मानवता या बाबी समाजात रुजाव्या, समाज निकोप व्हावा यासाठी आवश्यक असणारे धाडस आणि कृती सांस्कृतिक समीक्षा करू शकतो.

### ३.१०. समारोप:

वरील विवेचनावरून आपणास लक्षात आले असेल की सांस्कृतिक समीक्षा आंतरविद्याशाखीय असून यात इतिहास, समाज, तत्त्वज्ञान, विज्ञान, राजकारण इत्यादी घटकांचा समावेश होतो. जे आपणास दिसते की जे आपणासमोर सादर केले जाते. त्यात बरेचसे अदृष्य प्रवाह असतात. जे की समाजाची घडी बिघडू नये यासाठी कार्यरत असतात. पण त्याचवेळी आपण समाजात असमानता, लिंग-भेद, उच्च-नीच भाव, श्रेष्ठ-कनिष्ठ, वर्ग कलह, शोषण याबाबी ठायी ठायी आढळतात. याची चिकित्सा करून समाज जास्तीत जास्त समंजस, निकोप, शौहार्दपूर्ण होण्यासाठी सर्व विचारवंत आणि कृतिशील योगदान देणारे मानवता प्रेमी समूहात सांस्कृतिक समीक्षा आपली भूमिका चोख बजावू शकतात.

### ३.११. स्वाध्याय

३.११.१. स्वयंअध्ययनासाठी प्रश्न (योग्य पर्याय निवडा)

१. 'कल्चरल अँड अनार्की' हे पुस्तक कोणाचे आहे?

१. मॅथ्यू अरनॉल्ड २. फ्राझ फॅनन ३. एडवर्ड सईद ४. होमी भाभा

२. 'पाया' आणि 'अधिरचना' अशी मांडणी आपल्या सामाजिक विश्लेषणात कोणी केली

१. अल्युझर २. फूको ३. मार्क्स ४. रेमंड विल्यम्स

३. 'ओरीएइंटालिजम' हे पुस्तक कोणी लिहिले?

१ स्टुअर्ट हॉल २ होमी भाभा ३. एडवर्ड सईद ४. कार्ल मार्क्स

४. ग्रामची कोणत्या देशातील विचारवंत आहे.

१. इंग्लंड २. इटली ३. जपान ४. जर्मनी

५. विचारप्रणाली ही संकल्पना कोणी विकसित केली

१. ग्रामची. २. मार्क्स. ३. अल्थूझर ४. फ्राझ फॅनन

६. 'वर्चस्व' (Hegemony) ही संकल्पना कोणी विकसित केली?

१.ग्रामची. २. मार्क्स. ३. अल्थूझर ४. स्टुअर्ट हॉल

७. 'द सेकंड सेक्स' हे पुस्तक कोणी लिहिले?

१. सार्त २. देरिदा ३. सिमोन द बोव्हा ४. ज्युलिया क्रिस्टावा

८. सांस्कृतिक समीक्षा पद्धती कशाचा अंगीकार करते?

१. वसाहतवाद २. मानवतावाद ३. रंजनवाद ४. रंजनवाद

९. रिचर्ड होगार्ट यांनी 'सेंटर फॉर कंटेम्परी कल्चरल स्टडीज' या संस्थेची स्थापना कोणत्या वर्षी केली?

१. १९६० २. १९६४ ३. १९६६ ४. १९६८

१०. 'द रेच्ड ऑफ अर्थ ' हे पुस्तक कोणी लिहिले?

१. होगार्ट. २. सैद. ३. स्टुअर्ट हॉल ४. फ्रँटझ फेनॉन

उत्तरे : १)-१, २)-३, ३)-३, ४)-३, ५)-३ ६)-१, ७)-३,

८)-२, ९)-२, १०)-४

**३.११.२. १. दिर्घोत्तरी प्रश्न**

१. सांस्कृतिक समीक्षेची वैशिष्ट्ये सांगून ती कशी अंतविद्याशाखीय आहे याचे स्पष्टीकरण द्या.

२. सांस्कृतिक समीक्षेचे प्रकार सांगून मार्क्सवादी सांस्कृतिक समीक्षा बद्दल विस्तृत निबंध लिहा.

३. सांस्कृतिक समीक्षेचे कार्य विशद करा.

४. सांस्कृतिक समीक्षा मानवतावादी आहे स्पष्टीकरण द्या.

**३.११.२. २ लघुत्तरी प्रश्न**

१. उत्तरवसाहतवाद म्हणजे काय?

२. स्त्रीवादाची तात्विक चौकट विशद करा.

३. सांस्कृतिक समीक्षेतील आव्हाने सांगा.

४. सांस्कृतिक समीक्षकाच्या कार्याचे महत्त्व सांगा.

**३.११.३. अधिक वाचन**


१. The second sex - Simone de Beauvoir

२. The Wretched of the Earth - Frantz Fanon

३. Orientalism - Edward Said

४. For keeps-Thirty Years at the movies- Pauline Kael

५. Bad feminist- Roxane Gay

६. White Girls- Hilton Als

**३.११.४. पूरक वाचन**

१. महाराष्ट्रातील लोककला : चारुशीला किरण भामरे
२. संचित संस्कृतीचे : स्मिता भागवत
३. साहित्यशास्त्र स्वरूप आणि समस्या- वसंत पाटकणर
४. मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती - वसंत आबाजी डहाके
५. ऐस पैस गप्पा - दुर्गाबाईंशी- प्रतिभा रानडे
६. संस्कृतीच्या पाऊलखुणा - द. ता. भोसले
७. वाङ्मयीन संस्कृती- सुधीर रसाळ
८. मऱ्हाठी लोकांची संस्कृती- इरावती कर्वे
९. अभिरूचीः ग्रामीण व नागर- गो.म. कुलकर्णी
१०. Cultural Criticism- Arthur Burger
११. What is cultural Critism
१२. Against Interpretion – Susan Soutag

**३.११.५. उपक्रम**

१. मराठी साहित्यिक कलाकृती निवडून त्याची सांस्कृतिक समीक्षा पद्धती वापरून चिकित्सा करा.

२. मराठी स्त्री लेखिकांच्या कादंबरीतील स्त्री पात्रे व त्यांच्या जीवनधारणा यांचा अभ्यास स्त्रीवादी सांस्कृतिक समीक्षेच्या अंगानी करून आपली मते नोंदवा.

❑❑❑

## घटक ४
# देशीवादी समीक्षा

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्तविक

४.२. देशीवाद संकल्पना व स्वरूप

४.३. राल्फ लिंटन आणि नुगी उगी

४.४ देशीवादी साहित्यविचाराची वैशिष्ट्ये (भूमी, परंपरा, भाषा आणि नवनैतिकता)

४.५ मराठीतील देशीवादी साहित्यविचार

### ४.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणांस,

१. देशीवाद ही संकल्पना व तिचे स्वरूप समजून घेता येईल.

२. राल्फ लिंटन आणि नुगी उगी यांचा देशीवादी विचार समजून घेता येईल.

३. भूमी, परंपरा, भाषा आणि नवनैतिकता या देशीवादी वैशिष्ट्यांचा अभ्यास करता येईल.

४. मराठीतील देशीवादी साहित्यविचार समजून घेता येईल.

### ४.१ प्रास्ताविक

भारतीय वाङ्मयीन परिप्रेक्ष्यातील विविध भाषांमधील साहित्यशास्त्र व समीक्षा हे पाश्चात्य वाङ्मयाच्या अनुकरणातून अस्तित्वात आले, हे सर्वपरिचित आहे. किंबहुना सर्वमान्य आहे.

एकंदरीत मराठी साहित्याच्या या पारंपरिक वाटचालीत देशीकरणाचे संक्रमण अव्याहतपणे चालू आहे. साहित्यातील देशीवादाचा अभ्यास करण्यापूर्वी देशी, देशीयता या संज्ञा समजून घेणे आवश्यक आहे. या दोन्ही संज्ञांच्या अर्थच्छटा खोलवर समजून घेतल्या तरच साहित्यातील देशीयतेचे आकलन होईल. या अनुषंगाने मराठी भाषेतील प्रातिनिधिक शब्दकोशामध्ये देशी शब्दाचा अर्थ 'स्वदेशात झालेले' आणि 'देशभाषा' असा दिलेला आहे. म्हणजेच आपल्या जन्मभूमीशी संबंधित व स्वभाषेशी निगडित हा अर्थ अभिप्रेत आहे.

## ४.२ देशीवाद : संकल्पना व स्वरूप

'देशी' असणे म्हणजे त्या त्या भूमीशी जोडलेले असणे. हे नाते तिथली भाषा, संस्कृती आणि मूल्ये यांच्याशी असते. हे नाते अबाधित ठेवणारी स्वाभाविक अवस्था म्हणजे 'देशीपणा'. देशी नसलेली परकी बाहेरून येणारी मूल्ये, भाषा व संस्कृती यांचे जेव्हा देशी भाषा, संस्कृती व मूल्यांवर आक्रमण होते, तेव्हा स्वतःच्या अस्तित्वासाठी मानवी समूहांना देशीवादी व्हावे लागते.

देशीवाद ही संकल्पना इंग्रजीतील नेटिव्हिजम या संकल्पनेचा मराठी पर्याय आहे. अमेरिकन मानववंशशास्त्र राल्फ लिंटन यांनी इ १९४३ मध्ये अमेरिकन ॲन्थ्रोपॉलॉजिस्टमध्ये लिहिलेल्या 'निटिव्हस्टिक मुव्हमेंटस' या देशीवादी चळवळीवरील निबंधामुळे एक अभ्यासविषय म्हणून देशीवादाकडे पाहिले जाऊ लागले. देशीवादी चळवळ म्हणजे ''एखाद्या समाजातील सदस्यांनी त्यांच्या संस्कृतीच्या निवडक पैलूंचे पुनरुज्जीवन करण्याचा वा त्यांना चिरस्थायित्त्व देण्याचा जाणीवपूर्वक व संघटनपणे केलेला प्रयत्न'' अशी व्याख्या लिंटन यांनी केली आहे. १९८० नंतर भालचंद्र नेमाडे यांनी देशीयता ही देशीपणा आणि देशीवाद या दोन्ही संकल्पनांना व्यापणारी नवी संज्ञा निर्माण केली. साधारणपणे देशीयतेची बीजे आपल्याला दहाव्या-बाराव्या शतकादरम्यान भारतीय भाषेमध्ये दिसतात. भारतात प्राचीन काळात मार्गी (अभिजन) व देशी (बहुजन) परंपरा तर आधुनिक काळात पाश्चात्त्य परंपरेला नकार असून देशी व बहुजन परंपरेचा स्वीकार असतो. ही परंपरा बुद्ध, चार्वाक, महावीर, बसवेश्वर, चक्रधर ते महात्मा फुले, डॉ. आंबेडकर व महात्मा गांधी अशी मानली जाते. अहिंसा, मानवता, समता, सर्वधर्म समभाव ही मूल्ये देशीवाद या संकल्पनेत महात्मा गांधी यांनी मांडली. वाङ्मयाच्या मूल्यमापनासाठी या मूल्यांचा आग्रह धरला. साहित्याच्या भाषेबाबतही देशीवादाची ठाम भूमिका होती. त्यानंतर साने गुरुजींच्या 'श्यामची आई' या कादंबरीमध्ये खऱ्या अर्थाने देशीयतेचा पहिला आविष्कार दिसतो.

देशीयता ही समूह मानसिकतेशी निगडित आहे. इथे देशीपणा, देशीकरण आणि देशीवाद हे तीन घटक गृहीत धरले आहेत. देशीयतेचा विचार करायचा झाला तर एखाद्या विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या समूहाच्या जगण्याच्या काही धारणा परंपरेने निश्चित केलेल्या असतात. तिथल्या भौगोलिक व नैसर्गिक उपलब्धतेनुसार तिथली विशिष्ट प्रकारची पिके, झाडे, पशूपक्षी, तिथल्या बोली याचा अर्थ असा की, त्या त्या भूमीशी जोडलेले असणे म्हणजे देशीयता होय. ग्रामीण भागातील जातिव्यवस्था, जातपंचायत, परंपरा हे सर्व देशीयतेत आपल्याला दिसून येते. त्यातील देशीयतेशी संबंधित असलेले विविध घटक साहित्यातून व्यक्त होत असतात. परंपरेने चालत आलेले रितीरिवाज, श्रद्धा-समजुती हे सारेच देशीपणाचे घटक ठरतात. नीती, ज्ञान, यांच्या विषयीच्या पारंपरिक कल्पना आपल्याला देशीवादामध्ये दिसतात. नवे बदल तसेच बाहेरच्या संस्कृतीकडून उसनवारीने आपल्या संस्कृतीत मुरवून घेण्याच्या क्रियेला देशीकरण म्हणतात. देशीकरणातूनही बाह्य संस्कृतीतील अनेक घटक स्वीकारार्ह ठरतात. १९९० नंतर भारतीय समाजजीवनात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने सर्व स्तरात प्रवेश केला. सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात स्थित्यंतरे घडून आली. पाश्चात्त्य संस्कृतीच्या

मूल्यव्यवस्थेत देशी परंपरेचा पुनर्शोध आणि त्याची मूल्यचिकित्सा या काळात होऊ लागली. त्यामुळे देशवादाचा अभ्यास होणे आवश्यक ठरते.

एका विशिष्ट भू-प्रदेशातील आधिवास तेथील सभोवताली अस्तित्वात असणारे धर्म, जाती, वंश, परंपरा इ. विशेषांसोबत काळाच्या बदलाचे स्वरूप या सर्वा समवेत एका सुसूत्रतेचे व एकसंघपणाचे भान असणे यास देशी म्हणावे असा अर्थ अभिप्रेत आहे.

देशी असण्यास पूरक ठरणाऱ्या घटकांचे परस्परांतील संबंध आणि त्यांच्यातील एकजूट या जीवनमूल्याची जपवणूक करणे म्हणजे देशी असणे, असा अर्थ प्राप्त होतो. जगातील मानववंशाने स्वतःची संस्कृती निर्माण केलेली असते. रोजच्या जीवनात या संस्कृतीबद्दल आग्रही असणे म्हणजे देशी असणे. आपल्या स्वदेशातील संस्कृतीवर परसंस्कृतीची आक्रमणे होतात, त्यावेळी या होणाऱ्या आक्रमणांना विरोध करणे या प्रक्रियेस 'देशीवाद' असे संबोधले जाते. सर्वसाधारणापणे देशीवादाच्या व्याख्येत असा मध्यवर्ती अर्थ अभिप्रेत आहे.

मराठी साहित्य विश्वातील प्रसिद्ध लेखक व समीक्षक भालचंद्र नेमाडे यांनी 'देशी' या शब्दाचा अर्थ ''त्या त्या भूमीशी जोडलेले असणे असा प्रायः होतो.'' असा दिलेला आहे. (भालचंद्र नेमाडे, २००१, पृ.१०४) उपरोक्त मतानुसार संबंधित व्यक्ती त्यांच्या जन्मभूमीशी सतत जोडून राहण्याच्या अवस्थेला देशी असणे असा अर्थ अभिप्रेत होतो.

रूढी, परंपरा, चालीरिती, भूप्रदेश, समूहजण, संस्कृती, भाषा इ. घटकांसमवेत समाज स्थिरावलेला असतो. किंबहुना कालानुरूप स्वाभाविकपणे नैसर्गिक बदल होत राहतात. यामध्ये मानवी समूह हे बदल सहजपणे स्वीकारतात; परंतु हेच बदल मानवकृत असतील तर मग ते स्वकीयांकडून अन्य परकीयापासून होणारे असतील तर मात्र हा समूहवर्ग बदलाची ही प्रक्रिया स्वीकारत नाही. परिणामी या विरोधात बंड पुकारतो. याच प्रक्रियेस 'देशीवाद' म्हणावे; असा अर्थ उपरोक्त सांकल्पनिक मांडणीतून प्रत्ययास येतो. भालचंद्र नेमाडे यांच्या मते, 'देशीयतेचे तत्त्व असे सांगतो की, आपण निर्माण केलेली प्रमाणके सोडून इतरांच्या प्रमाणकांचा स्वीकार करता कामा नये. कितीही मोठ्या प्रमाणावर बाहेरून उसनवारी केली तरी त्यामुळे देशीपणाला बळकटीच येईल. परंतु ज्या प्रमाणकांवर हा उसनवारीचा सांस्कृतिक व्यवहार चालेल, ती प्रमाणके आपली स्वतःची असली पाहिजे. जर विशिष्ट प्रकारची आंतरराष्ट्रीयता आपल्याला परवडत नसेल, तर ती झुगारली पाहिजे. देशपणाचे महत्त्व स्वीकारले की, पहिली जबाबदारी म्हणजे जगभरच्या वावड्या न उडवता प्रथम आपल्या घराजवळची वस्ती, आपला गाव, प्रदेश, भाषा प्रांत ह्यावर आधी लक्ष केंद्रीत करावे. स्वातंत्र्योत्तरकाळात आपल्या देशात असे भोंदू विचार, राजकीय पक्ष आणि पंथ महत्त्वाचे ठरले की जे राष्ट्रीय एकात्मता, भारता जोडो, आंतरभारती, अखिल जग आणि विश्वमानव ह्यांच्या कल्याणाच्या गोष्टीच फक्त करतात. खोट्या सुखद एकतेचा आणि भव्य विशालतेचा प्रयोग राजकीय युक्ती म्हणून प्रमुख सत्ताधारी वर्ग जनतेवर नेहमीच करत असतो.' ('टीकास्वयंवर', १९८३, पृ. ११८-११९)

एकंदरीत देशीपणाच्या काळानुरूप निर्माण झालेल्या एका अवस्थेस 'देशीवाद' म्हणावे असा अर्थ नेमाडे नमूद करतात. कारण देशीपणाच्या स्थिरतेला ज्या वेळी बाधा निर्माण होते, त्या वेळी विरोधात लढा पुकारण्यासाठी देशीवाद जन्मास येतो. किंबहुना देशी असणे, देशीवाद त्या विशेषांना आपल्यात सामावून घेणाच्या महत्त्वपूर्ण घटकास नेमाडे 'देशीयता' असे संबोधतात. परिणामी देशी, देशीवाद, देशीयता या अवस्थांची शृंखला ही मानवाच्या खोलवर रुजलेल्या संस्काराची पाळेमुळे घट्ट रोवून ठेवते. आणि हे सांस्कृतिक पर्यावरण आपल्यात सामावून घेणारे, तथाकथित वाङ्मयीन क्षेत्रातून आविष्कृत करणारी देशीयता हा महत्त्वपूर्ण घटक आहे.

या दृष्टिकोनातून आपण साहित्याच्या पार्श्वभूमीवर देशी, देशीवाद, देशीयता या संकल्पनांचा संक्षिप्त रूपात आढावा घेतला आहे. परंतु या संकल्पना प्रत्यक्षात वाङ्मयात सामावलेल्या असतात त्यावेळी त्यांचे स्वरूप काय असते, याचा विचारही महत्त्वांचा ठरतो.

**४.३. राल्फ लिंटन आणि नुगी उगी**

प्रसिद्ध अमेरिक सांस्कृतिक मानवशास्त्रज्ञ. राल्फ लिंटन 'द स्टडी ऑफ मॅन' (१९३६), 'द कल्चर बॅकग्राउंड ऑफ पर्सनॅलिटी' (१९४५), 'द ट्रि ऑफ कल्चर' (१९५५) हे त्यांचे महत्त्वाचे ग्रंथ.

'कार्डिनर द इंडिव्हिज्युअल अँड हिज सोसायटी' (१९३९) आणि 'द सायकॉलॉजिकल अँड हिज ऑफ सोसायटी' (१९४५) हे समाजाचे विश्लेषण करणारे ग्रंथ. या ग्रंथातून 'मूलभूत व्यक्तिमत्त्वाची संरचना' किंवा 'बहुलक व्यक्तिमत्त्वां'चा प्रकार या संकल्पना उदयास आल्या. समाजशास्त्रात आज सर्वसामान्यपणे स्वीकारलेल्या सामाजिक प्रतिष्ठा वा स्थान आणि भूमिका ह्या संकल्पना प्रथम लिंटन यांनी मांडल्या.

स्थान आणि भूमिका यांच्या संरचनात्मक विश्लेषणामध्ये संस्कृतीला महत्त्व प्राप्त झाले होते, ते कमी करण्यास हातभार लावला. एखाद्या समाजात प्रचलित असलेले रीतिरीवाज आणि इतर सांस्कृतिक बंधने यामुळे प्रत्येक सामाजिक स्थानावरील व्यक्तीची भूमिका प्रमाणित बनते. त्यामुळे समाजात स्थानानुसार व्यक्तीमत्त्वाचे नमुने निर्माण होतात, असे त्यांनी प्रतिपादन केले. जगात प्रादेशिक संस्कृती कशी उदयाला येते आणि तिचा कसा विकास होत जातो, तसेच संस्कृतीच्या प्रादेशित स्वरूपाला भौगोलिक परिस्थिती कशी कारणीभूत असते, याचे विवेचन त्यांनी 'द ट्रि ऑफ कल्चर' या ग्रंथात केले आहे. भौगोलिक मर्यादा अगर सोयी नसत्या तर काही शोध लागलेच नसते असे त्यांचे म्हणणे होते. प्रेमावर आधारित विवाहाची पद्धत केवळ अमेरिकीय समाजात दिसून येते, असे त्यांचे मत होते. लिंटन यांना भौतिकीतही गती होती आणि इतिहास व साहित्य यांचेही ते व्यासंगी होते.

अमेरिकन मानवशास्त्रज्ञ राल्फ लिंटन यांच्या मते देशीवाद हा संस्कृतीसंपर्काचा परिणामातून उद्भवतो. जेव्हा एखाद्या संस्कृतीचे अस्तित्व दुसऱ्या प्रबळ संस्कृतीच्या आक्रमक दडपणामुळे धोक्यात येते, तेव्हा दडलेल्या समाजात देशीयतेची जाणीव निरनिराळ्या स्वरूपांमध्ये उद्भवते, हे लिंटनने सिद्ध केलेले आहे. असेच भालचंद्र नेमाडे यांचेही मत आहे. राल्फ लिंटनने देशीवादाच्या उद्भवाची जी कारणे सांगितली आहेत, त्याप्रमाणे १९ व्या शतकात निर्माण झालेल्या स्वातंत्र्याच्या चळवळी, शेतकऱ्यांचे उठाव इ. बरोबरच

जमशेदजी टाटा, महात्मा फुले इ. पुढारी नेमाडे यांना देशीवादीच वाटतात. नेमाडे यांना महात्मा गांधी हे या परंपरेतील उदाहरण वाटते. आता इथे एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो, की पाश्चात्य विचार आणि विचारवंतांकडून प्रभावित झालेले महात्मा फुले देशीवादी कसे ठरतात? या आक्षेपाचा खुलासाही त्यांनी याच निबंधात केलेला आहे. नेमाडे म्हणतात, देशीवाद एकाच समूहापुरता विभक्त करून पाहता येत नाही, कारण एक सांस्कृतिक घटना होण्यासाठी देशीवादाला आपल्या प्रदेशाबाहेरील अन्य संस्कृतींच्या अस्तित्वाची जाणीव असावीच लागते. या भूमिकेतून परसंस्कृतीचा संपर्क टाळता येत नाही किंवा टाळणे शक्यही नसते हे मान्य केले आहे. म्हणजे भालचंद्र नेमाडे यांच्या देशीवादी मांडणीत संस्कृती संपर्काला नकार दिलेला दिसत नाही, तर आक्रमकपणे संस्कृती लादण्याला किंवा आंधळेपणाने स्वीकारण्याला विरोध दिसतो.

### ४.४ देशीवादाची वैशिष्ट्ये

भालचंद्र नेमाडे यांनी १९८३ च्या सुमारास 'साहित्यातील देशीयता' असा एक निबंध लिहिला, तेव्हापासून देशीवादाची चर्चा सुरू झाली. दरम्यान १९६० नंतरचे दलित, ग्रामीण, प्रादेशिक व भटके-विमुक्त आदिवासींच्या साहित्याचे नवे प्रवाह निर्माण झाले. या प्रवाहांच्या साहित्य संमेलनांनी केवळ साहित्यक्षेत्रच नव्हे, तर महाराष्ट्राचे संपूर्ण वैचारिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्र बहरास आले. या नव्या चळवळींनी महाराष्ट्रातील तरुणांना लिहिते-बोलते केले.

देशीवादाची ठळक भू-प्रदेश, संस्कृती,परिसर, समूहभान विचार, भाषा विचार आणि परपंरा विशिष्टता या पाच मुख्य वैशिष्ट्यांचे विवेचन खालील प्रमाणे सांगाता येईल.

#### ४.४.१ भू-प्रदेश

कोणत्याही संस्कृतीचा परिपोष हा एका विशिष्ट भूमीवर होत असतो. देशीपणात भौगोलिक तत्त्वाला खूप महत्त्व आहे. आजपर्यंत विश्वात घडत असलेली अनेक स्थित्यंतरे ही भूमीशी जोडलेली असतात. एकूणच देशीपणाच्या आविष्कारांच्या प्रक्रियेत प्रारंभी भूमितत्त्वास अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्या त्या भूमीशी जोडून राहणे हा महत्त्वपूर्ण गुणधर्म देशी असण्याचे द्योतक आहे. किंबहुना साहित्याच्या देशीयतेची जडणघडण होण्यात स्थळ किंवा भू-प्रादेशिक निष्ठा महत्त्वपूर्ण मानलेली आहे. प्रत्येक भूमीची स्वतःची एक चिन्ह व्यवस्था असते. ती साहित्य व्यवहारातून प्रकटते. हेच देशीयतेच्या आविष्करणाचे बलस्थान असते. या व अनेक महत्त्वपूर्ण कारणांमुळे देशीयतेतील 'भू-प्रदेश' हा महत्त्वपूर्ण घटक ठरतो.

#### ४.४.२ संस्कृती

मानवी समूहाने निर्माण केलेली एक सामाजिक व्यवस्था असते. त्यातील 'संस्कृती' या घटकावरून समाजाची विशिष्ट ओळख निर्माण होते. रुढी, परंपरा, चालीरिती, सण, उत्सव, भाषा इ. महत्त्वपूर्ण घटकांचे समावेशन म्हणजे संस्कृती हा संस्कृतीचा प्रचलीत अर्थ आहे. देशीयतेची मूळ बीजे संस्कृतीतच सापडतात. कारण व्यक्ती घडण्याची क्रिया ही संस्कृतीच्या परिघात घडत असते. किंबहुना मानवी पातळीवर संस्कृतीविशिष्टतेला अतिशय महत्त्वपूर्ण स्थान आहे. स्थलकाळाच्या अनेक घटनांची ती साक्षीदार असते.

### ४.४.३ परिसर

प्रत्येक परिसराचे विशिष्ट संस्कार तेथील संस्कृतीवर होत असताना संस्कृतीचे संवर्धनाचे कार्य परिसर करत असतो. भू-प्रदेशाची ओळख तेथील परिसराच्या गुणवैशिष्ट्यांनी होत असते. देशीयतेतील परिसर हा विशेषतः खेड्यातील असतो आणि तो मातीशी नाते सांगणाऱ्या व्यवसायाशी निगडित असतो. त्याचप्रमाणे मानवी-मानवेतर सृष्टी, चेतन-अचेतन वस्तू, नद्या, डोंगर, झाडे, सामाजिक विशिष्ट धारणा इ. वस्तुपाठांचे समावेशन हे परिसर या घटकात येत असते.

### ४.४.४ समूहभावना/विचार :

साहित्यातील समूहविचार खूप महत्त्वाचा आहे. देशीयतेच्या दृष्टिकोनातून एखादी साहित्यकृती ही सामाजिक दस्तऐवज असते. समाजाच्या सांस्कृतिक संचिताचे एक महत्त्वपूर्ण द्योतक असते. मुळात कादंबरीचे अस्तित्वच समाजसापेक्ष असते. एकंदरीत समूहांच्या जाणिवा व्यक्त करणे, हा देशी साहित्यांचा दृष्टिकोन असतो. समूहाच्या जीवनाचा तपशील बारकाव्याने मांडणे हेसुद्धा साहित्यातील देशीयतेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

देशीयता संकल्पनेचे निर्माते भालचंद्र नेमाडेंच्या कादंबऱ्यांमधील समूहजाणीव अभ्यासली असता या घटकाचे महत्त्व समजू शकते. त्यांच्या 'बिढार', 'जरीला', 'झूल' या तिन्हीं कादंबऱ्यामध्ये व्यक्ती आणि समाज यांच्यातील सूक्ष्म संबंधाचे बारकावे अधोरेखित केलेले आहेत. त्यांच्या मते, समाज हा व्यक्ती असतो. एकमेकांच्या मनातील समूह भावनाच आपल्या संस्कृतीचा पाया भक्कम करू शकते.

### ४.४.५ भाषाविचार

भाषा हे मानवी भावभावनांच्या अभिव्यक्तीचे प्रमुख माध्यम आहे. साहित्यातून साकारणारी भाषा ही संहितानिष्ठ असते. परंतु त्या भाषेला स्थलकाल परिस्थितीचे व्यापक संदर्भ प्राप्त होत असतात. विस्तृत कालावकाश साहित्य प्रकारांमध्ये तर भाषेच्या या रूपास अतिशय महत्त्वपूर्ण स्थान असते. भाषेच्या दृष्टिकोनातून साहित्यातील देशीयता अभ्यासली असता, बोलीभाषेच्या उपयोजनाचे प्राबल्य मोठ्या प्रमाणात दिसून येते. ज्या संस्कृतीचा आविष्कार आपल्याला साहित्यातून आविष्कृत करायचा असतो, तो बोलीभाषेच्या वापरामुळे जिवंतपणे साकारता येतो. किंबहुना तत्कालीन समाजातील संस्कृती व समाज स्थितिगती समजून घेण्यासाठी त्या काळात प्रचलित असलेली बोलीभाषाच त्या कलाकृतीस योग्य न्याय देऊ शकते.

विशेषतः भाषा, शैली हे घटक साहित्यातील देशीयता मांडणीतील अनिवार्य घटक आहेत. कारण बोलीभाषेत भावात्मकता, उत्कटता, सत्यता, साधेपणा तीव्रतेने येतो आणि तेच जीवनाचे पारदर्शी चित्रण करण्यास उपयुक्त ठरत असते.

### ४.४.६ नवनैतिकता

देशीवादाचा अभ्यास करीत असताना नवनैतिकता अभ्यासणे महत्त्वाचे वाटते. सुरवातीला आपण नवनैतिकता म्हणजे काय ते समजून घेणार आहोत. 'नीती' या तत्सम शब्दापासून 'नैतिकता' हा शब्द मराठीत रूढ झाला आहे.

लॅटिन भाषेत Morus या शब्दापासून Morality हा शब्द तयार झाला असून त्या शब्दाचा अर्थ नीती, नीतीमत्ता, सदाचार, नेकी, सद्‌गुण असा इंग्रजी-मराठी शब्दकोशात दिला आहे. यावरून नीती शब्दाचा अर्थ संबंध मानवी जीवन, समाज, सांस्कृतिक यातील सत्य, योग्य, प्रामाणिक चांगल्या घडामोडी, चांगले रीतीरिवाज, परंपरा, यांच्याशी संबंधित असल्याचे दिसून येते. मराठी साहित्यात महात्मा फुले, राजारामशास्त्री भागवत, साने गुरूजी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नैतिकतेचा विचार मांडला आहे. महात्मा फुले यांनी सत्य हे मध्यवर्ती मूल्य त्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथात उलगडून दाखविले आहे. तसेच बाबासाहेब आंबेडकरांनी नैतिकता स्पष्ट करताना जगभरातील घटनांचा अभ्यास करून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मूल्ये मानली, वेद व हिंदू संस्कृतीची चिकित्सा यानवनैतिकतेच्या कसोटीवर केलेली दिसून येते.

भालचंद्र नेमाडे, अशोक बाबर आणि वासुदेव सावंत यांनी वेगवेगळ्या पद्धतीने नवनैतिकतेच्या व्याख्या मांडल्या आहेत. नेमाडे यांच्या मते 'सामाजिक प्रक्रियांची नोंद करताना कादंबरीकाराला स्वतःवर कोणती तरी नैतिकता लादून घ्यावी लागते. अशा वैयक्तिक मूल्यनिष्ठेला नवनैतिकता म्हणतात.' साहित्य व नीती यासंबंधाबद्दल तात्त्विक भूमिका अभिप्रेत आहे म्हणून नवनैतिकता ही केवळ वर्णनात्मक संज्ञा नाही, तर ती समीक्षा व्यवहारातील एक तात्त्विक संकल्पना आहे. अशोक बाबर यांनी 'बहुजन समाजाच्या जाणिवा व्यक्त करणे हे नैतिकतेत मध्यवर्ती मानले जाते, ही नवनैतिकता होय.' जे साहित्य बहुजन समाजाच्या जाणिवा व्यक्त करते, त्यात असणारी नैतिकता ही 'नवनैतिकता' असते. असे अशोक बाबर यांना वाटते. तर वासुदेव सावंत यांनी 'नवनैतिकता ही ब्राह्मणी (जुनी-खोटी) नीतीच्या परस्परविरोधी निर्माण झाली. अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यमूल्य याला नवनैतिकता म्हणता येते.' १९६० नंतर मराठी साहित्यात विविध प्रवाह निर्माण झाले आणि वेगवेगळ्या स्वरूपात साहित्य निर्माण होऊ लागेले. वास्तव आणि सत्याचा आविष्कार मराठी साहित्यात झाला. वासुदेव सावंत यांच्या मते वास्तवाचा आधार नसलेले, स्वार्थकेंद्री, जाणीवपूर्वक लिहिलेले, विशिष्ट चौकटीच्या बाहेर न जाणारे वास्तव सोडून जे जे आहे. त्याला सजवणारे साहित्य हे ब्राह्मणी साहित्य होय. अशा ब्राह्मणी साहित्यातील नीती स्वकेंद्रित आहे. तिला इतरांशी काहीही देणेघेणे नाही. म्हणून ब्राह्मणी साहित्यातील नैतिकता (जुनी) खोटी मानता येते. याउलट अब्राह्मणी साहित्यातील नवनैतिकता समाजसापेक्ष असल्याने नवनैतिक ठरते. वरील अभ्यासकांनी मांडलेल्या व्याख्यांवरून नवनैतिकतेचे स्वरूप समजावून घेता येते. नवनैतिकता म्हणूजे वास्तव परिस्थितीत मानवाने मानवता, सत्य, प्रमाणिकपणा, न्याय, जीवननिष्ठ आणि मूल्यनिष्ठ यांच्याशी बांधिलकी स्वीकारून केलेले आचरण होय. यामध्ये जुन्या रूढीग्रस्त नीतीमत्तेला विरोध करण्याचे सामर्थ्य आहे.

### ४.५. मराठी साहित्यातील देशीवादी विचार

वरील विवेचनानंतर मराठी साहित्यविश्वात वि. का. राजवाडे, भालचंद्र नेमाडे, म. सु. पाटील, अशोक बाबर, वासुदेव सावंत, गणेश देवी, रंगनाथ पठारे, राजन गवस, नीतीन रिंढे या समीक्षकांनी देशावादी विचार मांडला.

#### ४.५.१ वि. का. राजवाडे

वि. का. राजवाडे हे प्रामुख्याने इतिहासाचे लेखक. त्यांनी १८९८ ते १९२६ या काळात इतिहासाची साधने २२ खंडात लिहिली आहेत. मराठी भाषा आणि साहित्याच्या क्षेत्रात त्यांनी केलेले संशोधन महत्त्वाचे आहे. मराठी साहित्यावर इंग्रजी भाषेचे आक्रमण होत असताना स्वभाषेत लेखन करण्याची त्यांची वृत्ती देशीवादाचेच द्योतक आहे. राजवाडे यांच्या मते कोणताही लेखक हा मुळात देशीच असतो. या मतानुसार राजवाडे आपली भूमिका मांडतात. प्रत्येक लेखक जेव्हा काही निर्मिती करतो, तेव्हा त्याच्यासमोर त्याचा समाज, तिथला भूगोल, परिसर, भूमी आणि माणूस याचा विचार करत असतो. त्याचे लेखन त्या त्या परिसराशी निगडीत असते. त्यात वैश्विक असे काही नसते. त्यामुळे विशिष्ट देशातील लेखकाचे विधान दुसऱ्या देशात, भिन्न वातावरणात, भिन्न समाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीत लागू होणे शक्य नसते.

#### ४.५.२ भालचंद्र नेमाडे

१९८३ मध्ये 'साहित्यातील देशीयता' या निबंधातून भालचंद्र नेमाडे यांनी आपली देशीयतेविषयी भूमिका ठळकपणे मांडली आहे. यापूर्वी 'वारकरी चळवळीची आविष्कार शैली' (१९७९), 'भारतीयांचे इंग्रजी लेखन' (१९८१) या लेखातून ही भूमिका प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे व्यक्त झालेली आहे. मराठी साहित्यविश्वात भालचंद्र नेमाडे यांचा साहित्यविचार नेहमीच चर्चाविषय ठरला आहे. देशीवादाच्या आग्रही समर्थनापासून ते त्याच्या विरोधात अनेक वादळी चर्चा झडत आहेत.

भालचंद्र नेमाडे यांच्या देशीवादाचा विचार करता 'देशी याचा अर्थ त्या त्या भूमीशी जोडलेले असणे असा प्रायः होतो. खरे तर प्रत्येक वस्तू देशीच असेल, तर देशीपणाची चर्चा करण्याची गरजच काय? परंतु देशी नसलेल्या परक्या, बाहेरून येणाऱ्या अनेक मूल्यांचे, भाषांचे, संस्कृतींचे देशी मूल्यांवर, भाषांवर व संस्कृतींवर जेव्हा आक्रमण होते तेव्हा स्वतःच्या अस्तित्वासाठी मानवीसमूहांना देशीवादी व्हावे लागते. वस्तुतः देशीपणा ही अत्यंत स्वयंभू, झाडाझुडपांसारखी सोशिकपणे आपापल्या जागेवर उगवणारी व टिकून राहणारी संकल्पना आहे. परंतु तिलाही आक्रमक व्हावे लागते असे सांस्कृतिक कसोटीचे क्षण येतात. त्यावेळी अत्यंत नम्रतेने बोलणाऱ्या ज्ञानेश्वरालासुद्धा 'दाऊ वेल्हाळ देशी नवी' असे आक्रमक व्हावे लागते. किंवा भटोबासासारख्या गाढ्या पंडितालाही ' तुमचा अस्मात कस्मात मी नेणे गग : मज श्रीचक्रधरे, निरूपिली मऱ्हाटीः तियाचि पुसा :' असे 'संकुचित' किंवा 'दुराग्रही' व्हावे लागते. देशीपणाच्या संकल्पनेत स्थितिशीलत्व अबाधित राखणारी स्वाभाविक अवस्था, हा अर्थ अभिप्रेत असतो. देशीवाद या संकल्पनेत त्याच गुणांची लढाऊ वृत्ती, अवस्था, हा अर्थ अभिप्रेत असतो. देशीवादी ह्या संकल्पनेत त्याच गुणांची लढाऊ वृत्ती, आपल्या अस्तित्वाचा हक्क प्रस्थापित करण्याची आग्रही वृत्ती प्रकट होते. देशीवाद हा

अर्थातच देशीपणाची एक तात्कालिक अवस्था असते. देशीयता हा शब्द आपण ह्या दोन्ही अवस्थांना सामावणारा म्हणून वापरू.' (टीकास्वयंवर, पृ. १०५) असे नेमाडे यांचे मत आहे.

भालचंद्र नेमाडे यांनी देशीपणा आणि देशीवाद या दोन अवस्थांचा खुला केला आहे. त्यांच्या मते, देशीपणाचे तत्त्व कोणत्याही जिवंत समाजाच्या अस्तित्वांचे गमक असते मानववंशशास्त्रातील अभ्यासात हे तत्व गृहीत धरले जाते. मानववंशशास्त्रातील अभ्यासात कोणत्याही समाजाचे तत्त्व उच्च किंवा निच्च असे मानले जात नाहीत. कोणताही समाज हा आपापल्या जाणिवांशी, पर्यावरणाशी अपरिहार्यपणे जोडलेला असतो. त्या त्या समाजातील संरचनांमध्ये तो जगत असतो. जगण्याची ही नैसर्गिक शैली म्हणजे देशीपण असते. एकूण काय त्या त्या भूमीशी, संस्कृतीशी, परिसरांशी जोडून असणे म्हणजे देशीवाद असे स्पष्ट होते.

### ४.५.३ म. सु. पाटील

म. सु. पाटील यांनी देशीवादी वैशिष्ट्यांवर जास्त भर दिला आहे. कोणताही माणूस हा आचाराने विचाराने भाषेने, संस्कृतीने, मूल्यदृष्टीने स्वतःच्या भूमीशी स्वाभाविकपणे जोडलेला असणे ही गोष्ट देशीपणात गृहीत आहे. परंतु ही स्वाभाविक गोष्ट परकीय, विशेषतः पाश्चात्य आक्रमणामुळे टिकून राहणे टिकवून धरणे आज कठीण वाटू लागले आहे. म. सु. पाटील यांना असे वाटते की, 'परंपरेच्या आणि समानतेच्या जोखडात अडकलेला समाज वासाहातिक प्रभूत्व आणि जागतिकीकरणाचा रेट्याने चिकित्सक बाजून परंपरेच्या पाशातून मोकळा होतो आहे.' असा देशीवादी विचार म. सु. पाटील यांनी मांडला आहे.

### ४.५.४ गणेश देवी

साहित्यातील देशीवाद या संकल्पनेच्या मांडणीमध्ये गणेश देवी यांचेही नाव अग्रक्रमाने घेतले जाते. गणेश देवी यांनी 'आफ्टर ॲम्नेशिया-ट्रॅडिशन अँड चेंज इन इंडियन लिटररी क्रिटिसिझम' या पुस्तकातून देशीवादाविषयी सविस्तर चर्चा केली आहे.

'देशी' ही संज्ञा प्राचीन भारतात विविध बोली भाषांच्या भौगोलिक परिसीमा वर्णन करण्यासाठी वापरात आली. दंडीच्या 'काव्यादर्श' ह्या काव्यशास्त्रावरच्या ग्रंथात देशी म्हणजे 'विशिष्ट परिसरातील प्रचलित भाषा' ज्याला आधुनिक भाषाशास्त्रात Dialect म्हणता येईल. ही व्याख्या आढळते. 'देशी' भाषा देवभाषा संस्कृतपासून अमूलाग्र भिन्न नसते हे सांगताना दंडी 'तभ्दवस्तत्समो देशीप्यनेक : प्राकृतक्रमः' (काव्यादर्श, १-३३) असे मत व्यक्त करून प्राकृतचे तत्सम, तभ्दव व देशी हे तीन वर्णनपर प्रकार मान्य करतो.' (गणेश देवी, २००१, पृ.१८३). वरील संदर्भावरून आपल्या असे लक्षात येते की, प्राचीन भारतीय काव्यशास्त्रातील दंडी, मातंग इत्यादींचे संदर्भ देऊन मराठी भाषा निर्माण होण्यापूर्वीपासूनच मार्गी म्हणजे उच्चभ्रू किंवा सर्वव्यापी परंपरा आणि देशी म्हणजेच प्रादेशिक व लोकपरंपरा अशी संकल्पना अस्तित्वात असल्याचे जावणते.

'मराठीतील देशीवाद हा मराठी साहित्यशास्त्राला व समीक्षेला पाश्चिमात्य साहित्यशास्त्राच्या व पाश्चिमात्य समीक्षेच्या अतिरेकी प्रभावाच्या कोंडीतून मुक्त करण्याचा प्रयत्न आहे. इतर काही भारतीय

भाषातून-विशेषतः कानडी व गुजराती- अशाचे प्रकारचे प्रयत्न समकालीन लेखक, समीक्षक करत असल्याचे दिसते. देशीवादाच्या दृष्टीतून पाहिल्यास मराठी साहित्य हे मराठी भाषिक समाजानं निर्माण केलेल्या कृतींचे असून त्यात मराठी भाषा-संस्कृती मध्यवर्ती असावी हे भान आवश्यक बनते. लेखक व ज्या समाजासाठी तो वाटतो. त्या अर्थाने देशीवाद हा भाषा-विशिष्ट पद्धतीने साहित्याकडे पाहण्याचा प्रयत्न आहे. तो वैश्विक परिप्रेक्ष्याच्या संकल्पनांची समीक्षा नाकारतो. समीक्षेची मुख्य सूत्रे, तिचे मुख्य प्रश्न व साहित्यिक मुल्यामापनाचे मानदंड स्वतःच्या भाषा परंपरेतच उपलब्ध होऊ शकतात. असा आग्रह देशीवाद ठेवतो. केवळ मुख्य प्रवाहातील साहित्य हेच खरे व चांगले साहित्य आहे हा दावा देशीवाद अमान्य करतो. तर सर्व बोली, प्रादेशिक परंपरातून आलेले, अनेक समूहांचे साहित्य स्वीकारण्याकडे त्याचा कल आहे. त्यामुळे मराठीत जे प्रादेशिक, बोलीभाषा-आधारित, जाती-जनजातीतून लिहिले गेलेले असे सर्व नवे व मराठी भाषेच्या सर्व परंपरातून निर्माण झालेले साहित्य देशवाद स्वीकारताना दिसतो.' (गणेश देवी, २००१, पृ.१८३).

गणेश देवी यांचा देशीयतेकडे पाहण्याचा किंवा देशीवादी मांडणीचा दृष्टिकोन प्रामुख्याने भाषिक परंपरावर आधारित आहे. त्यांच्या भूमिकेमध्ये देशीवादाला अपेक्षित असणारी भूतकाळाची ओढ पाहावयास मिळते. भारतातील समृद्ध परंपरेचा आपल्याला विसर पडला आहे असे त्यांना वाटते. रूढी, परंपरा, चालीरिती, भूप्रदेश, समूहजण, संस्कृती, भाषा इ. घटकांसमवेत समाज स्थिरावलेला असतो. किंबहुना कालानुरूप या अवस्थेत नैसर्गिक बदल स्वाभाविकपणे होत राहतात. हा मानवी समूह हे बदल सहजपणे स्वीकारतात; परंतु हेच बदल मानवकृत असतील तर मग ते स्वकीयाकडून अन्य परकीयापासून होणारे असतील तर मात्र हा समूहवर्ग ही बदलाची प्रक्रिया स्वीकारत नाही. परिणामी या विरोधात बंड पुकारणे नेमकेपणाने या प्रक्रियेस 'देशीवाद' म्हणावे असा अर्थ उपरोक्त सांकल्पनिक मांडणीतून प्रत्ययास येतो.

### ४.५.५ रंगनाथ पठारे

रंगनाथ पठारे प्रामुख्याने कादंबरीकार आणि कथाकार म्हणून परिचित आहेत. त्यांचा 'जागतिकीकरण आणि देशीवाद' ही पस्तिका २००५ साली लोकवाङ्मय गृहाने प्रकाशित केली. रंगनाथ पठारे यांच्या मते, जागतिकीकरणात प्रतिसाद देणारा वर्ग म्हणजेच, ज्ञानेश्वरांपासून तुकारामापर्यंत यांचा देशी वारसा महत्त्वाचा आहे. इस्लामच्या आक्रमणात, अरबी, फार्शी, तुर्की अशा सगळ्या भाषांचे प्रभाव पचवत मराठी भाषा समृद्ध करत राहणारी संतांची हीच खरी देशी परंपरा आहे. भाषा, संस्कृती, मूल्यव्यवस्था यांचा संबंध आपल्या संबंध अस्तित्वाशीच असतो. आपलं स्वतंत्र सार्वभौम व्यक्ती म्हणून जगणंच तिच्या आत असतं. ती संपली की आपली सार्वभौमता संपते. आणि सार्वभौमताच संपली तर माणसाचं अस्तित्व केवळ परावलंबी सजीव, उपयोगी वस्तू, गुलाम किंवा दुय्यम, तिय्यम दर्जाचे नागरिक म्हणून शिल्लक राहते. म्हणूनच जे काही चांगलं अथवा वाईट आहे, ते संपवून किंवा टिकवून आपण आपल्याच निकषांवर जगणे, ही देशीवादी धारणा आहे. असे रंगनाथ पठारे यांचे मत आहे.

जागतिकीकरणामुळे आपल्याला जगण्याचे, टिकण्याचे आपले अस्तित्व जपण्याचे बळ केवळ देशीयता देते. जागतिकीकरणाला सामोरे जाताना सामान्य जनांसमोर देशीवादी असण्याचाच पर्याय शिल्लक आहे. असे

पठारे यांचे मत आहे. पुरुष व समाज हे एकक न धरता त्यातील प्रवृत्तींना एकक केल्यास या मर्यादांच्या प्रश्नांमधून रस्ता तर सापडतोच खेरीज देशीवादाच्या ही दोन सुस्पष्ट प्रवृत्ती ध्वनीत करता येत. कोणताही मानवी समाज वा मानवी समूह कोणत्याही काळात एकसंघ कधीच नसतो. त्याच्या अनेकविध प्रवृत्ती असतात. या प्रवृत्ती स्थूलमानाने दोन प्रकारात मांडता येतात किंवा त्यांची मांडणी दोन वर्गात करता येते, एक अभिजन वर्ग आणि दुसरा बहुजन वर्ग.

अभिजन वर्गामध्ये वेदप्रामाण्य, मनुसंहिताप्रणित चातुर्वर्ण्य मानणारी व्यवस्था समाविष्ट आहेत. ईश्वर आणि सामान्य माणूस यांच्यामध्ये धर्मगुरू, पुजारी, पुरोहित आवश्यक मानणारा किंवा त्यांचा पुरस्कार करणारा वर्ग. तर चार्वक, बुद्ध, आंबेडकर, गांधी, तुकाराम यांच्या समावेश बहुजन वर्गामध्ये रंगनाथ पठारे यांनी केला आहे. ईश्वर आणि भक्त नाकारणारा नवतेचा, आधुनिकतेचा स्वीकार करणारा, मानवी समतेचा पुरस्कार आणि परके प्रभाव पचविणारा असा वर्ग म्हणजे बहुजन वर्ग. असे ही रंगनाथ पठारे यांनी म्हटले आहे.

### ४.५.६ अशोक बाबर

अशोक बाबर यांचा या विषयावरील 'देशीवाद' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. साहित्यातील देशीवाद, देशी परंपरेचा शोध, देशी आधुनिकता, देशी संस्कृती, नवनैतिकता आणि भाषिक कृती या तत्त्वांच्या आधारे त्यांनी देशीवादी साहित्यविचाराचे स्वरूप विस्ताराने मांडले आहे. गौतम बुद्ध, चार्वाक, गुरूनानक, महात्मा फुले, राजारामशास्त्री भागवत, महर्षी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी ते राममानोहर लोहिया अशा देशी पूर्वपरंपरेचा शोध त्यांना महत्त्वाचा वाटतो. देशीयतेची तत्त्वे, वासहातिक मूल्ये, तथाकथित राष्ट्रवाद आणि नेमाडे यांची भूमिका, देशवादी भूमिकेच्या स्वतः नेमाडे यांनी मांडलेल्या मर्यादा असे एक सूत्र अशोक बाबर यांनी मांडले आहे.

### ४.६ समारोप

देशीवादाचा विचार करताना अभिजन देशीवाद, बहुजन देशीवाद असा भेदही निर्माण होताना दिसतो. वि. का. राजवाडे यांची भूमिका अभिजन देशीवादाकडे झुकणारी आहे. भालचंद्र नेमाडे यांचा देशीवाद हा बहुजन देशीवाद असल्याचे प्रतिपादन रंगनाथ पठारे यांनी केले आहे. भालचंद्र नेमाडे यांना वारकरी, महानुभाव या चळवळी आणि गौतम बुद्धांचे वेदांना नकार देणे या देशीवादी घटना वाटतात. या घटकात देशीवादाचे स्वरूप व संकल्पना समजून घेताना आपण भालचंद्र नेमाडे, वि. का. राजवाडे, गणेश देवी, म. सु. पाटील, रंगनाथ पठारे यांच्या मांडणीचा विचार केला आहे. राल्फ लिंटन या अभ्यासकाने अमेरिका आणि दक्षिण अफ्रिकेतील देशीवादी चळवळींच्या अभ्यासाला पद्धतीशास्त्राचे स्वरूप सांगितले आहे. जगातील प्रत्येक संस्कृती ही अपरिहार्यपणे त्या त्या भूमीशी जोडलेली असते. प्रत्येक समुहाचे स्वतःचे असे वैशिष्ट्य असते. संस्कृती असते आणि तिथला भूगोल, तिथले पर्यावरण यांच्याशी अपरिहार्यपणे जोडलेली असते. हे समूह आपआपल्या पर्यावरणात सहजपणे जगत असतात. नैसर्गिक शैलीत जगत असतात. पण जेव्हा या समूहांचा परकीय किंवा बाहेरील समूहांशी संपर्क येतो तेव्हा त्यांच्यात काही बदल होतात.

जगातील कोणताही समाज संस्कृती संपर्काशिवाय प्रगत होत नाही. परंतु दोन संस्कृतीमधील देवाणघेवाण ही एकतर्फी लादू पहाते तेव्हा त्या त्या समाजात स्वसंस्कृतीविषयीची आक्रमक भावना जन्म घेते. स्वसमाज, स्वसंस्कृतीच्या रक्षणासाठी ती विविध कृती करू लागते, या प्रक्रियेलाच देशीवादी जाणीव असे म्हटले जाते.

## ४.७ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

### ४.७.१ योग्य पर्याय निवडा

१. 'टीकास्वयंवर' हा ग्रंथ कोणाचा आहे.

१. रंगनाथ पठारे २. भालचंद्र नेमाडे ३. म. सु. पाटील ४. वासुदेव सावंत

२. अमेरिक मानवशास्त्र राल्फ लिंटन यांनी नेटिव्हस्टिक मुव्हमेंटस हा निबंध कोणत्या साली लिहिला

१. १९३२ २. १९४३ ३. १९९८ ४. १९४८

३. 'देशीवाद हा संस्कृतीसंपर्काचा परिणामातून उद्भवतो' असे मते कोणत्या अभ्यासकाने मांडले आहे.

१. भालचंद्र नेमाडे २. रंगनाथ पठारे ३. राल्फ लिंटन ४. म. सु. पाटील

४. 'एखाद्या समाजातील सदस्यांनी त्यांच्या संस्कृतीच्या निवडक पैलूंचे पुनरुज्जीवन करण्याचा वा त्यांना चिरस्थायित्त्व देण्याचा जाणीवपूर्वक व संघटनपणे केलेला प्रयत्न' अशी देशीवादाची व्याख्या कोणत्या अभ्यासकाने मांडली.

१. वासुदेव सावंत २. अशोक बाबर ३. राजन गवस ४. राल्फ लिंटन

५. 'जागतिकीकरण आणि देशीवाद' हा ग्रंथ कोणी लिहिला.

१. अशोक बाबर २. भालचंद्र नेमाडे ३. रंगनाथ पठारे ४. गणेश देवी

६. 'आफ्टर ॲम्नेशिया-ट्रॅडिशन अँड चेंज इन इंडियन लिटररी क्रिटिसिझम' या पुस्तकातून देशावादाविषयी सविस्तर चर्चा कोणी केली आहे.

१. राल्फ लिंटन २. नुगी उगी ३. रावसाहेब कसबे ४. गणेश देवी

७. इस्लामच्या आक्रमणात, अरबी, फार्शी, तुर्की अशा सगळ्या भाषांचे प्रभाव पचवत मराठी भाषा समृद्ध करत राहणारी संतांची हीच खरी देशी पंपरा आहे.

१. राल्फ लिंटन २. नुगी उगी ३. रंगनाथ पठारे ४. गणेश देवी

८. 'रा. रा. नेमाडे देशीवाद आणि THE WORLD IS FL' हा ग्रंथ कोणत्या लेखकाने लिहिला.

१. राल्फ लिंटन २. गणेश देवी ३. नीतीन वाघ ४. नीतीन रिंढे

९. 'देशीवादाचे दुश्मन' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

१. अशोक बाबर  २. नीतीन वाघ  ३. भालचंद्र नेमाडे  ४. वासुदेव सावंत

१०. 'परंपरेच्या आणि समानतेच्या जोखडात अडकलेला समाज वासाहातिक प्रभूत्व आणि जागतिकीकरणाचा रेट्याने चिकित्सक बाजून परंपरेच्या पाशातून मोकळा होतो आहे.' असा देशीवादी विचार केली मांडला आहे.

१. म. सु. पाटील  २. भालचंद्र नेमाडे  ३. रंगनाथ पठारे  ४. राजन गवस

**उत्तरे**

१. भालचंद्र नेमाडे  २. १९४३  ३. राल्फ लिंटन  ४. राल्फ लिंटन

५. रंगनाथ पठारे  ६. गणेश देवी  ७. रंगनाथ पठारे  ८. नीतीन वाघ

९. अशोक बाबर  १०. म.सु. पाटील

### ४.७.२ लघुत्तरी प्रश्न

१. भालचंद्र नेमाडे यांचा देशीवादी विचार स्पष्ट करा ?

२. देशीवादाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा ?

३. रंगनाथ पठारे यांचा देशीवादी विचार स्पष्ट करा ?

४. देशीवादाची संकल्पना स्पष्ट करा ?

### ४.७.३ दीर्घोत्तरी प्रश्न

१. मराठीतील देशीवादी साहित्याविचार स्पष्ट करा ?

२. देशीवादाचे स्वरूप सांगून देशीवादाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा ?

## ४.८ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ


१. कुलकर्णी, मा. गु : लिंटन राल्फ, विश्वकोश नोंद.

२. बाबर, अशोक : देशीवाद, साकेत प्रकाशन, औरंगाबाद

३. बाबर, अशोक : देशीवादाचे दुश्मन, हर्मिस प्रकाशन, पुणे

४. तवर, अशोक : नवनैतिकता आणि अनंत कदम यांचे साहित्य, तन्वी प्रकाशन, सातारा, २०१७

५. देवी, गणेश : देशीयतावाद (समीक्षेतील नव्या संकल्पना, संपा. डॉ. मनोहर जाधव), स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००१

६. देसाई, दत्ता : देशीवाद, आधुनिकता आणि जनवादी संस्कृती, हरिती पब्लिकेशन्स, मुंबई, २०१८

७. नेमाडे, भालचंद्र : टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००१

८. नेमाडे, भालचंद्र : निवडक मुलाखती, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००८

९. पठारे, रंगनाथ : जागतिकीकरण आणि देशीवाद, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००५

१०. भोळे, भा. ल : प्रस्तावना, एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य, खंड-१, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, २००८

११. वाघ, नितिन : रा. रा. नेमडे, देशीवाद आणि THE WORLD IS FL□, नवता प्रकाशन, मुंबई, २०१७

१२. रिंढे, नीतीन : मराठी कांबदरी पैस आणि परीघ, शब्द पब्लिकेशन, मुंबई, २०२१

❑❑❑